मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

सुधारित आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५२९२/०२

डॉ.के.एस.पिल्लई ----अपिलार्थी
बी-१/१ नारायणस पुजारी नगर,
अे.जी.खान रोड, वरळी,
मुंबई -४०० ०१८७

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी आरोग्य अधिकारी --उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका(सार्वजनिक आरोग्य विभाग)
एफ/साऊथ वॉर्ड इमारत, ३ रा मजला,डॉ.आंबेडकर रोड,
परेल, मुंबई १२

जन माहिती अधिकारी उप कार्यकारी अधिकारी
बृहन्मुंबई महानगरपालिका(सार्वजनिक आरोग्य विभाग)
एफ/साऊथ वॉर्ड इमारत, ३ रा मजला,डॉ.आंबेडकर रोड,
परेल, मुंबई १२

- विवेचन -

अपिलाचा दिनांक १२.११.२००९
सुनावणीची तारीख दि.४.२.२०१०
अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदाराच्या अर्जानुसार दि.७ जुलै २००९ रोजीच्या पत्रानुसार रुपये ४/- भरण्यास सांगितले होते. ते शुल्क भरुन त्यांनी माहिती प्राप्त करुन घेतलेली आहे. तसेच अर्जदारास अर्जदाराच्या दि.१२.६.२००९ रोजीच्या अर्जास दि.१०.८.२००९ रोजी पत्राने ८३०/- भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असे आदेश दिलेले आहेत. ही रक्कम अर्जदाराने न भरल्यामुळे त्यांना माहिती देण्यात आलेली नाही. अपिलीय अधिकारी यांनी अर्जदार हे महापालिकेच्या पब्लिक हेल्थ विभागात काम करीत असल्यामुळे त्यांना या सर्व माहितीची कल्पना आहे व त्यांना ही माहिती दिल्याने जन हित साध्य होईल असे वाटत नाही, असे आदेश देऊन अर्जदाराचे प्रथम अपिल फेटाळलेले आहे.

मागितलेल्या माहितीने जन हित साध्य होत नाही असे म्हणता येणार नाही. तसेच माहितीसाठी शुल्क मागण्याचे पत्रही एक महिन्यानंतर दिलेले आहे. अर्जदार याच विभागात काम करीत आहेत त्यांना प्रथम रुपये ८३०/- शुल्क असलेली माहिती दाखविण्यांत यावी व त्यातून ज्या कागदपत्रांची ते निवड करतील ती माहिती त्यांना विनाशुल्क देण्यांत नाही.

आदेश

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांकः ४.२.२०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

सुधारित आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५२९३/०२

डॉ.के.एस.पिल्लई ----अपिलार्थी
बी-१/१ नारायणस पुजारी नगर,
अे.जी.खान रोड, वरळी,
मुंबई -४०० ०१८७

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी आरोग्य अधिकारी --उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका(सार्वजनिक आरोग्य विभाग)
एफ/साऊथ वॉर्ड इमारत, ३ रा मजला,डॉ.आंबेडकर रोड,
परेल, मुंबई १२

जन माहिती अधिकारी उप कार्यकारी अधिकारी
बृहन्मुंबई महानगरपालिका(सार्वजनिक आरोग्य विभाग)
एफ/साऊथ वॉर्ड इमारत, ३ रा मजला,डॉ.आंबेडकर रोड,
परेल, मुंबई १२

- विवेचन -

अपिलाचा दिनांक १२.११.२००९
सुनावणीची तारीख दि.४.२.२०१०
अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदारास एकूण २० वर्षाचे टयुबरक्युलेसिस कंट्रोल सोसायटी मार्फत घेण्यांत आलेल्या सर्व प्रोजेक्टसूची इंतभूत माहिती मागितलेली आहे. अर्जदारास सदर माहिती देण्यांत आलेली आहे. त्यानंतर दि.१७.८.२००९ रोजी पत्र लिहून त्यांनी ९ मुद्यांवर माहिती देण्याची विनंती केलेली आहे. या मुद्यांपैकी जे मुद्दे मुळ अर्जात अंतर्भूत असतील त्याची माहिती देण्यांत यावी. मात्र अर्जदार यांनी किती वर्षाची माहिती पाहिजे याबाबत विवेक बाळगणे आवश्यक आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई (डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांकः ४.२.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

सुधारित आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५२९४/०२

डॉ.के.एस.पिल्लई ----अपिलार्थी
बी-१/१ नारायणस पुजारी नगर,
अे.जी.खान रोड, वरळी,
मुंबई -४०० ०१८७

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी आरोग्य अधिकारी --उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका(सार्वजनिक आरोग्य विभाग)
एफ/साऊथ वॉर्ड इमारत, ३ रा मजला,डॉ.आंबेडकर रोड,
परेल, मुंबई १२

जन माहिती अधिकारी उप कार्यकारी अधिकारी
बृहन्मुंबई महानगरपालिका(सार्वजनिक आरोग्य विभाग)
एफ/साऊथ वॉर्ड इमारत, ३ रा मजला,डॉ.आंबेडकर रोड,
परेल, मुंबई १२

- विवेचन -

अपिलाचा दिनांक १२.११.२००९
सुनावणीची तारीख दि.४.२.२०१०
अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदारास १९९६ पासून रिआर्गनायझेशन ऑफ दि मेडिकल केडर हेल्थ डिपार्टमेंटची माहिती पाहिजे होती. ही माहिती एकर फार विस्तृत स्वरुपाची आहे व तेव्हा अर्जदारास नेमकी कोणती माहिती पाहिजे असे विचारले असता मुळ प्रस्तावासंबंधी माहिती पाहिजे असे त्यांनी सांगितले. ही माहिती अर्जदारास ७ दिवसाचे आत देण्यांत यावी.
सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

आदेश

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई (डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांकः ४.२.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.१३३०/०२**

**श्री. संतोष महादु बागले** **अपिलार्थी**
**२१, उदयनगर विद्यावर्धिनी कॉलेज जवळ**
**साक्री रोड,धुळे**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी** ,धुळे **--उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी जिल्हाधिकारी** कार्यालय,धुळे

**- विवेचन -**

**अपिलाचा दिनांक १५.६.२००९**
**सुनावणीची तारीख दि.७.१२.२०१०**
**अपिलार्थी व अपिलीय अधिकारी,जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपिलार्थीनी दि.२२.३.२००९ च्या अर्जाव्दारे त्यांनी दि.२०.२.२००८ रोजी दिलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीच्या तपशिलाची मागणी केली. त्यांना माहिती न मिळाल्याने त्यांनी दि.२.५.२००९ रोजी प्रथम अपील केले. परंतू त्यांना माहिती मिळाली नाही. यास्तव त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.**

**व्दितीय अपिलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी सादर केले की, अपिलार्थीनी श्री.एस.आर.पाटील,नायब तहसिलदार (तत्कालीन तलाठी) यांच्या विरुध्दच्या विभागीय चौकशी विषयी कागदपत्रे मागितली असून ती त्यांना देण्यांत येत आहेत. श्री. पाटील हे सध्या तहसील कार्यालय शिरपूर येथे नायब तहसिलदार (दुस-या ठिकाणी) संवर्गात कार्यरत असल्याने त्यांची चौकशी करण्यांत विलंब लागला असे अपिलीय अधिकारी यांनी सांगितले. जन माहिती अधिकारी माहिती देण्यास तयार असल्याने त्यांना निर्देश देण्यांत येतात की, अपिलार्थीच्या मागणीप्रमाणे त्यांना ५ दिवसांत माहिती पुरविण्यांत यावी.**

आदेश

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांकः ४.२.२०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**सुधारित आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५२०९/०२**

**श्री. विजयकुमार शंकरराव होटकर ----अपिलार्थी**
**१-बी ज्४०५ संदिप को.ऑ.सोसायटी**
**देवरत्न नगर, सायन चुनाभटटी,**
**मुंबई.**

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा संचालक, --उत्तरवाद
राज्य कामगार विमा योजना, एम.जी.एम.हॉस्पीटल,
३ रा मजला डॉ.एस.एस.राव मार्ग, परेल मुंबई १२

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी**
राज्य कामगार विमा योजना, एम.जी.एम.हॉस्पीटल,
**३ रामजला डॉ.एस.एस.राव मार्ग, परेल मुंबई १२**

**- विवेचन**

**अपिलाचा दिनांक ५.१०.२००९**
**सुनावणी दिनांक १५.१.२०१०**
**अपिलार्थी अनुपस्थित व अपिलीय अधिकारी उपस्थित**

**अर्जदारास उपकरण फार्मा आणि इतर कंपनीकडून आयुर्वेदिक औषधांविषयी माहिती पाहिजे होती. यातील ११ मुद्यांपैकी फक्त दोन मुद्यांची माहिती देण्यांत आलेली असून ९ मुद्यांची माहिती देण्यांत आलेली नाही. सदरील मुद्यांच्या बाबतीतील सर्व कागदपत्रे ही सार्वजनिक आरोग्य विभागाला पाठविण्यांत आलेली आहे असे सांगण्यांत आलेले आहे व असे आदेश देण्यांत येत आहेत की, जन माहिती अधिकारी यांनी स्वत: सार्वजनिक आरोग्य विभागाकडे जाऊन संबंधित कागदपत्र प्राप्त करुन घेऊन त्यातील माहिती अर्जदारास देऊन परत सदर नस्ती संबंधित विभागास परत पाठविण्यांत यावी. सदरील कार्यवाही २० दिवसांत पूर्ण करावी. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.**

आदेश

अपील मान्य करण्यांत येत आहे.

**मुंबई (डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांक: ९.२.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५३०४/०२

डॉ.प्रशांत जयमल्हार बिडवई — अपिलार्थी
श्री रामदर्शन अपार्टमेंट २ रा मजला,
सानेनगर बदलापूर ता.अंबरनाथ ठाणे

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलिस उपआयुक्त --उत्तरवादी
चेंबूर, मुंबई ७१

जन माहिती अधिकारी उप कार्यकारी अधिकारी
चेंबूर, मुंबई ७१

- विवेचन -

अपिलाचा दिनांक १६.११.२००९
सुनावणीची तारीख दि.९.२.२०१०
अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित.

सदरील प्रकरणामध्ये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अर्जदारास हवी असणारी माहिती देण्यांत यावी असे निर्देश दि.२५.९.२००९ रोजी देण्यांत आले. जन माहिती अधिकारी यांनी वरिष्ठ पोलिस निरिक्षक, चेंबूर, पोलिस ठाणे यांचा प्राप्त झालेला अहवाल दि.१२.१०.२०१० रोजी अर्जदारास दिलेला आहे. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अर्जदाराने दुसरे अपील सादर केलेले आहे.

अपिलाच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित होते. त्यामुळे कोणत्या मुद्दयावर समाधान झाले नाही हे समजू शकले नाही. तरी पण पुढील दोन मुद्यांच्या बाबतीत मतभेद असावेत असे वाटते्. दोषारोपाच्या प्रती बाबत ११ वे न्यायालय, कुर्ला, मुंबई यांनी अर्जदाराने ॲफिडेव्हिड सादर करुन व दोषरोप पत्राची मागणी करावी असे निर्देश दिलेले आहे असे जन माहिती अधिकारी यांनी निवेदन केले आहे त्याप्रमाणे अर्जदाराने न्यायालयातून ती प्रत मिळवावी

अर्जदारास आरोपीचा पोलिसांनी घेतलेला जबाब याची प्रत पाहिजे ती देण्यांत आलेली नाही. न्यायालयासमोर सदर कागदपत्राची प्रत देण्यांत आलेली नाही म्हणून ही प्रत दिलेली नाही. मात्र आरोपाचा जबाब घेतलेला असल्याने ती तो जबाब म्हणजे पोलिस स्टेशनच्या रेकॉर्डचा प्रत भाग बनतो त्यामुळे ती प्रत अर्जदारास देण्यास हरकत नाही व ती देण्यात यावी. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे. वर दर्शविल्याप्रमाणे  जबाबाची प्रत अर्जदारास देण्यांत यावी.

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांकः ९.२.२०१०** **राज्य  मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५३६६/०२

श्री.सुदिन रमेश प्रधान — अपिलार्थी
३४/१२३६, सुभाषनगर, चेंबूर,
मुंबई ४०० ०७१

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा प्रमुख अभियंता — --उत्तरवादी
(पर्जन्य जल वाहिन्या)महापालिका इमारत,
ना.म.जोशी मार्ग, मुंबई ११

जन माहिती अधिकारी उपप्रमुख अभियंता (पूर्व उपनगरे)
पंतनगर गॅरेज इमारत, घाटकोपर पूर्व
मुबई ४०००७५

- विवेचन -

अपिलाचा दिनांक २२.१०.२००९
सुनावणीची तारीख दि.१५.२.२०१०
अपिलार्थी,अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदारास पुढील माहिती पाहिजे होती :-

१.पर्जन्य जल वाहिन्याचे सुभाषनगर वसाहतीतील जाळे/लेआऊट मिळावा

२. प्रमुख अभियंता पर्जन्य जल वाहिन्या सिमेंट गोडाऊन भायखळा

३.भदाणे कार्यकारी अभियंता घाटकोपर विभाग मुंबई मंडळ म्हाडा

४.श्री. खान देखभाल विभाग मुंबई म्हाडा नं. ३३६

अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांचे म्हणण्यानुसार सुभाष नगरच्या पर्जन्य जल वाहन्याचे लेआऊट बाबतची माहिती म्हाडाशी संबंधित असल्याने त्या अर्जाची प्रत म्हाडाकडे पाठविण्यांत आलेली आहे.

सुनावणीच्या वेळी म्हाडाचे अधिकारी उपस्थित होते. अर्जदाराला त्यांनी मगितलेले नकाशे तर म्हाडाने द्यावे व अर्जदाराची सोसायटीचे ड्रेनेज संबंधीची ज्या तक्रारी असेल त्या दूर करण्याच्या संदर्भात दि.१७.२.२००१० रोजी सकाळी ११.३० वाजला म्हाडा व महापालिकचे अभियंते यांनी एकत्र येऊन अर्जदाराच्या तक्रारीचे निवारण करण्याचा प्रयत्न करतील असे संबंधित अधिका-यांनी सांगितले. सबब पुढील आदेश देण्यांत येत आहे.

आदेश

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई — (डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांकः १५.२.२०१० — राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५३६५/०२

श्रीमती इला बलदेव — अपिलार्थी
बी-०१ बांगड नगर,
रामदेव पार्क रोड, मिरा रोड पूर्व जि.ठाणे

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अभियंता — --उत्तरवादी
(इमारत प्रस्ताव )पश्चिम उपनगरे-१ वांद्रा मुंबई ५०

जन माहिती अधिकारी उपप्रमुख अभियंता (इमारत प्रस्ताव )
(इमारत प्रस्ताव )पश्चिम उपनगरे-१ वांद्रा मुंबई ५०

- विवेचन -

अपिलाचा दिनांक १९.११.२००९
सुनावणीची तारीख दि.१५.२.२०१०
अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदारास जुहू क्लब मिलेनियम इमारत बाबतची माहिती पाहिजे होती. व या इमारतीच्या बांधकामाविषयी आलेल्या तक्रारी व त्यावर झालेली कार्यवाहीची माहिती पाहिजे होती.

अर्जदाराला हवी असणारी माहिती ब-याच मोठया स्वरुपाची असल्यामुळे अर्जदारास कागदपत्रे दाखविण्यांत आली परंतू अर्जदाराचे म्हणणे असे की, "माझ्या कागदपत्राची गरज मी स्पष्ट केलेली आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास हवी असलेली माहितीच्या नस्तीचे निरिक्षण करुन त्यांना हव्या असलेल्या कागदपत्राचे किती पैसे भरावयाचे ते कळवावे. " प्रथम दर्शनी नस्ती पाहण्यासाठी कळविले यात काही गैर नाही. परंतू अर्जदाराची विनंती लक्षात घेता, आयोगापुढील सुनावणीच्या वेळेला पुढीलप्रमाणे कागदपत्र शुल्क भरुन देण्यांत यावेत हे संबंधितांशी चर्चा करुन निश्चित करण्यांत आले.

१. विकासकाने सादर केलेले प्लॅन
२. आय.ओ.डी. ची प्रत,
३. बांधकामाबाबत असलेल्या तक्रारी व त्याबाबतच्या कार्यवाहीची प्रत.

वरील माहिती अर्जदारास शुल्क भरल्यानंतर देण्यांत यावी. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.

आदेश

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई — (डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांकः १५.२.२०१० — राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५३७१/०२**

**श्री. दत्तात्रय गुंडू अत्याळकर** **अपिलार्थी**
**अपीलकार आणि सरचिटणीस**
**महाराष्ट्र सुरक्षा रक्षक आघाडी,**
**१ञ४, श्रमिक (रॉयल केस्ट)प्लॉट नं.३१**
**लोकमान्य टिळक कॉलनी रोड नं.३**
**दादर (पूर्व)मुंबई ४००० ०१४**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष, सुरक्षा रक्षक** **--उत्तरवादी**
**मंडळ, बृहन्मुंबई मुंबई व ठाणे कॉपर रोलर मिल कपांऊड**
**एल.बी.द ास मार्ग, भांडूप मुंबई. ७८**

**जन माहिती अधिकारी उपप्रमुख अभियंता (इमारत प्रस्ताव )**
**मंडळ, बृहन्मुंबई मुंबई व ठाणे कॉपर रोलर मिल कपांऊड**
**एल.बी.दास मार्ग, भांडूप मुंबई. ७८**

**- विवेचन -**

**अपिलाचा दिनांक २१.११.२००९**
**सुनावणीची तारीख दि.१५.२.२०१०**
**अपिलार्थी, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**सुनावणीच्या वेळेला अपिलार्थी यांनी सुरक्षा रक्षक मंडळ, बृहन्मुंबई व ठाणे यांनी त्यांना हवी असलेली माहिती दिलेली असल्यामुळे अपिल मागे घेण्यांत येत असल्याचे आयोगास लेखी पत्र सादर केलेले आहे, सदर अपील मागे घेण्यास परवानगी देण्यांत येत आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.**

आदेश

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांकः १५.२.२०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५४१०/०२

श्री.अपूर्व चक्रवर्ती, अपिलार्थी
प्लॅट नं.४२, अे विंग वृषपर्व इमारत सेंटर,
३ सृष्टी कॉम्पलेक्स,
मिरा रोड, पूर्व जि.ठाणे

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलिस उपायुक्त --उत्तरवादी
परिमंडळ-६ चेंबूर पूर्व मुंबई ७१

जन माहिती अधिकारी सहायक पोलिस आयुक्त,
पूर्व प्रादेशिक विभाग कार्यालय चेंबूर मुंबई ७१

- विवेचन -

अपिलाचा दिनांक १.१२.२००९
सुनावणीची तारीख दि.२२.२.२०१०
अपिलार्थी, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदारास जी माहिती पाहिजे आहे त्या संदर्भात पोलिस ठाणे चेंबूर यांनी केलेल्या अर्जदाराच्या तक्रारीवरुन चौकशी अंती पुढीलप्रमाणे खुलासा सादर केलेला आहेः-

अर्जदार श्री.अपूर्व चक्रवर्ती यांची मुख्य तक्रार अशी आहे की, अर्जदार यांनी सन १००६ मध्ये पांजरापोळ शनिमंदिर चेंबूर मुंबई ७४ येथे नऊ मटक्याची पुजा केलेली आहे. सदर पुजेच्या वेळेस शनिमंदीरातील स्वामीने अर्जदार यांच्या डोक्यात कावळया सारखी छोटी अदृश्य शक्तीने प्रवेश केलेला आहे. तेव्हापासून त्यांच्या मेंदूवर पूर्णपणे नियंत्रण शनिमंदीरातील स्वामीजीचे आहे. त्यामुळे अर्जदार हे ज्या ठिकाणी पुजेला जातील अथवा कोणत्याही त्यांच्या फिल्म बनविण्याच्या कामासंबंधी कोणास भेटण्यास जातील त्यावेळी शनिमंदिरातील स्वामीजी हे कावळा व कबुतर बनुन अर्जदार ज्या ठिकाणी जातील व अर्जदार यांच्या कामात व्यत्यय आणतील तसेच आज पर्यत त्यांनी ८ ते ९ फिल्म पटकथा इंग्रजी व हिंदीतून लिहिलेली असुन जगात वेगवेगळया ठिकाणी मंजूरीसाठी पाठविलेल्या आहेत. परंतू स्वामीजी हे सदर पटकथा मंजुर होऊन देत नाहीत अशा प्रकारे मोठया प्रकाराचा गुन्हे शनिमंदीरातील स्वामीजी करीत आहेत. अशी त्यांची मुख्यत्वे तक्रार आहे.

एकंदर केलेले चौकशी वरुन अर्जदार यांनी स्वामीजी विरुध्द केलेल्या तक्रारीची आजच्या वैधानिक परिस्थितीत कोणताही आधार नाही. शनिमंदिरातील स्वामीजी अर्जदार ज्या ठिकाणी जातात त्या ठिकाणी कावळा व कबुतर बनुन जाणे हि कधीही शक्य होणारी बाब नाही. अर्जदार यांच्या पत्नीने एका वर्षातच अर्जदार यांच्या बरोबर घटस्फोट घेतलेला आहे. यावरुन

अर्जदार यांची मानसिक स्थितीत बरोबर नसल्याचे दिसुन येते आहे. आजच्या वैधानिक युगात माणसाने कावळा, कबुतर बनने तसेच कोणाचे काम कावळा कबुतर बनुन होऊ न देणे हि न समजणारी बाब असून त्याला कोणताही आधार नाही म्हणून तक्रार अर्जावरुन कोणतही दखलपात्र गुन्हा निष्पन्न होत नाही. अर्जदार यांच्या बोलण्यावरुन अर्जदार हे मानसिक रुग्ण असल्याचे दिसून येत आहे.

या संदर्भात मिळालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अर्जदाराने जे प्रथम अपिल केले हाते त्यावर निर्णय देताना प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पुढील प्रमाणे आदेश दिलेले आहेत.

अपिलाकारास माहिती अधिकार अधिनियमाखाली अर्ज केल्याप्रमाणे रेकॉर्डवर उपलब्ध असलेली सर्व माहिती देण्यात आलेली आहे व पोलिस स्टेशने केलेल्या चौकशीने अर्जदाराचे समाधान झाले नसेल तर अपिलार्थी यांनी याबाबत स्वतंत्र अर्ज करावा.

सुनावणीच्या वेळेलाही अर्जदार यांची तक्रार माहितीने समाधान झालेले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. याबाबतीत आयोग काही करु शकत नाही असे वाटते. अर्जदाराने दिलेल्या अर्जाच्या चौकशीच्या पध्दतीबाबत समाधान नसेल तर पोलिस स्टेशनच्या वरिष्ठ अधिकारी प्रशासनाकडे तक्रार करणे संयुक्तिक राहील. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.

## आदेश

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक: २२.२.२०१०

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५४११/०२

क्र. मुमाआ-२००९/तक्रार क्र.७२४/०२

श्री.वसंत एम.आदितीरावीतार — अपिलार्थी

ग्रीन हील सीएचएम

२५/ब प्लॅट नं.४०२ न्यू दिंडाशी,

गोरेगांव पूर्व मुंबई ६५

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी --उत्तरवादी

अतिक्रमण यांचे कार्यालय,

गृहनिर्माण भवन, तळमजला रु.न.६८

वांद्रे पूर्व मुंबई ५१

जन माहिती अधिकारी तहसिलदार अतिक्रमण/निष्कासन

अतिक्रमण यांचे कार्यालय,

गृहनिर्माण भवन, तळमजला रु.न.६८

वांद्रे पूर्व मुंबई ५१

- विवेचन -

अपिलाचा दिनांक १.१२.२००९ व तक्रार दि.२२.१.२०१०

सुनावणीची तारीख दि.२२.२.२०१०

अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदाराच्या अपिलाच्या संदर्भात प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन दिलेले आहे.

अर्जदार श्री. वसंत एम.आदीतीवार यांनी या कार्यालयास दि.२०.८.२००९ रोजी माहितीचा अधिकार २००५ अंतर्गत अर्ज सादर करुन खालील मुद्दयांवर माहिती मागविली होती.

१. न.भू.क्र.१६१० अं.भूं.क्र.१६ टीपीएस-६ दौलतनगर, सांताक्रुझ (पश्चिम)येथील राबविण्यांत येणा-या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील डी.क्र.२५६ संदर्भात परि-२ ची प्रत.

२. उपजिल्हाधिकारी (अति-निष्का)अंधेरी यांनी ि.१८.४.२००६ रोजी नोटीस क्र.डी-२५६ अंतर्गत क्र.उजि/अनि/निष्का/अंधेरी/दौलतनगर/२००६/११९ मध्ये घेतलेल्या सुनावणीच्या निर्णयाची प्रत.

अर्जदार श्री.वसंत एम.आदीतीवार यांच्या उपरोक्त मुद्दयास अनुसरुन त्यांना माहिती अधिकारी तथा तहसिलदार (अति/निष्का)बांद्रा यांनी पत्र क्र.उ.जि./अ.नि./बांद्रा/टै.नं.४/ एस.आर.२०७/०९ दि.४.९.२००९ अन्वये योग्यते उत्तर दिलेले आहे. तथापी त्यांचे सदरील उत्तरास

समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रकरणी प्रथम अपिल दि.६.१०.२००९ रोजी दाखल केले. त्यांच्या सदरहूं अपिल अर्जास अनुसरुन दि.३०.१०.२००९ रोजी सुनावणी ठेवण्यांत येऊन दि.३०.१०.२००९ रोजी सुनावणी न झाल्याने ती पुढील दि.४.११.२००९ रोजी सुनावणी ठेवण्यांत आली. दि.४.११.२००९ रोजी अपिलकार सुनावणीस हजर होते. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (अति/निष्का)बांद्रा यांजकडे त्यांनी मुद्दा उपस्थित केला की त्यांना माहिती अधिकारी यांजकडून ६ दिवस उत्तर उशिरा मिळाले आहे व उत्तर अपूर्ण आहे. तसेच उपजिल्हाधिकारी (अति/निष्का)अंधेरी यांनी दि.१८.४.२००६ अन्वये दिलेल्या नोटीसीवर काय निर्णय घेण्यांत आला याची प्रत द्यावी. तसेच डी.क्र.२५६ बाबत परि-२ तयार झाले असल्यास त्याची प्रत द्यावी त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयास अनुसरुन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यांत आले की, त्यांनी १० दिवसांत उपरोक्त नोटीसीवर काय कारवाई झाली. त्याबाबत आदेश झाले असल्यास त्याची प्रत अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावी. तसेच डी.क्र.२५६ बाबत परि-२ तयार झाले आहे काय याची खात्री करुन असल्यास त्याची प्रत उपलब्ध करुन द्यावी. सदरहूं सुनावणीस अनुसरुन प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) बांद्रा यांनी दि.७.११.२००९ रोजी योग्यते आदेश जारी केले व माहिती अधिकारी तथा तहसिलदार (अति/निष्का) बांद्रा यांना आदेश निर्गमित झाल्यापासून कारवाई करण्याचे निर्देश दिले. सदरहूं आदेशानुसार अपिलकर्ता यांनी सुनावणीमध्ये उपस्थित केलेल्या मुद्यास अनुसरुन डी.क्र.२५६ बद्दल प्रश्नांकित झोपडीचे पात्र/अपात्रतेबाबत दि.१७.११.२००९ रोजी योग्यते आदेश निर्गमित करण्यांत आले आहेत. सदरहूं आदेश त्यांनी दि.१८.११.२००९ रोजी या कार्यालयातून प्राप्त करुन घेतले आहेत.

या कार्यालयाच्या दि.१७.११.२००९ च्या आदेशाविरुध्द अपिलकार यांनी मा.विभागीय आयुक्त कोकण विभाग यांजकडे क्र.अपिल/डेस्क/स्लम/९७३/०९ अन्वये अपिल दाखल केले आहे.

प्रकरणी सादर करण्यांत येते की, मौजे दौलतनगर, चुनाभट्टी सांताक्रुझ (प)येथे विकासक मे.पायोनिअर इंडिया डेव्हलपर्स यांचेतर्फे राबविण्यांत येणा-या झोपडपट्टी पुनर्वसन योजनंतर्गत एकूण ३९८० झोपडपट्टीधारक असल्याचे प्रतिज्ञापत्र झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने मा.उच्च न्यायालय,मुंबई येथे दाखल केले आहे व एकूण ३९८० झोपडीधारकांचे परि-२ अपर जिल्हाधिकारी (अति-निष्का) पश्चिम उपनगर यांचे कार्यालयाकडून तयार करण्यांत आले आहे. अंदाजित ७०० च्या वर झोपडीधारक परि-२ बाहेरील आहेत. त्यांची परि-२ मध्ये नांवे अंतर्भूत नाहीत. त्यांना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने डी.क्र.देऊन त्यंचे अर्ज या कार्यालयात योग्यत्या निर्णयासाठी पाठविलेले आहेत. परंतू त्यांच्या झोपडीच्या पात्रतेबद्दल निर्णय घेण्यासाठी येणा-या कायदेशीर अडचणीबद्दल प्राधिकरणास या कार्यालयातर्फे दि.८.७.२००९ रोजी योग्यते पत्र पाठवून प्राधिकरणाकडून अभिप्राय मागविणेत आला होता. प्राधिकरणाकडील अभिप्राय अद्याप प्रलंबित आहे. प्रकरणी अपिलकार यांना त्यांचे माहितीच्या अधिकारातील अर्जास तसेच अपिल अर्जास अनुसरुन योग्यती माहिती पुरविण्यांत आलेली आहे.

मात्र अर्जदाराचे म्हणणे असे की, दि.१८.४.२००६ रोजी अपिलीय अधिकारी -यांनी जे निर्देश दिले होते त्या निर्देशाच्या बाबतीत कार्य निर्णय घेण्यांत आला. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, या संदर्भातील सर्व कागदपत्रे एस.आर.ए. कार्यालयाकडे पाठविण्यांत आली होती. त्यावर अपिलकर्त्याचे म्हणणे असे की, याबाबत झोपडपट्टी पुनर्वसन

**प्राधिकरणाकडे पाठपुरावा केला होता व त्यांना त्या प्राधिकरणाकडून असे कागदपत्र प्राप्त झलेले नाहीत असे कळविण्यांत आलेले आहे. तेव्हा ज्या पत्रासोबत ही कागदपत्रे पाठविण्यांत आले त्या पत्राची नक्कल प्रत व संबंधित रजिस्टरमध्ये त्यांची नोंद असेल त्याची प्रत अर्जदारास देण्यांत यावी. पात्रता अपात्रेतच्या विषयाबाबत अंतिम निर्णय विभागीय आयुक्त कार्यालयाचा असतो असे निर्णय पारित करण्यांत आले आहेत किंवा नाही याबाबतचा रेकॉर्ड जन माहिती अधिकारी यांनी तपासणे आवश्यक असते. सदर रेकॉर्ड तपासून अर्जदारास सदर माहिती एक आठवडयात पाठविण्यांत यावी. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.**

आदेश

अपिल निकाली काढण्यांत येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी उपनिर्दिष्ट कारवाई करावी.

**मुंबई** — **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांक: २२.२.२०१०** — **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५४४०/०२

श्री.विल्सन सी. ॲन्थोनी — अपिलार्थी
४०४, समंदा अरुणोदय नगर,
मुलूंड पूर्व मुंबई ८१

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक --उत्तरवादी
सहकारी संस्था यांचे कार्यालय,
म्हाडा इमारत, वांद्र पूर्व मुंबई ५१

जन माहिती अधिकारी उपनिबंधक
सहकारी संस्था यांचे कार्यालय,
म्हाडा इमारत, वांद्र पूर्व मुंबई ५१

- विवेचन -

अपिलाचा दिनांक १८.१२.२००९
सुनावणीची तारीख दि.२४.२.२०१०
अपिलार्थी, सहायक जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदाराने राष्ट्र सारथी संपदा को-ऑप-सोसायटी लि.संस्थेच्या बाबतीत काही माहिती मागितलेली होती व दि.१७.११.२००९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशात सुध्दा अर्जदारास हवी असलेली माहिती १५ दिवसांत देण्यांत यावी असे निर्देश देण्यांत येऊन सुध्दा माहिती न मिळाल्याचे दर्शवून व्दितीय अपिल सादर केलेले आहे.

सुनावणीच्या वेळेला अर्जदारास डिसेंबर महिन्यात पत्र लिहून अर्जदाराने मागितलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची आहे त्यामुळे ती देता येत नाही असे अर्जदारास कळविलेले आहे.

एखादया प्रथम अपिलीय अधिकारी यांनी निर्देश दिल्यानंतर ही माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची आहे म्हणून ती देता येत नाही हा मुद्दा शिल्लक रहात नाही. जन माहिती अधिकारी यांनी प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती देता नाही अथवा प्रश्न स्वरुपात माहिती विचारता येणार नाही असे नाही हे लक्षात घ्यावे प्रश्नाचा रोख विचारात घेऊन जी कागदपत्र उपलब्ध असतील ती कागदपत्र दिली तरी जन माहिती अधिकारी यांचेवर सोपविलेली जबाबदारी पार पाडल्यासारखे होईल. अर्जदाराचा अर्ज साधारणतः प्रशासकाची नियुक्ती, प्रशासकिय मंडळाची नियुक्ती तसेच प्रशासकिय मंडळाच्या सदस्य संख्येत केलेली वाढ वगैरे बाबतची आहे. या सर्व निर्णयाची काही तरी कारणमिमांसा निश्चित असणार व संबंधित नस्ती आणि नस्तीतील नोटींग साईडला कारणमीमांसा निश्चितपणे सापडू शकते. म्हणून अर्जदाराच्या प्रश्नाचा रोख लक्षात घेऊन अर्जदारास योग्यत्या कागदपत्राच्या फोटोकॉपी देण्यांत याव्यात. एकतर उशिरा पत्र देण्यांत आलेले

**आहे व ज्या तारखेला त्या पत्रावर तारीख आहे त्या तारखेच्या २०-२५ दिवसांतनंतर पत्र पोष्टात टाकण्यांत आलेले आहे. माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २० अन्वये संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर १५ दिवसाच्या विलंबाची शास्ती म्हणजे १५x २५० = रु.३७५० एवढी शास्ती लादण्यांत येत आह ती प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिका-यास दि.१ एप्रिल २०१० रोजी मिळणा-या वेतनातून वसूल करुन शासनाने विहित केलेल्या बजेट हेड खाली जमा करावी व त्याचा अनुपालन अहवाल प्रधान सचिव, सहकार विभाग व आयोगास दि.१५ एप्रिल २०१० पर्यत पाठवावा. सबब पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.**

आदेश

अपिल मान्य करण्यांत येत आहे.

वर निर्देश दिल्याप्रमाणे कार्यवाही करावी. त्या आदेशाची प्रत प्रधान सचिवए सहकार विभाग यांना देण्यांत यावी.

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांक: २३.२.२०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५४५२/०२**
**क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५४५३/०२**
**क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५४५४/०२**
**क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५४५५/०२**
**क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५४५६/०२**

**श्री.शंकर के. ठाकूर** **अपिलार्थी**
**प्लॅट न.५०१ श्री.विनायक सीएचएस लि.**
**इमारत क्र.२, ९० फूट रोड,**
**पंतनगर कॉलनी, घाटकोपर पूर्व मुंबई ७५**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य अधिकारी** **--उत्तरवादी**
**कोकण गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, पोटमाळा,वांद्रे पूर्व मुंबई ४०० ०५१**

**जन माहिती अधिकारी इस्टेट मॅनेजर**
**कोकण गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,**
गृहनिर्माण भवन, पोटमाळा,वांद्रे पूर्व मुंबई ४०० ०५१

**- विवेचन -**

**अपिलाचा दिनांक १८.२ २००९**
**सुनावणीची तारीख दि.२५.२.२०१०**
**अपिलार्थी व सहायक जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अर्जदाराने दि.११.२.२०१० रोजीच्या पत्राने आयोगास असे कळविले आहे की, वरील सर्व ५ अपिलानुसार मागितलेली सर्व माहिती मिळालेली आहे व त्यामुळे ही ५ ही अपिले अपिलार्थी मागे घेऊ इच्छित आहेत. तसेच वरील सर्व अपिलात माहिती मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त केलेले आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.**

आदेश

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांक: २५.२.२०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.१४७०/०२**

**श्री.गोविंद पर्वतराव मोरे** **अपिलार्थी**
**रेश-पर्व, आनंद नगर,**
**सोमगांव ता.मालेगांव जि.नाशिक**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक)** **--उत्तरवादी**
**जिल्हा परिषद नासिक**

**जन माहिती अधिकारी मुख्याध्यापक**
**गोविंदराव यशवंतराव पाटील विद्यालय,**
**जळगांव (नि)ता.मालेगांव जि.नासिक**

**- विवेचन -**

**अपिलाचा दिनांक २८.७.२००८**
**सुनावणीची तारीख दि.२१.१२.२००९**
**अपिलार्थी गैरहजर व अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपिलार्थीनी दि.२५.२.२००८ च्या अर्जाव्दारे सन २००३ ते आजपर्यतच्या कालावधीची विविध प्रकरणी एकूण १२ मुद्यांवर माहिती मागितली. तथापि त्यांच्या माहिती अर्जाना उत्तर न आल्याने त्यांनी दि.१९.३.२००८ रोजी प्रथम अपील केले. यानंतर सुध्दा त्यांना माहिती मिळू शकली नाही. यास्तव त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.**

**व्दितीय अपिलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, अपिलार्थीना १० दिवसांच्या आत माहिती देण्यास ते तयार आहे. यावर आयोगाचे असे निर्देश आहेत की, अपिलार्थीना त्यांच्या माहिती अर्जानुसार विनाशुल्क माहिती पुरविण्यांत यावी.**

आदेश

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांकः २५.२.२०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४७१०/अपील क्रमांक ५२९१/०२

श्री.भगवानजी रैयानी -----अपीलार्थी
कुबेर भवन, बजाज रोड, विलेपार्ले (पश्चिम)
मुंबई ४०० ०५६.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी ----उत्तरवादी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
५ वा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व)
मुंबई ४०० ०५१.

२.जन माहिती अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
५ वा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व)
मुंबई ४०० ०५१.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक १६/१०/२००९
सुनावणीचा दिनांक ३० जानेवारी, २०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींना अंधेरी गांवठाण येथील सि.टी.एस. नं.४७२ व ५२१ येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाबाबतीत कांही माहिती पाहिजे होती व ती त्यांना न मिळाल्यामुळे व प्रथम अपिलीय अधिका-यांनी प्रथम अपीलाची दखल न घेतल्यामुळे त्यांना आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन सादर केले.

" अर्जदार श्री. भगवानजी रैयानी यांच्या दिनांक २७/४/२००९ रोजी या कार्यालयास प्राप्त झालेल्या माहितीचा अधिकार-२००५ अंतर्गत अर्जास अनुसरुन या कार्यालयाचा क्र.एसआरए/ईएनजी/आरओआय/१४९८ दि १५/५/२००९ अन्वये अर्जदारास त्यांच्या विनंतीनुसार उपलब्ध दस्तऐवजांचे निरीक्षण करण्यास कळविण्यांत आले होते. परंतु अर्जदारामार्फत त्याबाबतीत कोणतीही प्रतिक्रया देण्यात आली नाही. तसेच अर्जदाराच्या दि. १/९/२००९ रोजीच्या पत्रास

अनुसरुन या कार्यालयाचे पत्र क्र. एसआरए/ईएनजी/६०३८/केई/डीडीटीपी दिनांक २५/९/२००९ अन्वये सविस्तर उत्तर देण्यात आले. तसेच अर्जदारास आवश्यक कागदपत्रे विहित शुल्क भरुन स्वीकारण्यास कळविले.

उपरोक्त बाबी लक्षात घेता, असे निवेदन करण्यात येते की, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातर्फे अर्जदाराच्या अर्जाच्या अनुषंगाने काही कार्यवाही करण्यांत आली नाही हे म्हणणे उचित वाटत नाही. तद्नंतर दि.२९/१/२०१० रोजी अर्जदारास दुरध्वनीद्वारे संपर्क साधला असता असे दिसून येते की, सदर प्रकरणी अर्जदारास पाठविलेली पत्रे प्राप्त झालेली दिसत नाही. तेव्हा त्यांना योग्य ती माहिती प्राप्त करुन घेण्याविषयी सांगण्यात आले आहे व त्यानुसार त्यांनी सोमवार दि. १/२/२०१० रोजी प्रत्यक्ष किंवा त्यांचा प्रतिनिधी पाठवून सदरची माहिती प्राप्त करुन घेण्याविषयी इच्छा दर्शविली व त्यानुसार अर्जदारास सदरची माहिती देण्यात येईल. "

अपीलार्थीस माहिती प्राप्त झालेली आहे असे सुनावणीच्या वेळेला दिसून आले. मात्र जन माहिती अधिकारी ज्याप्रमाणे म्हणतात त्याप्रमाणे दि. १५/५/२००९ रोजी अपीलार्थीस खरोखरीच दस्तऐवज निरीक्षणाचे पत्र पाठविले होते व दि.२५/९/०९ चे पत्र पाठविले होते किंवा नाही याची शहानिशा जावक रजिस्टर बघून करुन घेण्यात आली. त्यासाठी जन माहिती अधिकारी यांना जावक रजिस्टर सोबत आयोगाच्या कार्यालयात दि. १/२/२०१० रोजी बोलाविण्यात आले होते. वरील रजिस्टरचे निरीक्षण केले असता अशी पत्र पाठविल्याची नोंद आहे असे दिसून आले. दुर्दैवाने ही पत्रे अपीलार्थींना मिळालेली नाहीत असे त्यांचे म्हणणे आहे. जर पत्र मिळाले असते तर अपीलार्थी त्यांच्या विनंतीनुसार कागदपत्रांची पाहणी करुन स्वतः कागदपत्रे निवडू शकले असते.

अपीलार्थींची माहितीची गरज आता भागलेली आहे. मात्र प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपीलाची सुनावणी मुदतीत न घेतल्याबद्दल त्यांना समज देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २ फेब्रूवारी, २०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४५१८७/अपील क्रमांक ५२९७/०२**

**श्रीमती. रशिदा खान -----अपीलार्थी**
**१०४ मालवणी रिध्दीसिध्दी को.ऑप.हौ.सो.लि.,**
**म्हाडा गेट क्र. ८, मालवणी मालाड (पश्चिम)**
**मुंबई ४०० ०९५.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी ----उत्तरवादी**
**मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,**
**५ वा मजला, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**२.जन माहिती अधिकारी**
**मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,**
**५ वा मजला, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक १३/११/२००९**
**सुनावणीचा दिनांक ४ फेब्रूवारी , २०१०.**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

अपीलार्थींच्या अपीलातील म्हणणे की, त्यांनी त्यांचा अर्ज हा मुख्य सचिव कार्यालयास दिलेला असल्यामुळे त्यांनीच माहिती पुरवावी. अपीलार्थींचा अर्ज हा मुख्य सचिव कार्यालयाने वित्त विभागाला पाठविला व वित्त विभागाने अपीलार्थीस माहिती देणे आवश्यक आहे. प्रथम अपिलीय अधिका-यांनी ही बाब त्यांच्या निर्णयात स्पष्ट केलेली आहे आणि त्यांचा निर्णय हा आयोगास योग्यच वाटतो. मात्र अपीलार्थीस वित्त विभागाकडून अजूनहि उत्तर गेलेले नाही. त्यामुळे अपीलार्थींनी आयोगास द्वितीय अपील सादर केले आहे.

जन माहिती अधिकारी वित्त विभाग यांनी अपीलार्थीस हवी असणारी माहिती त्वरित ७ दिवसांच्या आत द्यावी. तसेच मुख्य सचिव कार्यालयाने पाठविलेल्या अपीलार्थीच्या माहितीच्या अधिकाराखालील अर्जावर मुदतीत माहिती न दिल्याबद्दल त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम २० अन्वये शास्तीची कारवाई का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा दि. २४ फेब्रूवारी, २०१० रोजी आयोगाच्या कार्यालयात प्रत्यक्ष येऊन सादर करावा.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.

या आदेशाची प्रत जन माहिती अधिकारी, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांनाहि पाठविण्यात यावी. (मुख्य सचिव कार्यालयाने दिलेल्या टिपणीसोबत )

जन माहिती अधिकारी, वित्त विभाग यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),<br>
दिनांक ४ फेब्रूवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५१८४/अपील क्रमांक ५२९५/०२

श्रीमती. रशिदा खान -----अपीलार्थी
१०४ मालवणी रिध्दीसिध्दी को.ऑप.हौ.सो.लि.,
म्हाडा गेट क्र. ८, मालवणी मालाड (पश्चिम)
मुंबई ४०० ०९५.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य ----उत्तरवादी
अंजूमन आय इस्लाम संस्थेचे
डॉ. एम इसाख जामखानवाला टिबीया युनानी मेडिकल कॉलेज
ॲन्ड हाजी अ.र. कळसेकर टिबीया हॉस्पीटल,
अंजूमन इस्माम कॉम्प्लेक्स, ६०, फिशरिज युनिर्व्हसिटी रोड,
वर्सोवा , अंधेरी ( पश्चिम) मुंबई ४०० ०६१.

२.जन माहिती अधिकारी
अंजूमन आय इस्लाम संस्थेचे
डॉ. एम इसाख जामखानवाला टिबीया युनानी मेडिकल कॉलेज
ॲन्ड हाजी अ.र. कळसेकर टिबीया हॉस्पीटल,
अंजूमन इस्माम कॉम्प्लेक्स, ६०, फिशरिज युनिर्व्हसिटी रोड,
वर्सोवा , अंधेरी ( पश्चिम) मुंबई ४०० ०६१.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक १६/११/२००९
सुनावणीचा दिनांक ४ फेब्रूवारी , २०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

सुनावणीच्या वेळेला असे दिसून आले की, अपीलार्थीच्या अर्जातील २३ मुद्दयांवर माहिती देण्यांत आलेली आहे. मात्र अपीलार्थीच्या कांही मुद्दयांवर समाधान झालेले दिसत नाही व त्यांना माहिती खोटी आहे असे वाटते.

तेव्हा अपीलार्थीस संबंधित कागदपत्रे दाखविण्यात यावीत व त्यांना ज्या कागदपत्रांच्या प्रती पाहिजे असतील त्या त्यांना देण्यात याव्यात.

*---आदेश---*

अपील अंशतः मान्यता करण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ४ फेब्रूवारी, २०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५१८५/अपील क्रमांक ५२९६/०२

श्रीमती. रशिदा खान -----अपीलार्थी
१०४ मालवणी रिध्दीसिध्दी को.ऑप.हौ.सो.लि.,
म्हाडा गेट क्र. ८, मालवणी मालाड (पश्चिम)
मुंबई ४०० ०९५.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा विभागीय सह निबंधक ----उत्तरवादी
मुंबई विभाग, मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला,
जी.पी.ओ. समोर, मुंबई ४०० ००१.

२.जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक
सहकारी संस्था, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व)
मुंबई ४०० ०५१.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक ०५/११/२००९
सुनावणीचा दिनांक ४ फेब्रूवारी , २०१०.
अपीलार्थी उपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थींच्या दि. १५/६/२००९ रोजीच्या अर्जाबाबत त्यांना अजूनपर्यंत कोणतीही माहिती मिळालेली नाही असे अपीलार्थींनी सुनावणीच्या वेळेस सांगितले.

उत्तरवादी सुनावणीच्या वेळेस अनुपस्थित असल्यामुळे त्यांचे म्हणणे समजून घेता आले नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस हे आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत माहिती द्यावी. तसेच सुनावणीस अनुपस्थित राहिल्याबद्दल व अपीलार्थीस विहित मुदतीत माहिती न दिल्याबद्दल त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम २० अन्वये

शास्तीची कारवाई कां करण्यात येऊ नये याबद्दल त्यांचा लेखी खुलासा आयोगाच्या कार्यालयात दि. २४ फेब्रूवारी, २०१० रोजी प्रत्यक्ष येऊन सादर करावा.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ४ फेब्रूवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५१८०/अपील क्रमांक ५३०१/०२

श्री. फ्रेडी केजेटन गोन्सालविस -----अपीलार्थी
१२ चिंचपोकळी रोड , वांद्रे (पश्चिम)
मुंबई ४०० ०५०.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (अ.नि) ----उत्तरवादी
उपजिल्हाधिकारी (अ.नि.)वांद्रे यांचे कार्यालय,
गृहनिर्माण भवन, तळमजला, रुम नं. ६८,
वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

२.जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार (अतिक्रमण)
उपजिल्हाधिकारी (अ.नि.)वांद्रे यांचे कार्यालय,
गृहनिर्माण भवन, तळमजला, रुम नं. ६८,
वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक १२/११/२००९
सुनावणीचा दिनांक ४ फेब्रूवारी , २०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस हव्या असलेल्या ९ आदेशांपैकी ४ आदेशांच्या प्रमाणित प्रती अपीलार्थीस याअगोदरच देण्यांत आलेल्या होत्या. मात्र ५ आदेशांच्या नस्त्या सहजतेने उपलब्ध नसल्यामुळे त्यांचा कसून शोध घेण्यात आला व सुनावणीच्या वेळेपर्यंत अपीलार्थीस उर्वरित पाचहि आदेशांच्या प्रती प्राप्त झालेल्या आहे व त्याबद्दल अपीलार्थींनी समाधान व्यक्त केले.

*----आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ५ फेब्रूवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

क्रमांक-मु.मा.आ/१२९/तक्रार क्रमांक ७०५/०१

श्री. डॉ. गंगाधर रुपराव मेतकर ----तक्रारदार
डी- २०२, पाईनवुड, मुलुंड (पश्चिम)
मुंबई ४०० ०८०.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी ----उत्तरवादी
राज्य कामगार विमा योजना
महात्मा गांधी रुग्णालय, ३ रा मजला,
लोअर परेल, मुंबई ४०० ०१३.

२.जन माहिती अधिकारी
राज्य कामगार विमा योजना
महात्मा गांधी रुग्णालय, ३ रा मजला,
लोअर परेल, मुंबई ४०० ०१३.

***---विवेचन---***

तक्रारीचा दिनांक १६/११/२००९
सुनावणीचा दिनांक ४ फेब्रूवारी, २०१०.
तक्रारदार व जन माहिती अधिकारी उपस्थित.

तक्रारदारांना त्यांच्याविरुध्द विनयभंगाच्या प्रकरणी गुन्हा दाखल झाला असल्यामुळे व त्यांना निलंबित केले गेले असल्याच्या प्रकरणात कांही माहिती पाहिजे होती. ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून न मिळाल्यामुळे त्यांनी आयोगाकडे तक्रार केलेली आहे.

सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, या विषयातील संपूर्ण नस्ती ही तक्रारदारांस दाखविण्यात आलेली आहे व त्यांना माहिती देण्यांत आलेली आहे. तक्रारदारांनी सुनावणीच्या वेळेला त्यांना पुढील माहिती मिळाली नाही असे सांगितले.

"        आयुक्त कार्यालयाने काय अहवाल पाठविला ही माहिती मिळाली  अजूनपर्यंत मिळाली नाही.

दि. २६/१२/२००७ चे आयुक्त रा.का.वि.योजना यांचे शासनास पाठविलेले पत्र मिळाले नाही.  (माझा  दि. ५/१२/२००९ चा अर्ज राज्य माहिती अधिक्ारी, आयुक्त कार्यालय)

१.  दि. ३/९/२००५ चे तक्रारी अनुषंगाने अभिलेख्यात लिखीत तक्रारी नाहीत.

महोदय अभिलेख्यात मौखिक तक्रारी आहेत असेही कोठे नमूद नाही.  तेव्हा ही माहिती माझ या मते दिशाभुल करणारी वाटते.

२.  दि. ५/९/२००५ ची तक्रार मला दाखविण्यात आली नाही.  त्यामुळे माझे मते सदर तक्रारी आधारावर माझेवर कोणताही दोषारोप ठेवता येणार नाही व सदर तक्रार माझ्या चौकशीचा विषय होऊ शकणार नाही. "

तेव्हा संबंधित नस्तीचे तक्रारदारांच्या उपस्थितीत वरील मुद्दयांच्या बाबतीत पुन्हा पाहणी करावी व यासंबंधीची कागदपत्रे असल्यास  तक्रारदारांस त्याच्या प्रती देण्यात याव्यात.

***---आदेश---***

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ५ फेब्रूवारी, २०१०  राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५४०८/अपील क्रमांक ५३२३/०२

श्री.जगन्नाथ एच. शर्मा -----अपीलार्थी
चंद्रीकाबाई एच. शर्मा चाळ, रुम नं. १ & २,
खार जवाहर नगर, साईबाबा रोड,
खार (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी ----उत्तरवादी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
गृहनिर्माण भवन, ५ वा मजला,
वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

२.जन माहिती अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
गृहनिर्माण भवन, ५ वा मजला,
वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक १८/११/२००९
सुनावणीचा दिनांक ६ फेब्रूवारी , २०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींच्या अपीलात त्यांना माहिती नको आहे त्यांची विनंती की त्यांना त्यांची स्वतःची प्रॉपर्टी स्वतः विकसित करु द्यावी अशी आहे. यासंदर्भात असलेली कागदोपत्री परिस्थिती प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. १२ नोव्हेंबर, २००९ रोजीच्या आदेशात स्पष्ट केलेली आहे. मात्र प्रथम अपीलाच्या सुनावणीस अपीलार्थी उपस्थित नव्हते व हे आदेश त्यांना मिळालेले नाहीत असे अपीलार्थींचे म्हणणे आहे. तरी प्रथम

**अपीलाच्या आदेशाची प्रत अपीलार्थींना देण्यांत आली. त्यावरुन अपीलार्थींची माहितीची गरज भागू शकते. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.**

***---आदेश---***

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**

**दिनांक ६ फेब्रूवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५४०९/अपील क्रमांक ५३२४/०२

श्री.अरविंद तिवारी -----अपीलार्थी
रुम नं. २, अमर बहादूर चाळ, साईबाबा रोड,
खार (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक मनपा आयुक्त ----उत्तरवादी
सहाय्यक मनपा आयुक्त कार्यालय, एच/पूर्व विभाग,
१३७, टी.पी.एस.-५, २ रा रोड, प्रभात कॉलनी,
सांताक्रुज (पूर्व) मुंबई ४०० ०५५.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.का.)
सहाय्यक मनपा आयुक्त कार्यालय, एच/पूर्व विभाग,
१३७, टी.पी.एस.-५, २ रा रोड, प्रभात कॉलनी,
सांताक्रुज (पूर्व) मुंबई ४०० ०५५.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक १६/११/२००९
सुनावणीचा दिनांक ६ फेब्रूवारी , २०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

सुनावणीच्या वेळेस हे स्पष्ट झाले की, अपिलीय अधिका-यांनी, अपीलार्थीस संपूर्ण डिटेक्शन रजिस्टर निरीक्षणासाठी देण्यात यावे व निरीक्षणानंतर त्यांना आवश्यक असलेली माहिती पाहिजे त्यांच्या छायांकित प्रती योग्यते शुल्क आकारुन देण्यात यावी असे त्यांच्या दि. १५/७/२००९ रोजीच्या आदेशात जन माहिती अधिकारी यांना असे निर्देश दिले होते. मात्र त्यानुसार अपीलार्थींनी निरीक्षण घेतलेले नाही. तेव्हा अपीलार्थींनी प्रथम

निरीक्षण घ्यावे आणि त्यांना ज्या आणि जेवढया कागदपत्रांच्या प्रती पाहिजे असतील त्या सर्व शुल्क आकारुन देण्यांत याव्यात असे निर्देश देण्यांत आले.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ६ फेब्रूवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५४००/अपील क्रमांक ५३२५/०२

श्री.करमशी आर. पटेल -----अपीलार्थी
बी/७०२, अंबिका टॉवर राज,
जिजामाता रोड, पंपहाऊस, अंधेरी (पूर्व)
मुंबई ४०० ०९६.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता विभाग १ ----उत्तरवादी
ठाणे पासपोर्ट ऑफिससमोर, वागळे इस्टेट,
ठाणे (पश्चिम) जि. ठाणे.

२.जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता
मरोळ उप विभाग, अंधेरी (पूर्व) मुंबई ४०० ०९३.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक १७/११/२००९
सुनावणीचा दिनांक ६ फेब्रूवारी , २०१०.
अपीलार्थी ,जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस ज्या २५ व्यक्तींना सन १९९९ च्या सर्व्हेमध्ये पात्रता घोषित करण्यात येऊन त्यांची नांवे ॲनेक्चर-II मध्ये समाविष्ट करण्यात आली होती. मात्र सन २००६ च्या सर्व्हे मध्ये चौकशीअंती ज्यांचे नांवे गाळण्यात आली होती त्या झोपडपट्टीधारकांची मुळ पात्र-अपात्रता घोषित करण्यासाठी देण्यात आलेल्या कागदपत्रांची मागणी अपीलार्थी यांनी केली होती.

ही कागदपत्रे जुनी असल्यामुळे सापडून येत नाहीत म्हणून ती देता आली नाही. सर्व्हेच्या वेळेला ज्या व्यक्तींच्या झोपडयाच अस्तित्वात नव्हत्या, त्यामुळे ॲनेक्चर II हे बदलावे लागले हे जरी योग्य असले तरी कागदपत्रे ही विहित कालावधीपर्यंत ठेवणे आवश्यक होते.

प्रथम अपिलीय अधिका-यांनी २६ झोपडपट्टीधारकांच्या पात्रता रद्द केल्याची कागदपत्रे

**अपीलार्थीस देण्याचे आदेश दिलेले आहेतच. पण अपीलार्थींना मुळ पात्रतेची कागदपत्रे पाहिजे आहेत त्यांचाहि पुन्हा एकदा जारीने शोध घेऊन जर ती कागदपत्रे मिळू शकली तर तीहि अपीलार्थीस देण्यात यावीत.**

***---आदेश---***

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**

**दिनांक ६ फेब्रूवारी, २०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५४१०/अपील क्रमांक ५३२६/०२

श्री.राजेंद्र वि. कांबळी -----अपीलार्थी
३०१, श्री. ओमकार सह.गृहनिर्माण संस्था,
अमेय रहिवाशी संकूल, न्यू प्रभादेवी मार्ग,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सहमुख्य अधिकारी ----उत्तरवादी
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

२.जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक १६/११/२००९
सुनावणीचा दिनांक ६ फेब्रूवारी , २०१०.
अपीलार्थी ,जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस त्यांच्या सोसायटीतील फ्लॅट क्र. बी-४०४ हा कोणास देण्यात आलेला आहे याबाबत व इतर माहिती पाहिजे होती.

ही माहिती अपीलार्थीना न मिळाल्यामुळे अंतिमतः ते आयोगाकडे आलेले आहेत.

सुनावणीच्या वेळेला अपीलार्थीस जरी माहिती देण्यात आली असली तरी मूळतः तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. तसेच तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलावर सुनावणी घेऊन सुध्दा कुठचाहि निर्णय दिलेला नाही.

माहिती विहित मुदतीत न दिल्याबद्दल तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेवर

अधिनियमाच्या कलम २० अन्वये रु. ५,०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे. ही शास्ती १ मार्च, २०१० रोजी होणा-या पगारातून वसूल करुन ती शासनाने विहित केलेल्या लेखाशिर्षाखाली जमा करावी व तसे केल्याचा अहवाल मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांनी आयोगास पाठवावा.

तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांना सुध्दा मुदतीत अपीलाचा निर्णय न दिल्याबद्दल समज देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

या आदेशाची प्रत मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१ यांनाहि पाठविण्यात यावी.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ६ फेब्रूवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५४११/अपील क्रमांक ५३२७/०२

श्री. विशाल रामदास भोगे -----अपीलार्थी
रुम नं. ३०६, इमारत नं. १०१,
न्यू म्हाडा कॉलनी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर,
मानखुर्द, मुंबई ४०० ०४३.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य अभियंता (स्थापत्य) ----उत्तरवादी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
२ रा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व)
मुंबई ४०० ०५१.

२.जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (घाटकोपर विभाग)
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
२ रा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व)
मुंबई ४०० ०५१.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक १६/११/२००९
सुनावणीचा दिनांक ६ फेब्रूवारी, २०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थीच्या अपीलातील मुद्दयांबाबत पुढीलप्रमाणे निवेदन सादर केले.

" अपीलार्थी श्री. विशाल रामदास भोगे यांना त्यांच्या अपील अर्जात नमूद केलेल्या श्री. ॲन्थोनी सेबेस्टीन व श्रीमती हेलन सेबेस्टीन यांना सन २००५ मध्ये वितरीत केलेल्या फोटोपास संबंधीची तसेच त्यांच्या स्वतःच्या तोडलेल्या दुकानाबाबत सर्व माहिती, या कार्यालयाने आतापर्यंत

याप्रकरणी केलेल्या कार्यवाही व पत्रव्यवहाराबाबतची संपूर्ण माहिती श्री.भोगे यांनी माहिती अधिकार अंतर्गत वेळोवेळी मागणी केल्यानुसार देण्यात आलेली आहे. मुळ उपलब्ध नस्तीची पुन्हा तपासणी करावयाची असल्यास या कार्यालयाशी संपर्क साधावा असे अनेक वेळा कळविण्यात आले आहे. श्री. विशाल रामदास भोगे यांच्या माहिती अधिकार अंतर्गत अर्जांना आतापर्यंत या कार्यालया मार्फत वेळोवेळी देण्यात आलेल्या माहिती पत्रांचा गोषवारा आयोगास सादर केला आहे. तसेच अपीलार्थीनी प्रथम अपिलीय अधिकारी व राज्य माहिती आयुक्त यांच्याकडे सुध्दा अनेक वेळा अपील दाखल केले होते व अपील सुनावणीमध्ये दिलेल्या आदेशानुसार श्री.भोगे यांना वेळोवेळी माहिती देण्यात आलेली आहे.

श्री.विशाल भोगे यांचे अनधिकृत दुकान म्हाडाने २००५ साली तोडले होते व त्याबाबत श्री. भोगे यांनी म्हाडाविरुध्द लोकआयुक्त यांचेकडे त्यांच्या तोडलेल्या दुकानाची पुनर्बांधणी करुन द्यावी व फोटोपास द्यावा म्हणून तक्रार दाखल केलेली असून मा.लोकआयुक्त यांच्या आदेशानुसार मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ यांनी श्री.विशाल भोगे यांची सुनावणी घेतली होती व श्री.भोगे यांना शासन निर्णयानुसार सदरहू ठिकाणी फोटोस अनुज्ञेय नाही तसेच त्यांनी मूळ ठिकाणी बांधकाम करण्याची किंवा पुनर्वसनाची मागणी वस्तुस्थिती लक्षात घेतल्यास अनुज्ञेय ठरत नाही असे निर्णय दिला होता. सदरहू निर्णयानुसार मा. लोकआयुक्तांना अहवाल सुध्दा सादर केला आहे. श्री.ॲन्थोनी सेबेस्टीन व श्रीमती. हेलन सेबेस्टीन यांना सन २००५ मध्ये वितरीत केलेल्या फोटोपास बद्दल तक्रार प्राप्त झ ाल्यानंतर ज्या कागदपत्रांच्या आधारे फोटोपास वितरीत करण्यात आला त्या कागदपत्रांची व प्रत्यक्ष जागेची पडताळणी करुन श्री. ॲन्थोनी सेबेस्टीन व श्रीमती. हेलन सेबेस्टीन यांना वितरीत केलेले फोटोपास या कार्यालयाचे पत्र दि. ३०/३/२००९ च्या आदेशानुसार रद्द केले आहेत.

फोटोपास रद्द केल्यानंतर श्री.सेबेस्टीन यांनी न्यायालयामध्ये दावा दाखल केला होता व मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार श्री.ॲन्थोनी सेबेस्टीन यांची सुनावणी कार्यकारी अभियंता मार्फत दि. ११/१२/२००९ रोजी घेण्यात आली असून सुनावणी नुसार सदर झोपडया २५ पेक्षा कमी असल्याने शासन निर्णयानुसार फोटोपास रद्द करण्याचा निर्णय या कार्यालयाने कायम ठेवण्यात आला आहे. परंतु सादर केलेल्या कागदपत्रावरुन झोपडी ०१/०१/१९९५ पूर्वीची असल्याचे सिध्द होत आहे. सुनावणी दरम्यान झोपडीधारकांनी सादर केलेले निवेदन व कागदपत्रांच्या

अनुषंगाने झोपडीधारकांच्या संरक्षण पात्रतेबाबतचा या कार्यालयाने तयार केलेला अहवाल म्हाडाचे विधी सल्लागार यांच्या अभिप्रायासाठी व वरिष्ठांच्या मान्यतेसाठी दि. १४/०१/२०१० रोजी सादर केलेला आहे.

उपरोक्त सर्व माहिती अपीलकता्र श्री. विशाल रामदास भोगे यांना देण्यात आलेली आहे. श्री. ॲन्थोनी सेबेस्टीन व श्रीमती.हेलन सेबेस्टीन यांना सन २००५ साली वितरीत केलेले फोटोपास या कार्यालयाने रद्द केले आहेत ही वस्तुस्थिती श्री.भोगे यांना माहिती असून सुध्दा ते त्याचा उल्लेख मा. राज्य माहिती आयुक्त यांना केलेल्या विषयांकित अपील अर्जात कोठेही नमूद करीत नाहीत.

प्रथम अपील अधिकारी तथा उपमुख्य अभियंता (स्थापत्य) मुंबई मंडळ यांनी श्री. विशाल रामदास भोगे यांच्या दि. ६/११/०९, २४/११/०९, च्या अपील सुनावणी मध्ये श्री. विशाल रामदास भोगे यांना कळविले होते की, कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या नस्तीमधील जी माहिती अपीलकर्त्यांस पाहिजे ती देण्यात येईल. उपलब्ध माहिती देणे बंधनकारक आहे. परंतु कुठल्याहि बाबीचे स्पष्टीकरण किंवा खुलासा देणे तथा एखादया गोष्टीबद्दल आपले मत व्यक्त करणे ही बाब माहितीच्या अधिकार अधिनियमाच्या माहिती या संज्ञेमध्ये येत नाही.

तसेच यापूर्वी मा. राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचेकडे दि. २३/३/०९ च्या सुनावणीमध्ये अपीलार्थीने श्री.ॲन्थोनी सेबेस्टीन यांना फोटोपास प्रकरणी घेतलेल्या निर्णयास कोणते निकष लावण्यात आले याबाबत माहिती, खुलासा विचारला होता त्यामध्ये सुध्दा मा. मुख्य माहिती आयुक्त महाराष्ट्र राज्य यांनी स्पष्ट आदेश दिले होते की रेकॉर्ड प्रमाणे असलेली माहिती अपीलार्थीस देण्यात आली आहे. मात्र त्यातील निर्णय हा जर अपीलार्थीस मान्य नसेल तर त्यांनी फोटोपास देण्यात येतात त्या कायद्याखालील अपिलीय प्राधिका-याकडे अपील करुन आपल्या तक्रारीची तड लावून घेणे श्रेयस्कर ठरेल व त्यानुसार श्री.भोगे यांचे अपील निकालात काढण्यात येत आहे असे आदेश दिले होते.

उपरोक्त प्रमाणे वस्तुस्थिती असून सुध्दा अपीलार्थी श्री. विशाल रामदास भोगे हे वारंवार अपील दाखल करीत आहेत व यापूर्वी अपीलामध्ये झालेली सुनावणी व देण्यात आलेले आदेशाचा कोणताही उल्लेख करीत नाहीत व नवीन अपील दाखल करीत आहेत. तरी अपीलार्थीस योग्य त्या सूचना देऊन अपील निकाली काढण्यात यावे अशी विनंती आहे. "

**वरील निवेदनावरुन अपीलार्थीस उपलब्ध असलेली सर्व माहिती देण्यांत आलेली आहे असेच दिसून येते. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.**

***---आदेश---***

**अपील अमान्य करण्यात येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक ८ फेब्रूवारी, २०१०**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५३९०/अपील क्रमांक ५३०६/०२

श्री. अंकुश रामचंद्र डांगे -----अपीलार्थी
द्वारा- भगवान रामचद्र कारंडे,
मंजुलाला चाळ, केवणीपाडा,
जोगेश्वरी (पश्चिम) मुंबई ४०० १०२.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक ----उत्तरवादी
सहकारी संस्था, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
५ वा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व)
मुंबई ४०० ०५१.

२.जन माहिती अधिकारी
सहकारी संस्था, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
५ वा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व)
मुंबई ४०० ०५१.

*---विवेचन---*

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक १७/११/२००९
सुनावणीचा दिनांक ९ फेब्रूवारी, २०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस त्यांनी मागितलेली कांही माहिती त्यांना देण्यांत आलेली आहे. मात्र त्यांना ज्या दि. २६/१/२००९ व ४/२/२००९ रोजीच्या पत्रांच्या प्रती पाहिजे आहेत ती पत्रे कार्यालयास मिळाल्याची कुठचीहि नोंद नाही व अपीलार्थींनी संपूर्ण नस्तीही तपासून पाहिलेली आहे.

सुनावणीच्या वेळेला अपीलार्थींनी सांगितले की, आता त्यांना पुनर्वसित गाळयाचा ताबा मिळालेला असल्यामुळे आता त्यांना कागदपत्रांची कांहीही गरज नाही.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक ९ फेब्रूवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४५३९३/अपील क्रमांक ५३०९/०२**

**श्री. लॉनेन्स जॉकी डिसिल्वा -----अपीलार्थी**
**खोली क्र.१, वेरोनिका गोम्स चाळ,**
**वरची पाखाडी, कांजूरमार्ग, मुंबई ४०० ०४२.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव ----उत्तरवादी**
**गृहनिर्माण विभाग, झोपसु १ अ,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**२.जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी**
**गृहनिर्माण विभाग, झोपसु १ अ,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक १७/११/२००९**
**सुनावणीचा दिनांक ९ फेब्रूवारी, २०१०.**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थीस सिटी सर्व्हे नं. १२०३ च्या बाबतीत त्यातील ३२.९ चौ.मी. हा जर स्लम मध्ये आहे तर उर्वरित ३१४.९ चौ.मी. हा भाग स्लम मध्ये नाही असे असेल तर त्याची तपशीलवार माहिती अपीलार्थीस पाहिजे होती.**

**सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट झाले की, संबधित विषयाची संपूर्ण नस्ती ही अपीलार्थींनी पाहिलेली आहे. याबाबतीत अपीलार्थींनी लोकआयुक्त कार्यालयाकडे तकार पाठविली होती व त्यासंदर्भातील अहवाल सुध्दा उपलोकआयुक्तांकडे पाठविण्यात आलेला आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. तेव्हा अपीलार्थींच्या मुळ तक्रारीच्या बाबतीत योग्यतो निर्णय**

लोकआयुक्त घेतीलच.   माहितीच्या बाबतीत संपूर्ण नस्तीच अपीलार्थींनी पाहिलेली असल्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ९ फेब्रूवारी, २०१०   राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५४०४/अपील क्रमांक ५३१४/०२

श्री. श्रीकांत वसंत जोगळेकर -----अपीलार्थी
३०७, अ, बेस्ट कमर्शियल कॉम्प्लेक्स,
अंधेरी (पश्चिम) मुंबई ४०० ०५८.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
के/पूर्व वॉर्ड, मनपा इमारत, गुंदवली व्हिलेज,
आझाद रोड, अंधेरी (पूर्व) मुंबई ६९.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.प्र.)
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
के/पूर्व वॉर्ड, मनपा इमारत, गुंदवली व्हिलेज,
आझाद रोड, अंधेरी (पूर्व) मुंबई ६९.

***---विवेचन---***

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक १८/११/२००९
सुनावणीचा दिनांक ९ फेब्रूवारी, २०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींच्या प्रिमायसेसमध्ये पहिल्या मजल्यावरील १९५५ सालापासून अस्तित्वात असलेला लॉफ्ट हा महापालिकेच्या अधिका-यांनी त्याचे फ्लोअरिंग उकरुन टाकून पोलीस बंदोबस्तात उध्वस्त केले होते. त्याविरुध्द अपीलार्थींनी सिव्हील कोर्टात धाव घेतली होती. व कोर्टाने यासंदर्भात कांही अंतरिम आदेश पारित केले होते. त्यानंतर दि. २३/५/२००९ रोजी अपीलार्थींनी महापालिकेस प्लॉटचे फ्लोअरिंग पुन्हा पूर्ववत करण्याची परवानगी मागितली होती. या अर्जावर निर्णय न मिळाल्यामुळे अपीलार्थींनी माहितीचा अधिकार अधिनियमामध्ये त्यांच्या अर्जावर अधिका-यांनी

काय रिमार्क्स लिहिले आहे त्याची प्रत दि.१४/८/२००९ च्या अर्जाने अपीलार्थीनी मागितली होती.

यासंबंधी जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्यामुळे दिलेल्या प्रथम अपीलावरील निर्णयात अपीलार्थीस ८ दिवसांच्या आत माहिती देण्याचे निर्देश जन माहिती अधिका-यांना देण्यांत आले होते. तरीही कुठचीही माहिती न मिळाल्यामुळे अपीलार्थींचे सदरचे अपील आहे.

अपीलार्थीस अजूनहि माहिती देण्यांत आलेली नाही. माहिती देण्यात पुष्कळ विलंब होऊन गेल्यामुळे शक्यतो अंतिम आदेशाच्या प्रतीसह माहिती अपीलार्थीस देण्यात यावी असे निर्देश देण्यांत आले.

अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ,के/पूर्व विभाग यांनी जन माहिती अधिका-यांच्या बाबतीत त्यांना अनेकदा आर.टी.आय. अर्जांवर ३०दिवसांच्या आत माहिती देण्याचे निर्देश दिले होते. हे ऑब्झर्व्हेशन लक्षात घेता व याहि अर्जाच्या बाबतीत त्यांनी लावलेला विलंब लक्षात घेता त्यांच्यावर रु. १०,०००/- ची शास्ती लावण्यात येत आहे. ही शास्तीची रक्क्म अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, के/पूर्व विभाग यांनी जन माहिती अधिका-यांच्या १ मार्च, २०१० रोजी किंवा ते शक्यच न झाल्यास १ एप्रिल, २०१० रोजी होणा-या पगारातून वसूल करुन शासनाने विहित केलेल्या लेखाशिर्षाखाली जमा करावी. व तसा अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा. तसेच या आदेशाची एक प्रत महापालिका आयुक्त यांनाहि माहितीसाठी व योग्यत्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

***---आदेश---***

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**जन माहिती अधिका-यांनी माहिती देण्यासंबंधी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

**शास्तीच्या बाबतीत महापालिक आयुक्त/ कार्यकारी अभियंता, के/पूर्व विभाग यांनी शास्ती वसूलीचा अनुपालन अहवाल १० एप्रिल, २०१० पर्यंत आयोगास पाठवावा.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक १० फेब्रूवारी, २०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४५३९५/अपील क्रमांक ५३११/०२**

**श्री. सुनिल संपतराव शिंदे -----अपीलार्थी**
**३०३, शांती निकेतन को.ऑप.हौ.सो.लि.,**
**आर.एस.सी २१, प्लॉट नं. ०८, गोराई,**
**बोरीवली (पश्चिम) मुंबई ४०० ०९१.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा सहायक मनपा आयुक्त ----उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,**
**आर/दक्षिण विभाग कार्यालय, कांदिवली (पश्चिम)**
**मुंबई ४०० ०६७.**

**२.जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (शाळा)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,**
**आर/दक्षिण विभाग कार्यालय, कांदिवली (पश्चिम)**
**मुंबई ४०० ०६७.**

***---विवेचन---***

**अपील प्राप्त झाल्याचा दिनांक १७/११/२००९**
**सुनावणीचा दिनांक ९ फेब्रूवारी, २०१०.**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

अपीलार्थींना ऑक्सफर्ड पब्लिक स्कूल या शाळेतील कर्मचारी हर्षद रनछोड पटेल यांनी शाळेविरुध्द ज्या तक्रारी केलेल्या आहेत त्या तक्रारींची चौकशी व कारवाईच्या प्रती मिळण्यासाठी जन माहिती अधिका-यांकडे अर्ज केलेला होता. यासंदर्भात श्रीयुत पटेल हे मनोरुग्ण असल्याची प्रमाणपत्रे शाळेने महापालिकेकडे पाठविलेली होती व त्यामुळे ते सदैव तक्रारी करीत राहतात असे लिहिलेले आहे. थोडक्यात त्यांच्या तक्रारींकडे शाळेने दुर्लक्ष केलेले दिसते.

अपीलार्थींच्या तक्रारीत त्यांना जास्त पगारावर सही घेऊन कमी पगार देण्यात येतो हीहि तक्रार आहे व याबद्दल महापालिकेने चौकशीही केलेली आहे. तेव्हा या चौकशीचे जे निष्कर्ष असतील व त्यावर केलेली कारवाई याची माहिती अपीलार्थीस १५ दिवसांच्या आत देण्यात यावी.

अपीलार्थीस माहिती देत असतांना त्यावर ही माहिती आर.टी.आय. अंतर्गत देण्यात येत आहे असा जो महापालिकेकडे स्टॅम्प आहे तो स्टॅम्प मारुन माहिती देण्यात यावी.

***---आदेश---***

अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक १० फेब्रूवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४५४०३/अपील क्रमांक ५३१३/०२**

**श्री. मनोज एम. कारंडे -----अपीलार्थी**
**१, ज्योत्स्ना प्रकाश, १ ला मजला,**
**सिंडीकेट बँकेसमोर, गोरेगांव रेल्वे स्टेशनजवळ,**
**गोरेगांव (पूर्व) मुंबई ४०० ०६३.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ----उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**महापालिका शाळा इमारत, पी/ साऊथ वार्ड कार्यालय,**
**मिठानगर, गोरेगांव (पूर्व) मुंबई ४०० १०४.**

**२.जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**महापालिका शाळा इमारत, पी/ साऊथ वार्ड कार्यालय,**
**मिठानगर, गोरेगांव (पूर्व) मुंबई ४०० १०४.**

***---विवेचन---***

**अपील प्राप्त झाल्याचा दिनांक २५/११/२००९**
**सुनावणीचा दिनांक ९ फेब्रूवारी, २०१०.**

अपीलार्थी यांनी द्वितीय अपील एका विषयाच्या संदर्भात व संबंधित कागदपत्रे दुस-या अर्जाच्या संदर्भातील जोडलेली आहेत. मात्र या अपीलाची सुनावणी जेव्हा घेण्यात आली तेव्हा ते प्रत्यक्ष उपस्थित राहिले नाहीत मात्र त्यांनी त्यांना काय हवे आहे यासंबंधीचे जे निवेदन सादर केले त्यावरुन त्यांनी जी कागदपत्रे जोडलेली आहे त्यासंदर्भातील त्यांचे अपील आहे असे दिसून येते.

सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी व अपीलार्थींचे प्रतिनिधी उपस्थित होते. अपीलार्थीस थोडक्यात को.ऑप.सोसायटीज वगैरेना सामाजिक कार्यक्रम, मॅरेजेस वगैरेसाठी जेव्हा

मंडप उभारायचा असतो त्यासाठी जे नियम व नियमावली आहे त्याची माहिती पाहिजे होती.

अपीलार्थीना या बाबतीतील सर्व कागदपत्रे प्रत्यक्ष देण्यांत आलेली आहेत असे सिध्द करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थींच्या सहया दाखविल्या. असे असतांना सुध्दा अपीलार्थींनी अपील करावे व सुनावणीच्या वेळेला त्यांचे विस्तृत निवेदन द्यावे याचा अर्थ त्यांचे समाधान झाले नाही असाच होतो. अपीलार्थींना जी कागदपत्रे देण्यांत आली आहेत ती अपीलार्थींना समजावून सांगितली आहेत असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. पण त्या अर्जाच्या नमून्यावर " तात्पुरते मान्सून शेड उभारणीसाठीचे शेड " असा मथळा आहे. त्यामुळे अपीलार्थींना उत्तर देतांना हाच फॉर्म मॅरेजेस व सामाजिक कार्यक्रमासाठी वापरता येईल असे स्पष्टपणे नमूद केले असते तर अपीलार्थींच्या मनात कोणतीही शंका राहिली नसती. तेव्हा अपीलार्थीस पुन्हा व्यवस्थित पत्र लिहून व आवश्यक ते नियम व नियमावली यांची प्रत व अर्जाचा नमुना योग्यत्या स्पष्टीकरणासह २ दिवसांच्या आंत विनामूल्य पाठविण्यात यावा असे निर्देश देण्यात येत आहेत.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १० फेब्रूवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५४१९/अपील क्रमांक ५३७२/०२
क्रमांक-मु.मा.आ/४५४१७/अपील क्रमांक ५३७४/०२

श्री. मच्छिंद्र एन. कारळकर -----अपीलार्थी
बी, हजारीमल हाऊस, रुम नं. ५,
इर्ला सोसायटी रोड, विलेपार्ले (पश्चिम)
मुंबई ४०० ०५६.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सहायक मनपा आयुक्त ----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
के/वेस्ट वॉर्ड कार्यालय, अंधेरी बेस्ट बसडेपोसमोर,
पालीराम पथ, अंधेरी (पश्चिम) मुंबई -- ५८

२.जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
के/वेस्ट वॉर्ड कार्यालय, अंधेरी बेस्ट बसडेपोसमोर,
पालीराम पथ, अंधेरी (पश्चिम) मुंबई -- ५८

***---विवेचन---***

अपीले प्राप्त झाल्याचा दिनांक २०/११/२००९
सुनावणीचा दिनांक १५ फेब्रूवारी, २०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस मेसर्स. पॅपिलियन फास्ट फूड सेंटर व हॉटेल माया भुवन यांनी त्यांच्या प्रिमायसेसमध्ये केलेल्या अनियमिततेबाबतची व त्यावर महापालिकेने केलेल्या कारवाईबद्दलची माहिती पाहिजे होती.

अपीलार्थीस हव्या असलेल्या माहितीच्या नस्त्या कार्यालयात येऊन पाहण्यास सांगितले होते. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे आदेशात सुध्दा अपीलार्थी यांनी नस्त्यांची पाहणी

करावी व त्यांना हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती देण्यांत याव्यात असे निर्देश देण्यांत आले होते.

अपीलार्थींनी जरी नस्त्यांची पाहणी केली तरी त्यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपीले सादर केलेली आहेत. अपीलार्थींचे म्हणणे असे की, त्यांनी जवळपास दर महिन्याला अर्ज दिलेले आहेत, पण अजूनहि त्यावर कारवाई होत नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलार्थींनी मागणी केलेल्या माहितीच्या हॉटेल प्रिमायसेसची पाहणी करण्यात आलेले आहे व संबंधित हॉटेलना महापालिका कायद्याच्या कलम ३९४ नुसार नोटीसेसहि देण्यांत आलेल्या आहेत. अपीलार्थींना या नोटीसेसच्या प्रती देण्यांत याव्यात. तसेच सदर नोटीसेसना अनुसरुन करीत असलेल्या कारवाईची माहिती कारवाई पूर्ण झाल्यानंतर अपीलार्थीस देण्यात यावी.

***---आदेश---***

दोन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

संबंधितानी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १५ फेब्रूवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५४१८/अपील क्रमांक ५३७३/०२

श्री. मच्छिंद्र एन. कारळकर -----अपीलार्थी
बी, हजारीमल हाऊस, रुम नं. ५,
इर्ला सोसायटी रोड, विलेपार्ले (पश्चिम)
मुंबई ४०० ०५६.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सहायक मनपा आयुक्त ----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
के/वेस्ट वॉर्ड कार्यालय, अंधेरी रेल्वे स्टेशनसमोर,
अंधेरी (पश्चिम) मुंबई -- ५८

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व.का.)
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
के/वेस्ट वॉर्ड कार्यालय, अंधेरी बेस्टडेपोसमोर,
दुसरा मजला, पालिराम पथ,अंधेरी (पश्चिम) मुंबई -- ५८

***---विवेचन---***

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक २०/११/२००९
सुनावणीचा दिनांक १५ फेब्रूवारी, २०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

श्री.मच्छिंद्र कारळकर यांनी त्यांच्या दि. ४/५/२००९ च्या अर्जान्वये माया भुवन हॉटेलच्या पाठीमागे हजराबाई हाऊस, इर्ला सोसायटी रोड, विलेपार्ले (प) येथील पाण्याची टाकी अधिकृत किंवा अनधिकृतपणे बसविलेली आहे किंवा कसे याबाबत माहिती विचारली होती. तसेच त्याच्या काय कारवाई केलेली आहे याबाबतची देखिल माहिती विचारली होती. त्यास सहायक अभियंता (इमारती व कारखाने ) या कार्यालयाने केलेल्या कारवाईची माहिती अपीलार्थीस क्र. केप/०४२३०/बीएफ-एक दि. ४/६/०९ नुसार दिली होती. त्यानंतर दि. ०९/७/०९ रोजी अपीलकर्त्यांनी प्रथम अपील केले होते. या अपीलाची सुनावणी दि. ११/८/२००९ रोजी घेण्यात

आली.  या सुनावणीस अपीलार्थी हे गैरहजर होते.  त्यांच्याशी दुरध्वनीवरुन संपर्क साधला असता सदरहू पाण्याच्या टाकीवर योग्य ती कारवाई करावी असे सुचविले व एकतर्फी सुनावणीस त्यांची कांहीही हरकत नाही अशी त्यांची त्यांनी सहमती दर्शविली.  त्यानुसार प्रथम अपिलीय अधिकारी, के/पश्चिम विभाग (विभाग कार्यकारी अभियंता) यांनी अनधिकृत पाण्याच्या टाकीवर कारवाई करावी असे आदेश पारित करुन दि. २६/८/०९ रोजी पत्र क्र. केप/१५९२९(६७४)/तनिअ/इवका अन्वये अपीलकर्त्यांस कळविले होते.  दिलेल्या माहितीने समाधान न झाल्यामुळे अपीलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले.

"  अपीलकर्त्यांनी निदर्शनास आणून दिलेल्या पाण्याच्या टाकीखालील बांधकामावर (वॉश रुमवर )  इमारती व कारखाने या कार्यालयामार्फत मनपा अधिनियम ३५१ अन्वये दि. २०/५/२००९ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावली होती.  सदरहू नोटीसला पक्षकाराने उत्तरासह काही कागदोपत्री पुरावे सादर केले होते.  त्याची छाननी करुन अंतिम आदेशाचे पत्र या कार्यालयामार्फत तयार केलेले आहे.  तरी पुढील निष्कासनाची कारवाई  नोटीस बजाविल्यानंतर त्यात नमूद केलेल्या विहित कालावधीनंतर नियमानुसार करण्यात येईल.  तसेच किटक नियंत्रण अधिकारी, के/पश्चिम या कार्यालयामार्फत सदरहू टाकीवर मनपा अधिनियम कलम ३८१ ए (नोटीस क्र.पीसीओ/११८/केप नुसार दि. २३/१/२०१० रोजी कार्यवाही केलेली आहे. "

अपिलीय अधिका-यांनी वरील प्रकरणात योग्यती कारवाई करुन प्रकरण संपुष्टात आणावे असे निर्देश दिलेले आहेतच.  त्याची अंमलबजावणी झाल्यावर अंतिमतः अपीलार्थीस माहिती देण्यात यावी.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक १५ फेब्रूवारी, २०१०  राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४५७३/अपील क्रमांक ५३७९/०२

श्री. संतोष दत्तात्रय सामंत -----अपीलार्थी
महादेव पाटील हाऊस, रुम नं. १,
आगरी समाज हॉलजवळ, घाटला व्हिलेज,
चेंबूर, मुंबई ४०० ०७१.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त ----उत्तरवादी
परिमंडळ ६, प्रशासकीय इमारत,
आर.सी. मार्ग, चेंबूर, मुंबई ७१.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
पूर्व प्रादेशिक विभाग, प्रशासकीय इमारत,
चेंबूर, मुंबई ४०० ०७१.

***---विवेचन---***

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक २२/११/२००९
सुनावणीचा दिनांक १६ फेब्रूवारी, २०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस चॅप्टर केस क्र. ३२/२००८ मधील विरोधकांची नांवे, चॅप्टर केसचा निकाल, केसची सद्य:स्थिती व चॅप्टर केसमध्ये तक्रारदार व साक्षीदार यांना केस चालू असतांना कोर्टासमोर बोलाविण्यात येते किंवा कसे १ येत असल्यास सदर केसमध्ये तक्रारदार व साक्षीदार यांना कां बोलाविण्यात आले नाही याची माहिती विचारली होती.

मुद्दा क्र. १ ते ४ ची माहिती देण्यांत आली आहे. मुद्दा क्र. ५ ची माहिती विशेष कार्यकारी दंडाधिकारी, चेंबूर विभाग यांच्याशी संबंधित असल्याने माहिती प्राप्त होताच कळविण्यात येईल असे नमूद करण्यात आले.

सहायक पोलीस आयुक्त चेंबूर यांचे म्हणणे की, विशेष कार्यकारी दंडाधिका-यांकडे केस

चालविण्यात येते व चॅप्टर केसची कार्यवाही ही न्यायालयीन बाब आहे. त्यामुळे अपीलार्थींनी मागितलेली माहिती पुरविता येत नाही असा अहवाल प्राप्त झाल्याने अपीलार्थी यांना पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे आदेशात अपीलार्थी यांनी मुद्दा क्र. ५ मध्ये मागणी केलेली माहिती अपीलार्थी यांना दिल्यास संबंधित न्यायालयाचा अवमान होत नसल्यास तसेच संबंधित न्यायालयाने हरकत घेतली नसल्यास अपीलार्थी यांनी मागणी केल्याप्रमाणे माहिती अपीलार्थीस देण्यात यावी असे निर्देश दिले.

संबंधित दंडाधिका-यांनी विरोध केल्यामुळे माहिती देण्यात आली नाही असे दिसते. मात्र दि. १२/२/२०१० रोजी जो अहवाल सादर केला आहे त्यात सहायक पोलीस आयुक्त यांनी मुद्दा क्र. ५ बाबतीत पुढीलप्रमाणे कळविलेले आहे.

" जाब देणार इसमाविरुध्द ज्या तक्रारीच्या आधारे चॅप्टर केस दाखल केली आहे अशा तक्रारीतील तक्रारदार व साक्षीदार यांना चौकशीच्या वेळी आवश्यकता भासल्यास बोलाविण्यात येते.

प्रस्तुत चॅप्टर केमध्ये पोलीस अधिकारी यांचेव्यतिरिक्त इतर साक्षीदारांची आवश्यकता भासलेली नसल्याचे कागदपत्रांवरुन निष्पन्न होत आहे."

चॅप्टर केसचा निकाल लागलेला आहे त्यामुळे चॅप्टर केससंबंधीची कागदपत्रे किंवा माहिती देण्यास कुठचीहि हरकत नाही. त्यामुळे दंडाधिका-यांनी घेतलेली हरकत ही फेटाळून लावण्यात येत आहे. अपीलार्थींना आता वर निर्देश केल्याप्रकाणे स्पष्टीकरणही उपलब्ध झाले आहे. दिलेल्या उत्तराव्यतिरिक्त आणखीन कांही कागदपत्रे अपीलार्थीस पाहिजे असल्यास किंवा पहायची असल्यास ती पाहून त्यांनी निवड केलेली कागदपत्रे त्यांना देण्यांत यावीत.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक १६ फेब्रूवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १४८०/०२

श्री. बाळासाहेब पुंडलिक दौंडे -----अपीलार्थी
ता. अध्यक्ष भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलन,
मु. पिंपळगांव लेप, पो. जळगांव नेऊर,
ता. येवला, जि. नाशिक.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी ----उत्तरवादी
ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद, नाशिक.

२.जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक
ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद नाशिक.

*---विवेचन---*

अपीलार्थीस जिल्हा परिषद नाशिक यांच्याकडून ग्रामपंचायत पिंपळगांव लेप येथील अतिक्रमणाबाबतची यादी तसेच झाडेतोड बाबतची जी माहिती पाहिजे होती ती, "ही माहिती ग्रामपंचायत स्तरावरील असल्यामुळे त्यांच्याकडून देण्यात यावी असे निर्देश जिल्हा परिषदेकडून देण्यांत आले होते. " याबाबत दिलेल्या माहितीने समाधान न झाल्यामुळे व माहिती देण्यास विलंब लागला आहे हे कारण देऊन त्यांनी आयोगाकडे दि. १७/४/२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. त्याची सुनावणी नाशिक येथे दि. २१/१२/२००९ रोजी घेण्यांत आली. सुनावणीच्या वेळेला अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते. तसेच संबंधित ग्रामसेवक हे सुध्दा उपस्थित होते.

अपीलार्थीच्या म्हणण्यानुसार माहिती पुरविण्यास विलंब झाला आहे. त्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन दिलेले आहे.

"संदर्भ -- १. नाशिक जि.प.नाशिक जा.क्र/साप्रवि/ग्रापं/तक्रार-१/३५२/०८ नाशिक

दि. २९/०७/२००८

२. नाशिक जि.प.नाशिक जा.क्र/साप्रवि/ग्रापं/तक्रार-१/५७१/०८ नाशिक दि. १८/१०/२००८

३. क्र.पं.स.ये/साप्रवि/ग्रापं/आस्था/४६४/०९ सामान्य प्रशासन विभाग पंचायत समिती कार्यालय येवला, दि. १५/५/२००९

४.शासकीय माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक ग्रा.पं.विभाग जिल्हा परिषद नाशिक यांचेकडील दि. १९/१२/२००९ ची सुचना.

महोदय,

वरील संदर्भिय विषयान्वये विनंतीपूर्वक खुलासा सादर करण्यात येतो की, संदर्भ १ नुसार श्री.बाळासाहेब पुंडलीक दौंडे यांनी ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद नाशिक यांचेकडे मौजे पिंपळगांव लेप येथील अतिक्रमणाबाबतची माहिती, माहिती अधिकारात मिळणेबाबत अर्ज दाखल केला होता. सदरच्या अर्जाप्रमाणे परिपूर्ण माहिती श्री. दौंडे यांना दि. ३/८/२००८ रोजी ग्रामपंचायत कार्यालय पिंपळगांव लेप येथे म.सरपंच श्री. मधुकर नामदेव साळवे यांचे समक्ष माहिती दिली असता श्री.दौंडे यांनी माहितीचे वाचन करुन माहिती परत केली व माहिती घेणेस नकार दिला. तसेच स्वाक्षरीही दिली नाही.

संदर्भ २ नुसार अर्जदार श्री.दौंडे यांना अर्जाप्रमाणे ग्रामपंचायतकडे उपलब्ध असलेली माहिती ग्रामपंचायत मध्ये बोलावून माहिती दिली असता त्यांनी श्री.माणिक कारभारी रसाळ यांचे नांव अतिक्रमण यादी आहे किंवा नाही याची पाहणी केली. त्यांना अपेक्षित असलेली नांवे न दिसलेमुळे माहिती घेणेस व स्वाक्षरी देणेस पुन्हा नकार दिला. वरील प्रमाणे व्यक्तींची नांवे यादीत समाविष्ट केल्याशिवाय माहिती स्वीकारणेस त्यांनी नकार दिला व सदरच्या अतिक्रमण धारकांच्या यादीची आवश्यकता नसल्याचे श्री. दौंडे यांनी सांगितले. सदरची नांवे ग्रामपंचायत गावठाण मोजणीत अतिक्रमणधारकांच्या यादीत मा.तालुका निरीक्षक , भूमि अभिलेख येवला यांचे मोजणी नकाशात येत नसल्याने अतिक्रमण धारकांच्या यादीत ग्रामपंचायत सदरची नावे समाविष्ट करुन माहिती मागणीधारकास देऊ शकत नाही.

संदर्भ ३ नुसार अर्जदार श्री.दौंडे यांना ग्रामपंचायतकडे उपलब्ध असलेली माहिती दि. २७/५/२००९ रोजी ग्रामपंचायत पिंपळगांव लेप येथे मा.सरपंच श्री.मधुकर नामदेव साळवे यांचे समक्ष देण्यात आली. मिळालेल्या माहितीबद्दल त्यांनी पोचही दिलेली आहे.

संदर्भ ४ नुसार श्री.दौंडे यांनी माहितीच्या अधिकारात मागणी केलेल्या माहितीपैकी जी माहिती ग्रामपंचायतकडे उपलब्ध आहे ती सर्व माहिती त्यांना पुरविलेली आहे. मी अधिनियमानुसार माहिती देण्याची कार्यवाही विहित वेळेत केली परंतु श्री.दौंडे यांनी सहकार्य न केल्यामुळे तसेच अपेक्षेप्रमाणे ग्रामपंचायतकडून चुकीची माहिती उपलब्ध करुन घेण्याचे प्रयत्नामुळे झालेल्या विलंबास सर्वस्वी तेच जबाबदार आहेत. "

वरील विवेचनावरुन अपीलार्थीस दिलेली अतिक्रमणधारकांची यादी पाहता रेकॉर्डप्रमाणे माहिती देण्यात आलेली आहे असे दिसून आले. वरील सर्व विवेचन वाचल्यानंतर अपीलार्थीस माहिती देण्यास निश्चितपणे प्रयत्न झालेला दिसून येतो. रेकॉर्डप्रमाणे माहिती दिलेली दिसून आली आहे. जर अपीलार्थीस एखादया व्यक्तीचे नांव त्यात नाही किंवा आहे याबद्दल आक्षेप असेल तर त्यांनी संबंधित योग्यत्या प्राधिका-यांकडे त्याची तक्रार करणे योग्य राहिल. रेकॉर्डप्रमाणे माहिती दिलेली असून येत आहे. विलंबाबाबत अपीलार्थी व ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक एकमेकाकडे बोट दाखवितात. पण ग्रामसेवकांचे निवेदन लक्षात घेता माहिती देण्याचा प्रयत्न झालेला दिसून येतो. विलंबाबाबत निश्चित निष्कर्ष काढता येत नसल्यामुळे दंडाबाबत आदेश नाहीत.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १६ फेब्रूवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५४१२/अपील क्रमांक ५३७८/०२

श्री.सुदेश श्री. साळगांवकर -----अपीलार्थी
बी/५७, मेघवाडी, डॉ. एस.एस.राव मार्ग,
लालबाग, मुंबई -- ४०० ०१२.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सहायक मनपा आयुक्त ----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका एफ/दक्षिण विभाग कार्यालय,
डॉ. बी.ए. रोड, परेल, मुंबई ४०० ०१२.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व.का)
बृहन्मुंबई महानगरपालिका एफ/दक्षिण विभाग कार्यालय,
डॉ. बी.ए. रोड, परेल, मुंबई ४०० ०१२.

*---विवेचन---*

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक १६/११/२००९
सुनावणीचा दिनांक १५ फेब्रूवारी, २०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस भूखंड क्र. १(बी)/११८(भाग), २/११८, ३/११८, ४/११८ ,७/११८ या परेल शिवडी डिव्हीजन महानगरपालिकेच्या ॲक्वायर प्रॉपर्टी संदर्भात तेथील जमिनीचा विनीयोग कसा होणार यासंबंधी माहिती पाहिजे होती.

अपीलार्थीस यासंबंधी माहिती दिलेली आहे व अपीलार्थींनी अतिशय प्रयत्नपूर्वक याविषयासंदर्भातील सर्व कागदपत्रांच्या प्रती प्राप्त केलेल्या आहेत व संबंधित नस्ती सुध्दा त्यांनी पाहिलेली आहे. अपीलार्थीस संबंधित जमिनीच्या विकासासंदर्भात काही खुलासा महापालिकेकडून पाहिजे आहे.

माहितीचा अधिकार अधिनियमामध्ये अस्तित्वात असलेल्या सर्व कागदपत्रांच्या प्रती मिळू

**शकतील. मात्र अमुक एका परिस्थितीत महापालिकेची भूमिका काय असेल वगैरे बाबतीत कागदपत्रे अस्तित्वातच नसल्यामुळे माहिती अपीलार्थीस मिळू शकेलच असे नाही. मात्र याबाबतीत अपीलार्थींनी महापालिका आयुक्तांबरोबर निश्चितपणे चर्चा करावी, जेणेकरुन त्यांना महापालिकेच्या या प्लॉटच्या विकासाबाबत त्यांच्या भूमिकेविषयी अंदाज येऊ शकेल.**

***---आदेश---***

**सद्य:स्थितीत अपील निकाली ठेवण्यात येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक १६ फेब्रूवारी, २०१०**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४५७८/अपील क्रमांक ५३८३/०२

श्री. ग्रेगरी परसिवल डिसा -----अपीलार्थी
४, सिल्व्हर स्ट्रीक, कलिना
कोलेव्हरी चर्च रोड, सांताक्रुज (पूर्व) मुंबई ४०० ०९८.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सहायक मनपा आयुक्त ----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/पूर्व विभाग कार्यालय,
१३७, टीपीएस-५, प्रभात कॉलनी,
सांताक्रुज (पूर्व) मुंबई ४०० ०५५.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (पर्यावरण)
बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/पूर्व विभाग कार्यालय,
१३७, टीपीएस-५, प्रभात कॉलनी,
सांताक्रुज (पूर्व) मुंबई ४०० ०५५.

***---विवेचन---***

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक २६/११/२००९
सुनावणीचा दिनांक १६ फेब्रूवारी, २०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींचा मुळ अर्ज तसा माहिती मागणार नाही. अपीलार्थींनी त्यांच्या वॉर्डातील कचराकुंडी हलवावी याबाबत सूचना केलेली होती. त्यामुळे अपीलार्थीस कोणती माहिती द्यावी याबाबत संभ्रम असल्यामुळे आपण मागितलेली माहिती उपलब्ध नाही असे जन माहिती अधिका-यांनी कळविले.

अपिलीय अधिका-यांनी मात्र त्यांच्या प्रशासकीय अधिकारात जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता यांना कचराकुंडी स्थलांतरित करणे शक्य आहे किंवा नाही हे तपासण्यात यावे व

तसे अपीलार्थीस कळवावे असे आदेश दिले. त्यानुसार चौकशी करुन कचराकुंडी हलविता येणे शक्य नाही असे जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस कळविले.

सुनावणीच्या वेळेला स्थानिक नगरसेवक यांनी सुध्दा आहे त्याचठिकाणी कचराकुंडी असणे योग्य आहे असे पत्र प्रशासनास दिलेले आहे. त्यामुळे ते पत्र सुध्दा अपीलार्थीस दाखविण्यांत आलेले आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक १६ फेब्रूवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४५६९/अपील क्रमांक ५३८०/०२

श्री. रामविंदर सिंग -----अपीलार्थी
१/७, सागरगित कॉलनी (Mb PT)
वरळी कोळीवाडा, वरळी, मुंबई -- ४०० ०३०.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा चिफ सर्व्हेअर आणि सागरी अभियंता ----उत्तरवादी
चिफ सर्व्हेअर आणि सागरी अभियंता यांचे कार्यालय,
महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, इंडियन मर्कन्टाईल चेंबर,
३ रा मजला, रामजीभाई कमानी मार्गख बॅलॉर्ड इस्टेट,
मुंबई ४०० ००१.

२.जन माहिती अधिकारी
चिफ सर्व्हेअर आणि सागरी अभियंता यांचे कार्यालय,
महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, इंडियन मर्कन्टाईल चेंबर,
३ रा मजला, रामजीभाई कमानी मार्ग, बॅलॉर्ड इस्टेट,
मुंबई ४०० ००१.

*---विवेचन---*

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक २३/११/२००९
सुनावणीचा दिनांक १६ फेब्रूवारी, २०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस हवी असलेली माहिती देण्यात आलेली आहे. मात्र अपीलार्थीचे म्हणणे की, मुळ अर्जास उत्तर व अपीलास सुध्दा उत्तर हे एकाच व्यक्तीने दिले आहे ते गैर आहे. अपीलार्थींचे हे म्हणणे बरोबर आहे. मुळ अर्जास माहिती ही जन माहिती अधिका-यांनी द्यायची असते व अपिलीय अधिका-यांनी प्रथम अपीलावर निर्णय द्यायचा असतो. पण या दोन्ही व्यक्ती वेगवेगळया असणे आवश्यक आहे. ही बाब मुख्य कार्यकारी अधिकारी मेरिटाईम बोर्ड यांच्या निदर्शनास आणण्यात

येत आहे व त्यांनी  जन माहिती अधिकारी कोण व अपिलीय अधिकारी कोण आहेत यासंबंधी कार्यालयाच्या प्रवेशद्वारावरील फलकावर स्पष्टपणे नमूद  करण्यासंबंधी योग्यत्या सूचना द्याव्यात.

*----आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

या आदेशाची प्रत  मुख्य कार्यकारी अधिकारी, मेरिटाईम बोर्ड, इंडियन मर्कन्टाईल चेंबर,३ रा मजला, रामजीभाई कमानी मार्ग,  बॅलॉर्ड इस्टेट,मुंबई  ४०० ००१. यांनाहि पाठविण्यात यावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १६ फेब्रूवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४५७२/अपील क्रमांक ५३८४/०२
क्रमांक-मु.मा.आ/४४५७१/अपील क्रमांक ५३८५/०२

श्री. विनोदकुमार के मिश्रा -----अपीलार्थी
नगीना चाळ, यादव नगर,
खेराणी रोड, साकीनाका, मुंबई ४०० ०७२.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा संचालक ----उत्तरवादी
संचालनालय वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांचे कार्यालय,
सेंट जॉर्जेस रुग्णालय, सी.एस.टी, मुंबई ४०० ००१.

२.जन माहिती अधिकारी
संचालनालय वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांचे कार्यालय,
सेंट जॉर्जेस रुग्णालय, सी.एस.टी, मुंबई ४०० ००१.

*---विवेचन---*

अपीलांचे दिनांक २३/११/२००९
सुनावणीचा दिनांक १६ फेब्रूवारी, २०१०.
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींचे जे दोन्ही मुळ अर्ज आहेत त्यानुसार अपीलार्थीस माहिती देण्यात आलेली आहे. अपीलार्थींच्या प्रथम व द्वितीय अपीलात अपीलार्थीस दिलेली माहिती त्रुटीपूर्ण का वाटते याचे कुठचेहि विवेचन नाही.

अपीलार्थींनी याच विषयावर आतापर्यंत कमीत कमी २० ते २५ अर्ज केले असतील व त्यांच्याकडे या विषयावरील माहितीचा भरपूर साठा एकत्रित झालेला आहे.

अपीलार्थीस संचालनालयाचे जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अत्यंत काळजीपूर्वक माहिती तयार करुन देतात असेच आयोगाच्या निदर्शनाला आलेले आहे. अपीलार्थीस

या सर्व माहितीच्या आधारे ॲडमिशन पध्दतीबाबत जर कांही सूचना असतील तर त्या त्यांनी निश्चितपणे संचालनालयास करायला पाहिजेत.

***---आदेश---***

दोन्ही अपीले अमान्य करण्यात येत आहेत.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक १६ फेब्रूवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४५७९/अपील क्रमांक ५३८९/०२

श्री. शिवाजी केशव इंगळे -----अपीलार्थी
कुर्ला जयहिंद बुध्द विकास को.ऑप.हौ.सो.लि.
इमारत नं.१, रुम नं. ३१०, ३ रा मजला,
सी विंग, कुर्ला (पूर्व) मुंबई ४०० ०२४.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उप नियंत्रक ----उत्तरवादी
उपनियंत्रक, शिधावाटप यांचे कार्यालय,
ई परिमंडळ, चंचल स्मृती इमारत,
१ ला मजला, ग.द.आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ३१.

२.जन माहिती अधिकारी
उपनियंत्रक, शिधावाटप यांचे कार्यालय,
ई परिमंडळ, चंचल स्मृती इमारत,
१ ला मजला, ग.द.आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ३१.

***---विवेचन---***

अपीलांचे दिनांक २४/११/२००९
सुनावणीचा दिनांक १६ फेब्रूवारी, २०१०.
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीच्या अर्जासंबंधी पुढीलप्रमाणे निवेदन अपिलीय अधिकारी यांनी सादर केले.

"श्री. शिवाजी केशव इंगळे , अपीलार्थी यांचे सुनावणीचे संदर्भातील दिनांकनिहाय कार्यवाहीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे --

| | |
|---|---|
| ०२/०७/०९ | अपीलार्थी श्री.शिवाजी केशव इंगळे, यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती अधिकारी तथा शिधावाटप अधिकारी, शि का क ३२-कुर्ला यांच्याकडे अर्ज केला. |

| | |
|---|---|
| १८/०७/०९ | माहिती अधिकारी यांनी पत्र दिनांक १८/७/०९ नुसार कागदपत्रांची संख्या खुप असल्याने, अर्जदारास कार्यालयात येऊन त्यांना आवश्यक असलले कागदपत्रांची पहाणी केल्यानंतर, त्याप्रमाणे शुल्काचा भरणा कार्यालयात केल्यानंतर, छायाप्रती काढून माहिती देण्यात येईल असे कळविले. |
| २१/०७/०९ | अर्जदाराची पोच घेतली आहे. |
| २५/०८/०९ | अपीलकर्ता श्री.शिवाजी केशव इंगळे, यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत माहिती अधिकारी तथा शिधावाटप अधिकारी, शि.का क ३२-कुर्ला यांनी समाधानकारक माहिती न दिल्यामुळे अपील अर्ज दिनांक २५/०८/०९ रोजी दाखल केला. |
| २३/१०/०९ | प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन माहिती अधिकारी तथा शिधावाटप अधिकारी, शि.का क ३२-कुर्ला यांनी दि. १/१/०९ ते २/०७/०९ या कालावधी मध्ये कार्यालयामधील नमुना ८, नमुना ९, नमुना १५ व बी १ अर्ज व सोबतच्या छायांकित प्रती x रुपये २/- एवढे शुल्क अर्जदारास दि. ०७/११/२००९ पर्यंत लेखी कळवून अर्जदाराने शुल्क भरल्यानंतर त्यांस माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिनांक २३/१०/२००९ रोजी देण्यात आले. |
| ३१/१०/०९ | माहिती अधिकारी, शिधावाटप अधिकारी, शि.का क ३२-कुर्ला यांनी पत्र क्र.३२ई/आस्था/माअ/जा २००५ दिनांक ३१/१०/२००९ नुसार पुढील रु. ९२,०५६/- शुल्काचे पत्र आर.पी.ए.डी.ने पाठविलेले आहे. |

अर्जदाराने मागितलेली माहिती मधील अर्जाची संख्या (१६८२२) जास्त असल्याने, माहिती अधिकारी यांनी अर्जदारास कार्यालयात उपस्थित राहून आवश्यक असलेली कागदपत्रे तपासणी करण्याची विनंती केल्याचे पत्र विहित मुदतीमध्ये दिलेले आहे. सदर अर्जाचे माहितीचे शुल्क रु. ९२,०५६/- ही अल्प रक्कम नाही. तसेच माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीमध्ये कागदपत्रांची तपासणी करण्याचे पत्र अर्जदारास दिलेले आहे, सबब अपील आदेशामध्ये अर्जदारास शुल्क भरुन माहिती घेण्याचे आदेश निर्ममित केलेले आहेत."

सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी व उत्तरवादी यांचे म्हणणे समजून घेण्यांत आले. माहितीसाठी आकारलेली रक्क्म कोणीही भरु शकणार नाही. तेव्हा दोन्ही पक्षाशी चर्चा करुन असे ठरविण्यात आले की, अपीलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक १९ फेब्रूवारी, २०१० रोजी जोतील व अपीलार्थीना जशा स्वरुपाची माहिती पाहिजे आहे त्याचे सॅम्पल माहितीच्या स्वरुपात अपीलार्थीना दाखविण्यात येईल किंवा एखादया विवक्षित अर्जाची माहिती पाहिजे असेल तर ती त्यांना शुल्क भरुन घेता येईल.

एकंदर अपीलार्थीनी अर्जाची पध्दत समजावून घेऊन व आपल्या माहितीची व्याप्ती निश्चित करुन त्याच दिवशी अपीलार्थीस शुल्क भरुन माहिती देण्यात यावी.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक १७ फेब्रूवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४५९५/अपील क्रमांक ५३९५/०२

श्रीमती अर्चना श्रीवास्तव -----अपीलार्थी
६९, न्यू मला, बाबासाहेब आंबेडकर रोड,
खार (पश्चिम) मुंबई ४०० ०५०.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/ उत्तर यांचे कार्यालय,
हरिश्चंद्र येवले मार्ग, दादर (पश्चिम) मुंबई २८.

२.जन माहिती अधिकारी
बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/ उत्तर यांचे कार्यालय,
हरिश्चंद्र येवले मार्ग, दादर (पश्चिम) मुंबई २८.

***---विवेचन---***

अपीलांचे दिनांक १/१२/२००९
सुनावणीचा दिनांक १७ फेब्रूवारी, २०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीच्या अपीलासंबंधी जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन दिले.

" अपीलार्थी श्रीमती अर्चना श्रीवास्तव यांनी आपणाकडे केलेल्या अपील अर्जामध्ये (अनु ४) नमूद केलेला तपशिल आणि त्यांच्या दि. २२/४/०९ रोजीच्या माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत मागितलेला माहितीचा तपशील भिन्न असल्याकारणाने बोध होत नाही.

तथापि अपीलार्थी श्रीमती अर्चना श्रीवास्तव यांच्या वरील नमूद अर्जाचे अनुषंगाने त्यांना या कार्यालयाचे पत्र क्रमांक जीउ/४०३६/प्र.अ(धारावी) दि. २०/०५/२००९ अन्वये शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घेणेबाबत कळविलेले आहे."

माहितीचा अर्ज व अपील याची सांगड लागत नाही हे खरेच आहे.   तरी अपीलार्थीस मुदतीत शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घेणेबाबत कळविलेले आहे.

अपीलार्थींनीहि  माहिती मागत असताना त्याच्या आवाक्याचा विवेक ठेवणे आवश्यक आहे. असे जरी असले तरी अपीलार्थींनी माहितीचे अवलोकन करावे व त्यांना आवश्यक असलेल्या माहितीच्या प्रती शुल्क भरुन प्राप्त करुन घ्याव्यात असे निर्देश देण्यात येत आहेत.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक १८ फेब्रूवारी, २०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४५८७/अपील क्रमांक ५४०४/०२

श्री. विलास जगन्नाथ हिंदळेकर -----अपीलार्थी
८८/२६२५, पंतनगर, घाटकोपर (पूर्व)
मुंबई ४०० ०७५.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सहायक मनपा आयुक्त ----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
एन वॉर्ड विभाग, जवाहर रोड, घाटकोपर (पूर्व)
मुंबई ४०० ०७७.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.का)
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
एन वॉर्ड विभाग, जवाहर रोड, घाटकोपर (पूर्व)
मुंबई ४०० ०७७.

***---विवेचन---***

अपीलांचे दिनांक २७/१२/२००९
सुनावणीचा दिनांक १७ फेब्रूवारी, २०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस अष्टमुख गणेश को.ऑप.हौसिंग सोसायटी इमारत क्र. ८८ मधील झालेल्या बेकायदेशीर बांधकामासंबंधी २० मुद्दयांवर माहिती पाहिजे होती. अपीलार्थीस सद्यःस्थितीची माहिती देण्यांत आलेली आहे. जे अभिलेख उपलब्ध नाहीत त्यासंबंधी कळविण्यात आलेले आहे.

सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट झाले की, बिल्डींग प्लान्सच्या संदर्भात अपीलार्थीचा अर्ज इमारत प्रस्ताव विभागकडे पाठविण्यात आलेला आहे व अपीलार्थीच्या अर्जाच्या संदर्भात त्यांच्याकडून कांही स्पष्टीकरण मागविण्यात आलेले आहे. सुनावणीच्या वेळेला अपीलार्थीनी स्पष्टीकरण देण्याचे मान्य केले. त्याप्रमाणे स्पष्टीकरण प्राप्त होताच ती माहिती अपीलार्थीस देण्यात यावी.

**वरील इमारतीत झालेल्या अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात अपीलार्थींची कार्यवाहीची मागणी आहे ती यासंबंधी चौकशी करुन अपीलार्थीस कळविण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.**

***---आदेश---***

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**

**दिनांक १८ फेब्रूवारी, २०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४५८२/अपील क्रमांक ५३९८/०२

श्री. विजय के. चौहाण -----अपीलार्थी
२ अ, सन & सी अपार्टमेंट, रॉयल लेन जवळ,
जुहू तारा रोड, सांताक्रुज (पश्चिम) मुंबई ४०० ०४९.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सहायक प्रबंधक ----उत्तरवादी
लोक आयुक्त कार्यालय, १ ला मजला,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई ३२.

२.जन माहिती अधिकारी
लोक आयुक्त कार्यालय, १ ला मजला,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई ३२.

***---विवेचन---***

अपीलांचे दिनांक १९/११/२००९
सुनावणीचा दिनांक १७ फेब्रूवारी, २०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस लोक आयुक्त कार्यालयाच्या गेल्या ५ वर्षाच्या डिसपोजल तसेच नागरिकांची सनद व नागरी सनदेअंतर्गत लोक आयुक्त आणि उपलोक आयुक्त कार्यालयापुढे आलेल्या प्रकरणात किती दिवसात अंतिम कार्यवाही या विषयीची माहिती पाहिजे होती.

अपीलार्थीस गेल्या पांच वर्षात निर्गत केलेल्या प्रकरणांची आकडेवाडी देण्यांत आली आहे. तसेच लोकआयुक्त कार्यालयासंबंधी माहितीपुस्तिका तयार केली असून ती वेबसाईटवर प्रसिध्द केलेली आहे असे कळविण्यात आले आहे. व वेबसाईटचा पत्ता अपीलार्थीस देण्यात आलेला आहे. मात्र अपीलार्थींचे प्रतिपादनाचा मुख्य जोर हा नागरिकांच्या सनदीनुसार वेळेचे बंधन निश्चित करुन ते देण्यासंबंधीचा आहे. लोकआयुक्त कार्यालयाने नागरिकांची सनद ही पारित केलेली नाही असे

त्यांना कळविण्यात आलेले आहे. तसेच कायद्यामध्ये किती मुदतीत प्रकरण निकाली काढावयास पाहिजे याबाबत मुदत ठरवून देण्यात आलेली नाही हीहि माहिती देण्यात आलेली आहे.

एखादया संस्थेविषयी नागरिकांच्या अपेक्षा असू शकतील. मात्र माहितीच्या अधिकारामध्ये उपलब्ध असलेली माहिती द्यायची असते व ती अपीलार्थीस देण्यांत आलेली आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक १८ फेब्रूवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४५८६/अपील क्रमांक ५४०३/०२

श्री. शेख नईम शेख लाल -----अपीलार्थी
जिल्हाध्यक्ष समाजवादी पार्टी, हिंगोली,
नवीन पाण्याच्या टाकीजवळ, पलटन,
हिंगोली, जिल्हा हिंगोली.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उप सचिव ----उत्तरवादी
महसूल व वन विभाग (ई-१)
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

२.जन माहिती अधिकारी
महसूल व वन विभाग (ई-१)
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

*---विवेचन---*

अपीलांचे दिनांक १६/११/२००९
सुनावणीचा दिनांक १७ फेब्रूवारी, २०१०.
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस श्रीयुत प्रकाश मोतीराम पिरतवाड यांनी खोटे जात प्रमाणपत्र सादर केल्याबद्दल उच्च न्यायालयाने जे निर्देश दिले होते त्यावर केलेल्या कारवाईची माहिती पाहिजे होती.

अपीलार्थीच्या अपीलासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे खुलासा सादर केलेला आहे.

" श्री.शेख नईम शेख लाल यांनी त्यांच्या दि. २२/७/२००९ च्या अर्जान्वये श्री.प्रकाशत मोतीराम पिरतवाड , स्वागत अधिकारी, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी मुन्नेरवारळू या अनुसूचित जमातीचे खोटे प्रमाणपत्र काढून नोकरी मिळविली व पदोन्नती घेतली. याबाबतच्या

तक्रारीनंतर जात पडताळणी समिती औरंगाबाद यांनी त्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरवून दि. १६/१०/२००७ च्या शुध्दीपत्रकाद्वारे गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिलेले होते. मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी रिट याचिका क्र. ६३४४/२००७ मध्ये श्री. पिरतवाड याना शासने दि. १५/६/१९९५ च्या शासन निर्णयास अनुलक्षून दिलेले संरक्षण नियमबाहय असल्याने त्यांच्याविरुध्द आठ आठवडयाच्या आत कार्यवाही करण्याचे आदेश पारित केले आहेत. या आदेशानुसार श्री.पिरतवाड यांच्याविरुध्द काय कार्यवाही करण्यात आली याबाबत विचारणा केली असून याबाबत केलेल्या कार्यवाहीची प्रत व वरिष्ठांना सादर केलेल्या टिप्पणीच्या प्रती उपलब्ध करुन देण्याची विनंती केली आहे.

श्री.शेख नईम शेख लाल यांच्या दि. २२/७/२००९ चा अर्ज दि. २५/७/२००९ रोजी कार्यासनास प्राप्त झाला. अर्जदाराने मागितलेल्या माहितीची संबंधित नस्ती त्यावेळी कार्यासनात उपलब्ध नव्हती. सदर नस्ती दि. २१/७/२००९ रोजी सामान्य प्रशासन विभागास सादर करण्यात आली होती. नस्ती कार्यासनात उपलब्ध नसल्यामुळे नस्ती परत आल्यानंतर कागदपत्रांच्या प्रती पुरविण्यात येतील असे अर्जदारास कळविण्यात आले.

दि. २२/७/२००९ च्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन न दिल्याने श्री.शेख नईम शेख लाल यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २२/९/२००९ च्या अर्जान्वये अपील दाखल केले. सदर अपीलामध्ये दि. १०/११/२००९ रोजी अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणी झ ाली. सदर सुनावणीमध्ये दिलेल्या आदेशान्वये श्री. शेख नईम शेख लाल यांना त्यांनी मागणी केलेल्या कागदपत्रांच्या प्रती विनामूल्य उपलब्ध करुन देण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत. त्या अनुषंगाने श्री.शेख नईम शेख लाल यांना श्री. पी.एम. पिरतवाड यांच्या प्रकरणासंदर्भातील नस्तीच्या छायाप्रती उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. तसेच श्री.पिरतवाड यांच्या संदर्भात करण्यात आलेल्या कार्यवाही बाबत वरिष्ठांना सादर केलेल्या टिप्पणीच्या प्रतीसह माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

मा. उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ६३४४/२००७ मध्ये दि. १७/६/२००९ रोजी दिलेल्या निर्णयानुसार जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे आदेश कायम ठेवल्याने समितीच्या आदेशानुसार श्री.पिरतवाड यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करुन श्रीय पिरतवाड यांच्याविरुध्द शिस्तभंग विषयक

कार्यवाही सुरु करण्याबाबतचा आवश्यकतो प्रस्ताव सादर करण्याबाबत विभागीय आयुक्तांना कळविण्यात आले आहे.

तसेच मा. उच्च न्यायालयाने सदर निर्णयामध्ये असेहि आदेश दिले होते की, सदर प्रकरणी आठ आठवडयात राज्य शासनाने निर्णय घ्यावा व तो सहायक शासकीय अभियोक्तंनी न्यायालयासमोर ठेवावा. तथापि, विहित मुदतीत सदर कार्यवाही पूर्ण झाली नसल्यामुळे श्री.शेख नईम यांनी मा. उच्च न्यायालयात अवमान याचिका दाखल केली आहे. मा. उच्च न्यायालयाचे दि. १७/६/२००९ च्या आदेशाचे अनुपालन होण्याच्या दृष्टीने श्री.पिरतवाड यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यामुळे त्यांच्या सेवा महाराष्ट्र अनुसुचित जाती अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणी विनियम) अधिनियम, २००० (सन २००१ चा क्रमांक २३) मधील कलम १० (१)नुसार श्री. पिरतवाड यांच्या सेवा दि. २१/१/२०१० शासन निर्णयान्वये समाप्त करण्यात आल्या आहेत. तसेच यासंदर्भातील टिप्पणीच्या प्रती श्री.शेख नईम यांना दि ९/२/२०१० च्या पत्रान्वये पाठविण्यात आल्या आहेत. "

वरील खुलाश्यावरुन शासनाने अंतिम कार्यवाही शासन निर्णय दि. २१/१/२०१० रोजी पारित केलेला आहे. त्यासंदर्भातील सर्व टिप्पणीच्या प्रती दि. ९/२/२०१० रोजी अपीलार्थीस पाठविण्यात आलेल्या आहेत असे नमूद केलेले आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक १८ फेब्रूवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४५८५/अपील क्रमांक ५४०२/०२

श्री. आत्माराम धुरी -----अपीलार्थी
सरचिटणीस, शासकीय वाहनचालक संघटना,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता ----उत्तरवादी
अधीक्षक अभियंता यांचे कार्यालय,
मुंबई (सार्वजनिक बांधकाम) मंडळ,
२५, मर्झबान रोड, फोर्ट , मुंबई ४०० ००१.

२.जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
अधीक्षक अभियंता यांचे कार्यालय,
मुंबई (सार्वजनिक बांधकाम) मंडळ,
२५, मर्झबान रोड, फोर्ट , मुंबई ४०० ००१.

*---विवेचन---*

अपीलांचे दिनांक २७/११/२००९
सुनावणीचा दिनांक १७ फेब्रूवारी, २०१०.
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस कर्मचारी व त्यांच्या संघटनांना दिलेल्या मंत्रालय व नवीन प्रशासकीय भवन येथील इमारतीत दिलेल्या जागांचे करारनामे, भाडे थकबाकी यासंबंधीची माहिती पाहिजे होती.

यासंबंधी उपलब्ध माहिती उशिरा कां होईना पण दिलेली आहे. मात्र या प्रत्येक संस्थेकडे किती थकबाकी आहे हे अजून काढलेले नाही, त्यामुळे ती देता आली नाही असे सुनावणीच्या वेळेला सांगण्यात आले.

थकबाकीची रक्कम काढून ती अपीलार्थीस एक महिन्याच्या आत पुरविण्यात यावी असे निर्देश देण्यात आहे.

***---आदेश---***

अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी वर निर्देशिल्याप्रमाणे त्वरित कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक १८ फेब्रूवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३१२२६/अपील क्रमांक ५४०१/०२

श्रीमती गुलाब सोनथालिया -----अपीलार्थी
संचालक, सिताराम इंडस्ट्रीज प्रा.लि.
धून अपार्टमेंट, ९ वा मजला,
६६, वरळी हिल रोड, मुंबई ४०० ०१८.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी ----उत्तरवादी
सहायक आयुक्त (वसाहत) यांचे कार्यालय,
बृहन्मुंबई महानगरपालिका, श्री.छत्रपती शिवाजी महाराज
मार्केट इमारत, २ रा मजला, पलटन रोड, मुंबई ४०० ००१.

२.जन माहिती अधिकारी
सहायक आयुक्त (वसाहत) यांचे कार्यालय,
बृहन्मुंबई महानगरपालिका, श्री.छत्रपती शिवाजी महाराज
मार्केट इमारत, २ रा मजला, पलटन रोड, मुंबई ४०० ००१.

*---विवेचन---*

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी , अपीलार्थी व त्यांचे ॲड्व्होकेट उपस्थित होते. सुनावणीच्या वेळेस असे निदर्शनास आले की, अपीलार्थीच्या दि. ४/४/२००८ रोजीच्या द्वितीय अपीलात याअगोदरच अपील क्र. ४००४ मध्ये दि. १६ मार्च २००९ रोजी निर्णय देण्यांत आलेले आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक १८ फेब्रूवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४५८९/अपील क्रमांक ५३९७/०२

श्री. शैलेश सी. ठक्कर -----अपीलार्थी
७०४, होमस्टेड, लोखंडवाला कॉम्प्लेक्स,
अंधेरी (पश्चिम) मुंबई ४०० ०५३.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त ----उत्तरवादी
परिमंडळ २, जे. जे. मार्ग, नागपाडा,
मुंबई ४०० ००८

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
दक्षिण प्रादेशिक विभाग नियंत्रण कक्ष,
जे.जे. मार्ग, नागपाडा, मुंबई ४०० ००८.

***---विवेचन---***

अपीलांचे दिनांक १/१२/२००९
सुनावणीचा दिनांक १७ फेब्रूवारी, २०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीच्या दि. १४ सप्टेंबर, २००९ रोजीच्या अर्जानुसार आझाद मैदान पोलीस स्टेशनमध्ये दाखल झालेल्या **MECR NO.03/08** या केसमधील **A to G** या कागदपत्रांची मागणी अपीलार्थी यांनी केली होती.

सदरील केसमधील अपीलार्थी हे आरोपी असल्यामुळे व मा. सत्र न्यायालय,मुंबई यांनी दिलेल्या आदेशानुसार जामीनावर असल्यामुळे माहिती देणे शक्य नाही असे कळविण्यात आले. व प्रथम अपिलीय आदेशात न्यायालयाच्या आदेशाने हा तपास चालू असल्याने अपीलार्थीस सद्य:स्थितीची माहिती देता येत नाही या जन माहिती अधिका-यांच्या मताशी सहमत आहे असा निर्णय दिला होता त्याविरुध्द सदरचे अपील आहे.

मुळ क्रिमीनल केसच्या बाबतीत मा. हायकोर्टाने दि. २४ जून, २००९ रोजीच्या आदेशानुसार, मेट्रोपोलिटन मॅजिस्ट्रेट यांनी दि. २१ मे. २००८ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही व्हावी असे निर्देश दिले होते ते आदेश पुढीलप्रमाणे आहेत-

**" Perused complaint and the documents attached thereto. Heard Complainant who happens to be practicing Adovcate. The averments made in the complaint do not require investigation under setion 156 (3) of Cr.P.C. However the complaint may record is statement on oath and examine his witness. "**

**SD/- M.M. 23RD Court,**
**I/C: 8TH Court,**
**Dt. 21/05/2008**

त्यामुळे अपीलार्थीचे म्हणणे की, सेक्शन १५६ नुसार याबाबतीत इनव्हेस्टीगेशनची आवश्यकता नाही. त्यामुळे माहिती देण्यास कुठचीहि हरकत नाही.

जन माहिती अधिका-यांनी असे सांगितले की, वरील केसमधील सर्व कागदपत्र जे मेट्रोपोलिटन मॅजिस्ट्रेट कोर्टाला पाठविण्यात आला ती सर्व कागदपत्रे अपीलार्थींना दाखविण्यात आली आहेत. अपीलार्थींच्या म्हणण्यानुसार या कागदपत्रात त्यांना फक्त त्यांच्या मुद्दा क्र. C व D ची माहिती मिळाली. इतर मुद्दयांची माहिती मिळालेली नाही. त्यामुळे वरील कागदपत्रांव्यतिरक्त आणणीन कांही कागदपत्रे पोलीस स्टेशनमध्ये असायला पाहिजेत आणि यापृष्ठयर्थ त्यांनी असे सांकितले की, जो अर्ज ऑक्टोबर २००८ मध्ये २०० पेजेसच्या सहपत्रासोबत दिला होता तो सदरील फाईलमध्ये नाही. याचा अर्थ इतरहि कांही कागदपत्रे असणे शक्य आहे. त्यामुळै जन माहिती अधिकारी यांना असे निर्देश देण्यांत आले की, त्यांनी याबाबतीत पुन्हा एकदा सर्व नस्त्यांचा शोध घेऊन अपीलार्थीस आवश्यक ती माहिती द्यावी. ही कार्यवाही आदेश मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत पूर्ण करावी.

***----आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १८ फेब्रूवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १३२५/०२

श्री.बी.जे. पाटील -----अपीलार्थी
५, प्रमोद नगर, सेक्टर २, देवपूर,
धुळे.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी ----उत्तरवादी
जिल्हाधिकारी कार्यालय धुळे.

२.जन माहिती अधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय धुळे.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक १५/६/२००९
सुनावणीचा दिनांक ७/१२/२००९
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीनी दि. ९/४/२००९ च्या अर्जान्वये रोजगार हमी योजना घोटाळा सन २००७-०८ बाबत दि. १७/१२/२००८ च्या तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीच्या तपशीलाची मागणी केली. परंतु त्यांना माहिती देण्यात आली नाही म्हणून त्यांनी दि. १३/५/२००९ रोजी प्रथम अपील केले. प्रथम अपीलावर कार्यवाही न झाल्याने त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी आयोगाच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, अपीलार्थीना माहिती दिलेली असून ती त्यांना प्राप्त झाली आहे. विलंबाच्या बाबतीत दिलेला खुलासा मान्य करण्यात येत आहे. यास्तव खालील आदेश पारित करण्यात येत आहेत.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक २२ फेब्रूवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४५९८/अपील क्रमांक ५४१२/०२
क्रमांक-मु.मा.आ/४४५९७/अपील क्रमांक ५४१३/०२

श्री. निपुण मठकर -----अपीलार्थी
बी-५, जिवदानी कृपा चाळ, रामचंद्र जाधव वाडी,
विजय नगर, नालासोपारा (पूर्व) ठाणे- ४०१ २०८

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी ----उत्तरवादी
गृहनिर्माण विभाग/ झोपसु-१, मंत्रालय, मुंबई ३२.

जन माहिती अधिकारी
गृहनिर्माण विभाग/ झोपसु-१, मंत्रालय, मुंबई ३२.

२. अपिलीय अधिकारी
नगर विकास विभाग (नवि- १२)मंत्रालय, मुंबई ३२.

जन माहिती अधिकारी
नगर विकास विभाग (नवि- १२)मंत्रालय, मुंबई ३२.

*---विवेचन---*

अपीलांचे दिनांक ३० नोव्हेंबर, २००९
सुनावणीचा दिनांक २२ फेब्रूवारी, २०१०.
अपीलार्थी व दोन्ही विभागाचे जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी, गृहनिर्माण विभाग व नगर विकास विभाग या दोन्ही विभागांना वसई-विरार-नालासोपारा महानगरपालिकेमधील जे क्षेत्र झोपडपट्टी म्हणून घोषित करण्यात आले आहे त्यासंबंधीची माहिती विचारली होती.

सदर माहिती ही महापालिकेकडे किंवा नगरपालिकेकडे असल्यामुळे अपीलार्थींचा अर्ज

महानगरपालिकेकडे पाठविण्यात आला.

मात्र अपीलार्थीस जी माहिती देण्यात आलेली आहे ती वसई व नवघर हे जे महानगरपालिकेचे दोन विभाग आहेत त्याची माहिती निरंक आहे अशी देण्यात आलेली आहे. सन २००१ साली जो गृहनिर्माण विभागाचे फोटोपास देण्याविषयीचे धोरण दाखविणारा शासन निर्णय आहे त्यात नालासोपारा व विरार नगरपालिका या योजनेत अंतःर्भूत होतात असे दिलेले आहे. त्यामुळे झोपडपट्टीविषयी माहिती अस्तित्वात असेल तर ती या दोन जुन्या नगरपालिकांसंबंधीचीच असणार. मात्र या दोन नगरपालिकासंबंधीची माहिती महापालिकेने दिलेली नाही. तेव्हा जन माहिती अधिकारी वसई-विरार महानगरपालिका यांना असे निर्देश देण्यांत येतात की, हे आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांचे आंत अपीलार्थीस या दोन्ही प्रभागांविषयी माहिती देण्यात यावी.

तसेच सुरुवातीलाच संपूर्ण माहिती देण्यात कां कुचराई केली याचाहि खुलासा आयोगास १५ दिवसांच्या आत पाठवावा.

---*आदेश*---

दोन्ही अपीले अंशतः मान्य करण्यात येत आहेत.

या आदेशाची एक प्रत जन माहिती अधिकारी, वसई-विरार महानगरपालिका, विरार यांनाहि पाठविण्यात यावी.

जन माहिती अधिकारी वसई- विरार महानगरपालिका, विरार यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही मुदतीत करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २२ फेब्रूवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४६०३/अपील क्रमांक ५४१५/०२

श्री. केतन मोदी -----अपीलार्थी
२५/६, महावीर , ३ रा मजला,
एस.व्ही. सोवाणी मार्ग, मुंबई ४०० ००४

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त (मुख्या-१) ----उत्तरवादी
पोलीस आयुक्त कार्यालय, क्रॉफर्ड मार्केट,
मुंबई ४०० ००१.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (मुख्या-१)
पोलीस आयुक्त कार्यालय, क्रॉफर्ड मार्केट,
मुंबई ४०० ००१.

*---विवेचन---*

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक २ डिसेंबर, २००९
सुनावणीचा दिनांक २२ फेब्रूवारी, २०१०.
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीचा अपीलमेमो व अपिलीय अधिकारी यांनी दिलेले निवेदन लक्षात घेता अपीलार्थीस उपलब्ध असलेली माहिती देण्यांत आलेली आहे असे दिसून आले.

मात्र अपीलार्थीचा मुख्य मुद्दा कांही अधिका-यांनी त्यांच्या कार्यालयीन दालनात वातानुकुलीत यंत्रणा असण्यास पात्र नाही अशाहि अनेक अधिका-यांनी खाजगीरित्या शासनाचे आदेश डावलून अशी यंत्रणा बसविली आहे. त्यामुळे शासनास विनाकारण जादा इलेक्ट्रीसिटी रकमेचा भुर्दंड बसतो. याची नोंद पोलीस आयुक्त यांनी घेणे आवश्यक आहे.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.
या आदेशाची प्रत पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनाहि पाठविण्यात यावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २२ फेब्रूवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४६०२/अपील क्रमांक ५४१४/०२

श्री. सुमीर मनोहरलाल डेम्बला -----अपीलार्थी
अ- २०२, गोदावरी , शांतीवन,
बोरीवली (पूर्व) मुंबई ४०० ०६६.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा संचालक ----उत्तरवादी
वैद्यकीय शिक्षण व संशोधन
शासकीय दंत महाविद्यालय इमारत,
सेंट जॉर्जेस हॉस्पीटल कंपाऊंड, मुंबई ४०० ००१.

२. जन माहिती अधिकारी
वैद्यकीय शिक्षण व संशोधन
शासकीय दंत महाविद्यालय इमारत,
सेंट जॉर्जेस हॉस्पीटल कंपाऊंड, मुंबई ४०० ००१.

*---विवेचन---*

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक ३० नोव्हेंबर, २००९
सुनावणीचा दिनांक २२ फेब्रूवारी, २०१०.
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीचे अपील विचारात घेण्यांत आले. तसेच अपीलासंदर्भात अपिलीय अधिकारी यांनी दिलेले निवेदन पुढीलप्रमाणे आहे.

" अर्जदार श्री. डेम्बला यांनी दि. २४/४/२००९ च्या अर्जान्वये गत वीस वर्षात घडलेल्या रँगिंग संबंधी घटनांची माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले होते.

सदर अर्जाच्या अनुषंगाने अपीलार्थीनी मागणी केलेली माहिती महाविद्यालयांच्या स्तरावर उपलब्ध असल्याने राज्यातील सर्व आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांकडे संचालनालायाच्या दि. ८/५/२००९ च्या पत्रान्वये अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता पाठविण्यात आले होते. तसेच सदर पत्रामध्ये महाविद्यालयांकडे उपलब्ध माहिती अर्जदारास विहित शुल्काची आकारणी

करुन उपलब्ध करुन देण्याबाबत कळविण्यात आले होते व त्याचा अहवाल संचालनालयास सादर करण्याबाबत सुचित करण्यात आले होते. सदर पत्रावर अर्जदारामार्फत पुन्हा दि १३/७/२००९ च्या अर्जान्वये माहिती प्राप्त झाल्याचे नमुद करताना अर्जदारास प्राप्त झालेली माहिती व संचालनालयाकडे संस्थेमार्फत सादर करण्यात आलेली प्रत एकच आहे अथवा नाही याची शहानिशा करण्याची विनंती केली होती. तसेच आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांची यादी उपलब्ध करुन देण्याबाबत नमुद केले होते. त्यामुळे अर्जदारास आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांची यादी दि. १५/९/२००९ च्या पत्रान्वये पाठविण्यात आली होती.

या व्यतिरिक्त दि. १३/७/२००९ रोजी अर्जदाराने खालील मुद्दयांच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत नमुद केले होते.

अ. भारतीय आयुर्विज्ञान परिषद मान्यता अभ्यासक्रमांबाबत

ब. पेपर फुटीबाबत

खुलासा :

उपरोक्त मुद्दयांच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, अर्जदाराने मागणी केलेल्या माहितीमध्ये संचालनालयामार्फत घेण्यात येणा-या सामाईक प्रवेश परिक्षांच्या कार्यप्रणाली बाबत माहिती उपलब्ध करुन देण्याची विनंती केली होती. त्यामुळे सदर माहिती पैकी कोणती माहिती अर्जदारास उपलब्ध करुन देता येणे शक्य आहे याबाबत समिती सदस्यांचे मत प्राप्त करुन घेण्यात येत होते. त्यामुळे अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देण्यास काहिसा विलंब झाला आहे. परंतु संचालनालयाच्या दि. १५सप्टेंबर, २००९ च्या पत्रान्वये अर्जदारास आवश्यकती सर्व माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली होती.

दरम्यानच्या कालावधीत अर्जदाराने उपरोक्त परिच्छेदातील माहिती उपलब्ध न झाल्याने अपील अर्ज संचालनालायास सादर केला होता. सदर अर्जावर संचालनालयातील अपिलीय अधिका-यांनी सुनावणीसाठी दि. १९/९/२००९ रोजी दुपारी ३-०० वाजता संचालनालायात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतु सदर दिनांकास अर्जदार उपस्थित न राहिल्याने याच प्रकरणी सुनावणीची दुसरी संधी अर्जदारास नियमाप्रमाणे उपलब्ध करुन देण्याकरीता दि. २९/९/२००९ रोजी दुपारी ३-३० वा. बोलाविण्यात आले होते. सदर दिनांकास अर्जदार उपस्थित

होते व त्यांनी अपिलीय अधिका-यांसमोर विषयांनुषंगाने उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने अपिलीय अधिका-यांनी या प्रकरणी पुढील कार्यवाहीचे आदेश दिले होते. अपिलीय अधिका-यांसमोर झालेल्या सुनावणी दरम्यानच्या बाबींचे इतिवृत्त तयार करण्यात येऊन त्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्यात येऊन अर्जदारास दि. ५/१०/२००९ च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविण्यात आले होते.

उपरोक्त वस्तुस्थितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदारास त्याने मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व कार्यवाही संचालनालयाच्या स्तरावर करण्यात आली आहे. अर्जदाराने मा. आयोगाकडे सादर केलेल्या अपीलामध्ये अर्जदारास माहिती करीता शुल्क आकारणी करण्यात आल्याचे नमूद केले आहे. याबाबत मा. आयोगास सादर करण्यात येते की, अर्जदाराने मागणी केलेली माहिती ही अर्जदारास वेळोवेळी संचालनालयामार्फत किंवा अन्य संस्थांमार्फत उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. तसेच काही माहिती ज्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे त्याचा पत्ताही अर्जदारास देण्यात आला होता. तरीही अर्जदाराने अपिलीय अधिका-यां समोर माहिती प्राप्त न झाल्याचे नमूद केल्याने सदरची माहिती संचालनालायामार्फत संबंधित संकेतस्थळांवरुन उपलब्ध करुन घेऊन अर्जदारास त्यासंबंधीचे शुल्क आकारण्याबाबत कळविण्यात आले होते.

उपरोक्त सर्व बाबींवरुन असे स्पष्ट निदर्शनास दिसून येते की, अर्जदारास माहिती उपलब्ध करुन दिली तरी अर्जदार वारंवार त्याच त्याच माहितीची विचारणा करीत आहे. तसेच अर्जदारास संचालनालयाकडे उपलब्ध असलेली माहिती वेळोवेळी देण्यात आलेली आहे. त्यामुळे सदरचे अपील अमान्य करावे अशी मा.आयोगास विनंती करण्यात येत आहे. "

सदर निवेदन लक्षात घेता अपीलार्थीस हवी असलेली माहिती देण्याचा प्रामाणिक प्रयत्न जन माहिती अधिकारी यांनी केलेला दिसून येतो. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २२ फेब्रूवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४६०४/अपील क्रमांक ५४१६/०२

श्री. प्राणलाल पी. राठोड -----अपीलार्थी
आर- ८५, सी-२, महावीर नगर,
शंकेकर लेन, एस.व्ही. रोड, कांदिवली (पश्चिम) मुंबई ६७.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सहायक मनपा आयुक्त ----उत्तरवादी
सहा.मनपा आयुक्त यांचे कार्यालय, डी. वार्ड,
नाना चौक, जोबनपूत्र कंपाऊंड, ग्रँटरोड (पश्चिम)
मुंबई ४०० ००७.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक करनिर्धारक व संकलक
सहा.मनपा आयुक्त यांचे कार्यालय, डी. वार्ड,
नाना चौक, जोबनपूत्र कंपाऊंड, ग्रँटरोड (पश्चिम)
मुंबई ४०० ००७.

*---विवेचन---*

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक ३० नोव्हेंबर, २००९
सुनावणीचा दिनांक २२ फेब्रूवारी, २०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस पंचरत्न को.ऑप.हौसिंग सोसायटी, ऑपेरा हाऊस येथील प्रिमायसेस क्र. २३०३ व २४०७ संबंधी माहिती पाहिजे होती.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे रेकॉर्डला असलेली माहिती अपीलार्थीस दिलेली आहे. तसेच अपीलार्थीकडे जे पंचरत्न को.ऑप.हौ.सोसायटी यांनी मेट्रोपोलिटन मॅजिस्ट्रेटला पत्र लिहिले होते ज्यात ही प्रिमायसेस कोणाच्या नांवावर आहे याचीहि माहिती त्या पत्रात आहे. अशी प्रत अपीलार्थीकडे आहेच.

याहि उप्पर कांही माहिती पाहिजे असल्यास अपीलार्थींनी सरळ संबंधित सोसायटीकडेच चौकशी करणे जास्त श्रेयस्कर राहिल.

*----आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),<br>
दिनांक २२ फेब्रूवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४६०५/अपील क्रमांक ५४१७/०२

श्री. राजकुमार अवस्थी -----अपीलार्थी
बी-१४, शांतीनगर, सि.एस.टी. रोड,
कुर्ला (पश्चिम) मुंबई ४०० ०७०.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा महाप्रबंधक ----उत्तरवादी
उच्च न्यायालय, मुंबई .

२. जन माहिती अधिकारी
उच्च न्यायालय, मुंबई .

*---विवेचन---*

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक ३० नोव्हेंबर, २००९
सुनावणीचा दिनांक २२ फेब्रूवारी, २०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. राजकुमार अवस्थी यांनी त्यांच्या दि. ७/५/२००९ रोजीच्या अर्जानुसार त्यांनी दि. १८/२/२००९ रोजी हायकोर्टाचे जज्ज आणि ॲड्व्होकेट जनरल यांच्याविरुध्द तक्रार अर्ज दिला होता त्याची हायकोर्टात झालेली नोंद व पुढील कारवाई यांच्या संदर्भात माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी यासंबंधी कुठलीही माहिती रजिस्ट्रीमध्ये नाही अशी माहिती अपीलार्थीस दिली. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा अशा प्रकारची माहिती देणे हे त्या न्यायमुर्तीला स्कॅन्डलाईज करण्यासारखे होईल असे दर्शवून व अधिनियमाच्या कलम 8(1)(b) नुसार माहिती देण्याची गरज नाही असे दर्शवून अपील फेटाळून लावले. त्याविरुध्द सदरचे अपील आहे.

अधिनियमाचे कलम ८(१) (बी ) पुढीलप्रमाणे आहे.

८(१) या अधिनियमात कांहीहि अंतर्भूत असले तरी कोणत्याही नागरिकास पुढील माहिती पुरविण्याचे आबंधन असणार नाही.

"	कोणत्याही न्यायालयाने किंवा न्यायाधिकरणाने जी प्रकाशित करण्यास स्पष्टपणे मनाई केली आहे किंवा जी प्रकट केल्यामुळे न्यायालयाचा अवमान होऊ शकेल, अशी माहिती :"

न्यायमुर्तीविरुध्द कोणी तक्रार केली तर ती कशा पध्दतीने त्याची निर्गत लावायची याबद्दल अपीलार्थीनी जशी स्टेप-बाय- स्टेप माहिती विचारली आहे तशा पध्दतीने माहिती देणे म्हणजे न्यायालयाचा अवमान करणे असेच मत अपिलीय अधिकारी तथा महाप्रबंधक यांनी व्यक्त केलेले आहे. अशा पध्दतीच्या तक्रारीची कशा पध्दतीने निर्गत लावावी याची जी पध्दत त्यांनी स्वीकारली असेल त्या पध्दतीने हायकोर्ट कारवाई करीलच. मात्र कमीत कमी अपीलार्थींचा अर्ज हायकोर्टात नोंद झालेला आहे किंवा नाही ही माहिती, माहितीचा अधिकार अधिनियमाप्रमाणे द्यावयास पाहिजे. मग ती आवक रजिस्टरमध्ये नोंद केली असेल किंवा दुस-या कुठच्या पध्दतीने त्याची नोंद घेतलेली असेल त्या नोंदीची प्रत अपीलार्थीस देण्यात यावी. इतर माहितीच्या बाबतीत हायकोर्टास जजेस विरुध्द आलेल्या तक्रारीची चौकशी व त्याविषयी जनतेस कशा पध्दतीने माहिती द्यावयाची हे हायकोर्ट स्वतःच ठरवू शकेल.

***---आदेश---***

अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २२ फेब्रूवारी, २०१०	राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४६०६/अपील क्रमांक ५४१८/०२
क्रमांक-मु.मा.आ/४४६०७/अपील क्रमांक ५४१९/०२

श्री. सुमीर सभरवाल -----अपीलार्थी
२, ग्रोटो इमारत, ३३ व ९ रोड क्रॉसिंग,
जुने खार, मुंबई ४०० ०५२.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य अभियंता (प.उ.१) ----उत्तरवादी
उपमुख्य अभियंता कार्यालय इमारत प्रस्ताव
पश्चिम उपनगरे १, १ ला मजला, आर.के. पाटकर मार्ग,
वांद्रे (पश्चिम) मुंबई ४०० ०५०.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ.प्र.)
उपमुख्य अभियंता कार्यालय इमारत प्रस्ताव
पश्चिम उपनगरे १, १ ला मजला, आर.के. पाटकर मार्ग,
वांद्रे (पश्चिम) मुंबई ४०० ०५०.

२. अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
कार्यकारी अभियंता बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
एच/वेस्ट वार्ड, सेंट मार्टिन्स रोड,
वांद्रे (पश्चिम) मुंबई ४०० ०५०.

जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.का.)
कार्यकारी अभियंता बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
एच/वेस्ट वार्ड, सेंट मार्टिन्स रोड,
वांद्रे (पश्चिम) मुंबई ४०० ०५०.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक २७ नोव्हेंबर, २००९
सुनावणीचा दिनांक २२ फेब्रूवारी, २०१०.
अपीलार्थी व दोन्ही जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपील क्रमांक ५४१९/०२ मध्ये जी माहिती अपेक्षित आहे ती माहिती कार्यकारी अभियंता यांच्याकडे आहे म्हणून अपीलार्थीचा अर्ज हा सहायक अभियंता (इ.का.) एच/वेस्ट वार्ड यांच्याकडून कार्यकारी अभियंता यांच्याकडे पाठविण्यात यावा असे अपिलीय अधिका-यांचे निर्देश आहेत. त्यामुळे अपील क्र. ५४१८/०२ वरील अपीलाच्या निर्णयामध्ये अपील क्र. ५४१९ चा निर्ण अंतःभूत होतो.

अपील क्रमांक ५४१८/०२ मधील जे प्रथम अपीलाचे आदेश आहेत त्या आदेशानुसार ग्रोटो बिल्डींगमधील प्रिमायसेस नं. २ व ३ यांचे जे ॲप्रूव्हड प्लान्स असतील त्याच्या प्रती अपीलार्थीस पाहिजेत, व त्या अपीलार्थीस अजूनहि देण्यांत आलेल्या नाहीत असे अपीलार्थीचे म्हणणे आहे.

जन माहिती अधिका-यांच्या म्हणण्यानुसार सदरील प्लान्स सन १९५० च्या आसपास मंजूर करण्यात आलेले असावेत व आता त्याचा शोध घेणे हे जिकीरीचे आहे.

अपीलार्थीस हवे असलेले प्लान्स शोधण्याचा जारिने प्रयत्न जन माहिती अधिकारी यांनी करावा व अपीलार्थीस हवी असलेली माहिती देण्यात यावी असे निर्देश देण्यात आले.

***---आदेश---***

दोन्ही अपीले मान्य करण्यात येत आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २२ फेब्रूवारी, २०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४४६०९/अपील क्रमांक ५४२०/०२**

**कुमारी दिपाली का. वाढविंदे -----अपीलार्थी**
**द्वारा- विजय कान्हा जाधव**
**अर्चना अपार्टमेंट, २ रा मजला, रुम नं.७,**
**महाराष्ट्र बँकेसमोर, दयाळ धाम,**
**खडकपाडा, कल्याण (पश्चिम) जि. ठाणे.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा प्रभारी उपसंचालक ----उत्तरवादी**
**रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय,**
**३ रा मजला, कोंकण भवन, नवी मुंबई ४०० ६१४.**

**२. जन माहिती अधिकारी**
**रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय,**
**३ रा मजला, कोंकण भवन, नवी मुंबई ४०० ६१४.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक १ डिसेंबर, २००९**
**सुनावणीचा दिनांक २२ फेब्रूवारी, २०१०.**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

अपीलार्थींना त्यांच्या अनुकंपा तत्वावर न झालेल्या नियुक्तीबाबत कांही माहिती पाहिजे होती व या संदर्भातील रेकॉर्डला असलेल्या सर्व कागदपत्रांच्या प्रती अपीलार्थीस दिलेल्या आहेत असेच दिसून आले.

अपीलार्थी यांच्या आईचे शासकीय सेवेत असताना निधन झाले पण त्यांचे वडिलहि शासकीय सेवेत आहेत. मात्र मुलगी व वडिल हे विभक्त राहात आहेत व अपीलार्थींना वडिलांकडून कोणतेही आर्थिक सहाय्य मिळत नाही यासंबंधीचे पुरावे विभागास पाहिजे आहेत. अपीलार्थींनी विभागास असे सबळ पुरावे देणे हेच त्यांच्या हिताचे राहील असे जन माहिती अधिकारी यांनी

सांगितले व ते योग्यहि वाटते.

माहितीच्या अधिकारात रेकॉर्डला असलेले सर्व कागदपत्र, नोटींग वगैरे अपीलार्थीस देण्यात आलेले आहेत. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २२ फेब्रूवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४६१०/अपील क्रमांक ५४२१/०२

श्री. राजबिहारी आर. पाठक -----अपीलार्थी
८०२/ सी/ १५, मृगविहार को.ऑप.हौ.सोसायटी,
सुभाष नगर, चेंबुर, मुंबई ४०० ०७१.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक (सहकारी संस्था) ----उत्तरवादी
उपनिबंधक सहकारी संस्था म्हाडा,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

२. जन माहिती अधिकारी तथा सहकार अधिकारी
उपनिबंधक सहकारी संस्था म्हाडा,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक ४ डिसेंबर, २००९**
**सुनावणीचा दिनांक २२ फेब्रूवारी, २०१०.**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

अपीलार्थीस दि. २३ नोव्हेंबर, १९९३ रोजी झालेल्या म्हाडा व मृग विहार सोसायटी यांच्यात झालेल्या डिड ऑफ सेल ची सर्टिफाईड प्रत पाहिजे होती. ही प्रत सोसायटीने द्यावी असे जन माहिती अधिकारी यांनी लिहिले होते, व सोसायटीने त्याप्रमाणे सर्टिफाईड प्रत दिली सुध्दा. पण अपीलार्थींना ही प्रत मुळ प्रतीची नाही असे वाटते.

अपीलार्थींचे पूर्ण समाधान होण्याच्या दृष्टीने म्हाडाकडे असलेली जी प्रत असेल त्याची सर्टिफाईड प्रत शुल्क भरुन अपीलार्थीस देण्यात यावी असे निर्देश देण्यांत येत आहेत. म्हाडाच्या ज्या जन माहिती अधिका-यांकडे ही कागदपत्रे असतील त्यांच्याकडे मजसमोर आलेल्या जन माहिती

अधिका-यांनी  अपीलार्थीचा अर्ज पाठवावा व त्या जन माहिती अधिका-यांनी  अपीलार्थीस शुल्क भरुन माहिती पुरवावी.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २२ फेब्रूवारी, २०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४६११/अपील क्रमांक ५४२२/०२
क्रमांक-मु.मा.आ/४४६१६/अपील क्रमांक ५४२६/०२

श्री. चंद्रमणी सि. कदम -----अपीलार्थी
आकांक्षा सोसायटी, इमारत क्र. १३/११३,
एम.एम.आर.डी.ए. कॉलनी, चेंबूर,
वाशीनाका, मुंबई.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा पुनर्वसन व पुर्नवसाहत अधिकारी ----उत्तरवादी
एम.एम.आर.डी.ए. कार्यालय, वांद्रे (पूर्व)
मुंबई ४०० ०५१.

२. जन माहिती अधिकारी
एम.एम.आर.डी.ए. कार्यालय, वांद्रे (पूर्व)
मुंबई ४०० ०५१.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक ४ डिसेंबर, २००९
सुनावणीचा दिनांक २२ फेब्रूवारी, २०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

सदर प्रकरणात परिस्थिती पुढील प्रमाणे आहे.

श्री. चिंतामणी सिताराम कदम तक्रारदार यांनी त्यांच्या दि. ८/४/२००९ च्या माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये प्रमुख (पु व पु) यांना कोकरी आगार येथील ११७ पुनर्वसितांचे कांजूरमार्ग मॅरेथान येथे स्थलांतराबाबतचा संपूर्ण तपशील व अधिकारी आदेश प्रत मागितली होती.

तसेच दुस-या अर्जामध्ये वाशीनाका येथील बि.क्र. १३ येथील खोली क्र. ७, १०६, ३०६ याचे स्थलांतर कोठे व कोणत्या अधिका-यांच्या आदेशाने करण्यात आले याची तपशीलवार माहिती व आदेश प्रत मागितली होती.

तथापि कार्यबाहुल्यामुळे सदरची माहिती विहित वेळेत तक्रारदारास सादर करणे शक्य झाले नाही यास्तव तक्रारदाराने दि. २/६/२००९ रोजी माहितीचा अधिकार २००५ कलम १९(३) अन्वये प्रथम अपिलीय यांजकडे अपील सादर केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि १७/८/२००९ च्या पत्रान्वये श्री.कदम यांना अपील सुनावणी करीता दि. २५/८/२००९ रोजी उपस्थित राहण्याचे कळविले. परंतु श्री कदम हे दिनांक २५/८/२००९ रोजी सुनावणीस उपस्थित राहिले नाही. यास्तव पुनश्च सुनावणी ४/९/२००९ रोजी आयोजित केल्याचे श्री. कदम यांना दि. २७/८/२००९ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले. सदर सुनावणीस श्री. कदम उपस्थित राहिले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी श्री. कदम यांचे म्हणणे ऐकून घेऊन त्यांना आवश्यक असलेली माहिती पुरविण्याचे आदेश दि. ८/९/२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांना दिले व त्याची प्रत श्री. चंद्रमणी कदम यांना अग्रेषित करण्यात आली. त्याप्रमाणे जन माहिती अधिका-यांनी दि. २८/१०/२००९ व २३/११/२००९ च्या पत्रान्वये सविस्तर माहिती श्री. कदम यांना पुरविण्यात आली.

वरील माहितीने समाधान न झाल्यामुळे अंतिमतः आयोगाकडे द्वितीय अपील केलेले आहे. रेकॉर्डप्रमाणे सर्व माहिती अपीलार्थीस दिलेली आहे असे दिसून आले. जर अपीलार्थींना संपूर्ण रेकॉर्ड स्वतः तपासून बघायचा असेल तर ते कागदपत्रांची तपासणी निश्चितपणे घेऊ शकतात. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

दोन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २२ फेब्रूवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५८७६/अपील क्रमांक ५४२७/०२

श्री. विलास अनंत लाड -----अपीलार्थी
१९, मिशन कंपाऊंड, ऑगष्ट क्रांती मार्ग,
नाना चौक, मुंबई ४०० ००७.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक ----उत्तरवादी
मुंबई शहर भूमापन व भूमि अभिलेख,
जुने जकात घर, शहीद भगतसिंग रोड,
फोर्ट, मुंबई ४०० ००१.

२. जन माहिती अधिकारी
मुंबई शहर भूमापन व भूमि अभिलेख,
जुने जकात घर, शहीद भगतसिंग रोड,
फोर्ट, मुंबई ४०० ००१.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक १७ डिसेंबर, २००९
सुनावणीचा दिनांक २३ फेब्रूवारी, २०१०.
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस त्यांच्या दि. २६/९/२००९ रोजीच्या अर्जानुसार भूकर क्रमांक २/५१६ ची माहिती व उतारा पाहिजे होता. याबाबतीत जन माहिती अधिका-यांच्या प्रतिसादामुळे समाधान न झाल्यामुळे अंतिमतः त्यांनी आयोगाकडे धाव घेतलेली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन दिलेले आहे.

" मलबार हिल विभाग भूकर क्र. २/५१६ याची माहिती व उतारा मिळणेबाबत श्री. विलास लाड यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत इकडिल कार्यालयात अर्ज सादर केलेला होता.

इकडिल अभिलेख पाहता मलबार हिल विभाग मध्ये भूकर क्र. २/५१६ असा नंबर अस्तित्वात

नाही.  भूकर क्र.५१६ ही मिळकत इकडिल अभिलेखात आहे.

श्री. विलास लाड यांनी दि. २६ जून २००८ रोजी केलेल्या अर्जास अनुसरुन इकडिल कार्यालयाकडून पत्र क्रमांक सीएसएलआर/एस ॲन्ड एल आर २/टे ३/मलबार हिल/भा.अ.क्र.१३९/०९/५०१ दि. २९/७/२००९ रोजी अर्जदार यांना भूकर क्र.२/५१६ ही मिळकत अस्तित्वात नसून मूळ भूकर क्र. ५१६ ही मिळकत आहे व भूक क्र. ५१६ या मिळकतीचा उतारा आवश्यक असल्यास इकडिल कार्यालयात विहित फी भरल्यास त्याची प्रत वितरित करणेत येईल अशा आशयाचे पत्राने कळविले होते.

इकडिल अभिलेख पाहता रजिष्टर नं. ३०८ पान नं. १८  वर भूकर क्र. ५१६ ही मिळकत असून त्यावर भूकर क्र. २/५१६ नंबर बाबत कोणताही उल्लेख नाही.  तसेच भूकर क्र. ५१६ यापुढे भूकर क्र. १/५१६, २/५१६ असे नंबर नाहीत.  या माहितीचे आधारे अर्जदार यांना कळविलेले होते.
"

अपीलार्थीचे म्हणणे २/५१६  हा नंबर पूर्वी कार्यालयानेच दिलेल्या माहितीवर आधारित होता.  पण आता असा नंबर नाही.  तेव्हा भूकर क्र. ५१६ च्या संदर्भात त्यांना काही माहिती पाहिजे आहे का १ असे विचारता त्यांनी त्यांच्या भूकर क्र.२/५१६ चे  प्रॉपर्टी कार्ड व नकाशे  व यु.सी.एन.आय.टि.एन साईड ट्रस्टची नोंद केव्हा झाली त्याचे वर्ष  ही माहिती पाहिजे असे सांगितले.

अपीलार्थींनी यासंदर्भात आवश्यक ते शुल्क भरल्यास लगेचच त्यांना ही माहिती देण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.  त्याप्रमाणे अपीलार्थी यांनी कार्यालयात जाऊन शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घेण्याचे मान्य केले.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २३ फेब्रूवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १५७४/०२

श्री. जयंत शंकरलाल मुथा -----अपीलार्थी
शिवाजी नगर, चिंचखेड रोड,
मु.पो. पिंपळगांव बसवंत , जि. नाशिक ४२२ २०९.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता ----उत्तरवादी
(ग्रामीण) ओ ॲन्ड एम सर्कल,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्या.
विद्युत भवन, नाशिक रोड, नाशिक.

२.जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
(ग्रामीण) ओ ॲन्ड एम सर्कल,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्या.
विद्युत भवन, नाशिक रोड, नाशिक.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक २६/६/२००९
सुनावणीचा दिनांक २२/१२/२००९
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींनी दि. २५/२/२००९ च्या अर्जान्वये मागितलेल्या माहितीचे थोडक्यात स्वरुप खालील प्रमाणे आहे.

१. उच्च दाबाचा ट्रान्सफॉर्मर बसवणे, लाईन शिफ्टिंग , लाईनचे डिमार्केशन बाबतचे नियम व सूचना.

२. नवीन वीज वाहिनीसाठी लागणा-या परवानग्या.

३. नाशिक महानगरपालिकेबाहेर कंपनीने केलेल्या कामांचा तपशील व त्यावरील खर्चाची

आकडेवारी.

४. उपरोक्त कामांसाठी घेतलेल्या परवानगीपत्रांच्या झेरॉक्स प्रती.

५. वीज वाहिनी उभारण्यापूर्वी घेतलेल्या खबरदारीच्या उपाययोजनांची माहिती इत्यादि.

उपरोक्त माहिती न मिळाल्याने त्यांनी दि. २०/३/२००९ रोजी प्रथम अपील केले. प्रथम अपील अर्जाला प्रतिसाद मिळाला नाही हे नमूद करुन त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी आयोगास जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सांगितले की, अपीलार्थींना माहिती दिलेली आहे. या व्यतिरिक्त त्यांना आणखी माहिती हवी असल्यास ती त्वरित उपलब्ध करुन देण्यात येईल. अपीलार्थींनी असे सांगितले की, त्यांची जन माहिती अधिका-यांकडून तेवढीच अपेक्षा आहे. याचा विचार करता असे निर्देश देण्यात येतात की, अपीलार्थींनी अतिरिक्त माहितीची मागणी केल्यास ती सात दिवसांत पुरविण्यांत यावी.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २३ फेब्रूवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १५६०/०२

श्री. संतोष नामदेव पगारे -----अपीलार्थी
एन ४१/एसीडी/१/१५/६, महाकाली चौक,
चौथी स्कीम, सिडको, नाशिक ४२२ ००८.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी ----उत्तरवादी
नाशिक एज्यूकेशन सोसायटी
द्वारा पेठे विद्यालय, रविवार कारंजा, नाशिक.

२.जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका
ना.ए. सोसायटीचे इंग्लीश मिडीयम स्कूल
उंटवाडी, त्रिमुर्ती चौक, सिडको, नाशिक.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक २७/७/२००९
सुनावणीचा दिनांक २२/१२/२००९
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीनी दि. २८/३/२००९ च्या अर्जाद्वारे नाशिक एज्यूकेशन सोसायटी संचालित इंग्लीश मिडीयम स्कूलशी संबंधित खालील माहिती मागितली.

१. चतुर्थ श्रेणी कर्मचारी प्रमिला सुर्यवंशी यांना प्रॉव्हीडंट फंड दिला जातो का १

२. सर्व चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांच्या सेवापुस्तकाच्या प्रमाणित झेरॉक्स प्रती.

३. सन १९९७ ते २००८ या कालावधीच्या किर्द पुस्तकाची तपासणी.

माहिती न मिळाल्याने त्यांनी दि. २१/५/२००९ रोजी प्रथम अपील केले. परंतु त्यानंतर सुध्दा त्यांना माहिती मिळाली नाही. यास्तव त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी

यांनी आयोगास सादर केले की, अपीलार्थीस आवश्यक असणारी व शाळेकडे उपलब्ध असणारी माहिती ते देण्यास तयार आहेत. याचा विचार करुन आयोगाचे असे निर्देश आहेत की, अपीलार्थींना शाळेकडे उपलब्ध असलेली माहिती विनाशुल्क पुरविण्यात यावी.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २३ फेब्रूवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४६१२/अपील क्रमांक ५४३१/०२

श्री. दिव्येश सेजपाल -----अपीलार्थी
बीग थ्री इमारत, २ रा मजला, रुम नं.४,
८८, आनंदीलाल पोद्दा मार्ग, मुंबई ४०० ००२.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक ----उत्तरवादी
सहकारी संस्था (१) मुंबई शहर, मल्होत्रा हाऊस,
६ वा मजला, जी.पी.ओ. समोर, फोर्ट , मुंबई -- ०१.

२. जन माहिती अधिकारी
सहकारी संस्था (१) मुंबई शहर, मल्होत्रा हाऊस,
६ वा मजला, जी.पी.ओ. समोर, फोर्ट , मुंबई -- ०१.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक ३ डिसेंबर, २००९
सुनावणीचा दिनांक २३ फेब्रूवारी, २०१०.
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी यांनी त्यांच्या अधिनियमाच्या कलम ६ अन्वये त्यांच्या गृहनिर्माण संस्थेकडून सिंडीकेट बँक असलेल्या प्रिमायसेस विषयी कांही माहिती विचारली होती.

माहिती न मिळाल्यामुळे अपीलार्थी यांनी सहकार विभागाकडे केलेले अपील, गृहनिर्माण संस्था या माहितीचा अधिकार अधिनियमाखाली त्या "जन प्राधिकरणे" नसल्याने व अपीलार्थी यांनी मागितलेली माहिती ही जन माहिती अधिकारी उपनिबंधक कार्यालय यांच्या रेकॉर्डचा भाग नसल्यामुळे अपील अग्राहय धरण्यात आले.

असे जरी असले तरी उपनिबंधकांनी संस्थेला अपीलार्थीस ही माहिती पुरविण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. या सुचना सहकार कायद्याच्या कलम ३२ व रुल २१ प्रमाणे आहेत. त्यामुळे

संस्थेवर या कलमान्वये माहिती सहकारी कायद्याखाली व त्याअंतर्गत असलेल्या नियमान्वये देणे हे बंधनकारकच आहे. त्यामुळे उपनिबंधकांच्या निर्देशाची अंमलबजावणी केली नसल्यामुळे संस्थेकडून त्या निर्देशांचे पालन करुन घेणे ही जबाबदारी ओघानेच त्या कायद्याखाली उपनिबंधकांवर येते. त्यादृष्टीने त्यांनी अपीलार्थी यांनी १५ दिवसांत माहिती देण्याबाबतची कार्यवाही करावी.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २३ फेब्रूवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४६१२०/अपील क्रमांक ५४३०/०२**

**श्री. चेतन कोठारी -----अपीलार्थी**
**५२, ओशियानिक अपार्टमेंट,**
**डॉ. राजाभाई पटेल लेन, बी देसाई रोड,**
**मुंबई ३ ४०० ०२६.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा सह सचिव ----उत्तरवादी**
**सहकार व वस्त्रोद्योग विभाग (२-स)**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**२. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव**
**सहकार व वस्त्रोद्योग विभाग (२-स)**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक १९ डिसेंबर, २००९**
**सुनावणीचा दिनांक २३ फेब्रूवारी, २०१०.**
**अपीलार्थी , जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय यांच्याकडे दि. १०/८/२००९ रोजी अर्ज करुन फुल उत्पादक ग्रिन हाऊस धारक शेतक-यांना कर्जमाफी याविषयी माहिती विचारली होती. हा अर्ज दि. १३/८/२००९ रोजी जन माहिती अधिका-यांस मिळाला. दि. २८/८/२००९ रोजी अपीलार्थीनी विचारलेल्या एकूण मुद्दयांपैकी मुद्दा क्र. २ हा मंत्रालयीन कार्यासन विभागाच्या कार्यकक्षेत येत असल्यामुळे त्यासाठी रु. ३५/- शुल्क भरण्यास लिहिले व कांही मुद्दयांवर माहिती देण्यासाठी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था पुणे यांचे जन माहिती अधिका-यांना व दोन मुद्दयांवर माहिती देण्यासाठी संचालक, फलोत्पादन संचालनालय यांना पाठविला व अपीलार्थीस त्याप्रमाणे कळवून आवश्यकतेनुसार या दोन जन माहिती अधिका-यांशी संपर्क करण्यास सुचविण्यात आले.**

**अपीलार्थीस माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले व त्यानंतर आयोगाकडे धाव घेतली. मंत्रालयातून मिळावयाच्या माहितीच्या बाबतीत त्यांनी मुदतीत शुल्काची मागणी**

करण्यात आली होती व अंतिमत: त्यांनी प्रत्यक्ष १०/- भरुन स्वत: माहिती प्राप्त करुन घेतली. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी ३० दिवसांच्या आतच ठेवली होती पण अपीलार्थी त्यावेळेस उपस्थित नसल्यामुळे ती त्यानंतर पुन्हा ठेवली होती.

दि. ३/११/२००९ रोजीच्या सुनावणीचे आदेश दि. १९/११/२००९ रोजी निर्गमित केले. दि. १/१०/२००९ रोजी प्राप्त झालेल्या अपीलावर उशिरात उशिरा दि. १५/११/२००९ पर्यंत आदेश पारित होणे आवश्यक होते. मात्र ४ दिवसांचा कालावधी जास्त लागलेला आहे. यापुढे अपिलीय अधिकारी यांनी सर्वसाधारण परिस्थितीत ३० दिवसांच्या आत व अपवादात्मक परिस्थितीत ४५ दिवसांच्या आत प्रथम अपीलावर निर्णय देणे आवश्यक असते याची नोंद घ्यावी.

मात्र दुसरी गोष्ट अशी की, अपीलार्थींनी मुळ अर्ज दिल्यापासून ३० दिवसांत त्यांना माहिती मिळायला पाहिजे. याचाच अर्थ यापेक्षा जास्त कालावधी लागल्यास त्यांना माहिती विनामूल्य द्यायला पाहिजे. सहकार विभागाच्या जन माहिती अधिका-यांनी त्यांच्याकडे अर्ज प्राप्त झाल्यानंतर १ महिन्याच्या आत जरी अपीलार्थीस शुल्क भरावयास कळविले असले तरी मुळ अर्ज मात्र मंत्रालयातून सहकार आयुक्त पुणे यांचे जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविण्यास वेळ झालेला आहे. त्यामुळे अपीलार्थींच्या मुळ दिनांकापासून माहिती मिळण्यास उशिर झाल्यामुळे ही माहिती अपीलार्थीस विनाशुल्क देण्यात यावी असे निर्देश आयोग देत आहे, व त्याप्रमाणे सुनावणीच्या वेळेला ही माहिती अपीलार्थीस विनाशुल्क देण्यात आली.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अर्ज प्राप्त झाल्यापासून मुदतीत अपीलार्थीस माहिती दिलेली आहे. एकूण विचार करता जन माहिती अधिकारी सहकार विभाग,मंत्रालय यांनी ५ दिवसांच्या आंत आपल्याकडे आलेला अर्ज संबंधित अधिका-यांना हस्तांतरित करावा अशी समज देण्यात येत आहे. यावेळेला जरी शास्ती लादण्यात येत नसली तरी अशा प्रकारची पुनरावृत्ती झाल्यास शास्तीची कारवाई होईल याची जाणिव जन माहिती अधिकारी यांनी ठेवावी.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २३ फेब्रूवारी, २०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४४६१७/अपील क्रमांक ५४३९/०२**

**श्री. विलासराव बा. देशमुख -----अपीलार्थी**
**खोली क्र. ए/१, श्री गुरुकृपा चाळ,**
**हनुमान टेकडी, काजूपाडा, बोरीवली (पूर्व)**
**मुंबई ४०० ०६६.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त ----उत्तरवादी**
**परिमंडळ २, सर. जे.जे. मार्ग, नागपाडा,**
**मुंबई ४०० ००८.**

**२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त**
**दक्षिण प्रादेशिक नियंत्रण कक्ष, सर. जे.जे. मार्ग,**
**नागपाडा, मुंबई ४०० ००८.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक ३० डिसेंबर, २००९**
**सुनावणीचा दिनांक २४ फेब्रूवारी, २०१०.**
**अपीलार्थी , जन माहिती अधिकारी उपस्थित.**

श्रीयुत नितीनकुमार दिनदयाळ डिडवाणीया यांनी अपीलार्थी श्रीयुत देशमुख यांच्या विरुध्द जो तक्रार अर्ज दिला होता त्या तक्रार अर्जाच्या संदर्भात अपीलार्थीस पुढीलप्रमाणे माहिती पाहिजे होती.

" गैरअर्जदार श्रीयुत देशमुख हे अर्जदार श्री. डिडवाणीया यांचे नोकर होते व नोकरीत करीत असतांना कुळअखत्यार दिले होते आणि जमिन खरेदीसाठी गैरअर्जदारांस पैसे मिळाले असल्याबाबतच्या पुराव्याच्या छायांकित प्रती मला मिळाव्यात. गैरअर्जदाराने कलम ४०८ व ४०९ अन्वये फौजदारीपात्र न्यासभंग केला आहे हे सिध्द करणा-या कागदपत्रांच्या छायांकित प्रतीसुध्दा मला मिळाव्यात. "

अपीलार्थीस पुढीलप्रमाणे कळविण्यात आले.-

" कफ परेड पोलीस ठाणे गु.र.क्र. १११/०९, कलम ४०८, ४०९, ४२०,३४ भादवि प्रमाणे गुन्हा दिनांक ०८/९५/०९ रोजी नोंद करण्यात आला आहे. तसेच सदर गुन्हयाचे दोषारोप पत्र पुराव्यांच्या कागदपत्रांसह मा. अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी, ४७ वे न्यायालय, मुंबई यांचेकडे दि. २७/७/२००९ रोजी सादर करण्यात आले असून त्याचा कोर्ट केस क्र. ६५४/पी.डब्ल्यू/०९ असा आहे. व सदरचा गुन्हा मा. न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे. "

सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट झाले की, संबंधित गुन्हयाच्या बाबतीत चौकशी पूर्ण होऊन चार्जशिट सुध्दा न्यायालयात दाखल करण्यात आलेली आहे व या चार्जशिटची प्रतहि अपीलार्थीस प्राप्त झालेली आहे. याव्यतिरिक्त इतर कुठचीही कागदपत्रे पोलीस स्टेशनमध्ये नाहीत. चार्जशिटची प्रत अपीलार्थीस देण्यात आलेली आहे त्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयात बदल करावा असे कांही दिसून येत नाही. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***----आदेश---***

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २४ फेब्रूवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५१८७/अपील क्रमांक ५२९७/०२

श्रीमती. रशिदा खान -----अपीलार्थी
१०४ मालवणी रिध्दीसिध्दी को.ऑप.हौ.सो.लि.,
म्हाडा गेट क्र. ८, मालवणी मालाड (पश्चिम)
मुंबई ४०० ०९५.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी ----उत्तरवादी
मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
५ वा मजला, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

२.जन माहिती अधिकारी
मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
५ वा मजला, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

***---विवेचन---***

अपील क्र. ५२९७ च्या निर्णयात जन माहिती अधिकारी वित्त विभाग यांनी अपीलार्थीस माहिती मुदतीत न दिल्याबद्दल त्यांचेविरुध्द कलम २० अन्वये शास्तीची कारवाई का करण्यात येऊ नये याचा खुलासा २४ फेब्रूवारी, २०१० रोजी आयोगाच्या कार्यालयात सादर करण्याचे निर्देश दिले होते. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी आपला खुलासा सादर केलेला आहे. त्यावरुन अपीलार्थीना वेळोवेळी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे असे निदर्शनास आणण्यात आले. तसेच या सर्व माहितीच्या प्रती आयोगास सादर करण्यात आल्या व श्रीमती खान यांना पुन्हा उपलब्ध करुन देण्यांत आलेल्या आहेत. त्यामुळे जन माहिती अधिका-यांवर शास्तीची कारवाई करण्याची आवश्यकता नाही. शास्तीचे प्रकरण बंद करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २४ फेब्रूवारी, २०१०

प्रत- जन माहिती अधिकारी, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना माहितीसाठी.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५८६१/अपील क्रमांक ५४४३/०२

श्री. वैभव चंद्रकांत कोरगांवकर -----अपीलार्थी
४८/३, राधाकृष्ण निवास, डॉ. आंबेडकर रोड,
दादर (पूर्व) मुंबई ४०० ०१४.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उप सचिव ----उत्तरवादी
सामान्य प्रशासन विभाग/ साप्रवि-२३,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

२. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव
सामान्य प्रशासन विभाग/ साप्रवि-२३,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक १४ डिसेंबर, २००९
सुनावणीचा दिनांक २४ फेब्रूवारी, २०१०.
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींच्या अपीलाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी जो खुलासा केलेला आहे त्यानुसार अपीलार्थीास त्यांच्या मुद्दा क्र. अ ,ब,क कडील माहिती पुरविण्यात आली असून ड कधील माहितीच्या बाबतीत खुलासाहि देण्यात आलेला आहे. सुप्रीम कोर्टाने दिलेल्या स्टे ऑर्डरची प्रत सुध्दा त्यांना देण्यांत आलेली आहे. त्यामुळे उपलब्ध सर्व माहिती ही अपीलार्थीस देण्यात आलेली असल्याचे दिसून आले. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २४ फेब्रूवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५८५४/अपील क्रमांक ५४४७/०२
क्रमांक-मु.मा.आ/४५८५३/अपील क्रमांक ५४४८/०२

श्री. चंद्रकांत अमृतलाल मर्चंट -----अपीलार्थी
जे.एम. राणे इमारत व खंबाटा पठाण चाळ,
डॉ. इ मोजेस रोड, वरळी, मुंबई ४०० ०१८.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सहायक मनपा आयुक्त ----उत्तरवादी
जी/ दक्षिण विभाग कार्यालय,
ना.म.जोशी मार्ग, मुंबई ४०० ०१३.

२. जन माहिती अधिकारी
जी/ दक्षिण विभाग कार्यालय,
ना.म.जोशी मार्ग, मुंबई ४०० ०१३.

***---विवेचन---***

अपीलांचे दिनांक १६ डिसेंबर, २००९
सुनावणीचा दिनांक २४ फेब्रूवारी, २०१०.
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपील क्रमांक ५४४७/०२

अपीलार्थीस GS-1071(2-1-2A) या प्रॉपर्टीचे १९६१ ते १९६२ मध्ये एकत्रिकरण केल्याचे अभिलेखावर दाखविण्यात आले आहे. तेव्हा १९६१ ते १९६२ च्या प्रथम कर आकारणीची तत्कालीन देय बिलाच्या प्रती अपीलार्थीस पाहिजे होत्या.

सदरील प्रकरणात कर देयकाच्या दुय्यम प्रती (१९६१-१९६२) या अभिलेखात उपलब्ध नाहीत त्यामुळे अपीलार्थीस हवी असलेली माहिती ही देता येऊ शकलेली नाही.

अपीलार्थींना हव्या असलेल्या कर देयकाच्या प्रती या ४८-४९ वर्षे जुन्या असल्यामुळे त्या उपलब्ध नाहीत त्यामुळे देता येऊ शकत नाहीत हे म्हणणे नाईलाजाने मान्य करावेच लागेल.

**अपील क्रमांक ४५४८/०२**

अपीलार्थींना हवी असणा्री माहिती व दिलेली माहिती पुढीलप्रमाणे आहे. ः

| | |
|---|---|
| मालमत्ता क्र ००२६००३<br>लेखा क्र. जीद १२-०२७५-०१-४-००० | देयकासाठी पोस्टल पत्ता दर्शविण्यात आलेला नाही. |
| समक्रमांकाच्या करनिर्धारक व संकलक यांच्या अभिलेखावरील नोंदणीमध्ये पक्षकाराचे नांव व पत्ता दिलेला नाही. तेव्हा कृपया त्या पक्षकारांचे नाव पत्ता याबाबत सखल माहिती देणे. | कार्यालयात उपलब्ध असलेल्या अभिलेखामध्ये सदर मालमत्ता मेसर्स खैबर प्रॉपर्टी आणि इन्व्हेस्टमेंट प्रा.लि. यांच्या नांवे दर्शविण्यात आली आहे. व या मालमत्तेची देयके गाळा नं.७२, गांधीनगर , डॉ. इ. मोजेस रोड, वरळी, मुंबई येथे दिली जातात. |

मात्र या मालमत्ता क्रमांक ००२६००३ मधील पक्षकारांची नांवे व पत्ते लिहिलेले नाहीत असे अपीलार्थींचे म्हणणे आहे. रेकॉर्डमध्ये जशी परिस्थिती आहे ती विदित केलेली आहे व त्याप्रमाणे अपीलार्थीस माहिती दिलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी यासंदर्भात पुढीलप्रमाणे सांगितले.

" ज्या स्वरुपात अभिलेख उपलब्ध आहेत त्या स्वरुपात अपीलार्थींना माहिती देण्यात आली आहे व तसेच देयकावर पक्षकाराचे नाव व पत्ता इत्यादी येण्यासाठी कार्यालयीन पध्दतीनुसार सक्षम अधिका-याच्या मंजूरीने नांव व पत्ता अंतःभूत करणे शक्य होईल. या अनुषंगाने अपीलार्थींना प्रथम अपील सुनावणीच्या वेळी देखिल सांगण्यात आलेले आहे."

वरिल परिस्थिती अपीलार्थींना जसा रेकॉर्ड आहे त्याप्रमाणे माहिती देण्यात आलेली आहे व अपीलार्थीस ज्याप्रमाणे रेकॉर्ड असावा असे वाटते त्यासंदर्भात काय करता येईल याचे मार्गदर्शनहि अपीलार्थींना करण्यात आले आहे.

***----आदेश---***

दोन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २४ फेब्रूवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५८५१/अपील क्रमांक ५४४९/०२

श्री. अब्दुल रौफ अजमल अली खान -----अपीलार्थी
रुम नं. १८/२२, रियासत चाळ, संत सावता मार्ग,
नारियल वाडी, मुंबई ४०० ०१०.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सहायक मनपा आयुक्त ई वॉर्ड ----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय, ई वॉर्ड, ३ रा मजला,
१०, हफिझुद्दीन मार्ग, सांकली स्ट्रीट,
भायखळा (पश्चिम) मुंबई ४०० ००८.

२. जन माहिती अधिकारी
सर्व्हेलन्स डिपार्टमेंट, ई वॉर्ड
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय, ई वॉर्ड, ३ रा मजला,
१०, हफिझुद्दीन मार्ग, सांकली स्ट्रीट,
भायखळा (पश्चिम) मुंबई ४०० ००८.

*---विवेचन---*

अपीलांचे दिनांक १८ डिसेंबर, २००९
सुनावणीचा दिनांक २४ फेब्रूवारी, २०१०.
अपीलार्थी उपस्थित, जन माहिती अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थींनी सिमेंट्री नं. ६९ चा कॅडेस्टल सर्व्हे नंबर काय आहे याची माहिती विचारली होती. हा अर्ज ज्या जन माहिती अधिकारी ई वॉर्ड यांच्याकडे देण्यांत आला होता त्यांनी तो अर्ज सर्व्हेलन्स डिपार्टमेंटकडे पाठविला व माहिती त्यांच्याकडून देण्यात येईल असे अपीलार्थीस कळविले. पण अपीलार्थींना अजूनहि माहिती मिळालेली नाही.

जन माहिती अधिकारी सर्व्हेलन्स डिपार्टमेंट , ३ रा मजला , बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय, ई वॉर्ड, १०, हफिझुद्दीन मार्ग, सांकली स्ट्रीट, भायखळा (पश्चिम) मुंबई ४०० ००८ यांनी

**अपीलार्थीस ८ दिवसांच्या आत माहिती द्यावी. तसेच त्यांना अर्ज प्राप्त झाल्यापासून १ महिन्याच्या आंत माहिती न दिल्याबद्दल त्यांच्यावर अधिनियमाच्या कलम २० अन्वये शास्तीची कारवाई का करु नये याबद्दल त्यांचा लेखी खुलासा दि. १८ मार्च, २०१० रोजी दुपारी २-३० वाजता आयोगाच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून सादर करावा.**

***---आदेश---***

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**जन माहिती अधिकारी यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**

**दिनांक २४ फेब्रूवारी, २०१०**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४०४७४/अपील क्रमांक ५४५०/०२**

**श्री. प्रमोद ल. कदम -----अपीलार्थी**
**१६/ डी-३, श्री. साई को.ऑप.हौसिंग सोसायटी,**
**एस.व्ही.पी. नगर, म्हाडा, अंधेरी (पश्चिम)**
**मुंबई ४०० ०५३.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक ----उत्तरवादी**
**सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई,**
**मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला, जी.पी.ओ.समोर,**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१.**

**२. जन माहिती अधिकारी**
**विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई,**
**मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला, जी.पी.ओ.समोर,**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१.**

***---विवेचन---***

**अपीलासोबत कागदपत्र जोडून नंतर प्राप्त झालेल्या अपीलाचादिनांक १८ डिसेंबर, २००९**
**सुनावणीचा दिनांक २४ फेब्रूवारी, २०१०.**
**अपीलार्थी उपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपीलार्थीस त्यांनी दि. ६/२/१००८ रोजी सभासदांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी नवजीवन को.ऑप.हौसिंग सोसायटी, चेंबूर येथे भरविण्यात आलेल्या हौसिंग अदालतीमध्ये त्यांनी जो तक्रार अर्ज दिला होता त्यावर काय कारवाई करण्यात आली याची माहिती मागितली होती.

अपीलार्थीचा माहितीचा अर्ज हा मुळतः विभागीय सहनिबंधक कार्यालयाकडे देण्यात आला होता तो त्यांनी उपनिबंधक, सहकारी संस्था म्हाडा यांच्याकडे पाठविला. मात्र यासंदर्भात

अर्जासोबतचा अर्ज हा त्यांच्या कार्यालयाकडे दिला नसल्याने त्याबाबत त्यांच्या कार्यालयात माहिती नाही असे कळविण्यात आले. प्रथम अपीलावर सुनावणी झाली पण आदेश झाले नाहीत असे अपीलार्थीचे म्हणणे आहे.

अपीलार्थीनी ज्या अर्जासंबंधीची माहिती पाहिजे आहे तो मुळ अर्ज हा अतिरिक्त निबंधक यांच्या लोकअदालतीच्या वेळेला त्यांच्याकडे दिला होता. त्यामुळे त्या अर्जाचे पुढे काय झाले याची माहिती त्यांना पाहिजे आहे.

अपीलार्थी यांनी असे सांगितले की, त्यांनी याबाबतीत अतिरिक्त निबंधक यांच्या कार्यालयात पृच्छा केली असता तो अर्ज त्यांनी उपनिबंधकांकडे पाठविला असल्याचे कळविलेले आहे.

अतिरिक्त निबंधकाकडून आलेल्या या पत्राची प्रत शक्य तितक्या लवकर अपीलार्थीनी जन माहिती अधिका-यांकडे द्यावी व जन माहिती अधिकारी यांनी त्या अर्जावर सक्षम प्राधिका-यांनी काय कारवाई केली याची माहिती अपीलार्थीस त्यानंतर १५ दिवसांचे आत कळवावी.

विद्यमान उपनिबंधक यांनी याबाबतीत स्वतः जातीने लक्ष घालून मुळ अर्जाची निर्गत लावणे आवश्यक आहे, तरच अपीलार्थीस समाधानकारक निर्गत करता येईल.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २४ फेब्रूवारी, २०१० — राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४६७४/अपील क्रमांक ५४५१/०२

श्री. राजेंद्र आर. चौहाण -----अपीलार्थी
४, चानिका प्रसाद चाळ, जुने हनुमान मंदिर जवळ,
टेक्निल एरीया, मरोळ पाईप लाईन,
अंधेरी (पूर्व) मुंबई ४०० ०५९.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (विशेष) ----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
३ रा मजला, के/पूर्व विभाग कार्यालय इमारत,
आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पूर्व) मुंबई ४०० ०६९.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ/का)
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
३ रा मजला, के/पूर्व विभाग कार्यालय इमारत,
आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पूर्व) मुंबई ४०० ०६९.

*---विवेचन---*

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक ८ डिसेंबर, २००९
सुनावणीचा दिनांक २४ फेब्रूवारी, २०१०.
अपीलार्थी यांचे प्रतिनिधी उपस्थित,जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थीस चानिका प्रसाद चाळ अंधेरी (पूर्व) येथील श्रीयुत विजय भारद्वाज यांनी केलेल्या अनधिकृत बांधकामासंबंधी कांही माहिती पाहिजे होती.

अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. २१ ऑक्टोबर, २००९ रोजीच्या आदेशात वरिल माहिती देण्याचे आदेश जन माहिती अधिकारी यांना दिलेले आहेत. सुनावणीच्या वेळेला अपीलार्थी

यांनी असे सांगितले की,  त्यांना अजूनहि माहिती मिळालेली नाही.

त्यामुळे पुढील निर्देश देण्यांत येतात की,

१. कार्यकारी अभियंता के/ई  वॉर्ड यांनी त्यांनी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी  ७ दिवसांच्या आत संबंधित जन माहिती अधिका-यांकडून करुन घ्यावी व तसे केल्याचा अहवाल आयोगास पाठवावा.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलीय अधिका-यांनी आदेश देऊनहि  अपीलार्थीस मुदतीत माहिती दिली नाही म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम २० अन्वये शास्तीची कारवाई कां करु नये याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाच्या कार्यालयांत दि. १८ मार्च, २०१० रोजी दुपारी २-४५ वाजता प्रत्यक्ष हजर राहून सादर करावा.

*----आदेश---*

अपील मान्य करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २४ फेब्रूवारी, २०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४५८५६/अपील क्रमांक ५४४५/०२**
**क्रमांक-मु.मा.आ/४५८४६/अपील क्रमांक ५४४६/०२**

**श्री. मेहमूद मेहबूब शेख -----अपीलार्थी**
**रुम नं. ७, दोस्त मोहम्मद चाळ,**
**गौसिया मज्जिद मागे, नित्यानंद नगर,**
**घाटकोपर (पश्चिम) मुंबई ४०० ०८६.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ----उत्तरवादी**
**आर सेंट्रल वॉर्ड, २ रा मजला,**
**मनपा मार्केट इमारत, स्वामी विवेकानंद रोड,**
**बोरीवली स्टेशनसमोर, बोरीवली (पश्चिम)**
**मुंबई ४०० ०९२.**

**२. जन माहिती अधिकारी**
**आर सेंट्रल वॉर्ड, २ रा मजला,**
**मनपा मार्केट इमारत, स्वामी विवेकानंद रोड,**
**बोरीवली स्टेशनसमोर, बोरीवली (पश्चिम)**
**मुंबई ४०० ०९२.**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक ८ डिसेंबर, २००९**
**सुनावणीचा दिनांक २४ फेब्रूवारी, २०१०.**
**अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.**

वरिल दोन्ही अपीलांचा विषय एकच असल्यामुळे दोन्ही अपीलांचा आदेश एकत्रित देण्यात येत आहे.

दोन्ही अपीलांचे अवलोकन केले असता असे दिसून आले की, अपीलार्थीस हवी असलेली

माहिती मिळालेली दिसत नाही.    अपीलार्थींनी दि. ३०/१०/२००९ रोजी माहितीसाठी रु. १३९६/- शुल्क भरलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांना असे निर्देश देण्यांत येतात की,  अपीलार्थीस  रु. १३९६/- शुल्क घेऊन देऊ केलेली माहिती ही दिलेली नसल्यास त्वरित द्यावी.

तसेच मुदतीत माहिती न दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांचेवर अधिनियमाच्या कलम २० अन्वये शास्तीची कारवाई कां करण्यात येऊ नये याबाबतचा त्यांचा लेखी खुलासा दि. १८ मार्च, २०१० रोजी दुपारी  ३-०० वाजता आयोगाच्या कार्यालयात प्रत्यक्ष येऊन सादर करावा.

***----आदेश---***

दोन्ही अपीले मान्य करण्यात येत आहेत.
जन माहिती अधिकारी यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २४ फेब्रूवारी, २०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक-मु.मा.आ/३९९९०/तक्रार क्रमांक ६१५/०२**

**श्री. नरवंदा प्रसाद मिश्रा -----तक्रारदार**
**प्राचार्य, राजीव गांधी मेमोरियल हायस्कूल,**
**नर्मदा कृष्णा भवन, परेरावाडी, साकीनाका,**
**मुंबई ४०० ०७२.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) ----उत्तरवादी**
**पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई ४०० ००१.**

**२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रतिबंधक)**
**पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई ४०० ००१.**

***---विवेचन---***

श्री.नरवंदाप्रसाद मिश्रा यांनी दि. १२/७/२००८ रोजी आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपीलावरील सुनावणी दि. ८/१२/२००८ रोजी घेण्यात आली व त्यावरील आदेश दि. ३१ डिसेंबर, २००८ रोजी पारित करण्यात आले. या आदेशानुसार खालीलप्रमाणे कार्यवाही जन माहिती अधिकारी यांनी करावयाची होती.

" सदर प्रकरणी संबंधित गोष्टीचा तपास तपासअधिकारी यांनी त्वरित पूर्ण करुन तक्रारदारास त्यानंतर शक्य तितक्या लवकर माहिती देण्याची कार्यवाही अप्पर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग यांनी करावी. "

उपरोक्त आदेशानंतर तक्रारदार श्री. नरवंदाप्रसाद मिश्रा यांना अपेक्षेप्रमाणे माहिती मिळावयास हवी होती. परंतु तशी ती मिळाली नसल्याचे तक्रारदारांनी त्यांच्या दि. ४ एप्रिल, २००९ च्या तक्रार अर्जाद्वारे आयोगाच्या निदर्शनास आणले. हा तक्रार अर्ज जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३० डिसेंबर, २००९ च्या आयोगाच्या पत्रासोबत

पाठविण्यात आला होता व असे निर्देश देण्यात आले होते की, सदर प्रकरणी लेखी अहवाल दि. ११/१/२०१० रोजी आयोगाकडे समक्ष सादर करण्यात यावा. तथापि जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी आयोगाच्या कार्यालयात उपस्थित झाले नाही. याच दिनांकास तक्रारदारानी आयोगाकडे पुन्हा निवेदन सादर करुन असे निदर्शनास आणले की, त्यांना अपेक्षित असलेली माहिती मिळालेली नाही.

यावरुन स्पष्ट होते की, आयोगाच्या दि. ३१ डिसेंबर, २००८ च्या आदेशावर कार्यवाही झालेली नाही. यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र ठरतात. तेव्हा जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रतिबंधक), पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई यांनी त्यांना कलम २० अन्वये शास्ती का लावण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा दि. १९ मार्च, २०१० रोजी स्वतः आयोगास सादर करावा. त्यावेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा उपस्थित राहावे. तसेच तक्रारदारांस त्यांनी मागितलेली माहिती त्वरित पुरवावी व तसे केल्याचे आयोगास कळवावे.

***---आदेश---***

तक्रार मान्य करण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २५ फेब्रूवारी, २०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक१३५८/०२**

**श्री. मोतीराम लोटन पाटील -----अपीलार्थी**
**प्लॉट नं. ६/अ, संतोषी माता कॉलनी,**
**महालक्ष्मी फरसाण हाऊस जवळ, नकाणे रोड,**
**देवपूर, धुळे.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी ----उत्तरवादी**
**सहकार आयुक्त व निबंधक यांचे कार्यालय,**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे- १**

**२. जन माहिती अधिकारी**
**सहकार आयुक्त व निबंधक यांचे कार्यालय,**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे- १**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक २२/५/२००८**
**सुनावणीचा दिनांक ७/१२/२००९**
**अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.**

**अपीलार्थींनी दि. २२/२/२००८ च्या अर्जान्वये दि. १६/१/२००८ ते अर्जाच्या दिनांकापर्यंतची माहिती मागितली. यानुसार त्यांना शासनाच्या दि. १६/१/२००८ च्या पत्रानुसार मागविलेल्या अहवालाच्या अनुषंगाने कागदपत्रे हवी होती.**

**तथापि त्यांना माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी दि. ३१/३/२००८ रोजी प्रथम अपील केले. यानंतर सुध्दा त्यांना माहिती मिळू शकली नाही. यास्तव त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.**

द्वितीय अपीलावरील सुनावणीसाठी अपीलार्थी व उत्तरवादी उपस्थित नव्हते. अपीलार्थीस फक्त अपीलार्थींचे शासनाकडून प्राप्त झालेले निवेदन दि. २५/२/२००८ रोजी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था यांचेकडे चौकशीसाठी पाठविण्यात आले आहे एवढीच माहिती देण्यात आली आहे.

सदर प्रकरणी आयोगाचे असे निर्देश आहेत की, अपीलार्थींनी त्यांच्या दि. २२/२/२००८ च्या अर्जात मागितलेली माहिती म्हणजे आता नाशिक कार्यालयाकडून आलेला अहवाल व त्यावरील पुढील कार्यवाही ही माहिती अपीलार्थींना विनामूल्य पुरवावी.

***---आदेश----***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २५ फेब्रूवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक१५९०/०२

श्री. पंढरीनाथ बाबुराव बोडके -----अपीलार्थी
रा.मु. मोह, पो. चिंचोली,
ता. सिन्नर, जि. नाशिक.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक ----उत्तरवादी
नाशिक ग्रामीण, नाशिक ४२२ ००१.

२. जन माहिती अधिकारी
पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण यांचे कार्यालय,
नाशिक ४२२ ००१.

***---विवेचन---***

अपीलांचा दिनांक २०/८/२००९
सुनावणीचा दिनांक २२/१२/२००९
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी अनुपस्थित, अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींनी दि. २०/१/२००९ च्या अर्जान्वये खालील माहितीची मागणी केली.

१. सिन्नर पोलीस स्टेशन जा.क्र. २१२७/०५ दि. १३/७/२००५ च्या पत्रान्वये पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण यांना पाठविलेल्या अहवालाच्या छायांकित प्रती.

२. मुदतबाहय रेकॉर्ड नाश करण्यासंबंधीच्या नियमांबाबतची माहिती.

उपरोक्त अर्जाला दि. १८/२/२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी खालील प्रमाणे उत्तर दिले.

आपण मागितलेला अहवाल मुदतबाहय झाल्याने पोलीस नियमावलीनुसार १९/५/२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे उत्तर दिले.

१. आपण मागितलेला अहवाल मुदतबाहय झाल्याने पोलीस नियमावलीनुसार १९/५/२००८ रोजी नाश करण्यात आला आहे.

२. महाराष्ट्र पोलीस नियमावली सन १९९९ -भाग-२ नियम क्र. २६२ परिशिष्ट १५ मध्ये नमूद तरतुदीनुसार अभिलेख जतन करुन ठेवण्याची मुदत असून अर्जासंबंधीत अभिलेख जतन करुन ठेवण्याची मुदत २ वर्षाची आहे.

वरील उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि. २४/३/२००९ रोजी प्रथम अपील केले. प्रथम अपीलावर सुनावणी होऊन दि. २९/५/२००९ रोजी आदेश पारित करण्यात आले. त्यानुसार अपीलार्थींना त्यांच्या मागणीनुसार माहिती देण्याचे आल्याचे नमूद करुन प्रथम अपील निकाली काढण्यात आले. यावर समाधान न झाल्याने त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. द्वितीय अपीलावरील सुनावणीचे वेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, अपीलार्थींच्या अर्जावर मुदतीत कार्यवाही केली असून अभिलेख ज्या नियमानुसार नाश केले आहेत तो नियम अपीलार्थींना कळविण्यात आला आहे. याचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

***----आदेश----***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २५ फेब्रूवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक१३१४/०२

श्री. रमेशचंद्र किसनलाल कुचेरीया -----अपीलार्थी
१७२५, अ, बॉम्बे लॉज चौक,
आग्रा रोड, धुळे.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक ----उत्तरवादी
भूमि अभिलेख धुळे.

२. जन माहिती अधिकारी तथा भू-मापन अधिकारी
धुळे.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक २५/५/२००९
सुनावणीचा दिनांक ७/१२/२००९
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींनी दि. १५/१/२००९ च्या माहिती अर्जान्वये सन १९७० व तद्नंतरच्या कालावधीची खालील सिटी सर्व्हे नंबरच्या विभागणी पत्रांबाबतची माहिती मागितली.

१. १७२५/अ-१

२. १७२५/अ-२

या अर्जाच्या अनुषंगाने त्यांना कळविण्यात आले की, संबंधित धारिका उपलब्ध न झाल्याने आपण मागणी केलेली माहिती पुरविता येत नाही. या उत्तरानंतर त्यांनी दि. ३०/३/२००९ रोजी प्रथम अपील केले.

प्रथम अपीलावर सुनावणी होऊन दि. १६/४/२००९ रोजी खालील आदेश पारित करण्यात आले.

" अपीलार्थी यांनी मागणी केलेल्या नकलांचा कसून शोध घेऊन अपीलार्थी यांना आवश्यक त्या नकला नियमानुसार फी आकारुन पुरवाव्यात."

उपरोक्त आदेशानंतर त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कागदपत्रे ४० वर्षापूर्वीची असल्याने कसून शोध घेऊनहि कागदपत्रे उपलब्ध होत नाही ही वस्तुस्थिती नाईलाजाने मान्य करावी लागेल.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २५ फेब्रूवारी, २०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक१२९७/०२**

**श्री. विकास जगन्नाथ चोपडे -----अपीलार्थी**
**मेन रोड, यावल, जि. जळगांव ४२५ ३०१.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी ----उत्तरवादी**
**नगरपरिषद यावल, जि. जळगांव.**

**२. जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपिक (साप्रवि)**
**नगरपरिषद यावल, जि. जळगांव.**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक १६/३/२००९**
**सुनावणीचा दिनांक २७/१२/२००९**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलीय अधिकारी अनुपस्थित**

**अपीलार्थींनी दि. १०/११/२००८ च्या अर्जान्वये खालील प्रकरणी माहितीची मागणी केली.**

१. **सौ. रश्मी विकास चोपडे यांनी दि. १५/७/२००८, १४/८/२००८ रोजी दिलेल्या अर्जावरील कार्यवाहीचा तपशील.**

२. **श्री.रमाकांत भिकाजी चोपडे यांनी दि. १४/८/२००८ रोजी दिलेल्या अर्जावरील कार्यवाहीचा तपशील.**

३. **श्री.जगन्नाथ भिकाजी चोपडे यांनी दि. १७/९/२००८ रोजी दिलेल्या अर्जावरील कार्यवाहीचा तपशील.**

४. **श्री.विकास जगन्नाथ चोपडे यांनी दि. ८/९/२००८, ९/९/२००८ व ११/८/२००८ रोजी दिलेल्या अर्जावरील कार्यवाहीचा तपशील.**

उपरोक्त माहिती न मिळाल्याने त्यांनी दि. १९/१२/२००८ रोजी प्रथम अपील केले. अपीलावर सुनावणी होऊन दि. १३/२/२००९ रोजी आदेश पारित करण्यात आले. त्यानुसार अपीलार्थींना जन माहिती अधिकारी यांनी माहिती त्वरित पुरवायची होती.

तथापि माहिती न मिळाल्याने त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपीलार्थींनी मागितलेली माहिती त्यांना वेळोवेळी पुरविली आहे. तरी ते वारंवार वेगवेगळया व्यक्तींकडून त्याच माहितीसाठी अर्ज करतात.

अपीलार्थी यांना त्यांच्या जागेवर आरक्षण कायम असल्याबद्दल संचालक नगर नियोजने यांना सुध्दा कळविल्यानंतर देखिल ते आरक्षण रद्द झाल्याचा आग्रह धरतात व त्याबाबत दाखले मागतात. त्याबाबत त्यांना अनेक वेळा लेखी दिले आहे असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे.

अपीलार्थींना माहिती मिळाली असल्याने खालील आदेश पारित करण्यात येत आहेत.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २५ फेब्रूवारी, २०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १५६९/०२**

**श्री. लक्ष्मीकांत यशवंत संत -----अपीलार्थी**
**१०, पिनाक सोसायटी,**
**बापू बंगल्यासमोर, इंदिरानगर,**
**नाशिक - ४२२ ००९.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक ----उत्तरवादी**
**सहकारी संस्था, जळगांव.**

**२. जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक**
**सहकारी संस्था चोपडा, जि. जळगांव.**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक १६/७/२००९**
**सुनावणीचा दिनांक २२/१२/२००९**
**अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित**

**अपीलार्थींनी दि. १२/३/२००९ च्या अर्जान्वये तापी सहकारी पतपेढी, चोपडा यांच्या संबंधित माहिती मागितली. माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी दि. ४/५/२००९ रोजी प्रथम अपील केले. परंतु त्यांना माहिती मिळू शकली नाही. म्हणून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.**

**द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केले की, अपीलार्थींना ज्या प्रकरणाची माहिती हवी आहे ते प्रकरण सहकारी संस्थेच्या माहितीविषयी आहे व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी ज्याप्रमाणे त्यांचे आदेशात नमूद केले आहे की, उच्च न्यायालयाने पुढील आदेश होईतो सहकारी संस्था, अर्बन बँका व पतपेढी यांचे बॅलन्स शीट, नफा-तोटा पत्रक वगळता इतर कोणतीही माहिती , माहिती अधिकार अधिनियम**

अंतर्गत देऊ नये अशी तुर्तातुर्त मनाई केलेली आहे. त्यामुळे सध्या तरी माहिती न पुरविणे सयुक्तिक ठरते. अपीलार्थींना याची स्पष्ट कल्पना सुनावणीच्या वेळी देण्यात आली. सदर प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

***----आदेश-----***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २५ फेब्रूवारी, २०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४०१८/अपील क्रमांक ४०१३/०२

श्री. सतिश विठ्ठलराव रत्नपारखी -----अपीलार्थी
४, जरीवाला मेंशन, टिळक रोड,
लोकमान्य सेवा संघ मागे, विलेपार्ले (पूर्व)
मुंबई ४०० ०५७.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा रजिस्ट्रार ----उत्तरवादी
श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरशी महिला विद्यापीठ,
१, नाथीबाई ठाकरशी रोड, मरिन लाईन्स,
मुंबई ४०० ०२०.

२.जन माहिती अधिकारी
श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरशी महिला विद्यापीठ,
१, नाथीबाई ठाकरशी रोड, मरिन लाईन्स,
मुंबई ४०० ०२०.

***---विवेचन---***

अपील क्रमांक २००९/४०१३/०२ मध्ये आयोगाने असे आदेश दिले होते की, अपीलार्थी श्रीयुत सतिश रत्नपारखी यांना हवी असलेली माहिती श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरशी महिला विद्यापीठाचे जन माहिती अधिकारी यांनी पुरवावी.

अपीलार्थींनी दि. १७/६/२००४ रोजी डायरेक्टर, जानकीदेवी बजाज इंन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट या जागेसाठी निवड करण्यासाठी झालेल्या निवड समितीच्या फेरबैठकीचे इतिवृत्त व कुलगुरु यांनी या सभेसाठी दिलेला अहवाल यांच्या प्रतींची मागणी केलेली होती.

जरी विद्यापीठाने ही माहिती विश्वासाश्रित (fiduciary) कॅपॅसिटीमध्ये मिळालेली असल्यामुळे नाकारली असली तरी जनहित लक्षात घेता ही माहिती द्यावी असे आयोगाने ठरविले होते. मात्र मा. हायकोर्टाने याबाबतीत फेरसुनावणी घेऊन कायद्याप्रमाणे पुन्हा निर्णय व्हावा असे निर्देश दिलेले होते.

दि. १२/१/२०१० रोजी अंतिमतः सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

आयोगाने याआधीच्या आदेशात स्पष्ट केले होते की, सर्वसाधारणपणे विश्वासाश्रित (fiduciary) कॅपॅसिटीमध्ये दिलेले मत किंवा अहवाल देण्याच्या बाबतीत माहितीचा अधिकार अधिनियमाच्या (कलम ८ (१) (ङ) नुसार ) अपवाद केला जावू शकतो. मात्र सदरील केसमध्ये डायरेक्टर, जानकीदेवी बजाज इंन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट यासारख्या महत्वाच्या जागेवर होत असलेल्या नेमणूकीच्या बाबतीत अपीलार्थीचे समाधान होणे हेहि आवश्यक आहे. एखादया उमेदवाराची निवड समितीने शिफारस करणे ही बाब नियुक्ती करण्याबाबत अंतिम जरी नसली तरी अशी शिफारस झालेली आहे हे माहिती असतांना कांही कारणासाठी सुध्दा जरी ती शिफारस मान्य करण्यात आली नसली तरी ती कारणे ही समभावाच्या (fairness) च्या दृष्टीने सर्वांना ज्ञात व्हावी असे आयोगास वाटते.

नुकतेच केंद्रिय माहिती आयोगाने सुध्दा खालील प्रमाणे आपले मत व्यक्त केलेले आहे.

**" The recommendation of appointment of justices is decidedly a public activity conducted in the overriding public interest. Hence, the plea of seeking exemption under the definition of fiduciary relationship cannot stand, and even if accepted in technical terms, will not withstand the test of public interest."**

दुसरे म्हणजे या निवड समितीची दुबार बैठक झाल्यानंतर सुध्दा या जागेवर नियुक्ती करण्यास बराच कालावधी विद्यापीठाने घेतलेला आहे. कलम ८(१)(ङ) च्या अपवादाचा वापर करुन माहिती न देण्यापेक्षा वरील कलमामुळे माहिती देणे हे जास्त समभावाचे व जनतेच्या मनातील संभ्रम दूर करणारे ठरणार असल्यामुळे जनहिताचे राहिल. त्यामुळे सर्वंकष समभावाच्या व

जनहिताच्या दृष्टीने ही माहिती द्यावी अशा जुन्याच निर्णयाप्रत आयोग आलेले आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*----आदेश---*

अपीलार्थींच्या दि. १८/१२/२००८ चे अपील मान्य करण्यात येत आहे.
अपीलार्थीस हवी असणारी माहिती ही ७ दिवसांच्या आत देण्यात यावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक २५फेब्रूवारी, २०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४५८६३/अपील क्रमांक ५४५७/०२**
**क्रमांक-मु.मा.आ/४५८६२/अपील क्रमांक ५४५८/०२**

**श्री. लक्ष्मीचंद बी. सत्रा** **-----अपीलार्थी**
**५०१, प्रतीक सी.एच.एस.लि.**
**मामलतदार वाडी, मेन रोड, मालाड (पश्चिम)**
**मुंबई ४०० ०६४.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा सहायक मनपा आयुक्त** **----उत्तरवादी**
**पी/एन वार्ड, लिबर्टी गार्डन, मालाड (पश्चिम)**
**मुंबई ४०० ०६४.**

**२. जन माहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी**
**पी/एन वार्ड, लिबर्टी गार्डन, मालाड (पश्चिम)**
**मुंबई ४०० ०६४.**

***---विवेचन---***

**अपीले प्राप्त झाल्याचा दिनांक १४ डिसेंबर, २००९**
**सुनावणीचा दिनांक २५ फेब्रूवारी, २०१०.**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थीस मुंबई महानगरपालिकेने मुंबई नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट अंतर्गत गाडीवान हॉस्पीटल यांनी जे प्रथम रजिस्ट्रेशन केले होते त्याची माहिती व त्यावेळेस सादर केलेले कागदपत्र व तद्‌नंतरहि सन २००८-२००९ , २००९-२०१० मध्ये रजिस्ट्रेशनचे नुतनीकरण देतांना केलेल्या चौकशी, स्क्रूटिनी व इतरहि अनुषंगिक माहिती पाहिजे होती.**

**अपीलार्थीस ही माहिती अपिलीय अधिकारी यांचे आदेश होऊनहि न मिळाल्यामुळे त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपीलात धाव घेतलेली आहे.**

जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार यासंदर्भात कागदपत्र आढळ होऊन येत नाही त्यामुळे अपीलार्थींना हवी असलेली माहिती देता येत नाही.

जन माहिती अधिकारी यांना असे निर्देश देण्यात येतात की, जन माहिती अधिकारी यांनी १५ दिवसात वॉर्ड ऑफिस, आरोग्य विभाग तसेच हॉस्पीटलचे प्राधिकारी यांचेकडून कागदपत्रे प्राप्त करुन घेऊन नस्तीची जास्तीत जास्त पुन:निर्मिती करावी व अपीलार्थीस जी माहिती पाहिजे आहे ती व विशेषेकरुन हॉस्पीटल प्रिमायसेसमध्ये बँकेला दिलेल्या जागेच्या बाबत जी माहिती पाहिजे आहे त्यासंबंधीची सर्व माहिती पुरवावी.

***---आदेश---***

दोन्ही अपीले मान्य करण्यात येत आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी २१ दिवसांचे आत वरिल कार्यवाही पूर्ण करुन अपीलार्थीस माहिती द्यावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २५फेब्रूवारी, २०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४४५७७/अपील क्रमांक ५३७८A/०२**

**श्री.दिलीप बी. नेवाटीया -----अपीलार्थी**
**शशीदिप, ५ अ, वरळी सी फेस,**
**मुंबई ४०० ०३०.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त ----उत्तरवादी**
**परिमंडळ ३, बावला कंपाऊंड,**
**बाबासाहेब आंबेडकर रोड, मुंबई ४०० ०२७.**

**२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त**
**मध्य प्रादेशिक नियंत्रण कक्ष, बावला कंपाऊंड,**
**बाबासाहेब आंबेडकर रोड, मुंबई ४०० ०२७.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक २६ नोव्हेंबर, २००९**
**सुनावणीचा दिनांक २५ फेब्रूवारी, २०१०.**
**अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थीस त्यांनी वरळी पोलीस ठाणे येथे दि. २९/९/२००९ रोजी पनहार बिल्डींग यांच्या विरोधात ध्वनीप्रदुषणाबाबत केलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कारवाईची माहिती पाहिजे होती.**

**अपीलार्थीस पोलीस स्टेशनकडून प्राप्त झालेली माहिती ही दि. १३/११/२००९ रोजी रजिस्टर्ड ए.डी. ने पाठविण्यात आलेली आहे व ती त्यांना मिळालेली आहे. विलंबाबाबत दरम्यानच्या कालावधीत अधिकारी हे निवडणूक संबंधीच्या कर्तव्यात व्यस्त असल्यामुळे माहिती देण्यास विलंब लागल्याचे नमूद केलेले आहे.**

**दिलेल्या माहितीने समाधान न झाल्यामुळे केलेल्या प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळेला**

प्रथमतः फार थांबावे लागले म्हणून ते नंतर उपस्थित राहू शकले नाही व नंतर जेव्हा सुनावणी घेतली तेव्हा ते उपस्थित राहू शकले नव्हते. मात्र अपीलार्थीस याअगोदरच माहिती दिलेली आहे असे नमूद करुन प्रथम अपील निकाली काढण्यात येत आहे त्याविरुध्द अपीलार्थींचे सदरचे अपील आहे.

सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी अनुपस्थित होते. मात्र त्यांनी सादर केलेले अपील व त्यासोबतच्या कागदपत्रे व जन माहिती अधिका-यांनी सादर केलेले निवेदन विचारात घेता असे दिसून आले की, अपीलार्थींची जी तक्रार होती त्यासंबंधी जी चौकशी करण्यात आली त्यासंबंधीची कागदपत्रे अपीलार्थीस देण्यात आलेली आहेत. विशेषेकरुन अपीलार्थींची तक्रार ध्वनीप्रदुषणाची आहे व तपासणीच्या वेळेला ध्वनीप्रदुषण आढळून आले नाही. मात्र तरीही परहार बिल्डींगच्या मॅनेजर्सना ध्वनीप्रदुषण न करण्याविषयीची ताकीद देण्यांत आलेली आहे व तसे अपीलार्थीस कळविण्यातहि आलेले आहे.

अपीलार्थीस मात्र ध्वनीप्रदुषण मोजण्याचे तांत्रिक उपकरणे वापरुन त्यानुसार कारवाई करावी असे अभिप्रेत दिसते. पण अशी उपकरणे संबंधित पोलीस स्टेशनमध्ये प्राप्त झालेली नाहीत असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

माहितीचा अधिकार अधिनियमानुसार जशी रेकॉर्डला कागदपत्रे असतील त्याप्रमाणे ती दिल्या जातात व तशी ती देण्यांत आलेली आहे. मात्र अपीलार्थीस ध्वनीप्रदुषणाबाबतीतली कळकळ आणि अपेक्षा ही अनाठायी आहे असे म्हणता येणार नाही याची वरिष्ठ अधिका-यांनी दखल घ्यावी. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येतो.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

या आदेशाची एक प्रत बृहन्मुंबई पोलीस आयुक्त यांनाहि पाठविण्यात यावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २५फेब्रूवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १५५३/०२**

**श्री. संजय जनार्दन शिंदे -----अपीलार्थी**
**दत्त मंदिरासमोर, पद्मावती नगर,**
**पारेगांव रोड, येवला, जि. नाशिक -- ४२३ ४०१.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) ----उत्तरवादी**
**जिल्हा परिषद नाशिक.**

**२. जन माहिती अधिकारी**
**सेनापती तात्या टोपे प्रसारण मंडळ येवला,**
**जि. नाशिक.**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक २७/७/२००९**
**सुनावणीचा दिनांक २२/१२/२००९**
**अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित**

**अपीलार्थीनी दि. २२/१/२००९ च्या अर्जाद्वारे श्रीमती सिमा बळवंत देशमुख ,कनिष्ठ लिपिक, यांच्या सन २००४-०५ मध्ये केलेल्या नेमणुकीची कागदपत्रे मागितली.**

**उपरोक्त अर्जाला उत्तर प्राप्त न झाल्याने त्यांनी दि. २६/२/२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यांना माहिती मिळाली नाही. यास्तव त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.**

**द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सादर केले की, संस्थेने माहिती टपालाने पाठविली होती. पण अपीलार्थीनी टपाल स्वीकारले नाही. मात्र अपीलार्थींना देण्यासाठी त्यांनी माहिती आणंली आहे. तेव्हा याबाबत आयोगाचे असे**

निर्देश आहेत की,  आज उपलब्ध असलेली माहिती अपीलार्थींना ताबडतोब देण्यात यावी. याव्यतिरिक्त उर्वरित माहिती अपीलार्थींना शीघ्र पोष्टाने पुरविण्यात यावी.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक  २५फेब्रूवारी, २०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १५५४/०२**

**श्री. संजय जनार्दन शिंदे -----अपीलार्थी**
**दत्त मंदिरासमोर, पद्मावती नगर,**
**पारेगांव रोड, येवला, जि. नाशिक -- ४२३ ४०१.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) ----उत्तरवादी**
**जिल्हा परिषद नाशिक.**

**२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक**
**एन्झोकेम हायस्कूल व श्रीमान गंगाराम छबिलदास शेठ**
**उच्च माध्यमिक विद्यालय, येवला,ता.येवला, जि. नाशिक.**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक २७/७/२००९**
**सुनावणीचा दिनांक २२/१२/२००९**
**अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित**

अपीलार्थीनी दि. १७/३/२००९ च्या अर्जान्वये खालील माहिती मागितली.

१. सन २००३- ०४ मध्ये सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकेतर कर्मचा-याचे नांव, पदनामा, निवृत्तीचा दिनाक.

२. त्यांच्या जागेवर नियुक्त झालेल्या कर्मचा-यांच्या मंजूरी प्रस्तावाची प्रत.

३. कनिष्ठ लिपीकासाठी आलेल्या सर्व अर्जदारांची यादी.

४. विद्यालयाने जिल्हा परिषदेकडे पाठविलेल्या प्रस्तावाच्या छायांकित प्रती इत्यादि.

उपरोक्त अर्जाला दि. १५/४/२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिले व कळविले की, उपरोक्त माहिती कोर्टात असल्यामुळे आपणांस देता येत नाही. या उत्तराने समाधान न

झाल्याने त्यांनी दि. १२/५/२००९ रोजी प्रथम अपील केले. संस्थेने/ शाळेने अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन द्यावी असे अपिलीय अधिकारी यांनी सांगितले. परंतु यानंतर सुध्दा त्यांना माहिती मिळाली नाही. यास्तव त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी उत्तरवादींनी असे सादर केले की, संस्थेने/ शाळेने अपीलार्थींना टपालाद्वारा माहिती पाठविली होती. परंतु ती स्वीकारण्यास त्यांनी नकार दिला. याचा विचार करता असे निर्देश देण्यांत येतात की, अपीलार्थींना त्वरित माहिती द्यावी व ती अपीलार्थींनी स्वीकारावी.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक २५फेब्रूवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १५७३/०२

श्री. मेमन रियाज अब्दुल गफार -----अपीलार्थी
प्लॉट नं. १, प्रेसिडेंट गार्डन मिरजकरनगर,
वडाळारोड ,नागजी हॉस्पीटलसमोर, नाशिक.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप धर्मादाय आयुक्त ----उत्तरवादी
खरवंदा पार्क , द्वारका सर्कल जवळ, नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक
खरवंदा पार्क , द्वारका सर्कल जवळ, नाशिक.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक ३०/६/२००९
सुनावणीचा दिनांक २२/१२/२००९
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित

अपीलार्थींनी दि. १३/३/२००९ च्या अर्जान्वये युथ एज्यूकेशन वेल्फेअर सोसायटीबाबत खालील माहिती मागितली.

१. सन २००० ते २००८ पर्यंतच्या सर्वसाधारण सभांचे इतिवृत्त.

२. मालमत्ता नोंदीबाबत सत्यप्रती

३. दरवर्षीच्या लेखा परिक्षण अहवालांच्या प्रती.

४. महिला प्रतिनिधींची माहिती

५. महिला प्रतिनिधी नियुक्त केलेल्या नसल्यास त्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा तपशील.

उपरोक्त माहिती प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी दि. १८/४/२००९ रोजी प्रथम अपील केले.

तथापि त्यांना माहिती प्राप्त झाली नाही यास्तव त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केले.

द्वितीय अपीलावरील आयोगाकडे उत्तरवादीतर्फे असे सादर करण्यात आले की, मुंबई हायकोर्टाच्या नागपूर बेंचचा रिटपीटीशन क्र. ५२२४/२००८ (भास्करराव कुलकर्णी विरुध्द मुख्य विश्वस्त, श्री.गोविंद रामानंद समर्थ सद्‌गुरु प्रल्हाद महाराज संस्थान विरुध्द प्रविण महाजन ) मध्ये २८ एप्रिल, २००९ रोजी दिलेल्या निर्णयानुसार पब्लिक ट्रस्ट ही "जन प्राधिकरणे" नाहीत. त्यामुळे त्यांनी माहिती देणे बंधनकारक नाही. मात्र धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे या ट्रस्टची कायद्यानुसार असलेली माहिती अपीलार्थींना त्यांच्या मागणीनुसार पुरविण्यात आली आहे. याचा विचार करुन खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

---*आदेश*---

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २५फेब्रूवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १५९२/०२

श्री. जितेंद्र नाथा चव्हाण -----अपीलार्थी
रा. पोलीस मुख्यालय,नाशिक शहर, बिल्डींग नं.७,
रुम नं. ५, जुन्या सी.बी.एस. मागे, गंगापुर रोड,
नाशिक - ४२२ ००२.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी ----उत्तरवादी
मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय,
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद,नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक
मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय,
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद,नाशिक.

***---विवेचन---***

अपीलांचा दिनांक ३/८/२००९
सुनावणीचा दिनांक २२/१२/२००९
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींनी दि. १२/५/२००९ च्या अर्जान्वये त्यांनी दि. ६/४/२००९ रोजी दिलेल्या तक्रार अर्जावरील कार्यवाहीच्या तपशीलाची मागणी केली.

उपरोक्त माहिती न मिळाल्याने त्यांनी दि. १५/६/२००९ रोजी प्रथम अपील केले. परंतु त्यांना माहिती मिळू शकली नाही. यास्तव त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीचे वेळी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) तथा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सादर केलेल्या लेखी निवदनानुसार असे दिसते की, अपीलार्थींच्या दि. ६/४/२००९ च्या तक्रार अर्जावर कार्यवाही झालेली नाही. माहिती अधिकारांतर्गत उपलब्ध असलेल्या

कागदपत्रांच्या आधारे जशी आहे त्या स्वरुपात माहिती पुरविणे अपेक्षित आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे निवेदन दिले की, श्री. जितेंद्र नाथा चव्हाण व श्रीमती. सविता बारकू चव्हाण (पती -पत्नी ) यांचे कौटुंबिक वाद आहेत व सदर ६/४/२००९ च्या अर्जाची चौकशी चालू आहे. याचा विचार करता आयोगाचे असे निर्देश आहेत की, दि. ६/४/२००९ रोजीच्या अपीलार्थीच्या तक्रार अर्जावरील कार्यवाही पूर्ण करुन चौकशी अहवालाची प्रत त्वरित अपीलार्थींना पुरविण्यात यावी.

***----आदेश----***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक २५फेब्रूवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १५२४/०२

श्री. अन्सारी मो. गफुरान मो. युसुफ -----अपीलार्थी
रा. मालेगांव, जि. नाशिक

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष ----उत्तरवादी
ईस्लामिक ॲन्ड मॉडर्न एज्युकेशन ट्रस्ट,
द्वारा- मॉडर्न हायस्कूल, नयापुरा मालेगांव, जि. नाशिक
२. जन माहिती अधिकारी तथा सचिव
ईस्लामिक ॲन्ड मॉडर्न एज्युकेशन ट्रस्ट,
द्वारा- मॉडर्न हायस्कूल, नयापुरा मालेगांव,जि. नाशिक

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक ५/८/२००८
सुनावणीचा दिनांक २१/१२/२००९
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी त्यांची संस्था एक पब्लिक ट्रस्ट असून मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांनी कोणतेही पब्लिक ट्रस्टला माहितीचा अधिकार कायदा लागू नसल्याबद्दल रिट याचिका क्र. ५२९४/२००८ मध्ये दिलेल्या निर्णया नुसार त्यांच्या संस्थेस माहितीचा अधिकार लागू नसल्यामुळे अपीलार्थींचे अपील फेटाळण्याची विनंती केली आहे. मात्र अपीलार्थीस ट्रस्ट चालवित असलेल्या शाळांमध्ये पदे भरण्यासाठी भरघोस शासकीय अर्थसहाय्य मिळते त्या पदावरील नियुक्तीसंबंधीची माहिती संबंधित शिक्षणाधिकारी कार्यालयाचे जन माहिती अधिकारी यांचेकडून घेता येईल.

*----आदेश---*

मा.उच्च न्यायालयाचा निर्णय लक्षात घेता अपीलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक २५फेब्रूवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १६२१/०२**

**श्री.राजेंद्र पोपटराव नवलेपाटील -----अपीलार्थी**
**३, वरदायनी अपार्टमेंट, हिरावाडी पंचवटी,**
**नाशिक ४२२००३.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी ----उत्तरवादी**
**नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज,**
**शिवाजी नगर, नाशिक.**

**२. जन माहिती अधिकारी**
**नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज,**
**शिवाजी नगर, नाशिक.**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक २५/९/२००९**
**सुनावणीचा दिनांक २२/१२/२००९**
**अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.**

अपीलार्थी यांनी ज्या संस्थेकडे माहितीची मागणी केलेली आहे ती संस्था माहितीचा अधिकार कायद्यानुसार "जन प्राधिकरण " नाही असे त्यांचे प्रतिवेदन आहे. अपीलार्थीकडून ही संस्था जनप्राधिकरण आहे याबाबत ठोस प्रतिवेदन नाही. सकृतदर्शनी वरील संस्था " जन प्राधिकरण " नाही असे दिसते.

अशा प्रकारच्या संस्थेचा माहितीचा अधिकार कायदा लागू नसल्याचे मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्र ५२९४/२००८ मध्ये निर्णय दिलेला आहे.

*----आदेश---*

अपील अमान्य करण्यात येत आहे. मात्र अपीलार्थीस हवी असणारी संस्था चालवित असलेल्या कॉलेजसंबंधीची माहिती कायद्यानुसार शिक्षण विभागाकडे असणे आवश्यक आहे किंवा त्यांना ती मिळविता येईल. ती माहिती अपीलार्थींनी अर्ज केल्यास संबंधित संचालनालयाचे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना द्यावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक २५फेब्रूवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १४६४/०२

श्री. शेख आरीफ युसूफ -----अपीलार्थी
प्लॉट नं. ५, म्यु.कामगार हौसिंग सोसायटी,
मनमाड, जिल्हा नाशिक- ४२३ १०४.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी ----उत्तरवादी
नगरपरिषद कार्यालय मनमाडा, जि. नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासन व आस्थापना अधिकारी
नगरपरिषद कार्यालय मनमाडा, जि. नाशिक.

***---विवेचन---***

अपीलांचा दिनांक ०६/१०/२००८
सुनावणीचा दिनांक २१/१२/२००९

अपीलार्थी जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित.

सुनावणीच्या वेळी अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी एकत्रित चर्चा केली. अपीलार्थीनी मागणी केलेली माहिती ही वैयक्तिक स्वरुपाची असल्यामुळे देऊ नये अशी जन माहिती अधिकारी यांनी विनंती केली आहे. तथापि त्रयस्थ पक्षाच्या सर्व्हिस बुकची झेरॉक्स प्रत देण्याबद्दल यापूर्वी आयोगाने दिलेले आदेश नमूद करुन अपीलार्थीनी नगरपरिषदेतील आस्थापना प्रमुख श्री. जेजूरे यांचे सेवापुस्तकाची प्रमाणित प्रत देण्याची मागणी केली आहे.

अपीलार्थीस हवी असणारी माहिती सेवापुस्तकांचा जो विहित नमुना आहे त्यात सापडू शकते. तेव्हा सेवापुस्तकाची प्रत देण्यात यावी अशी त्यांची मागणी आहे. सेवापुस्तकात जी

माहिती असते त्यांत निखळ वैयक्तिक असे कांहीही नाही.   त्यामुळे अपीलार्थीस सेवापुस्तकाची प्रत देण्यात यावी.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक  २५फेब्रूवारी, २०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५८७९/अपील क्रमांक ५४५९/०२

श्री. श्रीनिवास शेट्टी -----अपीलार्थी
अदिती रेस्टॉरंट, परेल हाऊस,
के.ई.एम. हॉस्पीटलसमोर, परेल, मुंबई १२.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त(मुख्या १) ----उत्तरवादी
पोलीस आयुक्त कार्यालय, क्रॉफर्ड मार्केट,
मुंबई ४०० ००१.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (मुख्या १)
पोलीस आयुक्त कार्यालय, क्रॉफर्ड मार्केट,
मुंबई ४०० ००१.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक १८/१२/२००९
सुनावणीचा दिनांक २५ फेब्रूवारी , २०१०.
अपीलार्थी अनुपस्थित, त्यांचा अपील पुढे ढकलण्याचा अर्ज ठोस कारणे नसल्यामुळे नाकारण्यात आला. जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस मुंबईमध्ये ज्या ज्या हॉटेल्सना त्यांचे लायसेन्स रद्द करण्यासंबंधी नोटीसेस काढण्यात आल्या होत्या त्या नोटीसेसच्या प्रती, आदेशांच्या प्रती, अपील झाले असल्यास शासनाच्या आदेशाच्या प्रती ही माहिती सन २००७-०८ व २००८-०९ या कालावधीबाबतची पाहिजे होती.

वरील माहिती फार विस्तृत प्रमाणात असल्यामुळे ती माहिती द्यायची झाल्यास व्यापक स्वरुपात साधनसामुग्री वळवावी लागणार असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी माहिती

नाकारली. मात्र प्रथम अपिलीय अधिकारी यांनी संख्यात्मक माहिती द्यावी व वानगीदाखल एका प्रकरणाची संपूर्ण कागदपत्रे द्यावीत असे आदेश दिले. याविरुध्द सदरचे अपील आहे.

जी संख्यात्मक आकडेवारी सादर केली आहे त्यावरुन असे दिसते की, अशा प्रकारची कारवाई ही ५५० पेक्षा जास्त हॉटेल्सवर सुरु करण्यात आली होती व सर्व प्रकारची कागदपत्रे द्यावयाची झाल्यास ती फार मोठे काम होऊन बसेल हा मुद्दा पटण्यासारखा वाटतो.

अपीलार्थीस एखादया विशेष हॉटेलसंबंधी माहिती पाहिजे असल्यास त्याची संपूर्ण कागदपत्रे देता येतील किंवा एका प्रकरणाच्या माहितीऐवजी त्यांनी नमूद केलेल्या ४/५ प्रकरणांची माहिती सुध्दा वानगीदाखल देता येऊ शकेल. मात्र ५५० पेक्षा जास्त प्रकरणांची संपूर्ण माहिती देण्यास सांगणे हे योग्य होणार नाही. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***----आदेश---***

अपील अमान्य करण्यात येत आहे.

अपीलार्थी यांनी माहितीच्या व्याप्तीबाबत आयोगाचे आदेश लक्षात घेऊन योग्यतो पर्याय ठरवावा.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक २५फेब्रूवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५१८३/अपील क्रमांक ५३००/०२

श्री. केएनके थॅम्पन पानीककर -----अपीलार्थी
१०५, धिरज व्हॅली टॉवर सीएचएस,
मोहन गोखले रोड, गोरेगांव (पूर्व)
मुंबई ४०० ०६३.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी ----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
पी/साऊथ वॉर्ड, मिठानगर, गोरेगांव (पश्चिम)
मुंबई ४०० ०९०

२.जन माहिती अधिकारी
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
पी/साऊथ वॉर्ड, मिठानगर, गोरेगांव (पश्चिम)
मुंबई ४०० ०९०

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक ११/११/२००९
सुनावणीचा दिनांक ४ फेब्रूवारी , २०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस धिरज व्हॅली टॉवर को.ऑप.हौसिंग सोसायटी येथील इमारतींना ऑक्युपेशन सर्टिफिकेट दिलेले आहे किंवा नाही याची माहिती पाहिजे होती. व दिली असल्यास त्याची प्रमाणीत प्रत पाहिजे होती. तसेच धिरज व्हॅली टॉवरच्या पूर्वेस असलेल्या जमिनीत जो आर.जी.प्लॉट दाखविण्यात आलेला आहे त्यासंबंधीही कांही माहिती मागितली आहे.

अपीलार्थींचे म्हणणे त्यांनी कार्यालयास भेट देऊनहि त्यांना समाधानकारक माहिती मिळालेली नाही.

अपीलार्थीच्या माहितीची गरज विवक्षित (स्पेसिफीक आहे) ऑक्युपेशन सर्टिफिकेट दिले असेल तर त्याची प्रत त्यांना पाहिजे. नसेल दिली तर त्याची नस्तीमध्ये जर कारणे असतील तर त्याची कारणे पाहिजे आहेत. तसेच आर.जी. प्लॉटसंबंधी माहिती पाहिजे आहे.

संबंधित माहिती ही इमारत प्रस्ताव विभागाच्या जन माहिती अधिका-यांकडे नाही व त्यांना ती माहिती दुस-या विभागाकडे आहे असे वाटत असेल तर अपीलार्थीस दुस-या विभागास अर्ज करण्यास सांगणे हे गैर आहे. तो अर्ज त्या विभागात माहिती देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिका-यांकडे मुळ जन माहिती अधिका-यांनीच पाठवायचा असतो. अजूनपर्यंत तसा पाठविला नसल्यास त्वरित पाठविण्यात यावा व दोन्ही जन माहिती अधिका-यांनी १० दिवसांच्या आत अपीलार्थीस विवक्षितपणे माहिती द्यावी.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २५फेब्रूवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १६११/०२

श्री. ॲड्.सुधाकर आर. जाधव -----अपीलार्थी
श्री. नरेंद्र मधुकर लचके
एन-४१,जेए-३-१२-१, सावतानगर,
४ थी स्कीम, नवीन सिडको, नाशिक, ता.जि. नाशिक ८

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता ----उत्तरवादी
कोकण पाटबंधारे मेडळ, कुवारबांव, रत्नागिरी,
जि. रत्नागिरी.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
तिलारी शिर्षकामे विभाग क्र. १,
कोनाळकट्टा यांचे कार्यालय, ता. दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक १८/०३/२००९
सुनावणीचा दिनांक २२/१२/२००९
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींनी दि. २३/८/२००८ च्या अर्जान्वये सन २००७-०८ या कालावधीत शासनाकडून मिळालेल्या सर्व निधीतून हाती घेण्यात आलेल्या कामांच्या तपशीलाची मागणी केली. याचबरोबर त्यांनी कार्यकारी अभियंतांचा पत्ता, पॅनकार्ड नंबर, दुरध्वनी क्रमांक इत्यादी वैयक्तिक तपशील मागितला.

उपरोक्त माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दि. १०/१०/२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यांना माहिती मिळाली नाही. यास्तव त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीयस अपीलावरील सुनावणीच्या वेळी अपीलार्थी व उत्तरवादी यांचे म्हणणे आयोगाने ऐकून घेतले व चर्चा करुन असे ठरविले की, अपीलार्थींनी त्यांची सोयीची तारीख जन माहिती अधिकारी यांना कळवावी. जन माहिती अधिकारी यांनी त्या तारखेस अपीलार्थीस सर्व रेकॉर्ड बघण्यासाठी उपलब्ध करुन द्यावा. आवश्यकतेनुसार अपीलार्थींना कागदपत्रांच्या छायांप्रती विनाशुल्क उपलब्ध करुन द्याव्यात.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २५फेब्रूवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १५१२/०२**

**श्रीमती. प्रमिला गोविंदराव मोरे -----अपीलार्थी**
**रेश- पर्व , आनंदनगर नववसाहत,**
**सोयगाव, ता. मालेगांव, जि. नाशिक.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त ----उत्तरवादी**
**नाशिक विभाग, द्वारका सर्कल, नाशिक.**

**२. जन माहिती अधिकारी तथा सेक्रेटरी,**
**नाशिक जिल्हा अ.देवी शिक्षण प्रसारक मंडळ,**
**जळगांव(नि) ता. मालेगांव, जि. नाशिक.**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक ३०/१२/२००८**
**सुनावणीचा दिनांक २१/१२/२००९**
**अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.**

अपीलार्थींनी दि. ३१/७/२००८ च्या अर्जान्वये सन २००५ ते ३१/७/२००८ या कालावधीची ना.जि.अ.देवी शिक्षण प्रसारक मंडळ, जळगांव (नि) संस्थेशी संबंधित एकूण १२ मुद्दयांवर माहिती मागितली.

या अनुषंगाने दि. ४/८/२००८ रोजी त्यांना असे कळविण्यात आले की, माहितीसाठीचे शुल्क रु.६०/- + टपाल खर्च याचा त्यांनी संस्थेकडे भरणा करावा व माहिती घेऊन जावी. या उत्तरानंतर त्यांनी दि. ८/९/२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील दि. २९/१२/२००८ च्या आदेशान्वये फेटाळण्यात आले. यावर व्यथित होऊन त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी उत्तरवादींनी आपले म्हणणे आयोगास सादर केले. त्यानुसार असे दिसते की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याची तयारी दर्शविली होती. परंतु अपीलार्थीकडून प्रतिसाद मिळाला नाही. याबाबत आयोगाचे निर्देश आहेत की उपलब्ध माहिती घेऊन जाण्याबद्दल जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थींना पुन्हा एकदा संधी द्यावी व अपीलार्थींनी शुल्क भरुन माहिती घ्यावी.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २५फेब्रूवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १३९६/०२**

**श्री. संतोष मुकुंद जहागिरदार -----अपीलार्थी**
**जनरल मॅनेजर, रत्नदिप सह.नागरी पतसंस्था मर्या.**
**शहादा, जि. नंदूरबार.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी ----उत्तरवादी**
**सरदार सरोवर प्रकल्प यांचे कार्यालय,**
**तळोदा, जि. नंदूरबार.**

**२. जन माहिती अधिकारी तथा पुनर्वसन अधिकारी**
**सरदार सरोवर प्रकल्प तळोदा, तिज. नंदूरबार.**

***---विवेचन---***

श्री. संतोष मुकुंद जहागिरदार यांनी सौ. उज्वला राजेंद्र तोरडे यांची शेतजमिन सरदार सरोवर विस्थापितांच्या पुनर्वसनासाठी शासनाने खरेदी केली असून त्या जमिनीच्या खरेदीशी संबंधित माहिती मागितलेली आहे.

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने पुनर्वसन अधिकारी, सरदार सरोवर प्रकल्प, नंदूरबार यांनी माहिती अर्जातील मुद्दा क्र. १ व ४ ची माहिती अपीलार्थीस दिलेली आहे. उर्वरित माहिती उपजिल्हाधिकारी सरदार सरोवर प्रकल्प यांचे कार्यालयाशी संबंधित असल्याने त्यांचेकडून घ्यावी असे दि. २१/७/२००९ च्या पत्रान्वये कळविलेले दिसते.

जन माहिती अधिकारी तथा पुनर्वसन अधिकारी सरदार सरोवर प्रकल्प यांचे माहितीने समाधान झाले नाही म्हणून अपीलार्थीनी दि. २१/७/०९ रोजी प्रथम अपिलीय प्राधिकारी सरदार सरोवर प्रकल्प यांचेकडे अपील दाखल केले. सदर अपीलाच्या अनुषंगाने नायब तहसिलदार, सरदार सरोवर प्रकल्प यांनी दि. २५/८/०९ रोजी माहिती दिल्याचे दिसते. त्यामध्ये माहिती

अर्जातील मुद्दा क्र. ५ ते ७ मधील माहिती जिल्हा पुनर्वसन अधिकारी नंदूरबार यांचेकडून घ्यावी असे कळविले.

अपीलार्थींनी दि. ५/९/२००९ रोजी राज्य माहिती आयोग, औरंगाबाद खंडपीठ यांचेकडे द्वितीय अपील दाखल केले असून त्याची सुनावणी दि. ८/१२/०९ रोजी धुळे येथे आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस अपीलार्थी , प्रथम अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी हे गैरहजर होते.

जन माहिती अधिकारी तथा पुनर्वसन अधिकारी यांनी त्यांच्या दि. २१/७/०९ च्या पत्रात उल्लेख केल्याप्रमाणे अनु.क्र. १ ते ४ वगळून इतर माहिती उपजिल्हाधिकारी सरदार सरोवर प्रकल्प यांचेकडून घ्यावी असे अपीलार्थीस कळविणे उचित वाटत नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेशी संबंधित नसलेल्या माहितीबाबत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील नियम ६(१) दोन नुसार ५ दिवसांच्या आत हस्तांतरित करणे आवश्यक होते. तसे देखिल केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.

(१) जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयाशी संबंधित माहिती नसेल तर ६(१) दोन नुसार कार्यवाही विनाविलंब करावी. यापुढे माहिती अर्जास उत्तर देतांना योग्यती काळजी घ्यावी अशी समज देण्यात येत आहे.

अपीलार्थीस पतसंस्थेच्या वाटयाची रक्कम कापून घेण्यासंबंधी व कापलेली रक्कम ही वेळेत वर्ग न केल्याबद्दल खुलासा पाहिजे आहे. दिलेली माहिती समाधानकारक नाही असे अपीलार्थीस वाटते. माहितीच्या अधिकारामध्ये रेकॉर्डला जशी माहिती आहे तशी मिळू शकते.

(२) अपीलार्थींचे जे मुद्दे आहेत त्यासंबंधी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसेल तर अपीलार्थींनी रेकॉर्डला असलेली माहिती स्वत: डोळयाखालून घालणे हा उत्तम पर्याय होऊ

**शकतो. तेव्हा अपीलार्थींनी हवी तर स्वतः रेकॉर्डची तपासणी घेऊन (जो अधिकारहि त्यांना आहे) रेकॉर्डमध्ये असलेल्या अतिरिक्त आवश्यक ती कागदपत्रांची मागणी केल्यास जी त्यांना विनामूल्य देण्यात यावी.**

**(३) सुनावणीस अनुपस्थित राहिल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांनी त्यांना शास्ती कां लावू नये याचा खुलासा आयोगाच्या मुंबई कार्यालयास पाठवावा.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**

**दिनांक २५फेब्रूवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १५३९/०२

श्री. प्रशांत वसंतराव देशमुख -----अपीलार्थी
१, गायत्री रो हाऊसेस, महाजन नगर,
इंद्रप्रस्थ कॉलनी, अतुल डेअरी समोर,
अंबड, नाशि, ता.जि. नाशिक.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी ----उत्तरवादी
नाशिक एज्युकेशन सोसायटी, द्वारा पेठे विद्यालय,
रविवार कारंजा नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका
कमलावती कोठारी मुलींची प्राथमिक शाळा,
जेल रोड, नाशिक रोड, नाशिक, जि.नाशिक.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक ७/५/२००९
सुनावणीचा दिनांक २१/१२/२००९
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. प्रशांत वसंतराव देशमुख यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ७/५/२००९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल जिल्हाधिकारी कार्यालय परिसर नाशिक, जि. नाशिक येथे दि. २१/१२/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीस अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २८/१/२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली.

१. १९९६ ते २००८ या कालावधीतील शिक्षक व शिक्षकेतर म्हणून काम केलेल्याचे पगारपत्रक व हजेरीपत्रक प्रत्यक्ष बघण्यासाठी उपलब्ध करुन देणे व पगार पत्रकाच्या प्रती शासनाच्या कुठल्या कार्यालयात सादर केल्या त्याचा तपशील.

२.   जून १९९६ ते मे २००३  या कालावधीतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे पगारपत्रक व हजेरीपत्रक प्रत्यक्ष बघण्यासाठी मिळावे व या पगारपत्रकाच्या प्रती शासनाच्या किंवा शिक्षण विभागाच्या कुठल्या कार्यालयास सादर केल्या त्याचा तपशील.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २१/२/२००९ च्या पत्राद्वारे अपीलार्थीस प्रत्यक्ष बोलावून फक्त जून २००३ ते जानेवारी २००९  पर्यंतची कागदपत्रे दाखवून माहिती दिली.  परंतु माहिती १९९६ पासून मागितलेली होती ती न मिळाल्याने अपीलार्थींनी दि. ४/३/२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय अधिक्ारी यांनी प्रथम अपीलाकडे दुर्लक्ष केल्यामुळे अपीलार्थींनी दि. ७/५/२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले.  द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते.  जन माहिती अधिकारी यांनी त्यांची नेमणूक जून २००३ मध्ये झाली असल्याने सन २००३ ते २००८ पर्यंत माहिती अपीलार्थीस दिलेली आहे.  सदर संस्था सन १९९६ ते सन २००३ या कालावधीत विनाअनुदानित असल्यामुळे सदर कालावधीतील माहिती उपलब्ध नाही त्यामुळे ती देता येत नाही असे नमूद केले आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील व्याख्या कलम २ मधील (१)व (२) यामधील तरतुदीनुसार ज्या संस्थेस प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष मोठया प्रमाणात वित्तपुरवठा होतो अशा अनुदानित संस्थेचा समावेश होतो.  ही शिक्षण संस्था सन १९९६ ते सन २००३  या कालावधीत विनाअनुदानित असल्याचे नमूद करुन माहिती उपलब्ध नाही म्हणून देता येत नाही  हे संस्थेचे म्हणणे ग्राहय धरण्यात येत आहे.  त्यामुळे अपीलार्थीस संस्था अनुदानित झाल्यापासूनची संस्थेकडे उपलब्ध असलेली माहिती अपीलार्थीस देणे बंधनकारक आहे  ती अपीलार्थीस देण्यात आलेली आहे.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक  २५फेब्रूवारी, २०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १५९१/०२**

**श्री. रविंद्र मुरलीधर देसले -----अपीलार्थी**
**योगेश्वर हौसिंग सोसायटी, टी.व्ही.सेंटर जवळ,**
**मालेगांव कॅम्प, ता. मालेगांव, जि.नाशिक.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य) ----उत्तरवादी**
**जिल्हा परिषद नाशिक, जि. नाशिक.**

**२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका**
**गुरुदेव चैतन्यस्वरुप जंगली महाराज हायस्कूल,**
**कोळाणे (प्रा) ता.मालेगांव, जि.नाशिक.**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक ३/८/२००९**
**सुनावणीचा दिनांक २२/१२/२००९**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित, अपिलीय अधिकारी उपस्थित.**

अपीलार्थीनी दि. ३०/३/२००९ च्या अर्जान्वये सन २००० ते २००९ या कालावधीची खालील माहिती मागितली होती.

१. शाळेला शिक्षण समितीची मान्यता आहे काय १

२. असल्यास कोणत्या वर्षापासून

३. समितीच्या पदाधिका-यांची नांवे

४. सभांच्या इतिवृत्ताच्या प्रती.

उपरोक्त माहिती न मिळाल्याने त्यांनी दि. २२/४/२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यांना माहिती मिळू शकली नाही. यास्तव त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील

दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, शाळेच्या मुख्याध्यापकांनी मुळ माहिती अर्ज स्वीकारलेला नाही. अर्ज न स्वीकारणे ही जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापकांची कृती निश्चितच गैर आहे. तेव्हा आयोगाचे असे निर्देश आहेत की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी याबाबत चौकशी करावी. तसेच अपीलार्थींचा अर्ज मुख्याध्यापकांनी स्वीकारुन त्यावर अपीलार्थींना ७ दिवसाचे आत माहिती मिळेल अशी व्यवस्था करावी. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी केलेल्या चौकशीचा अहवाल दि. ३१ मार्च २०१० पर्यंत आयोगास सादर करावा.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य) जिल्हा परिषद नाशिक यानी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),<br>राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक २५फेब्रूवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १६०५/०२

श्री. पंढरीनाथ बाबूराव बोडके -----अपीलार्थी
मु. मोहे, पो. चिंचोली, ता. सिन्नर जि. नाशिक.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी ----उत्तरवादी
प्रादेशिक परिवहन यांचे कार्यालय,
दिंडोरी रोड, नाशिक, जि. नाशिक ४२२ ००३.

२. जन माहिती अधिकारी
प्रादेशिक परिवहन यांचे कार्यालय,
दिंडोरी रोड, नाशिक, जि. नाशिक ४२२ ००३.

***---विवेचन---***

अपीलांचा दिनांक १२/८/२००९
सुनावणीचा दिनांक २२/१२/२००९
अपीलार्थी अनुपस्थित जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींनी दि. ६/४/२००९ च्या अर्जान्वये मोटार सायकल क्र.एमएच-१५, एपी ५६६३ च्या संदर्भात Certificate of Registration Maharashtra State India (From 23) शी संबंधित कागदपत्रांच्या प्रतींची मागणी केली. या अर्जाला दि. २/५/२००९ रोजी उत्तर देण्यात आले. फॉर्म २३ ची प्रत मूळ मालकाकडेच असल्याने त्याच्या छायांकित प्रती देता येणार नाही असे उत्तरात नमूद केले होते. यावर समाधान न झाल्याने त्यांनी दि. २८/५/२००९ रोजी प्रथम अपील केले. यावर निर्णय झाला नाही यास्तव त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, आर.सी. बुक व्यतिरिक्त उपलब्ध असलेली सर्व माहिती

अपीलार्थीस दिलेली आहे. अपीलार्थी गैरहजर असल्याने त्यांना नेमके काय हवे आहे हे आयोगास जाणून घेता आले नाही.

आर.सी. बुक ही तृतिय पक्षाची माहिती असल्याने अधिनियमाच्या कलम ११ मधील कार्यपध्दती अमलात आणून जन माहिती अधिकारी यांनी निर्णय घ्यावा.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २५फेब्रूवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १५२८/०२**

**श्री. सुभाष बाबूराव कापसे -----अपीलार्थी**
**मु.पो. विंचूर, ता. निफाड,**
**जिल्हा नाशिक ४२२ ३०५.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी ----उत्तरवादी**
**अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,**
**नाशिक, जि. नाशिक.**

**२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी**
**अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,**
**नाशिक, जि. नाशिक.**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक १८/९/२००८**
**सुनावणीचा दिनांक २१/१२/२००९**
**अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थींनी दि. ९/६/२००८ च्या अर्जान्वये एन.डी.सी.सी. बँकेने मागासवर्गीयांच्या अनुशेषाबाबत सरळ सेवा भरती अंतर्गत भरती केलेल्या ५० कारकुनांच्या जातपडताळणी बाबतच्या अनुषंगाने माहितीची मागणी केली.**

**या अर्जाला दि. १५ जुलै २००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिले. परंतु या उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि. १/८/२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलावर निर्णय न झाल्याने त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.**

**द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी अपीलार्थींनी सांगितले की, त्यांना अपूर्ण माहिती मिळाली आहे. यावर उत्तरवादींनी असे सादर केले की, अपीलार्थींना समक्ष हजर राहून माहिती**

पाहून घेण्यास सांगण्यात आले होते.  परंतु ते हजर झाले नाहीत.  याबाबत आता आयोगाचे असे निर्देश आहेत की, अपीलार्थींनी पूर्व सूचना देऊन कार्यालयात जावे.  त्यांना जन माहिती अधिकारी यांनी सर्व रेकॉर्ड उपलब्ध करुन द्यावा.  अपीलार्थींनी उपलब्ध रेकॉर्ड बघून आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती मागाव्या व त्या विनाशुल्क जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन द्याव्या.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २५फेब्रूवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १५०१/०२**

**श्री. ॲड् सुधाकर आर. जाधव** **-----अपीलार्थी**
**श्री. नरेंद्र मधुकर लचके**
**एन ४१, जे.ए. ३- १२-१**
**सावतानगर, सिडको-४, नवीन सिडको,**
**नाशिक ४२२ ७०८.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता** **----उत्तरवादी**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर.**

**२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पारनेर,**
**ता. पारनेर, जि. अहमदनगर.**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक २३/३/२००९**
**सुनावणीचा दिनांक २१/१२/२००९**
**अपीलार्थी उपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपीलार्थींनी दि. २३/८/२००८ च्या अर्जान्वये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पारनेर उपविभागाशी संबंधित विविध मुद्दयांवर माहिती मागितली.

माहिती अर्जाला उत्तर न मिळाल्याने त्यांनी दि. १०/१०/२००८ रोजी प्रथम अपील केले. प्रथम अपीलावर सुनावणी होऊन दि. १४/११/२००८ रोजी आदेश पारित करण्यात आले. यानुसार अपीलार्थींनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी विनाशुल्क लवकरात लवकर द्यावयाची होती. तथापि अपीलार्थींना माहिती मिळाली नाही. या कारणास्तव त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी अपीलार्थींनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश असतांना सुध्दा त्यांना माहिती मिळालेली नाही. उत्तरवादी अनुपस्थित असल्याने त्यांची बाजू आयोगाला जाणून घेता आली नाही. अपीलावरील सुनावणीसाठी उत्तरवादींनी गैरहजर राहणे ही गंभीर बाब आहे. तरी आयोगाचे त्यांना निदेश आहेत की, त्यांनी त्यांच्या गैरहजेरीबाबतचा खुलासा आयोगास १५ दिवसांच्या आत सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नसल्याने ते अधिनियमाच्या कलम २० अन्वये शास्तीस पात्र ठरतात. तेव्हा त्यांच्यावर शास्ती का लादण्यात येऊ नये याचा खुलासा प्रथम अपिलीय अधिकारी यांच्यामार्फत आयोगास सादर करावा. याबाबत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे स्पष्ट अभिप्राय जन माहिती अधिकारी यांच्या खुलाश्यावर नोंदवावे. आयोगाचे असेहि निदेश आहेत की, खुलाश्याच्या पत्रात डाव्या बाजूस चौकानात "खु" असे लिहावे.

अपीलार्थींना त्यांच्या मागणीनुसार सदर आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत विनाशुल्क माहिती पुरवावी.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

सदर आदेश्ांची प्रत उपरोक्त निर्देशांच्या अनुषंगाने उचित कार्यवाहीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी यांना देण्यात यावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक २५फेब्रूवारी, २०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १५००/०२**

**श्री. ॲड् सुधाकर आर. जाधव -----अपीलार्थी**
**श्री. नरेंद्र मधुकर लचके**
**एन ४१, जे.ए. ३- १२-१**
**सावतानगर, सिडको-४, नवीन सिडको,**
**नाशिक ४२२ ७०८.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता ----उत्तरवादी**
**कृष्णा खोरे विकास महामंडळ, कोरेगांव रोड,**
**कृष्णा नगर, सातारा, जि. सातारा.**

**२. जन माहिती अधिकारी**
**कृष्णा खोरे महामंडळ सातारा यांचे कार्यालय,**
**सातारा.**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक ११/४/२००९**
**सुनावणीचा दिनांक २१/१२/२००९**
**अपीलार्थी उपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपीलार्थींनी दि. २४/११/२००८ च्या अर्जान्वये सन २००७-०८ या वर्षात शासनाकडून महामंडळाला प्राप्त झालेल्या निधीतून हाती घेण्यात आलेल्या कामांबाबत विविध मुद्दयांची माहिती मागितली.

तथापि त्यांना उत्तर प्राप्त न झाल्याने त्यांनी दि. ९/१/२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यांना माहिती प्राप्त होऊ शकली नाही. यास्तव त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी अपीलार्थींनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, सुनावणीच्या दिनांकापर्यंत त्यांना माहिती उपलब्ध झालेली नाही. सुनावणीसाठी उत्तरवादी

हजर नव्हते. उत्तरवादींनी सुनावणीसाठी गैरहजर असणे ही बाब उचित नाही. तेव्हा याबाबत आयोगाचे असे निदेश आहेत की, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी , कृष्णा खोरे विकास मंडळ, कोरेगांव रोड, कृष्णानगर ,सातारा यांनी त्यांच्या अनुपस्थितीबाबतचा खुलासा आयोगाकडे सादर करावा. जन माहिती अधिकारी यांना असे निदेश देण्यात येतात की, त्यांनी अपीलार्थीनी मागितलेली माहिती त्वरित पुरवावी. तसेच माहिती पुरविण्याबाबत झालेल्या विलंबाबाबत त्यांच्यावर अधिनियमाच्या कलम २० अन्वये शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या मार्फत आयोगास सादर करावा. आयोगाचे असेहि निदेश आहेत की, खुलाश्याच्या पत्रात डाव्या बाजूस चौकानात "खु" असे लिहावे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या खुलाश्यावर स्वयंस्पष्ट अभिप्राय द्यावेत.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २५फेब्रूवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १४२२/०२

श्री.भरत जिऱ्या पाडवी -----अपीलार्थी
अध्यक्ष, अक्कलकुवा तालुका पेन्शन संघटना,
मु.पो. खापर, ता. अक्कलकुवा, जि. नंदुरबार.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी ----उत्तरवादी
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद धुळे, जि.धुळे.

२. जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद धुळे, जि. धुळे.
मालेगांव, जि. नाशिक.

***---विवेचन---***

अपीलांचा दिनांक ८/५/२००९
सुनावणीचा दिनांक ८/१२/२००९

अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थी श्री. भरत जिऱ्या पाडवी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३)अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि८/५/२००९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह धुळे, जि.धुळे येथे दि. ८/१२/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित , जन माहिती अधिकारी उपस्थित, अपीलार्थी अनुपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ३/११/२००८ रोजी डॉ. ई.एफ.पाटील

(सेवानिवृत्त) वैद्यकीय अधिकारी पंचायत समिती अक्कलकुवा यांना देण्यात आलेल्या कालबध्द पदोन्नतीच्या आदेशाची प्रत व माहिती मिळण्याबाबत अर्ज केला होता.

(१) जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ५/१२/२००८ रोजीच्या पत्रान्वये श्री. पाटील सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकारी यांचे कालबध्द पदोन्नतीचे वेळीच निर्णय घेतलेला आहे. त्याची प्रत सोबत दिलेली असून वेळीच निर्णय झालेला असल्याने प्रकरण प्रलंबित नाही.

(२) पेन्शन अदालत मध्ये केलेली तक्रार निवारण करण्यांत आलेले आहे असे अपीलार्थीस छायांकित प्रती देऊन कळविलेले आहे.

परंतु माहिती बेजबाबदारपणे खोटी दिल्यामुळे त्यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. २६/२/२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय अधिक्ारी यांनी प्रथम अपीलावर दि. २४/३/२००९ रोजी सुनावणी ठेवली होती व अपीलार्थीस तसे पत्र पाठविले होते. परंतु अपीलार्थीनी पत्र घेण्यास नकार दिला त्यामुळे एकतर्फी निर्णय घेऊन दि. १३/४/२००९ रोजी योग्यते आदेश पारित करण्यात आलेले आहेत व ते आदेश अपीलार्थीस मिळालेले आहेत.

अपीलार्थीचे या आदेशाने समाधान झाले नसल्याने त्यांनी द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय अधिकारी व अपीलार्थी अनुपस्थित होते. फक्त जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

सुनावणीच्या वेळी निदर्शना आलेल्या बाबी --

१. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस वेळेत दि. ५/१२/२००८ रोजी माहिती व हव्या असलेल्या माहितीच्या प्रती दिलेल्या आहेत.

प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी गैरहजर होते. तरीही अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारित करुन अपीलार्थीस यापूर्वी पारित केलेले आदेश बरोबर आहेत. डॉ. पाटील यांना कालबध्द पदोन्नती दि. २२/९/१९९७ पासून केलेली आहे. हे आदेश योग्य असल्याचेहि या प्रथम अपिलीय आदेशात नमूद केले आहे.

२. अपीलार्थी यांनी डॉ. पाटील यांच्या कालबध्द पदोन्नतीच्या बाबतीत दिनांक व वेतनश्रेणी याबद्दल जी माहिती मागितलेली होती ते त्यांनी दोन्ही सुनावणीच्या वेळे गैरहजर राहिल्याने ती संधी

गमावलेली आहे. त्यांनी दोन्ही सुनावणीस हजर राहून त्यांनी त्यांचे म्हणणे पटवून देणे आवश्यक होते. परंतु त्यांच्या गैरहजेरीमुळे त्यांना नक्की काय हवे होते हे आयोगास कळू शकले नाही. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थीस यापूर्वी दिलेली माहिती योग्य असल्याचे दिसून येते.

*---आदेश---*

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक २५फेब्रूवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १४९८/०२

श्री.एल.वाय. कुलकर्णी -----अपीलार्थी
जिल्हा सदस्य महाराष्ट्र लोक ग्राहक पंचायत
द्वारा- श्री.कुलकर्णी बंगला नं.२०, इंदिरा नगर,
नाशिक, ता.जि. नाशिक.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी ----उत्तरवादी
जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद,
जि. औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी
महसूल उप विभाग औरंगाबाद,
ता. जि. औरंगाबाद.

***---विवेचन---***

अपीलांचा दिनांक २९/३/२००८
सुनावणीचा दिनांक २१/१२/२००९
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थी श्री. एल.वाय.कुलकर्णी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २९/३/२००८ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, जळगांव येथे दि. २१/१२/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते, अपीलार्थी अनुपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १५/११/२००७ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.

१. श्री प्रभाकर काशिनाथ पवार किरकोळ केरोसीन परवाना क्र. ३२८/१९८४ (२) श्री.गणेश

प्रभाकर पवार, स्वस्त धान्य दुकान परवाना  दोघे एकत्र कुटुंबातील व्यक्तींनी केलेला भ्रष्टाचार व शासकीय योजनांचा घेतलेला गैरफायदा तसेच ग्राहकांना रॉकेल व धान्य नियमाप्रमाणे न दिल्याने त्यांची दोन्ही दुकाने त्वरित सखोल चौकशी करुन कायमची बंद करण्याबाबतची माहिती (कालावधी दि. १/१/०७ ते दि. ३१/१०/२००७ पर्यंत) मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी  अपीलार्थींचा अर्ज  दि. २३/११/२००७ रोजी जिल्हा पुरवठा अधिकारी औरंगाबाद येथे वर्ग केला.   त्यांनी अपीलार्थीस कोणतीही माहिती पुरविली नाही.

अपीलार्थींनी माहिती न मिळाल्याने दि. १५/१/२००८ अन्वये प्रथम अपील दाखल केले. त्यावेळी अपिलीय अधिकारी यांनी दि. १८/२/२००८ रोजी सुनावणी घेतली त्यावेळी निदर्शनास आले की,  जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती पुरविलेली नाही.   त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात असलेली माहिती द्यावी  व जी माहिती त्यांचेकडे नसेल त्या बाबतीत ज्यांच्याकडे ही माहिती असू शकते त्यांचेकडे तो अर्ज वर्ग करावा.   त्यानुसार दि. ४/३/२००८ रोजीच्या पत्राने जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांनी अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय अधिकारी यांना माहिती त्यांचे कार्यालयाशी संबंधित नाही.   सर्व माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी व तहसिलदार, औरंगाबाद यांचेशी संबंधित आहे असे कळविले. तसेच दि. ४/३/२००८ रोजीच जिल्हा पुरवठा अधिकारी व तहसिलदार, औरंगाबाद यांना पत्र लिहून अपीलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे पत्रहि पाठविले.   व पुन्हा दि. २९/३/२००८ याच दोन्ही अधिका-यांना पुन्हा पत्र लिहून माहिती विनामूल्य देण्याच्या विनंतीचा पुनरुच्चार केला.   तरीहि माहिती न मिळाल्याने  अपीलार्थींनी व्यथित होऊन दि. २९/३/२००८ रोजी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.   द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी  निदर्शनास आलेल्या बाबी ---

१.   श्री. शिादे जन माहिती अधिकारी  व  (२)  श्री.राठोड, जिल्हा पुरवठा अधिकारी यांना अपीलार्थींनी माहिती देण्यासाठी अनेक अर्ज सादर केलेले दिसून येतात.

२.   जन माहिती अधिकारी यांनी  त्यांच्या कार्यालयीन अभिलेखात माहिती उपलब्ध नसल्याने ती माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे उपलब्ध होऊ शकते म्हणून अपीलार्थींचा अर्ज विहित मुदतीत जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे वर्ग केला.

३.	अपीलार्थीस हव्या असलेल्या अनेक मुद्दयांपैकी एकाही मुद्दयांची माहिती वर्षाहून अधिक कालावधी उलटला तरी जिल्हा पुरवठा अधिकारी / तहसिलदार यांनी त्यांच्याकडे माहिती असतांना दिली नाही. उलट उपविभागीय अधिकारी औरंगाबाद यांनाच माहिती देण्यास सांगितल्याचे दि. ६/१२/२००७ रोजीच्या पत्रावरुन दिसून येते. सदरहू माहिती ही पुरवठा विभागाशी संबंधित आहे. शासकीय जन माहिती अधिकारी हे महसूल विभागाशी संबंधित असल्याने त्यांनी अर्ज पुरवठा विभागाकडे वर्ग केला त्यावर जिल्हा पुरवठा अधिकारी हे पुरवठा विभागाचे जन माहिती अधिकारी असल्याने तरी उपलब्ध असलेली माहिती अपीलार्थीस वेळेत देणे क्रमप्राप्त होते. परंतु त्यांनी वर्ष ओलांडून गेले तरी अपीलार्थीस साधी पोच दिलेली नाही अथवा त्यांना बोलावून त्यांच्याशी संवादहि साधलेला नाही. त्यामुळे अपीलार्थीस नाहक मानसिक व शारिरीक त्रास झालेला दिसून येतो. अपीलार्थीस माहिती उपलब्ध असूनहि ती देण्याचे टाळणे व अपीलार्थीस माहिती न देण्याचा त्यांचा कल दिसून येतो. या कारणास्तव जिल्हा पुरवठा अधिकारी औरंगाबाद तसेच तहसिलदार औरंगाबाद यांना त्यांचेवर आता अशी कारणे दाखवा नोटीस देण्यात येत आहे की, मुदतीत माहिती न दिल्याबद्दल त्यांचेकडून अधिनियमाच्या कलम २० अन्वये शास्तीची कारवाई का करु नये याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाच्या कार्यालयात दि. ५ एप्रिल, २०१० रोजी दुपारी ४-०० वाजता स्वत: उपस्थित राहून करावा.

अपीलार्थीस हवी असलेली माहिती १५ दिवसांत विनामूल्य देण्यांत यावी. माहिती देण्याची पूर्ण जबाबदारी जिल्हा पुरवठा अधिकारी यांचेवर टाकण्यात येत आहे.

तहसिल कार्यालयातून त्यांनी माहिती मागवून घ्यावी व दोन्ही कार्यालयाची माहिती अपीलार्थीस द्यावी.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.

या आदेशाची प्रत जिल्हा पुरवठा अधिकारी औरंगाबाद व तहसिलदार औरंगाबाद यांना पाठविण्यात यावी. त्यांनी आयोगाच्या वर दिलेल्या आदेशाचे बिनचूक पालन करावे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक २५फेब्रूवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १५३२/०२

श्री.नरेंद्र माधवराव खंडेलवाल ----अपीलार्थी
खंडेलवाल बंगला, लोया रोड,
मु.पो. इगतपुरी, जिल्हा नाशिक.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी ----उत्तरवादी
जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक,
जि. नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा अपर चिटणीस
जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक, जि. नाशिक.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक ११/६/२००९
सुनावणीचा दिनांक २१/१२/२००९
अपीलार्थी अनुपस्थित जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. नरेंद्र माधवलाल खंडेळवाल यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ११/६/२००९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक, जि. नाशिक येथे दि. २१/१२/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते, अपीलार्थी अनुपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २४/१२/०७ रोजी अर्ज करुन इगतपुरी येथील तलाठी तळेगांव यांनी नोंदणीकृत केलेले खरेदीखत क्र. २४६८ ची नोंद रद्द करण्याबाबत इत्यादी बाबीची मागणी केली होती.

तहसिलदार इगतपुरी यांनी त्यांच्या दि. १९/३/०८ नुसार मौजे तळेगांव, ता. इगतपुरी येथील

गट क्र. ३८८/३/२ च्या पैकी ०-७५-५ आर चे नोंदणीबाबत तलाठी तळेगांव यांचे मार्फत चौकशी करण्यांत येऊन नोंदणीकृत खरेदीखताचे आधारे फेरफार नोंद २४६८ मंजूर करण्यात आलेली आहे हे अपीलार्थीना स्पष्ट करण्यात आले.

अपीलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीविरुध्द अपीलार्थी यांनी अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, नाशिक उपविभाग, नाशिक यांचेकडे दाखल केलेल्या अपीलावर त्यांनी अपील फेटाळले व नोंदीविरुध्द सक्षम प्राधिका-याकडे दाद मागावी असे कळविले. त्यानंतर त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडे माहितीचा अर्ज दिला व विभागीय आयुक्तांकडे अपील केले. कोणत्याही कागदपत्रांची मागणी नाही हे कारण दाखवून हे अपील फेटाळण्यात आले. त्याविरुध्द आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले.

सुनावणीच्या वेळेस निदर्शनास आलेल्या ठळक बाबी --

१. अपीलार्थीस हव्या असलेल्या माहितीची उपलब्ध संचिता अवलोकनार्थ दाखविण्यात आली त्यातील आवश्यक ते कागदपत्र त्यांनी प्राप्त केलेले आहेत.

२. अपीलार्थींनी लोकायुक्त व विभागीय आयुक्त यांचेकडे मागणीही नोंद क्र. २४६८ व खरेदीखत रद्द करण्याबाबत होती त्याप्रमाणे लोकायुक्त व विभागीय आयुक्त यांना अहवाल सादर केलेला आहे.

अपीलार्थी यांची मागणी मालकी हक्क या स्वरुपात आहे. महसूल अधिकारी हा फक्त हक्काची नोंद करणारा अधिकारी आहे. खरेदीखत रद्द करण्याचे अधिकार कोणत्याही प्रशासकीय अधिका-यास देण्यांत आलेले नाहीत, किंबहूना ते त्यांना नाहीत.

अपीलार्थींची मागणी दिवाणी स्वरुपाची असल्याने त्यांनी योग्यत्या प्राधिका-याकडे दाद मागावी.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २५फेब्रूवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १६०३/०२

श्री.एस.एस. गिते ----अपीलार्थी
सहकार अधिकारी (प्र.श्रे)
द्वारा- उपनिबंधक सहकारी संस्था, नाशिक तालुका,
सारडा सर्कल, नाशिक.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक ----उत्तरवादी
सहकारी संस्था, नाशिक विभाग, गडकरी चौक, नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय उपनिबंधक
सहकारी संस्था नाशिक विभाग, गडकरी चौक, नाशिक.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक ४/२/२००९
सुनावणीचा दिनांक २२/१२/२००९
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. एस.एस. गिते, सहकार अधिकारी (प्र.श्रे)- निलंबित यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ४/२/२००९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक, जि. नाशिक येथे दि. २२/१२/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी व अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ६/१०/२००८ रोजी अर्ज करुन विभागीय सह निबंधक कार्यालयांतील दि. ७/१०/२००६ रोजीचे सफाई कामगार सभा संदर्भातील दुरध्वनी संदेश, सभेचे इतिवृत्त, दूरध्वनी रजिस्टर नोंद, संबंधित कर्मचारी श्री. नंदू मोरे यांचा जबाब वगैरे माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी दि. ४/११/२००८ च्या पत्राद्वारे अपीलार्थींनी मागणी केलेली माहिती कार्यालयाच्या अभिलेखात उपलब्ध नसल्याने ती देता येत नाही असे लेखी कळविले आहे.

माहिती न मिळाल्याने अपीलार्थींनी दि. २/१२/२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले.

सुनावणीच्या वेळी अपीलार्थींनी दि. ६/१०/२००८ रोजीच्या अर्जात तक्रार केलेली माहिती मिळावी अशी विनंती केली. तर जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयाच्या अभिलेखांत माहिती उपलब्ध नसल्याने ती देता येत नाही हे त्यांना लेखी कळविण्यांत आल्याचे सांगितले. परंतु प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थींना कार्यालयांत उपलब्ध असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी देणे क्रमप्राप्त असल्याने ती पुरविण्यात यावी असे आदेश दि. ३१/१२/२००८ रोजी पारित केले.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारित करुनहि माहिती न मिळाल्याने अपीलार्थींनी दि. ४/२/२००९ रोजी द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले.

द्वितीय अपीलाच्या झालेल्या सुनावणीच्या वेळी असे निदर्शनास आले की, जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे की, माहिती उपलब्ध नसल्याने ती देता येत नाही.

याबाबत अधिक खुलासा करतांना जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अर्जात नमूद दिनांक ७/१०/२००६ सफाई कामगार सभा संदर्भातील दूरध्वनी संदेशाची नोंद या कार्यालयाने दूरध्वनी संदेश नोंदवहीत आढळून येत नाही. तसेच मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील दि. २० जानेवारी १९८६ चे परिपत्रकानुसार सदरचे इतिवृत्त हे जतन करुन ठेवण्यात आलेले नाही. तसेच संबंधित कर्मचारी (श्री.नंदू मोरे) याचा याबाबतचा कोणताही जबाब या कार्यालयाकडे आढळून येत नाही. अर्जात मागणी केलेली माहिती या कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याने माहिती उपलब्ध करुन देता येत नसल्याने प्रस्तुतचा अर्ज निकाली काढण्यात आला आहे. माहितीच रेकॉर्डला नसल्याने पुढील आदेश देण्यात येतो.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २५फेब्रूवारी, २०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १४७९/०२

श्री. सुर्यभान वामन गायकवाड ----अपीलार्थी
संभाजीनगर, केतकी सोसायटीच्या मागे,
म्हसरुळ, नाशिक, ता.जि. नाशिक- ४

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ----उत्तरवादी
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्या.
खरबंदा पार्क, द्वारका चौफुली, नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्या.
उपविभाग कार्यालय, विद्युत कॉलनी, दिंडोरी रोड,
पंचवटी, नाशिक- ३.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक १५/४/२००९
सुनावणीचा दिनांक २१/१२/२००९
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. सुर्यभान वामन गायकवाड यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १५/४/२००९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक, जि. नाशिक येथे दि. २१/१२/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.

अपीलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २९/११/०८ रोजी अर्ज करुन चुकीच्या पध्दतीने सी.एफ.एल.बल्ब वितरण एजन्सीने वसूल केलेल्या रकमेसंबंधी झालेल्या त्रासांबद्दल (२) ॲथोराईज्ड सिग्नेचरचे ठिकाणी ज्या अधिका-यांच्या सहया आहेत त्यांचे ठाव ठिकाण इत्यादी माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ५/१२/२००८ च्या पत्राद्वारे अपीलार्थीस सी.एफ.एल.बल्ब वितरणाचे काम करणा-या एजन्सीचे नांव व पत्ता (मे.शिवशंकर नवी मुंबई ) व मुळ ठेकेदार मे.एशियन इलेक्ट्रॉनिक्स सातपूर नाशिक यांचे नाव पत्ता अपीलार्थीस कळविण्यांत आले आहे.

मागितलेल्या माहिती ऐवजी नको असलेली माहिती दिल्यामुळे अपीलार्थीनी दि. २५/१२/०८ रोजी कलम १९(१) अन्वये प्रथम अपील दाखल केले. यावेळी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांना ज्या पत्रावर एशियन इलेक्ट्रॉनिक्स कंपनीच्या अधिका-यांबाबत मागितलेली माहिती एशियन इलेक्ट्रॉनिक्स कंपनीकडून पत्रव्यवहाराद्वारे प्राप्त करुन अपीलार्थीस द्यावी असे निर्देश प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिले होते.

सदर आदेशाचे जन माहिती अधिकारी यांनी पालन न केल्याने अपीलार्थीनी दि. ३०/३/२००९ रोजी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेल्या बाबी ---

१. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस २/३ पत्राद्वारे मागितलेली माहिती दिलेली आहे.

२. अपीलार्थीकडून सी.एफ.एल.बल्ब वितरण करणा-या एजन्सीने चुकीच्या पध्दतीने रु. ६२५/- वसूल केले होते ती चुक करुन वितरण करणा-या एजन्सीने मान्य केली व चुकीच्या वसुलीचे रु. ६२५/- अपीलार्थीस देऊ केले परंतु ते त्यांनी घेतलेले नाहीत. तसाच त्यांचा विजपुरवठा सतत चालू आहे.

३. बल्ब देणा-या कंपनीच्या कर्मचा-यांची नांवे , हुद्दा या माहितीसाठी वीज कंपनीकडे लेखी तक्रार केली आहे. परंतु कंपनी माहिती देत नाही.

४. बल्ब कंपनीच्या विरोधात पोलीसांत तक्रार दाखल करण्यांत आली असून तपास चालू आहे.

५. जी माहिती एशियन कंपनीने दिलेली होती ती अपीलार्थीस देण्यात आलेली आहे. आयोगाचे काम उपलब्ध माहिती मिळवून देणे एवढेच आहे. ते पार पाडण्यांत आले आहे. याप्रकरणी पोलीस तपास चालू असल्यामुळे आयोग याबाबतीत कांहीही भाष्य करु इच्छित नाही. या परिस्थितीत मी पुढील आदेश देत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक २५फेब्रूवारी, २०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४५४०५/अपील क्रं. ५३१५/०२**

**श्री.वैभव चंद्रकांत कोरगांवकर** **---------अपीलकर्ता**
**४८/३,राधाकृष्ण निवास, डॉ.आंबेडकर रोड,**
**दादर (पूर्व), मुंबई ४०० ०१४**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **--------- उत्तरवादी**
**पोलीस उप आयुक्त (म.रा.), पोलीस आयुक्त कार्यालय,**
**क्रॉफर्ड मार्केट, मुंबई ०१**

**जन माहिती अधिकारी**
**सहायक पोलीस आयुक्त, (म.रा.) पोलीस आयुक्त कार्यालय,**
**क्रॉफर्ड मार्केट, मुंबई ०१**

**- विवेचन -**

अपीलाचा दिनांक : १७.११.२००९

सूनावणीचा दिनांक : ०६ फेब्रुवारी, २०१०

अपिलार्थी :उपस्थित

जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदारास इंडिया डिफेन्स ॲक्ट अंतर्गत मुंबई पोलीस आयुक्तालयासाठी अधिग्रहीत केलेल्या खाजगी इमारतीतील जागा व मुदत संपल्यानंतर त्या जागा मुळ मालकास परत करण्यासंदर्भात काही माहिती पाहिजे होती व त्यांनी तो अर्ज गृह विभागास सादर केला होता. गृह विभागाने मात्र तो अर्ज मुंबई पोलीस आयुक्त यांच्याकडे पाठविला. जन माहिती अधिकारी, मुंबई पोलीय उपायुक्त यांनी जी माहिती दिली ती माहिती जवळपास या विषयावरील कुठचेही कागदपत्र त्यांच्याकडे नाहीत या स्वरुपाची आहे. तेव्हा अर्जदाराच्या वडिलोपार्जित प्रार्पटीपैकी ६ गाळे १९९१ साली परत मिळाले आहेत मात्र ८ गाळे अजुनही शासनाकडे आहे असे त्यांचे म्हणणे आहे. जन माहिती अधिकारी गृह विभाग यांना असे निर्देश देण्यात येतात की त्यांनी गृह विभागातील अर्जदारास हवी असलेली माहिती १५ दिवसात द्यावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

अर्जदाराच्या अपीलाची प्रत व त्या सोबत जोडलेल्या कागदपत्रांची प्रत व हा आदेश जन माहिती अधिकारी गृह विभाग यांना पाठविण्यात येत आहे त्यावर १५ दिवसात कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ०६.०२.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ २००९/४५३९७/अपील क्रं. ५३१७/०२

**श्रीमती प्रणाली धयाळकर** **---------अपीलकर्ता**
**२३/३९,बी.डी.डी.चाळ, एन.एम.जोशी मार्ग,**
**मुंबई ४०० ०१३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **--------- उत्तरवादी**
**उप सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई ३२**

**जन माहिती अधिकारी**
**अवर सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई ३२**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : १७.११.२००९
सूनावणीचा दिनांक : ०६ फेब्रुवारी, २०१०
अपिलार्थी :उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलिय प्राधिकारी : उपस्थित

अर्जदारास सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत येणाऱ्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या बाबतीत माहिती पाहिजे होती व ही माहिती त्या त्या कार्यालयाकडे प्राप्त होईल असे त्यांना कळविण्यात आलेले होते. क्षत्रिय कार्यालयाची माहिती ही वेब साईटवर दिलेली आहे व अर्जदाराला ज्या ज्या कार्यालयाच्या कर्मचाऱ्यांची माहिती पाहिजे असेल त्या कार्यालयामध्ये अर्ज करुन प्राप्त करुन घ्यावी. एकत्रित स्वरुपाची माहिती ही मंत्रालयीन पातळीवर ठेवल्या जात नाही. अपिलिय अधिकारी यांनी याबाबतीत दिलेला निर्णय आयोगास योग्य वाटतो.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ०६.०२.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४५३९६/अपील क्रं. ५३१६/०२**

**श्री.राजन माधव कोरडे,** **---------अपीलकर्ता**
**व्दारा : घेराऊ अगनु गुप्ता,**
**५५९/इ-३, चारकोप (१), अर्चना सह.गृह निर्माण संस्था (प),**
**विभाग क्र.५, श्रीहरी मार्ग, कांदिवली (प)**
**मुंबई ४०० ०६७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **--------- उत्तरवादी**
**पोलीस उपायुक्त परि-२, पोलीस उपायुक्त, परि-२, प्रा.वि.कार्यालय इमारत,**
**सर जे.जे. मार्ग,नागपाडा, मुंबई ०८**

**जन माहिती अधिकारी**
**सहायक पोलीस आयुक्त, पोलीस उपायुक्त, परि-२, प्रा.वि.कार्यालय इमारत,**
**सर जे.जे. मार्ग,नागपाडा, मुंबई ०८**

## - वि वे च न -

अपीलाचा दिनांक : १६.११.२००९
सूनावणीचा दिनांक : ०६ फेब्रुवारी, २०१०
अपिलार्थी :उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदारास ते व त्यांचे काका यांनी दिपक कृष्णराव कोरडे यांच्याविरुध्द केलेल्या तक्रार अर्जाबद्दल झालेल्या कार्यवाहीची माहिती पाहिजे होती. याबाबत जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे कळविलेले आहे.

"अर्जदारास यांचे अर्जाचे अवलोकन करुन तसेच सविस्तर चौकशी करुन सदरचे प्रकरण हे दिवाणी स्वरुपाचे असल्याचे निष्पन्न झाल्याने नमूद प्रकरणी अर्जावर विरोधक नामे दिपक कृष्णराव कोरडे यांचे विरुध्द शिवीगाळ करणे व धमकी देणे याबाबत अदखलपात्र ग.नों.क्र.१२४३/०८,कलम ५०४,५०६ भांदवि,अन्वये नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाची छायांकित प्रत सोबत जोडली आहे."

अपिलिय निर्णयात सुध्दा रेकॉर्डप्रमाणे दिलेली माहिती बरोबर असल्यामुळे प्रथम अपील नाकारण्यात आले होते. व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळेला अर्जदाराचे मुळ भांडण हे भाडेकरु मालक या दिवाणी स्वरुपाचे आहे त्यामुळे पोलीसांना याबाबतीत कारवाई करता येत नाही. अदखलपात्र गुन्हा नोंद घेतल्याची माहिती दिली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. रेकॉर्डप्रमाणे दिलेली माहिती बरोबर असल्यामुळे अपील निकाली काढण्यात येत आहे मात्र अर्जदाराचे अपील पोलीस स्टेशनच्या कृतीबाबत असमाधानी असल्यास त्यांनी संबंधीत पोलीस स्टेशनच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधणे हे जास्त योग्य राहील.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ०६.०२.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ २००९/अपील क्रं. १४०४/०२

**श्री. पितांबर सुकलाल पेंढारकर** **------ अपीलकर्ता**
**२,तलाठी कॉलनी, डोंगरगांव रोड, शहादा,**
**ता.शहादा,जि.नंदुरबार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**तहसिलदार, तहसील कार्यालय,शहादा.ता.शहादा,जि.नंदुरबार**

**जन माहिती अधिकारी तथा**
**निवासी नायब तहसीलदार,**
**तहसील कार्यालय, शहादा.ता.शहादा,जि.नंदुरबार**

## - वि वे च न -

अपीलाचा दिनांक : २५.०८.२००९
सूनावणीचा दिनांक : ०८.१२.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलिय अधिकारी : उपस्थित

अपीलकार श्री. पितांबर सुकलाल पेंढारकर, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५.०८.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय,सभागृह धुळे, जि.धुळे परिसर जळगांव येथे दि. ०८.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी सुध्दा उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.३०.०४.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद माहितीचा तपशील "१) मौजे शहादा महसूल हद्दीतील स.न.७८/१+२ पैकी (१६) २ प्लॉटची फेरफार नोंद. २) तक्रार- ४३१४ ची जबाबासह नक्कल प्रत" इत्यादि.

जन माहिती अधिकारी यांनी सदर माहिती तलाठी शहादा येथील कार्यालयात उपलब्ध असल्याने अपीलार्थीचा अर्ज तलाठी शहादा कार्यालयात वर्ग केला व तसे अपिलार्थीस कळविले.

अपिलार्थीने तलाठी कार्यालयांस वारंवार विनंती केली तरी तलाठी शहादा यांनी त्यांना वेळेत माहिती न दिल्याने अखेर त्यांनी प्रथम अपील दाखल केले त्यावर प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी अर्जदार व शासकीय माहिती अधिकारी यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिली. त्यावेळी असे दिसून आले की तलाठी हे माहिती न देण्यास जबाबदार आहे त्यांनी जाणून बुजून वेळकाढू धोरण स्विकारुन अपीलार्थीस माहिती दिलेली नाही त्याबाबत तहसिलदार

यांनी तलाठी शहादा यांचे हे वर्तन अत्यंत बेजबाबदार असून गंभीर स्वरुपाचे आहे त्यांनी सदर माहिती अपीलार्थीस त्वरीत विनामुल्य द्यावी असे आदेश दिले तसेच भविष्यात अशा प्रकारे कामचुकारपणा केल्यास दंडाची कार्यवाही केली जाईल असे आदेश दि.२२.०७.२००९ रोजी पारीत केले.

अपीलार्थीने दि.२५.०८.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले त्यावेळी अपीलार्थी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी हे हजर होते.

सुनावणीच्या वेळी असे निदर्शनास आले की अपीलार्थीस प्रथम अपीलाच्या सुनावणी नंतरच दि२६.०६.२००९ रोजी माहिती विनामुल्य देण्यांत आली व त्यांनी ती स्विकारली आहे. माहिती विहित कालावधीत मिळाली नाही हे सत्य आहे तरीही जन माहिती अधिकाऱ्यांनी आपली चुक प्रामाणिकपणे मान्य केलेली आहे व माफीही मागितलेली आहे तलाठी शहादा यांनाही तहसीलदार यांनी सक्त ताकीद दिलेली आहे. अपीलार्थीस विलंबाने का हाईना माहिती मिळालेली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २३.०२.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपीले.**

**मुमाआ २००९/४५४०६/अपील क्रं. ५३२१/०२**
**मुमाआ २००९/४५४०७/अपील क्रं. ५३२२/०२**

**श्री. जगन्नाथ एच.शर्मा,** **---------अपीलकर्ता**
**चंद्रीकाबाई एच.शर्मा,चाळ,रुम नं.१ आणि २,**
**खार जवाहर नगर, साईबाबा रोड,**
**खार (पूर्व),मुंबई ४०० ०५१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **--------- उत्तरवादी**
**सहायक मनपा आयुक्त, सहायक मनपा आयुक्त,**
**एच/पूर्व विभाग, १३७, टीपीएस-५, २ रा रोड, प्रभात कॉलनी,सांताक्रुझ (पूर्व),**
**मुंबई ४०० ०५५**

**जन माहिती अधिकारी**
**सहायक अभियंता (इ/का), सहायक मनपा आयुक्त,**
**एच/पूर्व विभाग, १३७, टीपीएस-५, २ रा रोड, प्रभात कॉलनी,सांताक्रुझ (पूर्व),**
**मुंबई ४०० ०५५**

## - वि वे च न -

या प्रकरणातील दोन्ही अपीलांवरून अर्जदारास माहिती नको आहे मात्र त्यांच्या जमिनीवर झालेले अनधिकृत बांधकाम हे जमिनदोस्त करुन त्यांना पाहिजे आहे. यासंदर्भात अर्जदाराच्या जमिनीत असलेल्या टेनंट्सना स्लम ॲक्ट खाली फोटो पास देण्यात आलेले होते. मात्र आता ते फोटो पास रद्द करण्याची कार्यवाही हाती घेण्यात येत आहे असे अतिरीक्त जिल्हाधिकारी कार्यालयाने महापालिकेस कळविलेले आहे. महापालिकेने जरी या धारकांना कलम ३५१ नुसार नोटीसेस जारी केली असली तरी त्यांना तेथून हुसकावून लावण्याची कार्यवाही ते हे फोटो पासेस रद्द करता येईल असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यामुळे महापालिकेच्या कागदोपत्री असलेली ही वस्तुस्थिती आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी सांगितले. अर्जदारास ही माहिती आहेच मात्र सर्व प्रयत्नांचाच हा एक भाग म्हणून त्यांनी माहितीच्या अधिकाराचा अर्ज सुध्दा दिलेला आहे. जन माहिती अधिकाऱ्यांनी वरिष्ठांमार्फत अतिरीक्त जिल्हाधिकारी यांच्याकडे फोटो पास रद्द करण्याबाबत पाठपुरावा करीत असल्याचे सांगितले. रेकॉर्ड प्रमाणे असलेली सर्व माहिती अर्जदारास दिली असल्याने पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येतो.

## आदेश

**दोन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहेत.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**

दिनांक: ०६.०२.२०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :- मुमाआ /४५३८७/अपील क्रं. ५३०३/०२**

श्री.नरेंद्र अे.शाह, ---------अपीलकर्ता
२०,राम निवास, २ रा मजला,
पई नगर, एस.व्ही.पी.रोड,
बोरीवली (प),मुंबई ९२

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **--------- उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,**
**आर/सेंट्रल विभाग,२ रा मजला, म्युनिसिपल मार्केट इमारत, एस.व्ही.पी.रोड,**
**बोरीवली (प),मुंबई ९२**

**जन माहिती अधिकारी**
**सहायक अभियंता (इ/का), बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,**
**आर/सेंट्रल विभाग,२ रा मजला, म्युनिसिपल मार्केट इमारत, एस.व्ही.पी.रोड,**
**बोरीवली (प),मुंबई ९२**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ०९.११.२००९
सूनावणीचा दिनांक : ०९ फेब्रुवारी, २०१०
अपिलार्थी :अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलिय प्राधिकारी : उपस्थित

अर्जदाराने राम निवास सहाकारी गृह निर्माण संस्थेच्या इमारतीच्या ग्राऊंड फ्लोअरवर मागिल बाजूस मुंबई महापालिकेची परवानगी न घेता केलेले अनधिकृत बांधकाम काढून टाकण्यासंबंधी काय कार्यवाही केली आहे यांची माहिती विचारली होती. दिनांक १०.०७.२००९ पर्यंत कारवाईची सुरुवात झालेली नसल्यामुळे अर्जदारास दिनांक ३.०८.२००९ रोजीच्या पत्राने कार्यवाही झालेली नाही असे उत्तर दिले आणि त्या बद्दल रेकॉर्डला कोणतेही कारण उपलब्ध नाही असे ही कळविले. प्रथम अपीलावरील दिनांक १ सप्टेबर २००९ रोजीच्या आदेशात अपिलिय अधिकारी यांनी सद्यस्थिती दर्शविलेली आहे असे नमूद करुन अपील अमान्य केले मात्र या दरम्यानच्या कालावधीमध्ये अनधिकृत बांधकामाविरुध्द जी कार्यवाही केली जाईल त्यांची माहिती अर्जदारास देण्याचे निर्देशही दिले. त्याप्रमाणे दिनांक १५.०९.२००९ राजीच्या पत्राने अनधिकृत बांधकामाविरुध्द कलम ३५१ ची नोटीस दिनांक ११.०८.२००९ रोजी देण्यात आली व या बाबतीत अंतीम आदेशही दिनांक ९.०९.२००९ रोजी पारित करण्यात आले असे अर्जदारास कळविलेले आहे.

सुनावणी पुढे ढकलावी असे अर्जदाराने आयोगास पत्र पाठविले आहे अत्यंतिक अपवादात्मक परिस्थिती खेरीज अपीलाची सुनावणी पुढे ढकलत नाही त्यामुळे अर्जदाराचा अपील मेमो विचारात घेण्यात आला. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की सदरील आदेशावर सिटी सिव्हील कोर्टाने दिनांक ३०.११.२००९ रोजी स्थगन आदेश दिलेला असल्यामुळे सदरील बांधकाम पाडून टाकण्याबाबत पुढील कार्यवाही महापालिकेला करता आली नाही. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येतो.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ०९.०२.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :- मुमाआ /४५३८९/अपील क्रं. ५३०५/०२**

श्री.अंजली बी.कुलकर्णी, ---------अपीलकर्ता
८/बी/२०३,स्प्रींग लिंक का.ऑ.हौ.सो.,
लोखंडवाला कॉम्प्लेक्स, कांदिवली (पूर्व),
मुंबई १०१

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा --------- उत्तरवादी

**पोलीस उप आयुक्त, परि-१२,मुंबई**

**जन माहिती अधिकारी**
**सहायक पोलीस आयुक्त,उत्तर नियंत्रण कक्ष.**
**ठाकूर व्हिलेज, कांदिवली (पूर्व),**
**मुंबई १०१**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : १२.११.२००९
सूनावणीचा दिनांक : ०९ फेब्रुवारी, २०१०
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदार श्रीमती अंजली बंडु कुलकर्णी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मिळण्याकरीता या कार्यालयात दि.४.०५.२००९ रोजी अर्ज केला होता. त्यात त्यांनी समतानगर पोलीस ठाणे येथील दि.२०.०८.२००४ ते ३१.१२.२००४ दरम्यान पोलीस ठाणे कोठडी नोंदवहीत घेण्यात आलेल्या नोंदीच्या प्रतींची मागणी केली होती.

दि.३.०६.२००९ रोजी समतानगर पोलीस ठाणेकडून मागविण्यात आलेली माहिती प्राप्त झाली. त्यात अर्जदार यांना गुन्हा नोंद क्र. २४६/०४,२५५/०४,२५८/०४,२५९/०४ व ३०७/०४ अशा एकूण पाच गुन्हयात अटक करण्यात आली होती. त्या अनुषंगाने त्यांना जावक क्र. २१४१/०९,दि१७.०३.२००९ प्रमाणे सर्व नोंदी देण्यात आलेल्या आहेत. तसेच दि.१७.०९.२००४ नंतरच्या नोंदी उपलब्ध नाहीत. सदर अर्जदार यांना दि.२०.०९.२००४ पासून न्यायालयीन कोठडीत ठेवण्यात आले असल्याने दि.१७.०९.२००४ पासून नोंदी नसल्याचा अहवाल प्राप्त झाला. सदरचा अहवाल अर्जदार यांनी दि.२०.०७.२००९ रोजी स्विकारला.

अर्जदारांचे दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी प्रथम अपिलिय अधिकारी व पोलीस उप-आयुक्त,परि-१२,मुंबई यांचेकडे अपील दाखल केले. त्याची सुनावणी होऊन त्यात पाचव्या गुन्हयात अटक झ ाल्यानंतरच्या नोंदी अर्जदार यांना पुरविण्यात याव्यात असे आदेश पारीत करण्यात आले. त्या अनुषंगाने अर्जदार यांना सुधारीत माहिती प्राप्त करुन दि. ६.११.२००९ रोजी देण्यात आलेली आहे.

दरम्यान अर्जदार यांनी या कार्यालयात दि.११.११.२००९ रोजी त्यांना पाचव्या गुन्हयात म्हणजेच गुन्हा नोंद क्र.३०७/०४ कलम ४१८,४२०,३४ भा.द.वी. मध्ये अटक झाल्यानंतर बोरीवली जनरल लॉकअपमधील दि.१०.१०.२००४ ते ३१.१२.२००४ दरम्यानच्या नोंदी मिळण्याबाबत अर्ज सादर केला. सदरची माहिती ही बोरीवली पोलीस ठाण्याकडून मागविण्यात आली. त्यामध्ये बोरीवली लॉकअप येथे कोणतेही नोंद आढळून आली नसल्याबाबतचा अहवाल प्राप्त झाला. अर्जदार यांनी सदरबाबत अपील अर्ज केला असता दि.७.०१.२०१० रोजी सुनावणी होऊन त्यात

अर्जदार यांनी त्यांचे पूर्वीचे नांव संगीता गावा हे अर्जात कसात अस्पष्ट असे लिहिले असल्याने अर्जदार पूर्वीचे संगीता गावा या नावाने नोंदीची शोध घेऊन सुधारीत माहिती देण्यात यावी असे आदेश पारीत करण्यात ओ. सदरची सुधारीत माहिती बोरीवली पोलीस ठाण्याकडून प्राप्त करुन ती अर्जदार यांनी दि.२०.०१.२०१० रोजी स्विकारली.

सुनावणीच्या वेळी दिलेल्या माहितीने समाधान झाले आहे का असे विचारले असता समतानगर पोलीस स्टेशन सी.आर.नं. ३०७/०४ मध्ये त्यांना भायखळा जेलमधून आणून दि.२९.१०.२००४ रोजी अटक झाल्याचे दाखविण्यात आले होते व बोरीवली लॉकअप मध्ये दि. १८.११.२००४ पर्यंत होते असे त्यांचे म्हणणे आहे. जन माहिती अधिकारी यांनी याही कालावधीच्या नोंदी तपासून पाहून जर नोंदी असतीलतर त्या अर्जदारास १० दिवसाच्या आत देण्यात येतील असे सुनावणीच्या वेळी सांगितले. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येतो.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**जन माहिती अधिकारी यांनी १० दिवसात उपरिनिर्दीष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ०९.०२.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :- मुमाआ /४५३८९/अपील क्रं. ५३०८/०२**

**श्री.ओम प्रकाश पनवर,** **---------अपीलकर्ता**
**रुम.नं.डी-१/१:२, सेक्टर -६, नेरुळ,**
**नवी मुंबई - ४०० ७०६**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी** **--------- उत्तरवादी**
**संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, सेंट जॉर्जेस हॉस्पिटल,**
**आवार, सीएसटी,मुंबई ०१**

**जन माहिती अधिकारी**
**संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन,सेंट जॉर्जेस हॉस्पिटल,**
**आवार, सीएसटी, मुंबई ०१**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : १७.११.२००९

सूनावणीचा दिनांक : ०९ फेब्रुवारी, २०१०

अपिलार्थी : उपस्थित

जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदारास त्यांची मुलगी प्रियंका हीला एम.जी.एम.मेडीकल कॉलेजमध्ये ॲडमिशन घेतांना तीने जी अंडरटेकींग दिली होती त्याची प्रत पाहिजे होती. सन २००२ साली कॉलेजला सादर केलेल्या अशा हमीपत्राची प्रत सापडलेली नाही. त्यामुळे ती देता आली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी कळविले व आवश्यक वाटल्यास अर्जदाराला कागदपत्रांची पडताळणी करता येईल असे ही सांगितले. जन माहिती अधिकारी यांनी पुढे सांगितले की कुमारी प्रियंका हिला रिझर्व्ह कॅटगरी बेसीसवर ॲडमिशन मिळाली होती पण जात पडताळणी प्रमाणपत्र हे समाधान कारक नसल्यामुळे अंतिमतः सुप्रिमकोर्टाने सुध्दा तीला डिग्री मिळू शकणार नाही असे निर्देश दिले होते. अंडरटेकींग असे म्हणते की ॲडमिशन देतांना उमेदवार असे लिहून देतो की मी ९० दिवसांच्या आत जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करेल व तसे न केल्यास माझी ॲडमिशन ही रद्द होऊ शकेल याची मला कल्पना आहे. जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, ५ वर्षाच्या कालावधी नंतर असे रेकॉर्ड नष्ट करायला हरकत नसते मात्र प्रयत्न करुनही ते सापडले नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येतो.

**आदेश**

**अपील अमान्य करण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ०९.०२.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक :- मुमाआ /४५३९१/अपील क्रं. ५३०७/०२

श्री.विनोदकुमार के.मिश्रा --------अपीलकर्ता
नगीना चाळ, यादव नगर, खेरानी रोड,
साकीनाका, मुंबई - ४०० ०७२

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी ---------- उत्तरवादी
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, सेंट जॉर्जेस हॉस्पिटल,
आवार, सीएसटी,मुंबई ०१

**जन माहिती अधिकारी**
**संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन,सेंट जॉर्जेस हॉस्पिटल,**
**आवार, सीएसटी, मुंबई ०१**

## - वि वे च न -

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक : १७.११.२००९
सूनावणीचा दिनांक : ०९ फेब्रुवारी, २०१०
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदाराला MHCET इ.स. २००८ व ०९ च्या बाबतीत सात मुद्दयांवर माहिती पाहिजे होती. माहिती अर्जदारास देण्यात आलेली आहे मात्र माहिती देण्यास उशीर झालेला आहे तसेच न्यायालयाच्या आदेशानुसार जो चौकशी अहवाल तयार करण्यात आला तो न देण्याची कारणे ही सुध्दा पुढीलप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दिलेली आहेत.

अर्जदाराच्या पत्रातील बाबींच्या अनुषंगाने संचालनालयाकडे उपलब्ध सर्व माहिती अर्जदारास निःशुल्क उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्याच्या प्रती सहप्रतींसाठी सोबत सादर करण्यात येत आहेत. प्रस्तुत प्रकरणी माहिती मधील बाब मा.मुंबई उच्च न्यायालयातील प्रलंबित प्रकरणाशी संबंधीत होती व सदर प्रकरणाची सुनावणी मा.न्यायालयात सुरु होती. तसेच अन्य माहिती मध्ये प्रवेश प्रक्रियासंबंधाच्या माहितीची विचारणा केली होती. त्या कालावधीत संचालनालयामार्फत प्रवेश प्रक्रिया सुरु हेती व अर्जदाराने मागितलेली माहिती अर्जदारास माहिती उपलब्ध करुन दिल्यानंतर याबाबत अर्जदारास दि.६.०१.२०१० रोजी सुनावणीसाठी अपिलिय अधिकाऱ्यांसमोर उपस्थित रहाण्याबाबत कळविण्यात आले होते.

सदर दिनांकास अर्जदार उपस्थित राहिले होते. तदनंतर मा.राज्य माहिती आयुक्त यांच्या दालनात दि.१२ जानेवारी २०१० रोजी सुनावणीकरीता अर्जदार व संचालनालयातील अपिलिय अधिकारी उपस्थित होते. त्यावेळी सदर बाबत मा.आयुक्तांसमोर अर्जदाराने याच अर्जासंदर्भातील माहितीबाबत निवेदन केले होते की,सदर अर्जातील माहिती प्राप्त झाली असून त्यातील अनुक्रमांक (७) मधील माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. याबाबत संचालनालयामार्फत असे निवेदन करण्यात आले की, अनुक्रमांक ७ मधील बाब ही न्यायप्रविष्ट असल्याने व अर्जदार स्वतःच याचीकाकर्ता असल्याने अर्जदारास मा.न्यायलयाच्या आदेशानंतर सदरची माहिती उपलब्ध करुन देणे संचालनालयास शक्य होईल.

तरी उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता मा.आयोगास सादर करण्यात येते की, उपरोक्त सर्व वस्तुस्थितीवरुन असे निदर्शनास येते की,अर्जदारास माहिती उपलब्ध करण्यामध्ये झालेला विलंब हा जाणूनबुजून करण्यामागे या संचालनालयाचा कोणताही हेतू नाही. याबाबत मा.आयोगास असेही सादर करण्यात येते की,अर्जदार श्री.मिश्रा यांनी यापूर्वीही बऱ्याचवेळा माहिती अधिकारांतर्गत माहितीची विचारणा केलेली आहे. प्रत्येकवेळी त्यांना संचालनालयामार्फत

माहिती विहित कालावधीत उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. संचालनालयामार्फत देण्यात आलेल्या माहितीबाबत मा.आयेगासमोर सुनावणीसुध्दा झालेली आहे व मा.आयोगामार्फत वेळोवेळी अपील निकालीसुध्दा काढण्यात आले आहे. त्यामुळे अर्जदारास माहिती उपलब्ध करुन न देणे किंवा जाणूनबुजून प्रलंबित ठेवण्याचा कोणताही हेतू या संचालनालयचा नाही,असू दिसून येते.

न्यायालयातील पुढची तारीख ही मार्च महिन्यातील आहे व त्या नंतर न्यायालयाच्या निर्देशानुसार अहवालाची प्रत सुध्दा अर्जदारास उपलब्ध करुन देता येईल असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. विलंबाबाबतची कारणे कारणे मान्य करण्यात येत आहेत.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ०९.०२.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :- मुमाआ २००९/४५४०२/अपील क्रं. ५३१२/०२**

**श्री. नारायण भिकाजी परब,** **---------अपीलकर्ता**
**१७२/ब/५७५५, वंदे पुष्पा को.ऑ.हौ.सोसा.,**
**कन्नमवार नगर, क्र - १, विक्रोळी (पूर्व),**
**मुंबई -८३**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **--------- उत्तरवादी**

**उप निबंधक, सहकारी संस्था, म्हाडा इमारत,**
**रुम नं. ६९,गृहनिर्माण भवन वांद्रे (पूर्व), मुंबई ५१**

**जन माहिती अधिकारी**
**म्हाडा इमारत,रुम नं. ६९,गृहनिर्माण भवन वांद्रे (पूर्व),मुंबई ५१**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : १८.११.२००९
सूनावणीचा दिनांक : ०९.०२.२०१०
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदारास वंदे पुष्पा को.ऑप.हौ.सोसायटी, कन्नवार नगर या संस्थेबाबतची तक्रार व इतर अनुषंगिक माहिती पाहिजे होती. समाधान कारक रित्या माहिती न मिळाल्यामुळे अंतिमतः ते आयोगाकडे आलेले आहेत. सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की संस्थेच्या गैरकारभारामुळे संस्थेवर प्रशासकाची नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे व दोन्ही पक्षाशी चर्चा करुन असे ठरविण्यात आले की या आदेशाच्या प्रती अर्जदार हे स्वतः उद्या म्हणजे दि.१०.०२.२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जाऊन स्वतः माहिती स्विकारतील.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ०९.०२.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपीले.**

**मुमाआ २००९/४५४१५/अपील क्रं. ५३७५/०२**
**मुमाआ २००९/४५४१६/अपील क्रं. ५३७६/०२**

**श्री. विरेंद्रकुमार एस.गुप्ता,** **---------अपीलकर्ता**
**रुम नं. ६, अंबादे चाळ-३,देवीपाडा,**
**बोरीवली (पूर्व), मुंबई-६६**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **--------- उत्तरवादी**

**पोलिस उप आयुक्त, परिमंडळ - १२ , मुंबई.**

**जन माहिती अधिकारी**
**सहायक पोलीस आयुक्त, उत्तर नियंत्रण कक्ष,**
**ठाकूर व्हिलेज कांदिवली (पूर्व),**
**मुंबई - १०१**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : १८.१०.२००९
सूनावणीचा दिनांक : १५.०२.२०१०
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

वरील दोन्ही अपीलांच्याबाबतीत प्रथम अपिलिय अधिकारी यांनी शासकीय माहिती अधिकारी यांना संबंधीत पोलीस स्टेशन यांच्याकडून सुधारित माहिती प्राप्त करुन अर्जदारास द्यावी असे निर्देश दिले होते व त्याप्रमाणे या दोन्ही प्रकरणात अर्जदारास माहिती देण्यात आलेली आहे असे दिसून आले.

अर्जदारास हवी असलेली माहिती दिलेली आहे व त्या व्यतिरिक्तही अर्जदाराच्या आणखीन काही तक्रारी असतील तर त्या बाबतीतही शांतता व सलोखा प्रस्थापित करण्याच्या दृष्टिने प्रयत्न करण्याचे जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले.

**आदेश**

**दोन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १५.०२.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपीले.**

**मुमाआ २००९/४५४१३/अपील क्रं. ५२७७/०२**

**श्री. सुरेश शांताराम साने,** **---------अपीलकर्ता**
**अ-१,प्रधान सागर, जिवदया लेन,**
**घाटकोपर (प), मुंबई - ८६**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **--------- उत्तरवादी**

**उप निबंधक, सहकारी संस्था, उपनिबंधक,सहकारी संस्था,**
**एन-विभाग, मुंबई-कक्ष क्र.३११, ३ रा मजला, कोकण भवन,नवी मुंबई ४०० ०१४**

**जन माहिती अधिकारी**
**अध्यक्ष सचिव, घनश्याम कृपा को.ऑ.हौ.सो.लि.,**
**भटवाडी.आर.बी.कदम मार्ग, घाटकोपर (प), मुंबई - ८४**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : १८.११.२००९
सूनावणीचा दिनांक : १५.०२.२०१०
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदारास हवी असलेली माहिती ही सदस्याला त्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेडून पाहिजे असलेली माहिती आहे. सहकारी संस्था ही तसे त्यादृष्टिने जनप्राधिकरणे नाही तरीहि जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहाकारी संस्था यांनी पुढीलप्रमणे निवेदन केलेले आहे.

"श्री.सुरेश शं.साने,राहणार घाटकोपर,मुंबई यांनी संस्थेकडे संस्थेतील कागदपत्रांची मागणी केली होती. परंतु संस्थेने कागदपत्रे त्यांना उपलब्ध करुन दिली नसल्याने त्यांनी या कार्यालयाकडे माहितीच्या अधिकाराअंतर्गत संस्थेकडून कागदपत्रे उपलब्ध करुन देण्याविषयी अर्ज सादर केला होता. त्या अर्जाच्या अनुषंगाने या कार्याल्याने दिनांक १२.०२.२००९ रोजी संस्थेस त्याबाबत निर्देश दिले असून,संस्थेने त्यांना कागदपत्रे एक महिन्याच्या आंत उपलब्ध करुन द्यावी. सदरील अर्ज हा प्रथम अपील नसून,याबाबतचे या कार्यालयाचे आदेश दिलेले होते. परंतु संस्थेने कोणतीही कागदपत्रे त्यांनाउपलब्ध करुन दिलेली नाहीत. याबाबत त्यांना या कार्यालयाकडे दि.१३.०७.२००९ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे. त्यावर या कार्यालयाने दि.२०.०७.२००९ रोजी पुन्हा संस्थेस कागदपत्रे उपलब्ध करुन द्यावी अन्यथ महाराष्ट्र सहाकारी संस्था अधिनियम १९६० चे कायद्यान्वये पुढील कारवाई करण्यात येईल. असे कळविलेले आहे. सदरील पत्राच्या अनुषंगाने संस्थेत दि.०१.१०.२००९ रोजी या कार्यालयातील क्षेत्रीय अधिकारी यांना संस्थेत भेट देऊन श्री. साने यंना सदरील संस्थेतील कागदपत्रे उपलब्ध करुन देण्याविषयी निदैश दिलेले आहेत. त्या अनुषंगाने कारवाई चालु आह."

जवळपास एक वर्षापासून संस्था माहिती देतो म्हणते मात्र माहिती देत नाही असे दिसून आल्याने दहा दिवसाच्या आत संस्थेकडून अर्जदारास माहिती मिळवून देण्याचा प्रयत्न केला जाईल अन्यथा संस्थेविरुध्द कठोर कारवाई करण्यात येईल असे उपनिबंधक यांनी याही वेळेला सांगितले.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**

दिनांकः १५.०२.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ २००९/नाशिक/सी.आर अपील क्रं. १३६५/०२

श्री.भगवान शंकर मराठे, ---------अपीलकर्ता
२२,वनश्री कॉलनी मोहाडी,
उनगर धुळे,ता.जि.
धुळे - ४२४ ३११

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा --------- उत्तरवादी
उपवनसंरक्षक, जळगांव वनविभाग, जळगांव यांचे कार्यालय,
जळगांव

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहायक, वनसंरक्षक, रोहयो जळगांव वन विभाग,**
**जळगांव,जि.जळगांव**

## - विवेचन -

अपीलार्थी श्री.भगवान शंकर मराठे,यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९.०६.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नवीन प्रशाकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय, सभागृह, धुळे,येथे दि.०७.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे ५.०१.२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली १) श्री.प.ना.भामरे,उपवनसंरक्षक जळगांव वन विभाग जळगांव यांची माहे सप्टेंबर,२००६ ते आजतागायतची दैनंदिनीची छायांकित सत्यप्रत.२) श्री.एन.डी.पाबरा व आर.जे.बिराकुले सहा.वनसंरक्षक (रोहयो) या पदावरील कार्यरत कालावधीची प्रत, ३) जळगांव विभागाच्या सर्वच चारचाकी वाहनांच्या लॉगबुकच्या व वि.व.अ.दक्षता धुळे यांच्या वाहनाच्या लॉगबुकच्या छायांकित प्रती पुरविण्यासंबंधी माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी संबंधित माहिती पैकी काही माहिती देण्याची कार्यवाही सुरु असून उर्वरित माहिती त्यांच्या अखत्यारित येत नसल्याने अधिनियम २००५ चे कलम ६(३)(२) मधील तरतुदीनुसार ज्या विभागाशी माहिती संबंधीत आहे त्या विभागाकडे अर्ज वर्ग करण्यांत आला असे अपिलार्थीस दि.९.०१.२००९ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

अपिलार्थीचे म्हणणे असे होते की माहिती १,२,३ व ५ च्या मुद्यांची माहिती देतो म्हणून सूचित केले होते परंतु ती दिली न गेल्याने त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांची दि.२.०४.२००९ रोजी सुनावणी घेतली त्यावेळी खालील बाबी निदर्शनास आणण्यांत आल्या. अपीलार्थीने वन विभागाच्या तिन्ही अधिकाऱ्यांच्या दैनंदिन संबंधी माहिती मागितलेली होती. त्या अधिकाऱ्यांनी १) वन विभागाच्या काही अधिकाऱ्यांविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही होऊन निलंबन झालेले आहे. २) अधिकारी/कर्मचारी यांची विभागीय चौकशी चालू आहे. ३) औरंगाबाद न्यायालयांत काही प्रकरणी न्यायप्रविष्ट आहेत.४) वन्यजीव अपराधासंबंधी अपराध्याविरुध्द कारवाई सुरु आह या तपासणीच्या पाहणीच्या निष्कर्षाच्या विस्तृत नोंदी केलेल्या आहेत त्याच नोंदी लॉगबुकात संक्षिप्त केलेल्या आहेत त्यामुळे हवी माहिती उघड केल्यास अधिनियम २००५ च्या कलम ८ च्या (ख)(ज) ने उपलब्ध होईल म्ळणून पूर्णतय माहिती देता येणार नाही अे अपिलार्थीस दि.२.०५.२००९ च्या पत्राव्दारे कळविण्यात आले होते त्या विरोधात अपिलार्थीने व्दितीय अपील दाखल केले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते त्यावेळी निदर्शनास आलेल्या ठळक बाबी. १) अपिलीय प्राधिकारी यांनी अपिलार्थीस काही प्रकरणी माहिती दिलेली आहे. २) काही प्रकरणांत विभागीय चौकशी सुरु झाल्या आहेत त्यापैकी ६ विभागीय चौकशी प्रकरणांत अपिलार्थी हे अपचारीचे बचाव सहायक

म्हणून काम करीत आहेत. त्यामुळे अपिलार्थीस विशिष्ट व आवश्यक माहिती मागितलेली आहे त्यामुळे विभागीय चौकशीत अडथळे निर्माण होऊ शकतात. मात्र चौकशी अधिकाऱ्यांची संमती असल्यास हे कागदपत्र दिल्या जाऊ शकतील. तसेच औरंगाबाद हायकोर्टात न्यायालयातील फौजदारी रिट पीटीशन ५१/२००९ अन्वये शपथ पत्र दाखल करणे बाकी आहे. ही कार्यवाही पूर्ण झाल्यावरच अपिलार्थीस माहिती देण्यात येईल हे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणणे योग्य वाटते. या प्रकरणी सर्व सोपस्कार पूर्ण झाल्यावर अपिलार्थीस शिल्लक असलेली माहिती देण्यात यावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: १६.०२.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**मुमाआ २००९/३३३१९/तक्रार क्र. ६२७/०२**

**श्रीमती रत्नमाला सुधाकर काटकर** **-------तक्रारकर्ता**
**७/ब,सिल्वर अपार्टमेंट,ॲनेक्स,**
**२ रा मजला, आकुर्ली छेद रस्ता क्र.०१,**
**कांदिवली (पू), मुंबई ४०० १०१**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **--------- उत्तरवादी**
**शिक्षण निरीक्षक, शिक्षण निरीक्षक कार्यालय,**
**पश्चिम विभाग, जोगेश्वरी (पू),**
**मुंबई ४०० ०६०**

**जन माहिती अधिकारी तथा**
**शिक्षण उपनिरीक्षक, शिक्षण निरीक्षक कार्यालय,**
**पश्चिम विभाग, जोगेश्वरी (पू),**
**मुंबई ४०० ०६०**

**- विवेचन -**

१८ सप्टेबर २००९ च्या आदेशाने प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षण निरीक्षक यांनी श्रीमती रत्नमाला काटकर यांनी केलेल्या प्रथम अपिलावर निर्णय देण्याचे निर्देश जन माहिती अधिकारी यांना दिले होते. सुनावणी न झाल्यामुळे दि.४.११.२००९ रोजीच्या पत्राने आयोगास कळविले या तक्रारीची सुनावणी दि.१६.०२.२०१० रोजी घेण्यात आली त्यावेळी पुढीलप्रमाणे निवेदन अपिलीय अधिकारी यांनी सादर केले.

" आपल्या कार्यालयातील अपिल क्र.मुमाआ-२००९/३३३१९/अपिल क्र.४८२७/०२, दि.१८.०९.२००९ मध्ये दिलेल्या आदेशानुसार, मी अपिलिय अधिकारी श्री.के.आर.बोरसे,शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई पश्चिम,दि.१३.०१.२०१० रोजी अपीलाची सुनावणी आयोजित केली. या सुनावणीस सौ. रत्नमाला सुधाकर काटकर या उपस्थित होत्या. या सुनावणीचा निर्णय व अंतरिम अहवाल सौ.रत्नमाला सुधाकर काटकर यांना देण्यात आला व सुनावणीच्या निर्णयानुसार त्यांना दि.१६.०१.२०१० रोजी त्यांना शाळेकडून प्राप्त झालेली माहिती देण्यात आलेली आहे."

शिक्षण निरीक्षकांनी असे सांगितले की ऑन लाईन प्रवेश प्रक्रिया तसेच इतर कार्यक्रमांमुळे व निवडणूक कार्यक्रमांमुळे मुदतीत सुनावणी होऊ शकली नाही मात्र अर्जदारास आता हवी ती माहिती देण्यात आलेली आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येतो.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: १६.०२.२०१०**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपीले.

मुमाआ २००९/४४५७०/अपील क्रं. ५३८१/०२

श्री. राजेंद्र महादेव तावडे, ---------अपीलकर्ता
नौपाडा, सहार रोड, अंधेरी (पूर्व),
मुंबई ३ ५९

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा --------- उत्तरवादी
कार्यकारी अभियंता (विशेष), कार्यकारी अभियंता (विशेष) यांचे कार्यालय,
३ रा मजला, के/पूर्व, वार्ड ऑफीस, इमारत, आझाद रोड, गुंदवली,
अंधेरी (पू), मुंबई - ४०० ०६९

जन माहिती अधिकारी
सहायक अभियंता (इ/का), कार्यकारी अभियंता (विशेष) यांचे कार्यालय,
३ रा मजला, के/पूर्व, वार्ड ऑफीस, इमारत, आझाद रोड, गुंदवली,
अंधेरी (पू), मुंबई - ४०० ०६९

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २३.११.२००९
सूनावणीचा दिनांक : १६.०२.२०१०
अपिलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अपिलार्थीस माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी सदरील अपील सादर केलेले होते, पण अर्ज मिळाल्यानंतर सार्वत्रिक निवडणूकांमध्ये महापालिकेचा स्टाफ गुंतलेला असल्यामुळे वेळेत माहिती देणे शक्य झाले नाही. तसे अर्जदारास दि.२३ सप्टेबर २००९ रोजी कळविण्यात आले. अर्जदारास दि.२१ डिसेंबर २००९ रोजी पत्र लिहून माहिती घेऊन जाण्याचे सांगितले व अर्जदाराने प्रत्यक्षात दि.८.०१.२००९ रोजी प्रत्यक्ष उपस्थित राहून माहिती प्राप्त करुन घेतलेली आहे. कदाचित अर्जदाराचे दिलेल्या माहितीने समाधान झाले असल्यामुळे ते सुनावणीच्या वेळेस उपस्थित राहिले नसावे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १६.०२.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपीले.**

**मुमाआ २००९/४३६४५/अपील क्रं. ५३८२/०२**

**श्री. अन्सारी शाहीद अहमद,** **---------अपीलकर्ता**
**६०१, राबिया मंजिल, २ री घेलाभाई चाळ,**
**मदनपूरा, मुंबई - ४०० ००८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **--------- उत्तरवादी**
**प्राचार्य, अँटोनियो डिसूजा हायस्कुल, संत सावता मार्ग, भायखळा,**
**मुंबई - ४०० ०२७**

**जन माहिती अधिकारी**
**अँटोनियो डिसूजा हायस्कुल, संत सावता मार्ग, भायखळा,**

**मुंबई - ४०० ०२७**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २४ जुलै, २००९
सूनावणीचा दिनांक : १६.०२.२०१०
अपिलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदारास जन माहिती अधिकारी ऐंजा हायस्कूल, भायखळा यांच्याकडून गेल्या १० वर्षाच्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या जन्म तारखांच्या प्रमाणपत्रांच्या प्रती पाहिजे होत्या. ही माहिती देण्यासाठी रु.२५०० रुपये खर्च येईल असे सांगितले म्हणून अर्जदाराने आयोगाकडे अपील केलेले आहे. अर्जदाराने मागितलेली माहिती ही विस्तृत स्वरुपाची आहे जेणेकरुन प्रशासन व्यवस्थेवर अवाजवी ताण पडेल. अर्जदाराने ही माहिती मागतांना विवेक ठेवायला पाहिजे असे आयोगाचे मत आहे. शिवाय त्रयस्त व्यक्तिंची एवढी मोठी प्रमाणपत्रे इतरांस दिल्याने पालकांच्या तक्रारीसुध्दा येणे शक्य राहिल. तेव्हा अर्जदाराला माहितीची आवश्यकताच असल्यास त्यांनी विवक्षित माहिती मागावी म्हणजे ती शाळेला देता येणे शक्य होईल.

**आदेश**

**अपील अमान्य करण्यात येत आहे..**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १६.०२.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपीले.**

**मुमाआ २००९/४५५८८/अपील क्रं. ५३९६/०२**

**श्री. इंदर बहादूर शर्मा,** **---------अपीलकर्ता**
**१०, शर्मा चाळ, अंधेरी कुर्ला रोड,**
**कृष्णा नगर, मरोळ नाका, अंधेरी (पूर्व),**
**मुंबई ४०० ०५९**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी** **--------- उत्तरवादी**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई धर्मादाय भवन,**
**ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई ४०० ०१८**

**जन माहिती अधिकारी**

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई धर्मादाय भवन,**
**ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई ४०० ०१८**

**- विवेचन -**

अपीलाचा दिनांक : ३०.११.२००९
सूनावणीचा दिनांक : १७.०२.२०१०
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदारास हवी असणारी माहिती ही संबंधित ट्रस्टकडून मागविलेली आहे मात्र ती अजुनही अर्जदारास प्राप्त झालेली नाही तेव्हा जन माहिती अधिकारी यांना असे निर्देश देण्यात आले की त्यांनी संबंधित ट्रस्टच्या सेक्रेटरींकडून रेकॉर्ड मागऊन त्यांच्या कार्यालयात १५ दिवसात बोलऊन घ्यावे व ही माहिती कायद्यानुसार ट्रस्टने चॅरिटी कमिशनर कार्यालयास द्यावयाची आहे. ती त्यांनी स्वतः आणून सादर करावी. अशी माहिती प्राप्त झाल्या नंतर अर्जदारास हवी असणारी माहिती त्यांना देण्यात यावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १७.०२.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४४५९२/अपील क्रं. ५३९१/०२**

**श्री. अर्चना श्रीवास्तव,** ---------**अपीलकर्ता**
**६९, न्यूमला बाबासाहेब आंबेडकर रोड,**
**खार (प), मुंबई ५०**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** --------- **उत्तरवादी**
**उपनियंत्रक, शिधावाटप उपनियंत्रक शिधावाटप यांचे कार्यालय,**
**अ परिमंडळ, पुरवठा भवन, ५ वा मजला,**
**परेल, मुंबई १२**

**जन माहिती अधिकारी तथा**
**शिधावाटप अधिकारी १७/अ, उपनियंत्रक शिधावाटप यांचे कार्यालय,**
**अ परिमंडळ, पुरवठा भवन, ५ वा मजला,**
**परेल, मुंबई १२**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : १.१२.२००९
सूनावणीचा दिनांक : १७.०२.२०१०
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

सुनावणीच्या वेळेला अपिलीय अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन दिले.

" श्रीमती अर्जना श्रीवास्तव यांचे अपील या कार्यालयास दि.२१.०८.२००९ रोजी प्राप्त झाले असून, सदर अपीलाच्या अनुषंगाने दि.५.०९.२००९ रोजी अपीलाची सुनावणी ठेवण्यात आली होती. परंतु दि.५.०९.२००९ रोजी श्रीमती अर्चना श्रीवास्तव यांचेशी दूरध्वनीवरुन संपर्क साधला असता आपणास सुनावणीचे पत्र मिळाले नसल्याबाबत सांगितले. त्यामुळे पुन्हा दि. १८.०९.२००९ रोजी अपीलाच्या अनुषंगाने सुनावणी घेण्यात आलेली आहे.

सदर सुनावणीचे आदेश तयार करुन शिधावाटप का.क्र.१७/अ यांना देऊन माहिती आठ दिवसांत श्रीमती अर्चना श्रीवास्तव यांना विनामुल्य देण्यात यावी असे सुनावणीचे वेळी तसेच पत्राव्दारे कळविले असून श्रीमती अर्चना श्रीवास्तव यांना दि. १.१०.२००९ रोजी देण्यात सदर आदेशाच्या प्रती देण्यात येऊन त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेण्यात आली आहे.

कर्मचारी वर्ग विधानसभेच्या निवडणूकीच्या कामकाजात व्यस्त असल्यामुळे, सदर आदेश काढून संबंधीतास देण्यास विलंब झालेला आहे. तथापि जन माहिती अधिकारी तथा शिधावाटप अधिकारी, शिधावाटप का.क्र.१७/अ यांचेशी संपर्क साधला असता त्यांनी श्रीमती अर्चना श्रीवास्तव यांना माहिती दिली असल्याचे तसेच श्रीमती अर्चना श्रीवास्तव यांची पूर्ण माहिती मिळाली असलेबाबत स्वाक्षरी घेण्यात आलेली आहे.

अपिलार्थीने सुनावणीच्या वेळेला त्यांना २००० पेक्षा जास्त पृष्ठे माहिती ही विनामुल्य मिळाली असल्याचे सांगितले. अर्जदारास माहिती मिळाली असल्यामुळे पुढील आदेश देण्यात येतो.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १७.०२.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सी.आर./अपील क्रं. १५५६/०२**

**श्री. प्रशांत वसंतराव देशमुख,** ---------**अपीलकर्ता**
**१,गायत्री रो हाऊसेस,महाजन नगर,**
**इंद्रप्रस्थ कॉलनी, अतुल डेअरी समोर,**
**अंबड, नाशिक ४२२ ०१०**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी** --------- **उत्तरवादी**

**नाशिक एज्यूकेशन सोसायटी,**
**व्दारा पेठे विद्यालय, रविवार कारंजा,**
**नाशिक**

**जन माहिती अधिकारी**
**नाशिक एज्यूकेशन सोसायटी,**
**व्दारा पेठे विद्यालय, रविवार कारंजा,**
**नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २७.०७.२००९
सूनावणीचा दिनांक : २२.१२.२००९
अपिलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलिय प्राधिकारी : उपस्थित

अपिलार्थीनी दि.१३.०४.२००९ च्या अर्जान्वये शिपाई पदाच्या भरतीबाबत तसेच शिपाई पदांना विना अनुदानित शाळेतून अनुदानित शाळेत नेमणूक देण्याच्या पध्दतिबाबत एकूण १३ मुद्यांवर माहिती मागितली. या अर्जाला दि.२९.०४.२००९ च्या पत्रान्वये उत्तर देण्यात आले. परंतु प्राप्त उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि.९.०५.२००९ रोजी प्रथम अपील केले. यानंतर त्यांना माहिती न मिळाल्याने त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सादर केले की अपीलार्थींना संस्थेकडे उपलब्ध असलेली सर्व माहिती देण्यात आली आहे व तसे दिसूनहि येते याचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: १६.०२.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक : मुमाआ २००९/नाशिक/सी.आर अपील क्रं. १३४१/०२**

श्री.संजय भिका पाटील, ---------अपीलकर्ता
सा.धवल कार्यालय, म्यु.शॉप.नं.६,
शिवाजी रोड, दांडाईचा ता. शिंदखेडा,
जि.धुळे

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा --------- उत्तरवादी
जिल्हा शल्यचिकित्सक ,धुळे, ता.धुळे,जि.धुळे.

**जन माहिती अधिकारी**
**वैद्यकिय अधिक्षक, उपजिल्हा रुग्णालय,दोडाईचा,ता.शिंदखेडा,**
**ता.जि.धुळे**

## - वि वे च न -

अपीलाचा दिनांक : ०२.०६.२००९
सूनावणीचा दिनांक : ०७.१२.२००९
अपिलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलिय प्राधिकारी : उपस्थित

अपीलार्थी श्री.संजय भिका पाटील,यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२.०६.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नवीन प्रशाकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय, सभागृह, धुळे,येथे दि.०७.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलार्थी अनुपस्थित होते.

अपीलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १.१२.२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली १) अधिकारी कर्मचारी यांच्या कार्यालयीन वेळा काय आहेत २) स्थानिक असलेले व बाहेरगावावरुन येणारे-जाणारे अधिकारी कर्मचारी किती आहेत३) दवाखान्यातील भंगार विक्री. ४) शासनाकडून रुग्णालयास मिळालेला निधी ५) रुग्णालयात मोकळया जागेत फरशी बसविली त्याचा हिशोब इत्यादि माहिती मागितलेली होती.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि.१.०१.२००९ रोजी पत्राव्दारे एकूण ९ मुद्यांवर सविस्तर माहिती दिली आहे.

अपिलार्थीस काही शिल्लक राहिलेल्या मुद्यांची माहिती न मिळाल्याने दि.५.०३.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यावेळी प्रथम अपिली.य अधिकाऱ्यांनी दि.१५.०४.२००९ रोजी सुनावणी घेतली त्यावेळी वैद्यकिय क्षेत्रातील जिल्हा रुग्णालय धुळे उपजिल्हा रुग्णालय दोंडाईचा वगैरे रुग्णालयातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. त्यावेळी झालेल्या चर्चेत प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्या कार्यालयातील वैद्यकिय अधिकाऱ्यांची परस्पर माहिती देण्याचे सूचित केले त्याप्रमाणे प्रत्येक अधिकाऱ्यांनी अर्जदारास हवी असलेली माहिती दिली चर्चेअंती अपिलार्थीचे काही मुद्यांवर समाधान झाल्याचे दिसून आले. प्रस्तुत प्रकरणी जिल्हा शल्यचिकित्सक धुळे यांनी दि.७.०१.२००९ रोजी अपिलार्थीस माहिती संबंधी पत्रही दिले आहे.

काही मुद्यांची माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने व्दितीय अपील दाखल केले. परंतु सुनावणीच्या वेळी ते अनुपस्थित होते. प्रथम अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपिलार्थी हे सुनावणीस गैरहजर आहेत. मात्र त्यांच्या अपील मेमोवरुन असे दिसून येते की, जे कर्मचारी रुग्णालयाच्या मुख्यालयी न राहता बाहेरुन येजा करतात व वेळेत रुग्णालयात येत नाहीत, त्याचप्रमाणे दौडाईचा उपजिल्हा रुग्णालय वैद्यकिय अधिकारी हे मुख्यालयाच्या ठिकाणी थांबत नाहीत. यावर प्रशासकिय कारवाई व्हावी असे त्यांचे म्हणणे आहे. याबाबत सिव्हील सर्जन यांनी दखल घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे फरशी बसविण्याचे काम निकृष्ट दर्जाचे झालेले असल्याने त्या विषयी सुध्दा कारवाईची मागणी अपिलार्थीची आहे.याबाबत चौकशी करुन त्याचे निकर्ष अर्जदारास त्वरित कळविण्यात यावेत.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**
**सिव्हील सर्जन यांनी उपरनिर्दिष्ट कारवाई करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १६.०२.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. ५३९३/०२**

**श्री. अर्चना श्रीवास्तव,** ---------अपीलकर्ता
**६९, न्यूमला बाबासाहेब आंबेडकर रोड,**
**खार (प), मुंबई ५०**

विरुध्द

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** --------- उत्तरवादी
**कार्यकारी अभियंता, कार्यकारी अभियंता जी/उत्तर यांचे कार्यालय,**
**हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर (प), मुंबई २८**

**जन माहिती अधिकारी**
**कार्यकारी अभियंता जी/उत्तर यांचे कार्यालय,**
**हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर (प), मुंबई २८**

**- विवेचन -**

अपीलाचा दिनांक : १.१२.२००९
सूनावणीचा दिनांक : १७.०२.२०१०
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

वरील केसमध्ये प्रथम अपिलिय अधिकारी यांनी सुध्दा अर्जदाराने शुल्क भरुन अर्जदारास माहिती देण्यात यावी असे निर्देश दिलेले आहे. अर्जदारास हवी असणारी माहिती फारच व्यापक असल्यामुळे त्यांना असे सुचविण्यात येते की त्यांनी माहितीची पाहणी करावी व त्यांना हव्या असलेल्या माहितीची निवड करुन व त्यांचे शुल्क भरुन प्राप्त करुन घ्यावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १७.०२.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. ५३९४/०२**

**श्री. अर्चना श्रीवास्तव,** **---------अपीलकर्ता**
**६९, न्यूमला बाबासाहेब आंबेडकर रोड,**
**खार (प), मुंबई ५०**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **--------- उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता, कार्यकारी अभियंता जी/उत्तर यांचे कार्यालय,**
**हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर (प), मुंबई २८**

**जन माहिती अधिकारी**
**कार्यकारी अभियंता जी/उत्तर यांचे कार्यालय,**
**हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर (प), मुंबई २८**

**- वि वे च न** -

अपीलाचा दिनांक : १.१२.२००९
सूनावणीचा दिनांक : १७.०२.२०१०
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदारास श्री सुभाष अर्जुन बोराडे यांची बदली करण्यात आलेली आहे व त्यांच्या कार्यालयाने त्यांना कार्यमुक्त करावे एवढेच दि.६.०८.२००९ रोजीच्या पत्राने कळविलेले आहे पण दि.२३.११.२००९ रोजी सहायक आयुक्त तथा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जे निर्देश दिलेले आहेत त्याचे पालन झालेले दिसून येत नाही. त्यामुळे सात दिवसांच्या आत प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांच्या निर्देशाप्रमाणे माहिती देण्यात यावी. तसेच अपिलिय अधिकाऱ्यांच्या आदेशात किती मुदतीत माहिती द्यावी असे स्पष्ट होत नसेल तर जास्तीत जास्त एक महिन्याच्या आत माहिती देणे आवश्यकच होते. तसे न केल्याबद्दलचा खुलासा जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दहा दिवसात सादर करावा.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येतआहे.**
**जन माहिती अधिकारी यांनी उपरिनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १७.०२.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १५५७/०२**

**श्री. संतोष नामदेव पगारे** **-------अपीलकर्ता**
**एन४१/एसीडी/१/१५/६,**
**महाकाली चौक, चौथी स्किम,**
**सिडको, नाशिक ४२२ ००८**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी** **--------- उत्तरवादी**
**ना.ए.सोसायटी, व्दार पेठे विद्यालय, रविवार कारंजा,नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**मुख्याध्यापक, ना.ए.सोसायटी, व्दार पेठे विद्यालय, रविवार कारंजा,नाशिक**

## - वि वे च न -

अपीलाचा दिनांक : २७.०७.२००९
सूनावणीचा दिनांक : २२.१२.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

अपीलार्थीनी दि.२८.०३.२००९ च्या अर्जान्वये मागितलेल्या माहितीचा तपशील थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.

१) शाळेतील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची जन्म तारीख, पगार, पॉव्हिडंट फंडाचा लाभ, सेवापुस्तकाच्या झेरॉक्स प्रती. इत्यादि तपशील.

२) शिशुवृंद शाळेतील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचा पगार जन्म तारीख इत्यादि माहिती.

उपरोक्त माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी दि.२१.०५.२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यांना माहिती मिळाली नाही. यास्तव त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या तर्फे असे सादर करण्यात आलेकी अपीलार्थी वारंवार अर्ज करुन त्रास देत असतात. अपीलार्थीना माहिती पुरविलेली आहे तरी देखील त्यांचे अर्ज करणे सुरु आहे. याबाबत आयोगातर्फे असे स्पष्ट करण्यात येते की अर्जदाराला माहिती देणे अपेक्षित आहे ते वारंव०ार अर्ज करतात ही सबब माहिती न देण्यासाठी समर्थनीय ठरत नाही. प्रस्तुत प्रकरणी अपीलार्थीना माहिती देण्यात आलेली असल्याने खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १७.०२.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १५६८/०२**

**श्री. राजेंद्र विष्णुपंत भुजबळ** **-------अपीलकर्ता**
**१४०५,टाकसाळ लेन भद्रकाली, नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **--------- उत्तरवादी**
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प.नाश्कि**

**जन माहिती अधिकारी तथा**
**लेखा अधिकारी, वित्त विभाग, जि.प.नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २.०७.२००९
सूनावणीचा दिनांक : २२.१२.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

अपीलार्थींनी दि.०८.०४.२००९ च्या अर्जान्वये खालील मागिती मागितली.

१) अनुदान खर्च करण्यासाठी शासनाने १ वर्ष मुदतवाढ दिली असल्यास शासन निर्णयाची प्रत.

२) ३१ मार्च अखेर झालेल्या खर्चाच्या नोंदी.

माहिती न मिळाल्याने त्यांनी दि.११.०५.२००९ रोजी प्रथम अपील केले. यावर सुनावणी होऊन दि.१६.०६.२००९ रोजी आदेश पारित करण्यात आले त्यानुसार अपीलार्थींना दि.३१.०३.२००९ अखेर शिलकेची माहिती विनामुल्य पुरवावयाची होती. यानंतर माहिती अप्राप्त आहे या कारणासतव त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी आयोगास असे सांगण्यात आले की दि.१७.०६.२००९ रोजी अपीलार्थींना माहिती देण्यात आली आहे. याचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: १७.०२.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४४६१४/अपील क्रं. ५४२४/०२**

**श्री. मुकुंदराज व्ही. गुडीमेल्ला** -------- अपिलकर्ता
**रुम.नं.९५,गुरुकृपा सीएचएस,आंबेडकर चौक,**
**पंतनगर, घाटकोपर (पूर्व),**
**मुंबई ७५**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी** --------- उत्तरवादी
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, उच्चाधिकार समिती, गृहनिर्माण भवन,**
**५वा मजला,वांद्रे (पूर्व), मुंबई ५१**

**जन माहिती अधिकारी**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, उच्चाधिकार समिती, गृहनिर्माण भवन,**
**५वा मजला,वांद्रे (पूर्व), मुंबई ५१**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ४.१२.२००९
सूनावणीचा दिनांक : २३.०२.२०१०
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदारास त्यांच्या दि. १७ ऑगस्ट, २००९ रोजीच्या अर्जानुसार अपील क्रमांक ६७ए/०८ हया उच्चस्तरिय समितीपुढे असलेल्या अपीलाच्या संदर्भात काही माहिती पाहिजे होती. प्रकरण उच्चस्तरिय समितीच्या समोर असल्यामुळे ही माहिती देता येऊ शकली नाही. मात्र आता दोन दिवसात ही माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले व अपीलार्थीची त्यास सहमती आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**संबंधितांनी उपरिनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १७.०२.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४४६१३/अपील क्रं. ५४२३/०२**

**श्री. मनोहर र.राजगुरु** **-------- अपिलकर्ता**
**स्लम रिहॅाविलिटेशन सोसायटी,**
**(एन.जी.ओ.) स्वप्न साफल्य इमारत,**
**तळ मजला ए विंग,अी.पी.एस. III २५ वा रोड,**
**वांद्रे (प), मुंबई ५०**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी** **--------- उत्तरवादी**

**सहायक मनपा आयुक्त, एच/पश्चिम विभाग, सेट मार्टीन मार्ग, वांद्रे (प), मुंबई ५०**

**जन माहिती अधिकारी**
**सहायक मनपा आयुक्त, एच/पश्चिम विभाग, सेट मार्टीन मार्ग, वांद्रे (प), मुंबई ५०**

## - वि वे च न -

अपीलाचा दिनांक : ३०.११.२००९
सूनावणीचा दिनांक : २३.०२.२०१०
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदारास एच/प या विभागात विकास नियोजन आराखडयानुसार वेल्फेअर सेंटर म्हणून जे भूखंड आरक्षित करण्यात आलेले आहेत त्या वेल्फेअर सेंटरचे बांधकाम कोणी केले आहे व ते कोणत्या सामाजिक संस्थेला वापराकरिता दिले आहे काय किंवा कसे याबाबत माहिती पाहिजे होती.

अर्जदाराला माहिती देण्यात आली मात्र ती अपुर्ण वाटत असल्यामुळे केलेल्या प्रथम अपिलावर आदेश देतांना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपीलकारास आवश्यक असलेली माहिती पुनशःच प्रमुख अभियंता यांच्या कार्यालयात जाऊन व पुन्हा तपासणी करुन द्यावी असे निर्देश दिले होते. वास्तविक पाहता सुरवातीलाच हा अर्ज सहायक अभियंता (परिरक्षण) यांच्या ऐवजी सहायक अभियंता (वि.नि.) यांनी हाताळला असता तर ते जास्त चांगले झाले असते. अर्जदाराने जी आरक्षणे नमूद केलेली आहेत व त्यांचे पत्ते जे दिलेले आहे ते महापालिकेनेच प्रसिध्द केलेल्या पुस्तकाप्रमाणे आहे. त्यामुळे त्याबाबतचा खुलासा करुन घेण्याची आवश्यकता नाही. सहायक अभियंता (वि.नि.) एच/प विभाग यांना हा आदेश मिळताच सात दिवसांच्या आत अर्जदारास उर्वरित माहिती द्यावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**संबंधितांनी उपरिनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: २३.०२.२०१०**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ २००९/४४६१५/अपील क्रं. ५४२५/०२

श्री.महादेव आप्पा कदम -------- अपिलकर्ता
वरळी, बी.डी.डी. चाळ क्र.१० जवळ,
पीडब्ल्युडी कामगार वसाहत, पंपहाऊस,
डॉ.जी.एम.भोसले मार्ग, वरळी, मुंबई १८

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी --------- उत्तरवादी
संचालक, मुंबई विकास विभाग चाळी, (सा.बां.) विभाग,
वरळी, मुंबई १८

जन माहिती अधिकारी
व्यवस्थापक, मुंबई विकास विभाग चाळी, (सा.बां.) विभाग,
वरळी, मुंबई १८

## - विवेचन -

अपीलाचा दिनांक : ०४.१२.२००९
सूनावणीचा दिनांक : २३.०२.२०१०
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदार व श्रीयुत महादेव आप्पा कदम व त्यांचे चिरंजीव श्रीयुत सुनिल महादेव कदम यांनी माहितीच्या अधिकाराखाली प्रत्येकी ५ अर्ज करुन श्रीयुत गोपाळ सोमा गुरव यांनी बी.डी.डी. चाळ क्षेत्रात केलेल्या बांधकामाबाबतची माहिती विचारली होती. दिलेल्या माहितीने समाधान न झाल्यामुळे त्यानी व्दितीय अपील सादर केले. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यानी पुढीलप्रमाणे निवेदन केलेले आहे.

"अपीलार्थी महादेव आप्पा कदम यांनी अपील अर्जात नमूद केलेल्या विषयाबाबत आजपर्यंत या कार्यालयाकडे सादर करण्यात आलेल्या सर्वच अर्जांना या कार्यालयाने वेळोवेळी उत्तरे व कागदपत्रे दिलेली आहेत. अपीलार्थी मागीत असलेली माहिती ही फार जुनी असल्याने तसेच या कार्यालयापुकडे पुरेसा कर्मचारी वर्ग नसल्याने माहिती शोधून ती पुरविण्यास काही प्रमाणात विलंब झाला परंतु ती लपविण्याचा किंवा ती न पुरविण्याचा कोणताही हेतू नव्हता व नाही.

श्री.महादेव आप्पा कदम तसेच त्यांचे चिंरजीव श्री.सुनिल महादेव कदम यांनी आजपर्यंत सादर केलेले अर्ज व त्यांना या कार्यालयाकडून देण्यात आलेली उत्तरे याची सुची व त्यांच्या छायाकित प्रती या सोबत आपल्या अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहेत. त्यांना पुरविण्यात आलेली माहिती योग्य नाही वती चुकीची आहे असे त्यांनी या कार्यालयास अर्जाव्दारे कळविल्याने त्यांच्याकडे कोणती योग्य माहिती उपलब्ध आह हे या कार्यालयास जाणुन घ्यावयाचे असून ती या कार्यालयास सादर करावी. असे या कार्यालयाचे पत्र क्र.ईव्हिएन/मा.अ./७४९/२०१० दिनांक ११.०२.२०१० अन्वये कळविण्यात आलेले आहे. परंतु त्यांचेकडे अध्याप तसे काहीही उत्तर देण्यात आलेले नाही यावरुन दिसून येईल की, या कार्यालयाने माहिती पुरवितांना कोणतीही लपवा छपवी किंवा टाळाटाळ केलेली नाही."

अर्जदारास कोणती माहिती मिळाली नाही असे विचारले असता त्याची तक्रार त्यांनी बांधकाम दुरुस्तीच्या परवानगीच्या पेक्षा जास्त पक्के बांधकाम केल्याची तक्रार केली होती. तशी सर्वकश चौकशी अजून झाली नाही व माहिती देण्यात आली नाही अशी तक्रार सांगितली. माहितीचा अधिकार अधिनियमान्वये अस्तित्वात असलेल्या कागदपत्रांच्या प्रती देण्यात येत असतात. मात्र नागरिकांनी केलेल्या तक्रारीची दखल घेणे हे तेवढेच आवश्यक असते. त्यानुसार चौकशीची दखल घेऊन जे चौकशीचे निष्कर्श असतील त्याच्या प्रती एक महिन्याच्या आत अर्जदारास देण्यात याव्यात.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**संबंधितांनी उपरिनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: २३.०२.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४५८८२/अपील क्रं. ५४२८/०२**

**श्री.राजेश हिरालाल मर्चंट** **-------- अपिलकर्ता**
**७१-४, गांधी नगर, दैनिक शिवनेर मार्ग,**
**वरळी, मुंबई १८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी** **--------- उत्तरवादी**
**सहायक मनपा आयुक्त, जी/उत्तर विभाग यांचे कार्यालय,**
**हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर (प),मुंबई १८**

**जन माहिती अधिकारी**
**सहायक मनपा आयुक्त, जी/उत्तर विभाग यांचे कार्यालय,**
**हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर (प),मुंबई १८**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक :१८.१२.२००९
सूनावणीचा दिनांक : २३.०२.२०१०
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदारास पुढील माहिती पाहिजे होती.

"मालमत्ता क्र.GN-6238 (2A) 162 BA

मालमत्ता क्र.GN-6238 (2AB) 162 BA

मालमत्ता क्र.GN-6238 (2AA) 162 BA

धारावी रोड.येथील असलेली वरील मालमत्तेच्या संबंधी फाईलचे परिक्षण करुन आवश्यक असलेल्या कागदपत्राची प्रति मिळणे संबंधी आहे. "

सुनावणीच्या वेळी हे स्पष्ट झाले की अर्जदाराने सर्व नस्त्यांचे निरिक्षण करुन त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करुन घेतलेल्या आहेत.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २३.०२.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४५२२८/अपील क्रं. ५४२९/०२**

**श्री.आनंदराव बबनराव गावडे** **-------- अपिलकर्ता**
**मु.पापळवाडी, पो.चास-कमान,ता.खेड,**
**जि.पुणे**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी** **--------- उत्तरवादी**
**सांस्कृतिक कार्य व पर्यटन विभाग, मंत्रालय,**
**मुंबई ३२**

**जन माहिती अधिकारी**
**सांस्कृतिक कार्य व पर्यटन विभाग, मंत्रालय,**
**मुंबई ३२**

**- वि वे च न -**

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक : १२.११.२००९
सूनावणीचा दिनांक : २३.०२.२०१०
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदाराने क्रांतीवीर शिवराम हरी राजगुरु चित्रपटाच्या डी.व्ही.डी.बाबतचा सहसंचालक दादासाहेब फाळके चित्रनगरी गोरेगांव, मुंबई यांनी दिलेल्या अहवालाची प्रत व अहवालच्या अनुषंगाने पुढील कारवाई संबंधीची माहिती मागितली होती.

अर्जदारास असे कळविण्यात आले की सदरील चित्रपट अनुदानाबाबत सचिव सांस्कृतिक कार्य यांचा लवाद नेमण्यात आला असल्यामुळे प्रकरणी लवादापुढे असल्याने अधिनियमाच्या ८ (अ) (झ) नुसार आपण मागितलेली माहिती उपलब्ध करुन देणे शक्य नाही. प्रथम अपिलाच्या सुनावणीचे पत्र अर्जदारास उशीरा मिळाले त्यामुळे ते सुनावणीस हजर राहूशकले नाही व प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी आदेशही न दिल्यामुळे अर्जदाराचे व्दितीय अपील आयोगाकडे आलेले आहे. सुनावणीच्या वेळेला असे सांगण्यात आले की अहवालावर निर्णय घेण्यासाठी प्रकरण लवादामडे सोपविण्यात आले होते. पण आता नवीन परिक्षण समितीकडून पुन्हा अहवाल मागविण्यात येत आहे व नस्ती मुख्यमंत्र्यांकडे सादर केली आहे. कुठच्याही प्रकरणात चौकशी अहवाल हा एक भाग असतो व अहवालावर करावयाची कारवाई हा दुसरा भाग असतो. अहवालावर निर्णय घेण्यास बराच कालावधी लागत आहे असे दिसते. तेव्हा मूळअहवालाच्या प्रती ही अर्जदारास देण्यात याव्यात व अंतिम निर्णय झाल्यावर त्यासंबंधात अर्जदारास कळविण्यात यावे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**जन माहिती अधिकारी यांनी उपरिनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: २३.०२.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १५८९/०२**

**श्री. पंढरीनाथ बाबूराव बोडके** **---------अपीलकर्ता**
**मु.मोह,पो.चिंचोली, ता.सिन्नर,**
**जि.नाशिक.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **--------- उत्तरवादी**
**अप्पर पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण, नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कार्यालय अधीक्षक, अप्पर पोलीस अधीक्षक नाशिक**
**ग्रामीण यांचे कार्यालय**
**नाशिक.**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २०.०८.२००९
सूनावणीचा दिनांक : २२.१२.२००९

अपिलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

अपीलार्थीनी दि.०९.०२.२००९ च्या अर्जान्वये खालील पत्रांच्या छायांकित प्रतींची मागणी केली.

१) उप विभागीय पोलीस अधिकारी यांचे दि.२१.०७.२००५ चे पत्र.

२) उप विभागीय पोलीस अधिकारी यांचे पत्र दि.२७.०९.२००५ चे पत्र.

३) पोलीस अधिक्षक,नाशिक ग्रामीण यांचे पत्र दि.२२.०६.२००५.

४) पोलीस अधिक्षक,नाशिक ग्रामीण यांचे पत्र दि.१६.०७.२००५.

या अर्जाच्या अनुषंगाने दि.१३.०३.२००९ च्या पत्रान्वये अपीलार्थींना असे कळविण्यात आले की महाराष्ट्र पोलीस नियमावली सन १९९९-भाग-दोन नियम २६२, उपरिनिर्दिष्ट १५ मध्ये नमूद तरतूदीनुसार अर्जासंबंधीचा अभिलेख जतन करण्याचा कालावधी दोन वर्षाचा असल्याने आपण मागितलेला अभिलेख दि.१९.०५.२००८ रोजी नाश करण्यात आला आहे.

या उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि.३०.०१.२००९ रोजी प्रथम अपील केले. यावर सुनावणी होऊन दि.२९.०५.२००९ रोजी आदेश पारित करण्यात आले व प्रथम अपील अर्ज निकाली काढण्यात आला.

यावर व्यथित होऊन त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. व्दितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सादर केले की अभिलेख नियमानुसार २ वर्षाच्या मुदतीनंतर नाश करण्यात आला आहे. ही बाब विचारात घेऊन खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: १७.०२.२०१०**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

**मुमाआ २००९/४५८७७/अपील क्रं. ५४३८/०२**

**श्री.श्रीरंग मोतीराम कानडे** -------- **अपिलकर्ता**
**डी-०१, साई आकृती सी.एच.एस.लि.,**
**खांबदेव नगर, धारावी, मुंबई १७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** --------- **उत्तरवादी**
**वित्त नियंत्रक, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व),**
**मुंबई ५१**

**जन माहिती अधिकारी**
**लेखा अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व),**
**मुंबई ५१**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : १७.१२.२००९
सूनावणीचा दिनांक : २४.०२.२०१०
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

अर्जदार श्री.श्रीरंग मोतीराम कानडे यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये दि.७.०८.२००९ व दि.१२.०८.२००९ हे दोनही अर्ज अनुक्रमे दि.२०.०८.२००९ व दि.२२.०८.२००९ रोजी राज्य जन माहिती अधिकारी यांचेकडे प्राप्त झाले. दि.७.०८.२००९ च्या अर्जान्वये संबंधित अर्जदाराने सन १९९६ ते २००९ या कालावधीत सर्व सोसायटीची खालील बाबीवरील माहिती उपलब्ध करुन देणेबाबत कळविले होते.

Maintenance Deposit to Societies

1. Amount credited to Societies
2. Amount Deposited in Co.Op.Bank as circular
3. Amount Deposited in other Banks
4. Rate of Interest payable to Societies
5. Rate of interest received from other banks where deposits have been deposited.

तसेच दि.१२.०८.२००९ च्या अर्जान्वये सन १९९६ ते २००९ या कालावधीतील सर्व सोसायटयांचे टीडीएस वजाती रकमांचा तपशील उपलब्ध करुन देणेबाबत कळविले होते.

उपरोक्त अर्जाच्या अनुषंगाने अर्जदार श्री.कानडे यांनी ज्या को.ऑप.सोसायटीची माहिती मागितली त्या सोसायटीचा तपशील दिला नसल्याने त्या अर्जदारास दि.९.०९.२००९ च्या पत्रान्वये कार्यालयात वैयक्तिक संपर्क/उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. त्या अनुषंगाने अर्जदार कार्यालयात उपस्थित झाल्यानंतर त्यांना कोणत्या सोसायटींची माहिती आवश्यक आहे. याबाबत विचारणा केली असता, प्राधिकरणाकडील सर्व सोसायटीची माहिती उपलब्ध करुन देणेबाबत त्यांनी सांगितले. परंतु अशा स्वरुपाची माहिती ठेवली जात नसल्याने, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ प्रकरण-१,अ.क्र.(च)मध्ये समाविष्ट होत नसल्याने सदरची माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. असे दि.२२.१०.२००९ च्या पत्रान्वये कळविण्यात आले. या उपरोक्त अर्जदार यांची दि.१८.११.२००९ रोजी प्राधिकरणाकडे व अपिल अधिकारी यांचेकडे दि.१९.११.२००९ रोजी प्राप्त झालेल्या अपिल अर्जास अनुसरुन दि.१९.११.२००९ च्या पत्रान्वये दि.१.१२.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली. अपिलार्थी यांनी अर्जान्वये जन माहिती अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेकडे झापडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणांतर्गत पुर्ण झालेल्या व मेटेनन्स डिपॉझिटवरील व्याज दिले व त्यावर टिडीएस किती कपात केली याची मागणी केली असल्याचे सांगितले. त्यांचे म्हणणे विचारात घेऊन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ प्रकरणी क्र.१.क्र.२(च) मधे समाविष्ट नसल्याने सदरची माहिती उपलब्ध करुन देता येत नाही, व आपल्या पत्रात नमूद केल्यानुसार माहिती या कार्यालयात ठेवण्यात आलेली नाही असे दि.३.१२.२००९ अन्वये संबंधित अर्जदारास कळविण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांचेकडून मूळ माहिती देण्यास विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंब झालेला नाही.

प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांकडून प्रथम अपिलावर अपिलार्थीस त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देऊन स्वयंस्पष्ट आदेश काढण्यास अपील कार्यालयास मिळाल्यापासून ३० दिवसांपेक्षा जास्त कालावधी लागलेला नाही. अपिलातील मुद्यांवर लेखी खुलासा अपिलार्थी श्री.कानडे यास प्राधिकरणाच्या पत्र दि.२३.०२.२०१० अन्वये पाठविण्यात आला.

अपीलार्थीचे प्रथम अपील फेटाळण्यात आले त्यामुळे त्यांनी व्दितीय अपील सादर केले. जर प्रत्येक झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी एस.आर.ए. व सोसायटी यांचे संयुक्त अकाऊंट काढून व्याज सोसायटीला देण्याची पध्दत अमलात आणली

जात नसली व सर्व रक्कम एकत्र स्वरुपात इनव्हेस्टमेंट करुन प्रो रेटा बेसिसवर व्याजाची रक्कम संबंधीत संस्थेला वितरित करण्यात येत असे, असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले इनव्हेस्टमेंट करण्याची जी पध्दत असेल त्या पध्दतीची माहिती अर्जदारास देण्यात यावी तसेच गेल्या काही वर्षामध्ये या पध्दतीने इनव्हेस्टमेंट झाल्यानंतर ॲव्हरेज रेट ऑफ इंट्रेस्ट काय याचीही माहिती अर्जदारांना देण्यात यावी. तसेच अर्जदार सोसायटीच्या बाबतीत सोसायटीला दिलेल्या व्याजाच्या रकमेची माहिती सुध्दा देण्यात यावी असे निर्देश देण्यात आले.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**जन माहिती अधिकारी यांनी सात दिवसांच्या आत उपरिनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २४.०२.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४५८६४/अपील क्रं. ५४४२/०२**

**श्री.राजन पांडूरंग पारकर** -------- **अपिलकर्ता**
**दिनानाथ महादेव टेंभेकर, ब-१२,**
**कपोळ सोसायटी मारविया भवन, व्हि.एल.मल्होत्रा रोड,**
**जूहू स्किम पार्ले (प), मुंबई ४९**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी** --------- **उत्तरवादी**
**मुख्य अधिकारी, कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पुर्व), मुंबई ५१**

**जन माहिती अधिकारी**
**कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पुर्व),**
**मुंबई ५१**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : १४.१२.२००९
सूनावणीचा दिनांक : २४.०२.२०१०
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

अर्जदार यांना इतर सर्व माहिती देण्यात आलेली आहे. अर्जदारास घुसखोरांवर कारवाई करण्यासाठी म्हाडाचे अधिकाऱ्यांनी काय करणार याची माहिती पाहिजे आहे. यासंदर्भात घुसखोरांविरुध्द म्हाडा कारवाई करणार असे वृत्तपत्रात छापून आले होते म्हणून ही माहिती पाहिजे आहे असे अर्जदाराचे म्हणणे आहे. यासंदर्भात म्हाडाने घेतलेल्या निर्णया संबंधीची जे काय कागदपत्र असतील ते कागदपत्र १५ दिवसांच्या आत प्राप्त करुन घेऊन अर्जदाला देण्यात यावीत असे निर्देश देण्यात आले.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**संबंधीतांनी उपरिनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: २४.०२.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४५८६७/अपील क्रं. ५४४/०२**

**श्री.रमेश एस.मिरचंदानी** **-------- अपिलकर्ता**
**३३१, शाहनानी कॉलनी, मुलुंड (पू),**
**मुंबई ८१**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी** **--------- उत्तरवादी**
**उपमुख्य अभियंता, पूर्व उपनगरे (इ/प्रस्ताव),**
**राज लॅगशी जवळ, पेपर मिल कंपाऊंड, एल.बी.एस.मार्ग, विक्रोळी (प),**
**मुंबई ८३**

**जन माहिती अधिकारी**
**पूर्व उपनगरे (इ/प्रस्ताव),**
**राज लॅगशी जवळ, पेपर मिल कंपाऊंड, एल.बी.एस.मार्ग, विक्रोळी (प),**
**मुंबई ८३**

**- वि वे च न -**

अपील प्रापत झाल्याचा दिनांक : १०.१२.२००९
सूनावणीचा दिनांक : २४.०२.२०१०
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदारास सी.टी.एस. क्रमांक ११०८,११८/१ ते ८ व्हिलेज चेंम्बुर येथे असलेल्या इमारतीतील फ्लॅट क्रमांक १,२ व ३ प्लॉट क्रमांक १९१ मध्ये काही स्ट्रक्चरल बदल करण्यात आले किंवा कसे याची माहिती पाहिजे होती. यासंबंधीच्या बांधकामाचे नकाशे उपलब्ध होत नसल्यामूळे याबाबत कुठचेही व्हेरिफीकेशन करण्यात आलेले नाही. त्यामुळे काही माहिती देऊ शकत नाही. तसेच सहायक अभियंता (इ/का)/एम (प) वार्ड यांच्या कार्यालयात जी माहिती उपलब्ध असेल ती माहिती अर्जदारास देण्यात

यावी असे सांगितले. सहायक अभियंता (प) वार्ड यांना अर्जदाराने या अगोदरच अर्ज दिला होता व त्यांनी सुध्दा ओरीजनल प्लॅन उपलब्ध नसल्यामुळे स्ट्रक्चरल चेंजेस झाले किंवा नाही याची माहिती देऊ शकत नाही असे कळविण्यात आलेले आहे. थोडक्यात अर्जदाराच्या मूळ तक्रारीबाबत वार्ड ऑफीस व कार्यकारी अभियंता इमारत प्रस्ताव विभाग यात टोलवाटोलवी चालू आहे. जन माहिती अधिकारी कार्यकारी अभियंता इमारत प्रस्ताव यांनी त्यांच्या अहवालामध्ये त्यांच्या कार्यालयातर्फे सदर इमारती विषयक धारणीचा शोध घेण्यात येत असून उपलब्ध झाल्यास त्याप्रमाणे अर्जदारास कळविण्यात येईलअसे म्हटले आहे. हा शोध एक महिन्याच्या आत पुर्ण करुन अर्जदारास माहिती देण्यात यावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**संबंधीतांनी उपरिनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २४.०२.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४५८६८/अपील क्रं. ५४४१/०२**

**श्री.रमेश एस.मिरचंदानी** -------- **अपिलकर्ता**
**३३१, शाहनानी कॉलनी, मुलुंड (पू),**
**मुंबई ८१**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी** --------- **उत्तरवादी**
**पोलीस उपायुक्त, पोलीस आयुक्त परि-६, चैंबुर, मुंबई ७१**

**जन माहिती अधिकारी**
**स्सहायक पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक नियंत्रण कक्ष, चैंबुर, मुंबई ७१**

**- वि वे च न -**

अपील प्रापत झाल्याचा दिनांक : १०.१२.२००९
सूनावणीचा दिनांक : २४.०२.२०१०
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदारास त्यांच्या ट्रस्टच्या प्रॉपर्टीमध्ये भाडेकरु व पोट भाडेकरु यांच्याबाबत केलेली तक्रार या बाबतची माहिती पाहिजे होती. याबाबतची कुठचीही माहिती ही जन माहिती अधिकाऱ्यांकडे व पोलीस स्टेशनला उपलब्ध नाही कारण ट्रस्टने याबाबत अपील ऑथरटींना काही कळविले नाही असे सांगून अर्जदारास ट्रस्टकडूनच ही माहिती घेण्याचा सल्ला देण्यात आलेला आहे. त्या विरुध्द सदरचे अपील.

सदरील पेनंटच्याबाबतीत पोलीस स्टेशनच्या रेकॉर्डला कुठचीही माहिती नसल्यामुळे ती देता येत नाही हे म्हणने सयुक्तिक वाटते. जी माहितीच अस्तित्वात नाही ती माहिती देता येणार नाही. संबंधीत इमारतीमध्ये पोटभाडेकरु राहत आहेत. त्यांच्या विरुध्द काही कारवाई होत नाही असे अर्जदारास वाटत असेलतर त्यांनी संबंधीत प्राधिकरणाकडेच याची दाद मागावी हे जास्त योग्य राहिल.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २४.०२.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १५५८/०२**

**श्री. मोहनसिंह नारायणसिंह परदेशी,** ---------**अपीलकर्ता**
**एन३२/एन१/२३-३, सिडको,**
**नाशिक ४२२ ००९**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** --------- **उत्तरवादी**
**प्रादेशिक व्यवस्थापक, म.राज्य मार्ग परिवहन महामंडळ**
**विभागीय कार्यालय, एन.डी.पटेल रोड,**
**नाशिक ४२२ ००१**

**जन माहिती अधिकारी तथा**
**म.राज्य मार्ग परिवहन महामंडळ**
**विभागीय कार्यालय, एन.डी.पटेल रोड,**
**नाशिक ४२२ ००१**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : १३.०७.२००९
सूनावणीचा दिनांक : २२.१२.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

अपीलार्थींनी दि.२०.०३.२००९ च्या अर्जान्वये महामंडळातर्फे विद्यार्थी व नोकरदारांना देण्यात येणाऱ्या सवलतीच्या दराच्या पासबाबत माहितीची मागणी केली. त्यांना,पासचा मासिक/त्रैमासिक/वार्षिक दर,पास कोणत्या बसच्या प्रवासासाठी असतो, पाससाठी कोणत्या कार्यालयाशी संपर्क साधावा इत्यादि माहिती अपेक्षित होती.

दि.३.०४.२००९ च्या पत्रान्वये त्यांना असे कळविण्यात आले की त्यांना हवी असलेली माहिती आगाराच्या कार्यालयातून शुल्क भरुन घेऊन जावी. तदनंतर त्यांना दि.७.०४.२००९ च्या पत्रान्वये सविस्तर उत्तर देण्यात आले. परंतु

दरम्यानच्या काळात दि.२८.०३.२००९ रोजी त्यांनी प्रथम अपील दाखल केले. यावर सुनावणी झाली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे  व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की अपीलार्थींना माहिती पुरविण्यात आली आहे. अपिलार्थीने सुध्दा माहिती मिळाली असल्याचे सांगितले. याचा विचार करुन खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १७.०२.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १५६७/०२**

**श्री. राजेंद्र विष्णुपंत भुजबळ,** **---------अपीलकर्ता**
**१४०५,टाकसाळ लेन, भद्रकाली,**
**नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **--------- उत्तरवादी**
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जि.प. नाशिक**

**जन माहिती अधिकारी**
**वित्त विभाग, जि.प. नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ०२.०७.२००९
सूनावणीचा दिनांक : २२.१२.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

अपीलार्थींनी दि.०१.०४.२००९ च्या माहिती अर्जाव्दारे योजनानिहाय खर्चाच्या कॅश्‍बुकाच्या ३१ मार्च अखेरच्या शेवटच्या पृष्ठाच्या साक्षांकित प्रतींची मागणी केली.

उपरोक्त माहिती न मिळाल्याने त्यांनी दि.२.०५.२००९ रोजी प्रथम अपील केले. प्रथम अपीलावर दि.१६.०६.२००९ रोजी सुनावणी झाली व त्यानुसार अपिलार्थींना माहिती देण्याबाबतचे आदेश पारित करण्यात आले. तथापि माहिती मिळू न शकल्याने त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर दिलेल्या निवेदनावरुन असे दिसते की दि.१७.०६.२००९ रोजी अपीलार्थींना माहिती देण्यात आलेली आहे. अपीलार्थींना माहिती मिळाली असल्याने सदर प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**

**दिनांक: १७.०२.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १६१३/०२**

**श्री. गोविंद पर्वतराव मोरे,** **---------अपीलकर्ता**
**२ रा पर्व, आनंद नगर,सोयगाव,**
**ता.मालेगांव,जि. नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **--------- उत्तरवादी**
**शिक्षण संचालनालय (माध्यमिक) पुणे**

**जन माहिती अधिकारी**
**शिक्षण संचालनालय (माध्यमिक) यांचे कार्यालय,**
**पुणे**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २०.०८.२००९
सूनावणीचा दिनांक : २२.१२.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

अपीलार्थींनी दि.२६.०५.२००९ च्या अर्जाव्दारे शिक्षण उपसंचालक, नाशिक यांनी दि.१८.०५.२००९ रोजी शिक्षण संचालनालय,पुणे यांच्याकडे पाठविलेल्या प्रस्तावावर केलेल्या कार्यवाही विषयी मागणी केली. याचप्रमाणे खाजगी शाळेतील सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन मंजूर करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याबाबत माहिती मागणी केली.

माहिती अर्जाला उत्तर प्राप्त न झाल्याने त्यांनी दि. ८.०६.२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यांना माहिती मिळू शकली नाही. यास्तव त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी उत्तरवादी गैरहजर होते. अपीलार्थींनी आयोगाकडे केलेल्या कथनानुसार त्यांना अद्यापही माहिती मिळालेली नाही. याचा विचार करता असे निर्देश देण्यात येतात की अपीलार्थींनी मागितलेली माहिती सदर आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत विनाशुल्क पुरविण्यात यावी व तसे केल्याचा अहवाल आयोगास सादर करावा. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी दोघेही व्दितीय अपीलावरील

सुनावणीसाठी गैरहजर आहेत तेव्हा गैरहजेरीबाबत जन माहिती अधिकारी यांनी त्यांचा खुलासा प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या मार्फत आयोगास सादर करावा.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १७.०२.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १५७५/०२**

**श्री.सुधाकर आर.जाधव, ---------अपीलकर्ता**
**एन ४१/जे-ए/०३/१२/०१,सावता नगर,**
**४ थी स्किम, नवीन सिडको, नाशिक ४२२ ००८**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा --------- उत्तरवादी**
**गट विकास अधिकारी, पं.स.येवला,**
**जि.नाशिक**

**जन माहिती अधिकारी**
**गट विकास अधिकारी, पं.स.येवला,**
**जि.नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ०८.०६.२००९
सूनावणीचा दिनांक : २२.१२.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

अपीलार्थींनी दि.१.११.२००८ च्या अर्जाव्दारे येंवला तालुक्यातील सेवानिवृत्त मुख्याध्यापकांच्याबाबतीत सन १९९४ पासूनच्या पुढील कालावधीची माहिती मागितली.

१) मुख्याध्यापकांचे नाव

२) पत्ता

३) दूरध्वनी क्रमांक.

४) श्री.तुलसीराम आवडू सूर्यवंशी यांच्या सेवा पुस्तिकेची छायाप्रत. इत्यादि

उपरोक्त माहिती न मिळाल्याने त्यांनी दि.१८.१२.२००८ रोजी प्रथम अपील केले यावर सुनावणी होऊन दि.२३.०३.२००९ च्या आदेशान्वये त्यांचा अर्ज निकाली काढण्यात आला. याव्दारे त्यांना असे कळविण्यात आले की श्री.सूर्यवंशी यांचे मूळ सेवा पुस्तक आढळून न आल्याने त्याची छायांकित प्रत देता येत नाही.

या उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. श्री. सुर्यवंशी सेवा निवृत्त झालेले आहेत. सेवा पुस्तकाच्या अभावी जर त्योचे पेन्शन पेपर्स तयार करुन त्यांना पेन्शन मिळणे अडून राहिले असेल तर श्री.सुर्यवंशी

यांचे सेवापुस्तक त्याचेकडे व कार्यालयात असलेल्या माहितीवरुन Reconstruct करण्यात यावे व त्याची प्रत अर्जदारास देण्यात यावी. मात्र पेन्शन मिळावयास सुरवात झाली असेल तर असे Reconstruct करण्याची आवश्यकता नाही. सेवापुस्तक Reconstruct करावयाचे आवश्यक असल्यास ती कारवाई ४५ दिवसात पुर्ण करुन अर्जदारास आवश्यक ती माहिती द्यावी. सबब खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**संबंधीतांनी उपरिनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २५.०२.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १५४७/०२**

**श्री.धर्मराज दत्तात्रय शिरसाट** **---------अपीलकर्ता**
**घर नं. ४४०५, देशपांडे गल्ली,**
**येवला, जि. नाशिक ४२३ ४०१**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **---------- उत्तरवादी**
**शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प.नाशिक**

**जन माहिती अधिकारी**
**मुख्याध्यापक एन्झो केम हायस्कूल, येवला,जि. नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २९.०७.२००९
सूनावणीचा दिनांक : २२.१२.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

अपीलार्थीनी दि.२४.०३.२००९ च्या अर्जान्वये एन्झोकेम हायस्कूल व श्रीमान गंगाराम छबिलदास शेठ उच्च माध्यमिक विद्यालय, येवला या शाळांच्या सन २००६ ते २००८ या कालावधीच्या शिक्षकांच्या मान्यचतेची सूची व अनुषंगिक माहिती मागितली.

उपरोक्त माहिती कोणत्या कारणास्तव हवी आहे याबाबत जन माहिती अधिकारी यांनी दि.२१.०४.२००९ च्या पत्रान्वयचे अपीलार्थीकडे विचारणा केली. तद्नंतर दि.४.०५.२००९ रोजी अपीलार्थीनी प्रथम अपील दाखल केले. तथापि त्यांना माहिती मिळाली नाही. यास्तव त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी आयोगाच्या निदर्शनास आणण्यात आले की अपीलार्थीनी मागितलेली माहिती तयार आहे. अपीलार्थीना ती देण्यात आली होती परंतु ती त्यांनी स्विकारली नाही. याचा विचार करुन असे निदेश देण्यात येतात की अपीलार्थीना त्वरीत माहिती देण्यात यावी. यासाठी शुल्क आकारण्यात येऊ नये. तसेच दिलेली माहिती अपीलार्थीनी स्विकारावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २५.०२.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १६०८/०२**

**श्री.गोविंद पर्वतराव मोरे,** **---------अपीलकर्ता**
**रेश-पूर्व आनंद नगर, सोयगांव,**
**ता.मालेगांव, जि. नाशिक.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **--------- उत्तरवादी**
**शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हापरिषद, नाशिक,जि.नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**मुख्याध्यापक, गो.य.पाटील,माध्य व उच्च माध्य.विद्यालय,**
**जळगांव (नि), ता.मालेगांव, जि.नाशिक.**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २०.०८.२००९
सूनावणीचा दिनांक : २२.१२.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

अपीलार्थींनी दि.२.०६.२००९ च्या अर्जाव्दारे .श्री.गो.प.मोरे (स्वत: अपीलार्थी) यांच्या ग.वि.योजनेबाबतच्या प्रलंबित प्रकरणाची माहिती मागितली.

माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.२५.०६.२००९ रोजी अपीलार्थींना उत्तर देण्यात आले. परंतु दिलेली माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे या सबबीखाली त्यांनी दि.८.०७.२००९ रोजी प्रथम अपील केले. परंतु त्याला प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे निदर्शनास आले की अपीलार्थींना माहिती पुरविण्यात आली आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: २५.०२.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १५५५/०२**

**श्री.रमेश कचरु शेलार,** ---------अपीलकर्ता
**महात्मा फुले चौक, ओझर (मिग),**
**ता.निफाड, जि.नाशिकं**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** --------- उत्तरवादी
**उपसंचालक, भुमी अभिलेख, नाशिक प्रदेश नाशिक यांचे कार्यालय,**
**नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उपसंचालक, भुमि अभिलेख, नाशिक,जि.नाशिक.**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ११.०७.२००९
सूनावणीचा दिनांक : २२.१२.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

अपीलार्थीनी दि.१७.०४.२००९ च्या अर्जाव्दारे खालील माहिती मागितली .

"श्री. दौलत कचरु शेलार,श्री.रतन कचरु शेलार व श्री.सुभाष कचरु शेलार यांनी दि. १७.०४.२००९ यांनी दाखल केलेल्या तातडीच्या अर्जावर झालेल्या कार्यवाहीचा तपशील. "

उपरोक्त अर्जाला दि.१८.०४.२००९ रोजी खालीलप्रमाणे उत्तर देण्यात आले.

"काहीही कार्यवाही झालेली नाही. "

या उत्तराने व्यथित होऊन त्यांनी दि.२२.०५.२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यांना माहिती न मिळाल्याने त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी आयोगास उत्तरवादींतर्फे सादर करण्यात आले की अपीलार्थीना माहिती पुरविण्यात आली आहे. याचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतात.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: २५.०२.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १५६३/०२**

**श्री. गोरख उत्तम सानप, ---------अपीलकर्ता**
**मु.पो.राजापूर, ता.येवला, जि.नाशिक.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा --------- उत्तरवादी**
**गट विकास अधिकारी, पं.स.येवला, जि.नाशिक.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कक्ष अधिकारी, पं.स.येवला,जि.नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २४.०७.२००९
सूनावणीचा दिनांक : २२.१२.२०१०
अपिलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

अपीलार्थींनी दि.१२.०१.२००९ च्या अर्जान्वये राजापूर, सोमठाण व ममदापूर परिसरातील जि.प.प्राथमिक शिक्षकांची नावे व ते ज्या घरात राहतात त्या घर मालकांची नावे व घरपट्टी भरल्याबाबतच्या झेरॉक्स प्रतींची मागणी केली.

उपरोक्त अर्ज ग्रामसेवक, ग्रा.प. राजापूर व ममदापूर यांच्याकडे दि.१२.०१.२००९ रोजी वर्ग करण्यात आला. तथापि ग्रामसेवकांकडून माहिती मिळू शकली नाही. यास्तव त्यांनी दि.२७.०२.२००९ रोजी प्रथम अपील केले. यावर दि.१४.०५.२००९ रोजी खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात आले.

"ग्रामसेवक,ग्रा.प.राजापूर, ता.येवला यांनी सादर केलेली २६ शिक्षकांची माहिती कर भरल्याच्या पावत्यांच्या प्रतीसह सादर केली आहे ती अपिलार्थींना देण्यात आल्याने प्रकरण निकाली काढण्यात येत आहे."

या उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी गैरहजर होते. त्यामुळे त्यांना नेमकी कोणती माहिती हवी आहे हे आयोगास जाणून घेता आले नाही. सुनावणीसाठी अधिक्षक,शिक्षण विभाग,जि.प.नाशिक व शिक्षणाधिकारी (प्राथ) जि.प.नाशिक अनुक्रमे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने उपस्थित होते.

प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशात ग्रामविकास अधिकारी यांनी २६ शिक्षकांची माहिती सहा स्तंभात अर्जदारास दिली आहे नमूद केले आहे. अर्जदारास ही माहिती खोटी का वाटते याचे कुठलेहि विवेचन त्यांचे अपीलात नाही व ते सुनावणीसहि हजर नाहीत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

हवे असल्यास अर्जदार ग्रामपंचायतीचा रेकॉर्ड तपासून आपली खात्री करुन घेऊ शकतात.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः २५.०२.२०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्र.मुमाआ/अपील/नाशिक/२००९/सीआर-१६१०/०२**

**श्री.शेख मो.बशीर इस्माईल** ------ **अपीलकर्ता**
**रा.१५०९, लक्ष्मीबाई डेरे,कॉलनी, पिंपळगांव बसवंत,**
**ता.निफा४ड,जि.नाशिक - ४२२ २०९**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**विभाग नियंत्रंक, परिवहन महामंडळ,नाशिक विभाग,**
**नाशिक, जि.नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**विभाग नियंत्रंक, परिवहन महामंडळ,नाशिक विभाग,**
**नाशिक, जि.नाशिक**

**- वि वे च न -**

| | |
|---|---|
| माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक | : २०.०५.२००८ |
| जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक | : ११.०६.२००८ |
| प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे दाखल अपिलाचा दि. | : १७.०६.२००८ |
| प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि. | : ९.०७.२००८ |

श्री शेख मो.बशीर इस्माईल यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये उपरोल्लेखित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्याविरुध्द दि.१५.०९.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. कलम १९ (३) खालील या अपिलाची सुनावणी नियोजन हॉल जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक,जि.नाशिक येथे दि.२२.१२.२००९ रोजी आयोजित करण्यात आली होती. या सुनावणीसाठी अपिलार्थी श्री.शेख अनुपस्थित होते परंतु जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते.

**विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल :**

अपीलार्थी श्री.शेख यांनी दिनांक २०.०५.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे पत्र क्र. १३७६,दिनांक ६.११.२००७ चे पत्रानुसार पिंपळगांव बसवंत बर स्थानकात जाऊन कॉल शिटमध्ये एंट्री करतात का. जर वाहन चालक स्थानकात जाऊन लॉक शिटमध्ये एंट्री करीत नसतील तर त्यांच्यावर दंडात्मक किंवा अपराधीन कारवाई का केली जात नाही या अनुषंगाने इतर अनेक मुद्यांवर माहिती मागितलेली होती.

**जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर:**

सदरची माहिती त्यांनी जन माहिती अधिकारी यांची चौकशी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांना पत्र पाठवून मागितलेली होती खरे तर सदरहू माहिती वाहतूक संबंधांत असल्यामुळे त्यांनी अर्ज जन माहिती अधिकारी तथा विभागीय वाहतूक अधिकारी नाशिक यांच्याकडे करणे आवश्यक होते. दिनांक ११.०६.२००८ च्या पत्राव्दारे अपिलार्थीस वेळेत अधिनियमानुसार वेळेत कळविण्यात आले होते. परंतु माहिती मिळाली नाही याकारणास्तव प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे दिनांक १७.०६.२००८ रोजी प्रथम अपिल दाखल केले.

**प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश** :

प्रत्यक्षात अपिलार्थीने मागितलेली माहिती ही राज्य परिवहन महामंडळाच्या अखत्यारातील असुन वाहतुक संबंधीत निगडीत असल्याने त्या विभागाने नियुक्त केलेल्या जन माहिती अधिकाऱ्याकडून माहिती अधिकारी अधिनियम २००५ मधील तरतूदीच्या आधीन राहून प्राप्त करुन घेणे क्रमप्राप्त आहे व त्यानुसार अपिलार्थीस विहित नमूण्यात अर्ज करण्यास सांगण्यात आले होते. त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

**सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती :**

व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते परंतु अपिलार्थीस श्री.शेख अनुपस्थित होते. अपीलार्थीने अनुक्रमांक १ ते ७ व ९ ची माहिती प्रश्नाच्या स्वरुपात मागितलेली होती अधिनियम २००५ नुसार लिखीत स्वरुपात कार्यवाही झालेल्या प्रकरणाची माहिती उपलब्ध करुन देण्याची तरतूद आहे. प्रश्नांना उत्तरे देण्याची तरतूद नाही मुद्या क्रं.५ व ११ ची माहिती अपिलार्थीस दि.१९.१२.२००९ च्या पत्राव्दारे देण्यात आलेली आहे. मुद्या क्र.१० ची माहिती उच्च न्यायालयीन प्रकरणी असल्याने ती उपलब्ध नसल्याने ती देता येत नाही. हे प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे म्हणणे योग्य आहे. मुख्यत: अपिलार्थी सुनावणीस हजर नसल्याने त्यांचे म्हणणे नक्की काय आहे व माहिती कशा प्रकारे हवी आहे याचा कोणताच अर्थबोध होत नाही तरीही जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या लिखित म्हणण्यानुसार उर्वरित माहिती अपिलार्थीस वेळेत व विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: २५.०२.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/ अपील क्रं. १४६६/०२**

**श्री.ब्रायन रॉड्रीग्ज,** **-------अपीलकर्ता**
**१ ला मजला, पिन्टोज आर्केट-२,**
**विक्टोरी सिनेमाजवळ, इगतपुरी,ता.इगतपुरी,**
**जि.नाशिक.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**शिक्षण अधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, नाशिक,**
**जि.नाशिक.**

**जन माहिती अधिकारी**
**गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती, इगतपुरी,ता.इगतपुरी,**
**जि.नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री.ब्रायन रॉड्रीग्ज, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७.०६.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. २१.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय प्राधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे ३०.०१.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमुद केलेली माहिती मागितली

" हॉली फॅमेली हायस्कूल इगतपुरी यांच्या कारभाराविषयी तक्रार व सहकार्य न करणे नोटीशीला उत्तर न देणे त्याचप्रमाणे शिक्षक विद्यार्थी व खाजगी सहकारी यासंबंधीची माहिती मागितली होती. "

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६.०२.२००६ अपिलार्थीस शाळेच्या मुख्याधिपिकांनी कोणत्याही प्रकारे रहदारीस प्रतिबंधात्मक उपाय योजना तसेच इतर बाबींची माहिती दिली तसेच काही माहिती तत्कालीन गट

शिक्षणाधिकारी यांच्याकडून विलंब झाला म्हणून माहिती देण्यास मुदत वाढ द्यावी असे नमूद केले. माहिती अपुर्ण दिली व वेळेत दिली नाही म्हणून अपिलार्थीने प्रथम अपिल दाखल केले.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ९.०४.२००८ च्या आदेशांत वस्तुस्थिती नमूद केली आहे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वेळेत माहिती देण्याचे आदेश दिले तसेच दि.१५.०२.२००८ रोजी अपील केले. यांचे अपीलावर झालेल्या सुनावणी नुसार अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती दिलेली नाही. तेव्हा माहिती उशीरा दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी दंडास पात्र ठरतात असे नमूद केले आहे.

अपिलार्थीस माहिती योग्य वेळेत न मिळाल्यामुळे तसेच माहिती अपुर्ण व दिशाभूल करणारी दिल्यामुळे व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय प्राधिकारी, जन माहिती अधिकारी व अपीलार्थी उपस्थित होते. त्यावेळी निदर्शनास आलेली बाब तत्कालीन जन माहिती अधिकारी सेवा निवृत्त झाले असल्यामुळे माहिती देण्यास उशीर झाला आहे असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. तर अपिलार्थी वारंवार एकाच प्रकारची माहिती मागतात. काही माहिती दिली आहे. उर्वरीत माहिती शाळेकडून उपलब्ध करवून घेऊन देण्यात येईल.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपुरी माहिती १५ दिवसात विनामूल्य पुरवावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २५.०२.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४६४००/अपील क्रं. /०२**

**श्री. सुनिल मुलचंद विश्वकर्मा, -------- अपीलकर्ता**
**नं.८९,खेरवाडी, वांद्रे (पूर्व),**
**मुंबई - ४०० ०५१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलिय प्राधिकारी तथा --------- उत्तरवादी**
**सहायक मनपा आयुक्त,सहायक मनपा आयुक्त,**
**एच/पुर्व, १३७,टीपीस-५, दुसरा रोड, प्रभात कॉलनी,**
**सांताक्रुज (पूर्व), मुंबई ५५**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहायक अभियंता (इ/का), सहायक मनपा आयुक्त,**
**एच/पुर्व, १३७,टीपीस-५, दुसरा रोड, प्रभात कॉलनी,**
**सांताक्रुज (पूर्व), मुंबई ५५**

**--- विवेचन ----**

श्री. सुनिल मुलचंद विश्वकर्मा, यांनी आयोगाकडे दि.८.०१.२०१० रोजी अधिनियमाच्या कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील सादर केले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. १९.१२.२००९ च्या निर्णयात अपिलार्थीस माहिती देण्यात यावी असे निर्देश जन माहिती अधिकारी यांना दिलेले आहेत. मात्र त्याचे पालन झालेले नाही म्हणून आयोगाकडे व्दितीय अपील सादर करण्यात आले आहे.

जन माहिती अधिकारी यांना असे आदेश देण्यात येत आहेत की, त्यांनी हे आदेश मिळाल्यानंतर १० दिवसात प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी निर्देशिल्याप्रमाणे माहिती द्यावी.

जन माहिती अधिकारी यांना असेही निर्देश देण्यात येत आहेत की, त्यांनी अर्ज मिळाल्यानंतर तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी निर्देश देऊनही अपिलार्थीस माहिती दिलेली नाही. यासतव त्यांचेवर अधिनियमाच्या कलम २० अन्वये शास्तीची कारवाई का करुन नये याचा लेखी खुलासा दि. ३० मार्च,२०१० रोजी ५.०० वाजता आयोगासमोर समक्ष उपस्थित राहून सादर करावा. अपिलार्थी सुध्दा त्यांना हवेतर यावेळी उपस्थित राहू शकतात.

**--- आदेश ----**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**संबंधितांनी उपर्निर्दिष्ट कार्यवाही करावी.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक :- २६.०२.२०१०**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

**क्रमांक : रामाआ/नाशिक/अपील क्र. १५१३/०२**

श्री. एल वाय.कुलकर्णी, ---------अपीलकर्ता
श्रीराम बंगला नं.२०, मोदकेश्वर मंदिर, इंदिरा नगर,
नाशिक ४२२ ००९

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा --------- उत्तरवादी
अप्पर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद,
जि.औरंगाबाद

जन माहिती अधिकारी तथा
जिल्हा पूरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद

## - वि वे च न -

श्री. एल वाय.कुलकर्णी नाशिक यांनी त्यांच्या दि.१५.०३.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये श्री.विजय रंगनाथ गवळी,मु.पो.इसारवाडी,ता.पैठण,जि.औरंगाबाद यांचे स्वस्त धान्य दुकान क्र.१९६ चे प्राधिकारपत्र कायमचे समाप्त करणेबाबत व सदर स्वस्त धान्य दुकानाशी संबंधित मुद्देनिहाय माहिती मागितलेली होती.

जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पूरवठा अधिकारी यांनी त्यांच्या दि.५.०६.२००८ रोजीच्या पत्रान्वये श्री.विजय रंगनाथ गवळी यांचे स्वस्त धान्य दुकान क्र.१९६ चे प्राधिकार पत्राची १०० टक्के अनामत रक्कम जमा करुन प्राधिकारपत्र रद्द करण्यात आले असल्याचे कळविले आहे. परंतु सदर पत्रातील संदर्भामध्ये आपले पत्र दि.२.०५.२००८ असा संदर्भ दिलेला आहे. श्री.कुलकर्णी यांनी दाखल केलेला माहिती अर्ज हा दि. १५.०३.२००८ चा आहे. संदर्भामध्ये नमूद केलेले दिनांकाचे पत्र सोबतच्या अपीलामध्ये दिसून येत नाही. माहिती अधिकाऱ्याने दिलेले उत्तर अपूर्ण असून विहीत कालावधीत दिले नसल्याचे दिसते.

जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराने समाधान झाले नाही म्हणून प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे अपील केलेले आहे. त्या अनुषंगाने अपर जिल्हाधिकारी औरंगाबाद तथा प्रथम अपीलय प्राधिकारी यांनी दि.३१.०७.२००८ रोजी आदेश पारित केलेले आहेत. त्यामध्ये असे नमूद केले आहे अपीलार्थीने एकूण १७ मुद्यांची माहिती मागितलेली होती ती माहिती त्यांना विहीत मुदतीत देणे आवश्यक होते तथापि माहिती विहीत वेळेत दिली नसल्याचे सिध्द होते. अपीलार्थीचे अपील मंजूर करुन त्यांना हवी असलेली सर्व माहिती १५ दिवसांत पूरवावी. माहिती उपलब्ध नसल्यास

ज्यांचेशी माहितीचा संबंध आहे त्यांचेकडे अपीलार्थीचा अर्ज कलम ६ (३) नूसार हस्तांतरित करावा व माहिती विनामूल्य द्यावी.

अपीलार्थीने दि.२५.०८.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केलेले असून त्याची सुनावणी दि.२१.१२.२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात अपील अपीलासोबतची कागदपत्रे पहाता जन माहिती अधिकारी यांनी तब्बल ५० दिवसांनी उशिरा माहिती दिली असल्याचे सिध्द होते व त्यास प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी देखील त्यांचे आदेशात माहिती उशिरा दिल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांना एकूण ५० दिवस विलंब केला म्हणून प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.१२,५००/- इतकी शास्ती लादण्यात येत आहे.

जन माहिती अधिकाऱ्याने माहिती देण्यास विलंब केला असल्यास त्याबाबतचे लेखी स्पष्टीकरण तसेच शास्ती संदर्भात खुलासा देण्याबाबत कळवूनही त्यांनी लेखी खुलासा केला नसल्याचे प्रकर्षाने नमूद करण्यात येत आहे. या आदेशाची प्रत जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना देण्यात यावी.

## आदेश

अपील मान्य करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास एकूण ५० दिवसांचा विलंब केला म्हणून प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.१२,५००/- इतकी शास्ती लादण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांनी जन माहिती अधिकारी यांचेवर लादलेल्या शास्तीची रक्कम पुढील दोन महिण्यात वसूल करुन शासनाने विहीत केलेल्या लेखाशिर्षाखाली भरणा करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः २५.०२.२०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक : रामाआ/नाशिक/अपील क्र. १५०९/०२**

**श्री. पंढरीनाथ बाबुराव बोडके** ---------**अपीलकर्ता**
**मु.मोह, पो.चिंचोली, ता.सिन्नर,**
**जि.नाशिक.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** --------- **उत्तरवादी**
**अप्पर पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक यांचे कार्यालय,**
**नाशिक ग्रामीण, नाशिक.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप विभागीय पोलीस अधिकारी, निफाड विभाग,निफाड,**
**जि.नाशिक**

**- विवेचन -**

श्री. पंढरीनाथ बाबुराव बोडके, नाशिक यांनी दि. १७.१२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी, निफाड यांचेकडे माहितीच्या अर्जान्वये देवगांवकर हॉस्पीटल व गुरुकृपा हॉस्पीटल यानी गुन्हेगार रुग्णानंतर उपचार करुन अटकेपासून बचाव करणेकरीता तात्पुरती वैद्यकीय प्रमाणपत्रे इत्यादि चौकशीसाठी दि.४.०६.२००७ व १६.०६.२००७ रोजी दिलेल्या तक्रार अर्जाच्या कार्यवाहीचा अहवाल देण्याबाबत माहिती मागितली आहे. तदनंतर दि.४.०३.२००९ रोजी प्रथम अपील देखील दाखल केले असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी चूकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीने दि.२४.०६.२००९ रोजी दाखल केलेल्या व्दितीय अपीलाची सुनावणी दि.२१.१२.२००९ रोजी नाशिक येथे आयोजित केली होती. सदर सुनावणीस अपीलार्थी अनुपस्थित होते तर जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय उपस्थित होते.

अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी असे दिसून आले की अर्जदाराने मनिऑर्डरने शुल्क भरल्यानंतर दि.१२.०२.२००९ रोजी माहिती दिली आहे. जी चुकीची आहे असे अर्जदाराचे म्हणणे आहे. त्यांनी ती चुकीची का वाटते हे नमूद केले नाही. रेकॉर्ड बरहुकूम माहिती दिलेली असल्याने पुढील आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील अमान्य करण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २५.०२.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/ अपील क्रं. १५४३/०२**

**श्री.रमेश शंकरराव कोतवाल** **-------अपीलकर्ता**
**रा.साकोरेमिग, ता.निफाड,**
**जि.नाशिक.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नाशिक,**
**जि.नाशिक.**

**जन माहिती अधिकारी**
**सहायक निबंधक सहकारी संस्था,निफाड, ता.निफाड, नाशिक,**
**जि.नाशिक.**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री.रमेश शंकरराव कोतवाल यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०.०४.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. २१.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय प्राधिकारी तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे २७.०१.२००९ रोजी अर्ज करुन खालील नमुद केलेली १) महाराष्ट्र सहाकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ नुसार नोंदणी झालेल्या संस्थेच्या संचालक मंडळावर निवडूण आलेल्या नवीन संचालकास किती दिवसात बंधपत्र देणे बंधनकारक आहे. २) निवडून आलेल्या संचालकांनी दोन वा तीन मिळूण संयुक्त बंधपत्र सादर केले त्याची माहिती. ३) बंधपत्राची माहिती खोटी चुकीची असल्याची माहिती. ४) जय बजरंग शेतकरी वि.का.सहकारी संस्था मर्यादित या संस्थेची कार्यक्षेत्राची माहिती. ५) नविन संघ केलेल्या संघाचे

रजिस्टेशन नंबर संपूर्ण पत्ता व कार्यालय असलेल्या संचालक मंडळाची यादी ६) मुदतीत बंधपत्र करण्यासाठी तक्यातील माहिती मिळावी.

जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक १७.०२.२००९ च्या पत्राव्दारे मुद्या क्र. ४ व ५ ची माहिती अपिलार्थीने संबंधीत संस्थेकडून उपलब्ध करुन घ्यावी व मुद्या क्रमांक १ व २ ची माहिती प्रश्नोत्तर स्वरुपात असल्याने ती देता येत नाही असे कळविले.

अपिलार्थीने दिनांक २०.०२.२००९ रोजी प्रथम अपील केले त्यास प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ५.०३.२००९ रोजी पारित केलेल्या आदेशांत अपिलार्थीस मुद्या क्र.१ ते ३ व ४ ते ७ या मुद्यांची माहिती जन माहिती अधिकारी यांना देणे बंधनकारक आहे. २) मुद्या क्र.४ व ५ ची माहिती संस्थाकडून उपलब्ध करुन घ्यावी माहिती अधिकारी यांनी अपिलकारास मुद्या क्र.२,३ व ५ या त्यांचे कार्यालयाशी संबंधित असलेली मुद्याची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

सदरहू माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने दि.३०.०४.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर होते तथापि जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित होते.

जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिनांक ५.०३.२००९ रोजी आदेश देऊनही मुद्या क्र.१,३,४व ७ या मुद्यांची माहिती अपिलार्थीने व्दितीय अपीलाची सुनावणी होईपर्यंत दिलेली नाही व सुनावणीच्या वेळी प्रत्यक्ष हजरही राहिले नाहीत यावरुन जन माहिती अधिकारी यांनी काम रस दिसत नाही अपिलार्थीने अर्ज जानेवारीत केला व डिसेंबर २००९ पर्यंत त्यांना माहिती देण्यात आलेली नाही किंवा तसा प्रयत्नही केलेला दिसत नाही. माहिती असूनही ती देण्याचे टाळणे हे कामचुकारपणाचे लक्षण आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी न करणे त्यांच्या पदाला शोभा देत नाही अशा परिस्थीतीत त्यांच्यावर रु.५०००/- ची शास्ती लादण्यांत येत आहे. ती त्यांच्या १ एप्रिल २०१० रोजी होणाऱ्या पगारातून वसुल करुन शासनाने विहित केलेल्या बजेडहेडमध्ये जमा करावी व तसे केल्याचा अनुपालन अहवाल आयोगास दि.१५ एप्रिल २०१० पर्यंत पाठवावा.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संबंधीत मुद्यांबाबतची तात्काळ मोफत माहिती उपलब्ध करुन द्यावी व शास्तीबाबत अपिलीय प्राधिकारी यांनी उपरिनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**

**दिनांकः २५.०२.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/अपील क्रं. १५११/०२**

**श्री.विजय दौलतसिंग मदन,** **-------अपीलकर्ता**
**विजय व्हिला,व्हिजन हॉस्पीटल जवळ,**
**वितेमळा,कॉलेज रोड,शरणपूर रोड,**
**नाशिक ५**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,**
**पुणे विभाग, साखर संकुल,शिवाजी नगर,पुणे**

**जन माहिती अधिकारी**
**उपनिबंधक सहकारी संस्था,पुणे २,**
**साखर संकुल,शिवाजी नगर,पुणे**

**- वि वे च न -**

श्री.विजय दौलतसिंग मदन, नाशिक यांनी दि.२६.०३.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहाकारी संस्था-पुणे-२ यांचेकडे गुरुप्रसाद को.ऑप हौसींग सोसायटी लि.पुणे-२ या संस्थेशी संबंधित एकूण १० मुद्यांची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी दि.२.०४.२००८ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले की सदर संस्थेस माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू नाही. तसेच माहिती अर्जातील मुद्या क्र.१ ते ५ वरील माहिती सदर संस्थेच्या नोंदणी धारीकेचा शोध घेऊनही कार्यालयात आढळत नाही म्हणून ती माहिती उपलब्ध करुन देता येत नाही उर्वरीत माहिती संस्थेकडे विनंती अर्ज करुन उपलब्ध करुन द्यावी.

जन माहिती अधिकाऱ्यांच्या आदेशाने समाधान झाले नाही म्हणून अपिलार्थीने दि.१३.०५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपिलाच्या अनुषंगाने प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, पुणे विभाग यांनी खालीलप्रमाणे आदेश पारीत केले.

अपीलकर्त्यांच्या दि.२६.०३.२००८ रोजीच्या अर्जातील १ ते १० मुद्यांपैकी त्यांचे कार्यालयात उपलब्ध अर्जातील माहिती अपीलकर्त्यास ८ दिवसात द्यावी. तसेच महाराष्ट्र सहाकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ३२ मधील तरतुदीनुसार अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देणेबाबत संबंधीत संस्थेस लेखी कळवावे.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी आदेश देऊनही जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही म्हणून अपिलार्थीने दि.५.०७.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि.२१.१२.२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. त्यावेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, अपीलकर्ते अनुपस्थित होते.

व्दितीय अपील व त्यासोबतची सर्व कागदपत्रे पाहता असे दिसते की प्रथम अपिलीय प्राधिाकरी यांनी जन माहिती अधिकारी यांना माहिती देण्याबाबत आदेश पारित केलेले आहेत. परंतु जन माहिती अधिकारी यांनी त्याचे पालन केलेले दिसून येत नाही. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सांगितले की

"अपील अर्जातील मुद्या क्र. १ ते १० पैकी १,२,९ व मुद्यांशी निगडीत कागदत्रे उपलब्ध झाल्यास अपीलकर्त्यास देण्यात येतील व उर्वरीत मुद्यांबाबतची माहिती अपीलकर्त्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० तरतूदीनुसार योग्य ती कार्यवाही करुन अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येईल." त्यास अपीलीय अधिकारी यांनी त्यास दुजोरा दिला.

जन माहिती अधिकारी यांना असे आदेश देण्यात येतात की, त्यांनी नस्तीचा कटाक्षाने शोध घ्यावा,तरीही नस्ती आढळत नसेल तर संपुर्ण नस्तीची पुर्नबांधणी करुन अपीलार्थीने मागितलेली संपुर्ण माहिती १५ दिवसांत द्यावी.

जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे आदेशाचे पालन का केले नाही तसेच सुनावणीस स्वत: का हजर राहिले नाही म्हणून त्यांचेवर शास्तीची कारवाई का करु नये याचा खुलासा १५ दिवसात आयोगाच्या मुंबई कार्यालयास पाठवावावा.

या आदेशाची प्रत निबंधक, सहाकारी संस्था, पुणे यांनी देखील देण्यात यावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**जन माहिती अधिकारी यांनी उपरिनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**

**दिनांक: २५.०२.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/ अपील क्रं. १५१५/०२**

**श्री.पांडुरंग सावजी शिंदे** **-------अपीलकर्ता**
**रा.नागोसली, मु.पो.वैतरणानगर,**
**ता.इगतपूरी, जि.नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**अप्पर जिल्हाधिकारी, नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप विभागीय अधिकारी नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : १३.१२.२००६
सूनावणीचा दिनांक : २१.१२.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

अपिलार्थीनी दिनांक १.०९.२००६ च्या अर्जान्वये खालील माहिती मागितली.

१. कार्यालयीन पत्र क्र. एल एक्यू/१२३५/७९ दि.२.०७.१९७९.

२. वैतरणा धरणातील संपादित जमीन परत करण्याबाबतचा आदेशाच्या प्रती.

उपरोक्त अर्जाला दि.११.०९.२००६ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिले. तसेच दि.२०.०९.२००६ च्या पत्रान्वये त्यांना कळविण्यात आले की आपण मागितलेली कागदपत्रे गहाळ झालेली नाहीत तरी त्यांच्या प्रती उपलब्ध करुन देता येत नाही. या उत्तराने व्यथित होऊन त्यांनी दि.५१०.२००६ रोजी प्रथम अपील केले. अपीलात जन माहिती अधिकारी यांचे उपरोक्त उत्तर कायम करण्यात येऊन अपील नाकारण्यात आले. यास्तव त्यांनी आयोगाकडे व्दिती अपील दाखल केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी उत्तरवादींनी आयोगास सादर केले की कागदपत्रांचा शोध घेऊन १ महिन्याच्या आत अपीलार्थींना त्याच्या प्रती पुरविण्यात येतील. आयोगाचे याबाबत असे निदेश आहेत की अपीलार्थींना १ महिन्याच्या आत कागदपत्रांच्या प्रती पुरविण्यात याव्या.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २५.०२.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/ अपील क्रं. १४७९/०२**

**श्री.सुर्यभान वामन गायकवाड,** **-------अपीलकर्ता**
**संभाजी नगर केतकी सोसायटीच्या मागे,**
**म्हसरुळ, नाशिक, ता.जि.नाशिक -४.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता, महा.राज्य विद्युत वितरण**
**कं.मर्यादित उप विभाग कार्यालय, व्दारका चौफुली,**
**नाशिक.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप कार्यकारी अभियंता, महा.राज्य विद्युत वितरण**
**कं.मर्यादित उप विभाग कार्यालय,विद्युत कॉलनी, दिंडोरी रोड,**
**पंचवटी, नाशिक-३.**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री.सुर्यभान वामन गायकवाड, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५.०४.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक,जि.नाशिक येथे दि. २१.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय प्राधिकारी, जन माहिती अधिकारी व अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे २९.११.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमुद करुन चुकीच्या पध्दतीने सी.एफ.एल.बल्ब वितरण एजन्सीने वसूल केलेल्या रकमेसंबंधी झालेल्या त्रासाबद्दल २) ऑथोराईज्ड

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: २५.०२.२०१०**